करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग : १-२

संपादक :

मा. वि. गुजर, बी. ए.

किंमत ७ रुपये

म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार
यांना
प्रेमादरपूर्वक भेट
मा. वि. गुर्जर
20-७-१९५२



करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग पहिला व दुसरा

इ. स. १७०० ते १७६०



संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.



शके १८८३ इ. स. १९६२

प्रकाशक :
मा. वि. गुजर
१३२१ कसबा पेठ, पुणें २.

●

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—
हिस्ट्री ऑफिस, न्यू पॅलेस, कोल्हापूर
किंवा प्रकाशक यांच्याकडे

●

किंमत

रु. ७

(सात रुपये)

●

: मुद्रक :
मा. प. तळेकर
श्रीदत्त मुद्रणालय,
३३५ शनवार, पुणें २.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग पहिला.)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डीतून निवडलेले कागद

छत्रपति शिवाजी महाराजांची कारकीर्द इ. स. १७०० तें इ. स. १७१४

व

छत्रपति संभाजी महाराजांची कारकीर्द इ. स. १७१४ ते इ. स. १७६०

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८३ इ. स. १९६२

निवेदन

करवीर छत्रपति घराण्याचा इतिहास लिहिण्यास उपयोगी असणारे कागदपत्र मिळविण्यासाठीं मी इ. स. १९५६ पासून झटत आहें. त्याकरितां डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणें येथील मराठा हिस्ट्री डिपार्टमेंटचा जो ऐतिहासिक अस्सल कागदपत्रसंग्रह आहे तो चाळला. त्या संग्रहांतील ह्या विषयास उपयुक्त असणारे कागद निवडून त्यांच्या नकला करून त्या सर्व तेथील अधिकाऱ्यांकडून मिळविल्या. त्यानंतर एलिनेशन ऑफिस, पुणें येथें असलेल्या पेशवे दप्तरांतून कागद निवडले. या कागदांच्या नकला करून त्या मुंबई राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेतल्या. पुढें करवीर राज्याची राजधानी असलेलें कोल्हापूर शहर येथें असलेल्या कोल्हापूर स्टेट रेकॉर्ड नांवाच्या पूर्वीच्या करवीर सरकारच्या दप्तरचे कागदपत्र पाहण्यास सुरुवात केली. त्या दप्तरांतून पुष्कळ कागद निवडून त्यांच्या नकला करून त्या डायरेक्टर ऑफ आर्काइव्हज अँड हिस्टॉरिकल मॉन्युमेन्ट्स, मंबई राज्य सरकार—आतां महाराष्ट्र राज्य सरकार—यांच्याकडून प्राप्त करून घेतल्या. कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद प्रसिद्ध करण्यासाठीं महाराष्ट्र राज्य सरकारच्या परवानगीची आवश्यकता होती. त्याप्रमाणें विनंती-अर्ज केल्यानंतर सरकारनें हे कागद छापण्यास परवानगी दिली, त्याबद्दल महाराष्ट्र राज्य सरकारचे मी मनःपूर्वक आभार मानतों. तसेंच या कामीं डॉक्टर पी. एम. जोशी, डायरेक्टर ऑफ आर्काइव्हज ॲण्ड हिस्टॉरिकल मॉन्युमेन्टस यांनीं नानाप्रकारचें साहाय्य मला केलें आहे, हें नमूद करण्यास मला संतोष वाटतो. त्यांनीं केलेज्या ह्या साहाय्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

हे निवडलेले कागद कालक्रमानुसार जुळविले आहेत. करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें यांचे खालीं स्पष्ट केल्याप्रमाणें सात भाग करून ते कागद हल्लीं प्रसिद्ध करावे अशी योजना ठरविली आहे.

भाग पहिला—कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद.

छत्रपति शिवाजीमहाराजांची कारकीर्द. इ. स. १७०० ते इ. स. १७१४

व

छत्रपति संभाजीमहाराजांची कारकीर्द. इ. स. १७१४ ते इ. स. १७६०

भाग दुसरा—पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद.

छत्रपति शिवाजीमहाराजांची कारकीर्द. इ. स. १७०० ते इ. स. १७१४

व

छत्रपति संभाजीमहाराजांची कारकीर्द. इ. स. १७१४ ते इ. स. १७६०

विभाग अ–शाहू दप्तर.

विभाग ब–चिटणीस दप्तर, जमाव दप्तर व पेशवे रोजनिशी.

भाग तिसरा—कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद.
छत्रपति शिवाजीमहाराजांची कारकीर्द इ. स. १७६१ ते इ. स. १८१३.

भाग चवथा—विभाग अ. पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद.
छत्रपति शिवाजीमहाराजांची कारकीर्द. इ. स. १७६१ ते इ. स. १८१३.

व

कालखंड. इ. स. १८१९ ते इ. स. १८२९.

विभाग ब. डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिटयूट पुणें, मराठा हिस्ट्री डिपार्टमेंट ऐतिहासिक कागदपत्र संग्रहांतून निवडलेलें कागद.
छत्रपति शिवाजीमहाराजांची कारकीर्द इ. स. १७६१ते इ. स. १८१३

व

कालखंड इ. स. १८२१ ते इ. स. १८४४.

भाग पांचवा—कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेलें कागद.
छत्रपति संभाजी ऊर्फ आबासाहेबमहाराजांची कारकीर्द इ. स. १८१३ ते इ. स. १८२१.

भाग सहावा—कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद.
छत्रपति शहाजी ऊर्फ बुवासाहेबमहाराजांची कारकीर्द. इ. स. १८२१ ते इ. स.१८३८.

भाग सातवा—कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद.
छत्रपति शिवाजी ऊर्फ बाबासाहेबमहाराजांची कारकीर्द. इ. स. १८३८ ते इ. स.१८६६

व

कालखंड इ. स. १८६७ ते इ. स. १८७८.

या साधनग्रंथांत कांहीं कागदपत्रांचें पुनर्मुद्रण केलें आहे आणि ते कागद प्रथम प्रसिद्ध करण्याचें श्रेय कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, कै. काशीनाथ नारायण साने, कै. वासुदेव वामनशास्त्री खरे, कै. गणेश चिमणाजी वाड, कै. दत्तात्रय बळवंत पारसनीस, व कै. गोविंद सखाराम सरदेसाई या विद्वान् इतिहाससंशोधकांना आहे. तसेच कै. बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं कोल्हापूर राज्याचा इतिहास, उत्तरार्ध भाग १ व भाग २ हीं दोन पुस्तकें लिहून तीं सन १८८६ व सन १८९२ इसवीमध्यें प्रसिद्ध करून या कार्याचा पाया घातला आहे. तेव्हां या सर्व विद्वानांनीं कसोशीनें केलेल्या ऐतिहासिक संशोधनकार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख मी येथें करतों.

कागदपत्रांचे काल निश्चित करण्यासाठीं भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें या संस्थेंतील संशोधकांनीं परिश्रमपूर्वक तयार केलेल्या कालनिर्णयसुधारणापत्रिकेचा

(हस्तलिखित प्रत) मला पुष्कळच उपयोग झाला, याबद्दल भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें या संस्थेच्या कारभारी-मंडळाचे व तेथें काम करणाऱ्या संशोधकांचे मी आभार मानतों. याच संस्थेंतील प्राध्यापक ग. ह. खरे यांनीं मला जरूर असलेली माहिती पुरविण्याचें कार्य मोठ्या आस्थेनें केलें आहे त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतों. श्री. शंकरराव शिंदे, रेकॉर्ड कीपर, कोल्हापूर स्टेट रेकॉर्डस यांनीं मला या दप्तराची संपूर्ण माहिती देऊन माझ्या संशोधनकार्यांत तेथें निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यास मोठ्या आस्थेनें मदत केली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. भारत इतिहास संशोधक मंडळानें आपल्या ग्रंथालयांतील पुस्तकें देऊन मला बहुमोल साहाय्य केलें तें मी येथें नमूद करतों.

करवीर राज्यांतील जहागीरदार, सरदार, सरंजामी इनामदार, देसाई, देशपांडे यांच्या दप्तरांची तपासणी करून त्यांतून ऐतिहासिक महत्त्वाचे कागद निवडून त्यांच्य विषयींचें हें साहित्य छापून त्याचा वेगळा साधनग्रंथ प्रसिद्ध करण्याची माझी अपेक्षा आहे. जर पत्रसंख्या पुष्कळच असेल तर या प्रकारचे अनेक भाग घराणेंवार वेगवेगळे प्रसिद्ध करण्याचा माझा मनोदय आहे.

शेवटीं ज्यांच्या प्रोत्साहनानें मी ही साहित्यसेवा करीत आहें त्या थोर श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, हिंदुपदपातशहा, महाराज सरकार करवीर यांचे मी मनःपूर्वक आभार मानून हें निवेदन पूर्ण करतों.

१३२१ कसबा पेठ, पुणें २.
मिति फाल्गुन कृष्ण ९ शके १८८३
ता. ३०-३-१९६२

मा. वि. गुजर

प्रस्तावना

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग पहिला, यांत कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद छापले आहेत. ही पत्रसंख्या ११० आहे. या पत्रांतील ऐतिहासिक मजकुरासंबंधीं सारांशरूपानें दिग्दर्शन पुढें केलें आहें.

सिदोजी इंगवले किल्ले सज्जनगडाच्या युद्धांत स्वामिकार्यावर पडले; सबब त्यांचे पुत्र मत्याजी इंगवले यांना छत्रपति शिवाजीमहाराजांनीं नूल गांवीं जमीन इनाम दिली ही माहिती ले. १ मध्यें आहे. सिदोजी हिंदुराव घोरपडे, ममलकतमदार यांना चिकोडी तालुक्यांत छत्रपति संभाजीमहाराजांकडून नाडगौडकीचें वतन मिळतें, हा मजकूर ले. ४ मध्यें आहे. सेनापति घोरपडे घराण्यांतील पुरुषांनीं मराठ्यांच्या राज्यरक्षणासाठीं जी थोर कामगिरी केली त्याचें त्रोटक वर्णन ले. ५ मध्यें आहे. रामचंद्रपंत अमात्य यांनीं संताजी घोरपडे सेनापति यांना हुजूरचीं वस्त्रें आणून दिलीं हा महत्त्वाचा उल्लेख याच लेखांत आढळतो.

रामाजी महादेव सभासद यांना संभाजीमहाराज मोकासा वतन देतात हा मजकूर ले. ७ मध्यें आहे. कर्नाटक प्रांतांतील सोंधे संस्थानाकडून तहाप्रमाणें ठरलेली खंडणी मिळत असलेल्या ऐवजाचा हिशेब ले. ८ मध्यें दिला आहे. येथें हिंदुराव घोरपडे व नरगुंदकर या प्रसिद्ध व्यक्तींची माहिती मिळते. विद्यावंत जोतिषशास्त्रनिपुण दशरथ ज्योतिषी जोसीराव यांनीं आपल्या चारहि पुत्रांस विद्याभ्यास शिकवून स्वामींच्या सेवेस तत्पर केलें; सबब, संभाजीमहाराजांनीं त्यांना वृत्तीसाठीं एक गांव इनाम दिला, हा मजकूर ले. १० मध्यें आहे. पिराजी घोरपडे नवकस यांना मिरज प्रांताची सरदेखमुखी मिळते. याच सुमारास त्यांनीं आपले पुत्र राणोजी घोरपडे यांना सरदेशमुखीचा मामला सांगितला ही माहिती ले. १३, १४, १५, १६ व १७ मध्यें दिली आहे. पुढें छत्रपति शाहूमहाराज, सातारा यानीं पिराजी घोरपडे यांना कुरुंदवाड गांवाचा मोकासा दिला, हें ले. १८ व १९ वरून निदर्शनास येतें. तथापि, छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांनीं राणोजी घोरपडे वजारतमाब यांना ता. १४-११-१७२२ रोजीं मोकासा बाब करार करून दिली ही माहिती ले. २० ते ले. ३१ या आज्ञापत्रांत आढळते. राणोजी घोरपडे यांना मिरज प्रांतांत सरंजाम आहे तेथें त्यांना उपसर्ग देऊं नये म्हणून संभाजीमहाराजांनीं उदाजी चव्हाण हिंमतबहाद्दर यांना एक आज्ञापत्र पाठविलें. (ले. ३४) सोंधे संस्थानाकडून घेत असलेल्या खंडणीच्या हिशेबाचा तक्ता ले. ३५ मध्यें दिला आहे. येथें गंगाधर पंडित सुमंत या व्यक्तीचा उल्लेख मिळतो. व्यंकटराव नारायण घोरपडे, इचलकरंजीकर यांना शाहूमहाराज, सातारा यांजकडून कांहीं

गांवांचा मोकासा मिळाला (ले. ३२, ३३, ३६). काजीस दिलेलें इनाम त्याजकडे चालविण्याबद्दल उदाजी चव्हाण हिंमतबहाद्दर यांस संभाजीमहाराज करवीर यांनीं एक आज्ञापत्र पाठविलें (ले. ३७). सोंधे संस्थान व संभाजीमहाराज यांचा परस्पर पत्रव्यवहार ले. ४०, ४१, ४२, १०१ या लेखांत आहे. नागोजीराव पाटणकर यांनीं आपणांस तारळ्याची देशमुखी मिळावी म्हणून संभाजीमहाराज, करवीर यांना विनंती केली तो मजकूर ले. ४५ मध्यें आहे. यासंबंधीं अधिक माहिती ले. ९५ मध्यें आहे. शाहूमहाराज, सातारा यांनीं राणोजी बिन पिराजी घोरपडे यांना वतन दिल्याची माहिती ले. ४६, ४७, ४८ व ४९मध्यें आहे. दोघां राजबंधूंच्या भाऊबंदकीच्या तंट्याचा शेवट व्हावा म्हणून संभाजीमहाराजांनीं शाहूमहाराजांना एक मार्मिक व समयोचित पत्र पाठविलें. तसेंच त्यांनीं शाहूमहाराजांची रक्षा विरूबाई यांच्याशीं पत्रव्यवहार केला. ले. ५०, ५१ ५२ हे लेख याच प्रकरणासंबंधीं आहेत. संभाजीमहाराज व शाहूमहाराज या दोघां राजबंधूमध्यें ठरलेल्या तहनाम्याची माहिती ले. ५३, ५४ व ५५ मध्यें आहे.

राणोजी घोरपडे नवकस देशमुख यांना संभाजीमहाराज वतन देतात ही माहिती ले. ५६ व ५७ या लेखांत आहे. पिराजी घोरपडे झुंजांत निधन पावले हा उल्लेख ले. ५९ मध्यें आढळतो. जानराव बिन केदारजी धारराऊ, अमिरुलउमराव यांना संभाजीमहाराजांनीं गोकाक परगण्यांत नवीन गांव इनाम दिला (ले. ६०). शिवलिंग सिवराम वजारतमाब देसाई, परगणे गोकाक याना संभाजीमहाराजांनीं एक आज्ञापत्र पाठविलें (ले. ६२). सेनापतीकडे सरंजाम म्हणून चालत असलेल्या मुलखाची नांवनिशीवार यादी ले.६८ मध्यें आहे. संभाजीमहाराजांनीं राणोजी घोरपडे यांना देशमुखी वतनाची सनद दिली, त्या सनदेंत घोरपड्यांच्या पूर्वजांनीं केलेल्या स्वामिसेवेचें गौरवपूर्ण वर्णन आढळतें (ले. ६९, ७४, ८९). जिवाजी खंडेराव चिटणीस यांची चिटणिसी, कारखाननिसी, जमेनिसी व पन्हाळा प्रांताची नाडगौडकी हे धंदे करवीर राज्यांत चालावे म्हणून शाहूमहाराजांनीं संभाजीमहाराजांना एक पत्र लिहिलें (ले. ७६). राणोजी घोरपडे यांना संभाजीमहाराजांनीं सेनापतिपद व त्या पदाचा सरंजाम पूर्ववत्प्रमाणें करार करून दिल (ले. ८१).

शाहूमहाराज, संभाजीमहाराज व विरूबाई यांचा परस्पर जो पत्रव्यवहार झाल त्यासंबंधीं ले. ८३, ८४, ८५ व ८६ हे लेख आहेत. प्रतापसिंगजी राजे, तंजावर राज्य यांनीं संभाजीमहाराज व महाराणी जिजाबाईसाहेब, करवीर यांना मकरसंक्रमणाचे तिळगूळ पाठविले (ले. ८७, ८८). संभाजीमहाराजांनीं व्यंकटराव नारायण जोशी, घोरपडे, इचलकरंजीकर यांना स्वामीसेवेबद्दल इचलकरंजी व इतर गांव इनाम करार करून दिले. पुढें व्यंकटराव नारायण यांनीं संभाजीमहाराजांची सेवा एकनिष्ठेनें करावी, त्याबद्दल सेनाखासखेल यांच्या मध्यस्थीनें तेरा कलमांची एक करारयादी केली (ले. ९०, ९१). त्यानंतर सोंधे प्रांतांतील करवीर राज्याचीं ठाणीं व्यंकटराव नारायण यांनीं बसवून द्यावीं म्हणून शाहूमहाराजांनीं त्यांनाच आज्ञा केली (ले. ९२).

शेषो नारायण यांनीं स्वामिसेवा एकनिष्ठेनें केल्याबद्दल त्यांस संभाजीमहाराजांनीं एक गांव इनाम दिलें (ले. ९६). संभाजीमहाराज यांच्याशीं कर्नाटक प्रांतांतील देसाई व देशपांडे यांनीं मर्यादेनें निष्ठापूर्वक वर्तणूक ठेवावी म्हणून शाहूमहाराजांनीं तेथील देसाई व देशपांडे यांना एक आज्ञापत्र पाठविलें (ले. ९८). मुरारराव घोरपडे हुजूर स्वामींच्या दर्शनास करवीर मुक्कामीं आले व त्यांनीं स्वामिसेवा निष्ठेनें करून हुजूर स्वामींना संतोषी केलें. (ले. ९९).

करवीर राज्य व सातारा राज्य हीं दोन्हीं राज्यें शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर एक करून करवीर छत्रपति महाराजांचा एकछत्री शिक्का चालावा असा करार संभाजीमहाराज आणि बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे व त्यांचे चुलत बंधु सदासिव चिमणाजी ऊर्फ सदाशिवराव भाऊ यांच्यामध्यें झाला (ले. १००). शाहूपटी या नांवाखालीं जो वसूल होत असे त्याचा हिशेब ले. १०४ मध्यें आढळतो. मातोश्री महाराणी ताराबाई यांनीं नानासाहेब पेशवे यांच्या अर्जीस दिलेलें कलमवार उत्तर ले. १०८ मध्यें आहे. याच लेखांत छत्रपति रामराजेमहाराज, सातारा यांच्या पूर्ववृत्ताचा तपशील आहे. ले. १०५, ८३, ८४, ८५, ८६, हे लेख या प्रकरणासंबंधीं पुष्कळच माहिती देतात. अशा रीतीनें या पुस्तकांत आलेले ११० कागद मी वाचकांपुढें मांडीत आहें.

१३२१ कसबापेठ, पुणें नं. २
मिति फाल्गुन कृष्ण ९ शके १८८३ — मा. वि. गुजर
ता. ३०-३-१९६२

दुरुस्ती भाग १

पृ. १ निवेदन ओळ ११ ‘ मंबई ’ च्या ऐवजीं ‘ मुंबई ’ वाचावे.

पृ. २ निवेदन ओळ १५ ‘ तंभाजी ’ च्या ऐवजीं ‘ संभाजी ’ वाचावें.

पृ. ३ निवेदन ओळ ११ ‘ त्यांच्य ’ च्या ऐवजीं ‘ त्यांच्या ’ वाचावें.

पृ. १ प्रस्तावना ओळ २ ‘ रेकाडातून ’ च्या ऐवजीं ‘ रेकॉर्डातून ’ वाचावें.

पृ. १ प्रस्तावना ओळ १९ ‘ सरदेखमुखी ’ च्या ऐवजीं ‘ सरदेशमुखी ’ वाचावें.

पृ. २ प्रस्तावना ओळ २४ ‘ दिल ’ च्या ऐवजीं ‘ दिला ’ वाचावें; ओळ २६ ‘ झाल ’ च्या ऐवजीं ‘ झाला ’ वाचावें.

पृ. ३ प्रस्तावना ओळ ६ ‘ संतीषीं ’ च्या ऐवजीं ‘ संतोषी ’ वाचावें.

पृ. १ ओळ २६ ‘ सुमा ’ च्या ऐवजीं ‘ सुा ’ वाचावें.

पृ. ११ ओळ २० ‘ सुमा ’ च्या ऐवजीं ‘ सुा ’ वाचावें.

पृ. २७ ओळ ३ ‘ वौज ’ च्या ऐवजीं ‘ मौजे ’ वाचावें

पृ. ४३ ओळ २२ ‘ सुरूरूप ’ च्या ऐवजीं ‘ सुखरूप ’ वाचावे.

पृ. ४७ ओळ ८ ‘ वैश ’ च्या ऐवजीं ‘ पौश ’ वाचावें.

पृ. ६२ ओळ खालून ४ ‘ इ. स. १७३८ ’ च्या ऐवजीं ‘ इ. स. १७२९ ’ वाचाथें.

पृ. ६३ ओळ खालून १३ ‘ इ. स. १७३८ ’ च्या ऐवजीं ‘ माहे मार्च १७३६ इसवी नंतर ’ वाचावें.

पृ. ६४ ओळ १५ ‘ मुलेकेकरानिसी ’ च्या ऐवजीं ‘ मुलेलेकरानिसी ’ वाचावें.

पृ. ६४ ओळ २३ ‘ इ. स.१७३८ ’ च्या ऐवजीं ‘ माहे मार्च १७३६ इसवी नंतर ’ वाचावें.

पृ. ६५ ओळ खालून १३ ‘ इ. स. १७३८ ’ च्या ऐवजीं ‘ इ. स. १७२९ ’ वाचावें.

पृ. ७७ ओळ २२ ‘ सोकल ’ च्या ऐवजीं ‘ मोकल ’ वाचावें.

पृ. ८१ ओळ ११ ‘ सुमा ’ च्या ऐवजीं ‘ सुा ’ वाचावें.

पृ. ८३ ओळ २ ‘ कारावतो ’ च्या ऐवजीं ‘ तो करावा ’ वाचावें.

पृ. ८४ ओळ खालून ५ ‘ ककन ’ च्या ऐवजीं ‘ करून ’ वाचावें.

पृ. ८५ ओळ १० ‘ ७७६० ’ च्या ऐवजीं ‘ १७६० ’ वाचावें.

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्. बी. ए.

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग १

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग पहिला)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख ३०-१२-१७००

श्री

रु. नं. १
अ. नं. ३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २७ विक्रमनाम संवत्सरे पौष शुद्ध प्रतिपदासह द्वितिया इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति स्वामी यानी

राजेश्री यादवराऊ शिवदेऊ मुख्य देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी सुभा प्रां आजरे यासी आज्ञा केली ऐसीजे मा मत्याजी इंगवले नाईक दिा पाकाल्य यानी स्वामीचे सेवेसी विनंती केली की आपले बाप सिदोजी इंगवले यानी तीर्थरूप राजेश्री कैलासवासी स्वामीची सेवा मनोभावे केली याकरिता तीर्थरूप राजेश्री मेहरबान होऊन कैलासवासी स्वामी याजवरी मेहरबान होऊन करयात नूल प्रां आजर येथे एक चावर जमीन इनाम अजरामऱ्हामत करून दिले होत त्याप्रमाणे माहली देशाधिकारी यानी गावगना जमीन नेमून देऊन अजीवर चालविले आहे ऐसीयास आपला बाप स्वामी कार्यावर किले सजनगडी पडलो व इनामाचा कागद होत तेही गलबलेयाचे प्रसंगात गेले पुढे उत्तरोतर भोगवटा इनामाचा करून परंपरेने चालला पाहिजे तरी साहेबी मेहरबान होऊन नवी सनद द्यावयास आज्ञा केली पाहिजे म्हणोन त्याजवरोन मनास आणिता सिदोजी इंगवले यानी तीर्थरूप राजेश्री कैलासवासी स्वामीची सेवा एका अंतकरण केली याकरिता त्यास एक चावर इनाम दिले होत हली त्याचे लेकराचे लेकरी चालवणेस स्वामीस अगत्य या निमित्य मत्याजी इंगवले यावरी स्वागी कृपालु होऊन को नुलेपैकी जमीन खेरीज हकदार पेशजी सिदोजीस इनाम दिले होत ते यासी अजरामऱ्हामत करून दिले असे तर पेशजी गावगना इनाम चालत आहे त्याजप्रमाणे यासी व याचे वंशपरंपरे चालवणे दरसाल ताजा सनदेचा उजूर न करणे तालीक लेहून घेऊन असल सनद भोगवट्यास याजवल परतून देणे जाणिजे निर्देश समक्ष मोर्तब. तेरीख छ २९ रजब सुमा इहिदे मया. (तारीख २९-१२-१७००)

लेखांक २ तारीख ८-१-१७१३

श्री

अ. नं. ५९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३९ नंदननाम संवत्सर पौष बहुल सप्तमी
सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति याणी मोक

दमानी मौजे निर्वांडी ता ३८
माहालाबाबद

यासी आज्ञा केली येसीजे मौजे मजकूर पेशजीच्या मोकासियाकडोन दूर करून हाली राजश्री मोरेश्वर रामचंद्र याजकडे जमावाच्या बेगमीबदल मोकासा दिल्हा आहे तरी मशारनिल्च्या रजातलबे वर्तोन खंडणीप्रमाणे येवज पावणे दुसरियाकडे वसूल न देणे जाणिजे लेखनालंकार मोर्तब आसे.

लेखांक ३ तारीख ३१-८-१७१४

श्री

रु. नं. १
अ. नं. ४

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री व्यंकटराऊ नारायण गोसावी यासी स्नेहपूर्वक सिद्‌पा देसाई सरनाईक पो हुकेरी जोहार विनंती सु।। खमस आशर मया आलफ विशेस आमचा इनाम गाव मौजे शिवापूर का। सोलापूर हा गाव गोसावियासी दिला आहे मौजे मजकुरचे हक वेडकी देखील इनाम देखील आम्ही आपले आत्मसंतोषे तुम्हासी दिले आहे वंशपरंपरेने अनुभवने हे विनंती.
छ १ रमजान विंनंती

असल मुताबक नक्कल.

लेखांक ४ तारीख १७-६-१७१६

श्री

अ. नं. ६७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४३ त्रेतालीस दुर्मुखीनाम संवत्सरे आशाढ शुध्ध नौमी भानुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्री राज्या शंभु छत्रपति स्वामी याणी समस्त राज्य-कार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री सिदोजी हिंदुराव घोरपडे ममल्कतमदार यासी दिल्हे वतनपत्र येसेजे तुम्ही श्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक तुमचे पिते राजश्री हिंदुराव याणी तीर्थस्वरूप राजश्री कैलसवासी स्वामीची शेवा राज्याभिव्रद्धीविसी

असाधारण श्रमसाहास करून त्याची कृपा संपादून घेतली तसेच तुम्हीही स्वामीची सेवा येकनिस्ठेन करीत आहा तुमचे चालवण स्वामीस आवश्यक आहे प्रस्तुत तुम्ही राजेश्री गंगाधरराव केशव यासमागमे विनंती सांगोन पाठविली की चिकोडीचे नाडगौडकीचे वतन आपणास आजन्हामरामत करून दिल्हे पाहिजे म्हणोन मशारनिलेनी विनंती केली त्यावरून मनास आणिता तुम्ही स्वामीचे कार्यकर्ते येकनिष्ट शेवा करीत आहा तुमचे चालवणे स्वामीस परम आवश्यक याजकरिता स्वामी तुम्हावर कृपालु होऊन इनाम चिकोडीचे नाडगौडकीचे वतन नूतन आजन्हामरामत करून दिल्हे असे तरी तुम्ही सदरहू नाडगौडकीचे वतन आनभवणे या वतनास हक व लाजिमा मोईनीप्रमाणे घेत जाणे आणि नाडगौडकीचे वतन तुम्ही व तुमचे वौश पुत्रपौत्रादि वौशपरंपराने आनभऊन सुखरूप राहणे. जाणिजे छ बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ आसा. मोर्तब सिकेचे.

लेखांक ५ इ. स. १७१६

रुमाल नं. १ (अ)

निवडी दप्तर

श्री

नं. १३

यादी सेनापतिपदाप्रकरणी पूर्वी शककर्ते माहाराजास राज्याभिषेक शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध।। १३ खमससबैन व अलफ मंदवारी जाला ते समई हंसाजीराव मोहिते हंबीर-राव बीडकर यास दिल्हे ते संभाजी माहाराजाचे कारकीर्दीत मोहिते वारलेवर धनसिंगराव जाधवराव यास राजशके १० शके १६०५ आर्बा समानीन व अलफ साली दिल्हे पुढे संभाजी राजे यास शके १६१० ज्येष्ठ शु।। १४ संगमेश्वराहून धरून नेऊन औरंगजेब याणी तुलापूर मु।। मारिले त्यानंतर राजारामसाहेब रायगडाहून विशालगडास आले तेथे असता जुलफकारखान याणी येऊन रायगडास वेढा दिल्हा व फौज हिंडू लागली प्रांत खराब जाला त्या काली धनसिंगराव जाधवराव याजसमागमे सरदार व फौज देऊन रवाना केले त्याकाली संताजी घोरपडे तिघे बंधू हे माहालोजीचे पुत्र ते वाई प्रांती पाटिलकी करून होते थोरले माहाराजा-पासी पाच स्वारानी चाकरी करीत असता शूर मर्द पाहून दाहा स्वार करून दिल्हेवर काजकामे केली म्हणून दोनशेहे स्वारानिशी ठेविले शककर्ते माहाराजानी संभाजी राजे यास पनालेस ठेविले वली (वेळीं) फौज ठेविली त्याची सरनोबती माहालोजीस दिल्ही होती संभाजीराजे याची कृपा म्हणून जवल होते संगमेश्वराहून नेहलेवेली घोरपडे सरकार कामावर पडले त्याचे जेष्टपुत्र १ संताजी २ बहिरजी ३ मालोजी हे तीन हजार स्वारा निसी राजारामसाहेब याजपासी होते सेनापति बराबर दिल्हे ते माहादेव मु।। फौजसुध्धा जाऊन लढाई करावी इतकेत तिघे बंधू आपली फौज ३००० घेऊन पादशाहाचा मु।। तुलपुरी + + फौजेनिसी असता निघाले ते तिसरे रोजी जाऊन रात्री छापा घालून डेरेचे तणावे तोडून शर्तमर्द केली तेथून परभारच विशालगडास माहाराजापासी आले

पाहून बहुत संतोष होऊन संताजी घोरपडे यास ममलकतमदार व बहिरजी घोरपडे यास हिंदूराव व मालोजी घोरपडे यास अमिरुलउमराव असे किताब दिल्हे व वस्त्रे भूषणे दिल्ही माहादेवाचे मु।। लढाई होऊन फौज उधलली आणि रायगडाहून झुलफकारखान याणी तह करून शाहू माहाराज वय वर्षे आठ व येसूबाईसो वगैरे घेऊन तुलापुराचे मु।। गेले बेगमेयाणी आपले स्वाधीन घेतले ते तेथे येकोणीस वर्षे होते पुढे राजारामसो याणी विच्यार केला की शाहू माहाराज धरून नेहले फौज उधलली गेली पादशाहाचे फौजेचा दंगा भारी जाला या प्रांती टिकाव होत नाही म्हणोन चंदीस निघाले जाधवराव गेले ठिकाण नाही ते आलेस उत्तम न आलेस सेनापतिपद संताजी घोरपडे यास द्यावे म्हणोन अमात्य यास सांगून चंदीस पौष्यमासी गेले जाधवराव आले नाहीत सबब माघमासी अमात्य याणी संताजी घोरपडे यास दिल्हे राजशक १५ शके १६१० आर्बा * समानीन साली नंतर सेनापति वगैरे तिघे बंधू याणी मुलुक काबीज केला व पादशाहाचे फौजेसी लढाई दिल्ही अमात्य याचे विच्यारात चालत होते हुजूरची वस्त्रे पाहिजेत म्हणून अमात्य यास विच्यारिलेवरून वस्त्रे आणऊन दिल्ही राजशक १९ शके १६१४ सलास तिसैन व अलफ नंतर जाधवराव चंदीस गेले तेथे त्यानी काजकामे केलेवर याची पूर्वीची सेनापती असता दुसरेस दिल्ही म्हणोन रघुनाथराव हणमंते व प्रल्हाद निराजी याचे हातून विनंती करऊन वस्त्रे घेतली राजशक २० नंतर स्वारी देशी आली औरंगाबादेस पादशाहाचा मुकाम होता तेथे जाऊन आलेवर सिंहगडी काल जाला शके १६२१ राजशक २६ फाल्गुन व।। ८ नंतर थोर पत्नी ताराबाई याचे पुत्र शिवाजीराजे कनिष्ट राजसबाईसो याचे पुत्र संभाजीराजे या उभयतास ताराबाईसो याणी घेऊन अमात्य व प्रांतनिधि परशरामपंत कारभारी व सेनापति जाधवराव याप्रो। राज्य चालवित असता शाहू माहाराज पादशाहाचा काल शके १६२८ पौष्य वद्य ३० जालेवर येकूणिसावे वर्षी शके १६२९ साली देशी आले राजशके ३४ समान मया व अलफ यात त्याजकडे मंडली गेली त्यात सेनापति गेले व वारणेचा तह जाला आईसो उभयता पुत्रासह पनालेस चालली शाहू माहाराज सातारेस चालले सिवाजी राजे याणी शके १६३१ राजशक ३६ सन अशर मया व अलफचे साली संताजी घोरपडे यास सेनापतीची वस्त्रे जाली नंतर दुसरे लग्न संताजी घोरपडे याणी करून घेऊन म्हसवडास आले याचा व माने याचा वयमनश्य पूर्वीचा होता सबब दगा करून घोरपडे यास तेथेच मारिले शके १६३५ सन आर्बा अशर मया व अलफ नंतर कारणपरत्वे द्वारकाबाई घोरपडी सातारेस गेली तेथून आणऊन पिराजी घोरपडे यास सेनापतीची वस्त्रे दिल्ही कारकीर्द सिवाजीराजे व आईसो शके १६३७ राजशक ४२ सन सीत अशर मय्या व अलफ त्यापासून घोरपडे याचे घरांत सेनापतिपद चालत आहे.

---

* 'आर्बा' असें हस्तदोषामुळें लिहिलें गेलें असावें.. तेथें 'तिस्सा' हें पाहिजे..

लेखांक ६ तारीख १२-११-१७१७

श्री

अ. नं. ६९

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनाम संवत्सरे कार्तिक बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

राजश्री देशाधिकारी व कारकून व-
र्तमान भावी सुभा परगणे कुडाल

यासी आज्ञा केली यैसीजे जागण प्रभु देसाई पा। मजकूर हे पूर्वी कोट कुडाल येथे होत त्यास खेमसावंताने परीघ कोटास घालून कोट हस्तगत केला तेसमई बरी शर्त करून जागण प्रभु स्वामी कार्यावरी खर्च जाहाला त्याच्या बायका कासीबाई व येसूबाई उभयेता आहेत याचा योगक्षेम चालावा हे स्वामीस आवशेक यास्तव स्वामी उभयेता बायेका याजवर कृपाळु होऊन शंभर होन निशाणी होनाचा गाव इनाम द्यावा यैसा सिध्धांत करून यास नूतन इनाम कुलबाब कुलकानु खेरीज हाकदार व इनामदार करून मौज आडेली ता। तलवड हा गाव इनाम आजरामरामत करून दिल्हा असे तरी तुम्ही मौज मजकूर सदरहुप्रो। इनाम यास नेमून देऊन बायेकाचा योगक्षेम चालोन सुखरूप राहेत ते गोष्ट करणे सालदरसाल ताजा सनदेचा उजूर न करणे तालीक लेहून घेऊन असल सनद परतोन देणे. जाणिजे निर्देश समक्ष मोर्तब असे.

लेखांक ७ तारीख १२-११-१७१७

श्री

अ. नं. ६८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनाम संवत्सरे कार्तिक बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

मोकदमाण मौजे होरवडे ता।
तलवड प्रा। कुडाल यासी
आज्ञा केली यैसीजे मौज

मजकूर पेशजीचा मोकासियाकडून दूर करून हाली राजश्री रामाजी बावाजी सभासद याकडे वेतनाचे यैवजी मोकासा दिल्हा आसे तरी तुम्ही यासी रुजुवात राहोन मुकासबाबेचा यैवज याकडे बिलाकुसूर पाववणे. जाणिजे निर्देश समक्ष मोर्तब असे.

लेखांक ८ तारीख २८।१।१७१८

श्री

अ. नं. ७०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनाम संवत्सरे माघ शुध अष्टमी भोम-

वासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री भानजी बलाळ हेजीब मुा सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे संस्थानचा प्रतिवार्षिक तह रुपये ३५०००८

बिा

संस्थानसंबंधे × × × × पंचमहालसंबंधे रुपये १००००८

येकून रुा येकसाला × × × सीत अशर मया व अलफ तो सन समान अशर मया व अलफ येकून सिसाला रुा १०५००० यक लक्ष पांच हजार याचा वसूल राजश्री घंटया (घंटपा) व गौतपा नाईक याचे विद्यमाने तुमचे गुजारतीने जाला

रुपये बिा

हुजूर पावले रुपये

५०५०० यैन सिसाला

४८००० रुजू हिसेब

२५०० हिसेबामुले जाजती हिंदु रायाचे यैवज पैकी रुजू हिसेब सनसमान

———

५०५००

६००० सोडी चौसाला द्या सन सीत तो सन तिसा रुपये.

१२००० पैकी

८००० यैन संस्थानाचे तहापैकी

४००० अंत्रजबाबत चौसाला

———

१२०००

पैकी सिसाला + + + +

यासी वजा अंत्रज + +

बाकी संस्थानकडे सिसाल वेरीज

———

५६५००

राजश्री हिंदुराऊ घोरपडे याजकडे परभारा वसूल जाला

रुपये

१२५०० सन सीत

१०००० सन समान

———

२२५००

तेरीज

८२५०० हुजूर पावले

२२५०० हिंदुरायाकडे पावले

———

१०५०००

१४५०० राजश्री हिंदुराव याचे यैवज पैकी
नरगुंदकरास व बरकड लस्करास
देविले रुपये

७१०००
११५०० किा यैवज रुजू हिसेब सन समान
यैवजबाबत हिंदुराऊ

८२५००

येकून यक लक्ष पांच हजार रुपये तुमचे गुजारतीने हुजूर पावले इा जेष्टमास मन्मथसंवत्सर ता जेष्ट मास विलंबीसंवत्सर मजुरा असे. जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते

तेरीख ८ माहे रबिलोवल
सुा समान अशर मया अलफ
(तारीख २८—१—१७१८) बार

लेखांक ९ इ. स. १७१९ माहे जुलै नंतर

श्री

तालीक

रु. नं. १
अ. नं. १७७

श्रीमंत सकल तीर्थस्वरूप राजश्रियाविरा
जमान राजश्री दाजी वडिलाचे सेवेशी

आपत्ये संभाजी राजे कृतानेक दंडवत विनंती उपरी येथील कुशल श्रीकृपे वडिलाचे आसीर्वाद जाणोन वडिली आसीर्वाद पत्र पाटवून समाधान पावविले पाहिजे विशेष तीर्थस्वरूप मातुश्री काकीसाहेब आली दर्शन जाली ते वर्तमान राजश्री बाबाजी प्रभु याणी लिहिले त्यावरून परम संतोष जाला परंतु वडिली हे संतोषवृत लिहिले नाही हे आनुचित तैसेच निरंतर बडिलाचे आसीर्वाद पत्र यावे हे आपेक्षा यैसे असता आम्ही पाटविलया पत्राची उत्तरेही येत नाहीत हे वडिलाचे ममतेस विहित कीं काय ? याउपरी यैसे न होता घडीघडी आसीर्वाद पत्र पाटवून समाधान होय ते गोष्टी केली पाहिजे राजश्री बाबाजी प्रभु पाटविले आहेत त्यानी सविस्तर विनंती केलीच असेल प्रस्तुत ही ते विनंती करतील तदनुरूप निर्वाह होऊन उभयपक्षी कीर्तीपद होय ते करणार वडील विवेकी आहेत बहुत काय लिहिणे तरी वडील सुज्ञ आसेत मोर्तब.

लेखांक १० तारीख १९-६-१७२०

श्री

अ. नं. ७६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४७ शार्वरीनाम संवत्सरे जेष्ठ बहुल दशमी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी वो राजश्री चिंतामणी जोतिषी व मोरेश्वर जोतिषी व भास्कर जोतिषी व बाल जोतिषी बीन दशरथ जोतिषी जोसीराव उपनाम सवदागर गोत्र शांडिल्य सूत्र आश्वालायेन कसबा संगमेश्वर यासी दिल्हे दानपत्र यैसीजे तुम्ही स्वामीचे पुरातन आश्रित तुमचे पिते राजश्री दशरथ जोतिषी जोसीराव याणी तीर्थरूप कैलासवासी स्वामी पासून आजवर स्वामीची सेवा त्रिकर्ण शुध्धीने केली स्वामीचा अभ्युदय दिवसेदिवस व्हावा याजवितिरिक्त दुसरा निजध्यास किमपि नाही विद्यावंत जोतिषशास्त्रीनिपुण सिध्धांतवास्ते याणी स्वामीसंनिध विनंती केली की आपण स्वामीची सेवा बहुत दिवस केली आहे आपले पुत्र चववेजण विद्याभ्यास करून स्वामीचे सेवेसी तत्पर केले आहेत तरी यासी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चाले यैसा इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणोन विदित केले त्याजवरून तुम्ही चववे बंधू विद्यासंपन्न स्वामीची शेवा निष्ठेने करीत आहा तुमचे चालविणे स्वामीस परम आवश्यक याकरिता विकारी-संवत्सरी पौष वा॥ ३० सूर्योपराग पर्वकाली धारादतसह हिरण्योदक मौजे मांगोली तर्फ तारले दिल्हे आसे.

लेखांक ११ तारीख २३-९-१७२०

श्री

अ. नं. ७३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४७ शार्वरीनाम संवत्सरे आश्विन शुध त्रितीया भृगुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वा

मी याणी कमाविस

(१) (२)

दार कसबे प्रभान

वली सुभा प्रांत राजापूर यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री धोंडो भास्कर देश-कुल्कर्णी मामले प्रभानवली व ता॥ मल्कापूर याणी स्वामीसंनिध विनंती केली की आपल्या वतनास कदीम इदीलशाही कारकीर्दीस इनाम हक व लाजिमे बहुत चाल्त होते आलीकडे माहाराज राजश्री कैलासवासी थोरले माहाराजानी हे राज्य कबज केले ते समई इनामे खालिसा करून हकाची मोईन करून दिल्ही तेणेकरून योगक्षेम चाल्त नाही हाली दरसदे पावणा लरी आहे त्यामध्ये दोन तकमा निमे शंकराजी माहादेव केसो नरसिंह

मोरो त्रिमल निमे आपण व संभाजी तुकदेव ऐशा दोन तकसिमा चालत आहेत साहेबी महरवान होऊन या वतनास हक व इनाम करून दिल्हे पाहिजे म्हणून विदित केले त्यावरून मनास आणिता धोंडो भास्कर याणी या राज्यात बहुतच श्रमसाहास केले किले विशालगड ताम्रानी घेऊन कोकणात ठाणी बैसविली त्यासमई याणी रत्नागिरी नवीन गड वसवून ताम्राची ठाणी मारून देश हस्तगत केला श्रम करून गड बांधला हालीही हुजूर शेवा करीत आहेत याचे वंशपरंपरेने चालवणे हे स्वामीस परम आवश्यक यास्तव स्वामी याजवरी कृपालु होऊन नूतन इनाम जमीन व हक व विस्वा जकातीस मोईन करून दिल्हे असे हक गावगना रयेत निसबतीने हाली निर्ख जिराईत व बागाईत आकार होईल त्यास दरसदे लारी जकातीस विस्वा दरबैली १ कापड व गडी

जलोणे दरबैली रु।। ८६

लोणेभुस दरबैली रु।। ८२

इनाम जमीन कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार करून जमीन यास कसबे मारऱ्या कुलकर्ण्यास जमीन इनाम आहे त्याखेरीज जाजती जमीन भात रोखे

बिघे ८५

येणेप्रमाणे हक गावगना दरसदे लारी येक व जकातीस विस्वा दरबैली कापड व गऊ + + + + + + + +

दोन रुके व इनाम जमीन पाच बिघे मोईन करून दिल्ही असे सदरहुप्रमाणे यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा अक्षेप न करणे या सनदेची तालीक लेहोन घेऊन असल सनद भोगवटियास देशकुलकर्णी याजवल परतोन देणे. जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयं
विराजते

(१) शिक्का भगवतराव रामचंद्र अमात्य

श्री सीताप
ति चरणी दृढ
भाव रामचंद्र
सुत भगवंत
राव

श्री आई आ
दि पुरुष श्री राजा
शिवछत्रपति स्वामी
कृपानिधी।। तस्य प-
रशुराम त्र्यंबक
प्रतिनिधि

(२) शिक्का परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि

टीप : ही सनद "पारपत्यगार व कारकून वर्तमान व भावी ता।। राजापूर" यांसही आहे.

लेखांक १२ तारीख २७-९-१७२०

श्री

अ. नं. ७५

राजश्री फोंड सांवत भोसले देसाई
प्रांत कुडाल गोसावी यासी

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री राजा शंभु छत्रपति उपरी बदल देणे बेगमी जमा रदकर्ज राजश्री हीर सांवत यासी रुपये ६००० साहा हजार रुो देविले आहेत सदरहू ऐवज अर्धअधिक मशारनिलेच्या जमावाकडे बिलाकुसूर आदा करणे सदरहू ऐवज दरसाली दोन हजार प्रो तीन साला पाववणे छ ५ जिल्हेज सुा। इहिदे आश्रेन मया अलफ बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक १३ तारीख ६-१२-१७२०

(चिटणीसी दप्तर रु. नं. १)

श्री

अ. नं. ९

माा अजम देशमुख व देशपांडे
प्रांत मिरज यास श्रीनिवास

परशराम प्रतिनिधि सुाा सन इहिदे अशरीन मया अलफ राजश्री पिराजी बिन संताजी घोरपडे नौकस याणी व याच्या वडिलानी या राज्यामधे श्रमसाहास बहुत काही केले सांप्रत राजश्री स्वामीच्या पायासी निष्ठा धरून येऊन पदरी पडले यास्तव याजवरी राजश्री स्वामी कृपालु होऊन प्रांत मजकूरचे सरदेशमुखीचे वतन अजरामऱ्हामत करून दिल्हे असे तरी यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे सरदेशमुखीच्या वतनास हकलाजिमा व इनाम गाऊ व गावगना इनाम जमीन पहिले चालत आली असेल त्याप्रमाणे चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र माारनिल्हेयासी भोगवटियास देणे. जाणिजे छ १६ सफर निर्देश समक्ष.

लेखांक १४ तारीख ३०-१२-१७२०

श्री

अ. नं. ११

आज्ञापत्र राजमान्य राजश्री पिराजी घोरपडे देसाई व सरदेसाई मामले मुर्तजाबाद ताा मोकदमानी देहाये काा ढालगाव प्राा माार सुाा इहिदे अशरीन मया अलफ देहाये मारचा सरदेसमुखीचा मामला चिरंजीव राजश्री राणोजी घोरपडे याकडे दिल्हा आहे तरी

याचे आज्ञेत राहून गावचा आकार करीत जाणे सरदेसमुखीचा हक व इनाम व विस्वा व मेटी व कानुबाब बिलाकुसूर देत जाणे. जाणिजे रा छ ११ रबिलोवल मोर्तब सुद.

लेखन

सीमा

लेखांक १५ तारीख ३१-१२-१७२०

श्री

अ. नं. १४ अ

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री पिराजी घोरपडे ममल्कतमदार ताा मोकदमानी देहाये का मनेराजूरी प्रां मिरज सुा इहिदे अशरीन मया व अलफ का माार चिरंजीव रा राणोजी घोरपडे याकडे मुकासा देऊन कार्यभागाची मुतालिकी रा त्र्यंबक हरि यास सांगून पाठविली आहे तरी तुम्ही याचे आज्ञेत राहून आकाराप्रमाणे उठऊन मशारनिलेकडे देत जाणे जाणिजे छ १२ रबिलोवल पाा हुजूर

लेखन

सीमा

लेखांक १६ तारीख ३१-१२-१७२०

श्री

रु. नं.२

अ. नं. ४१७

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री पिराजी घोरपडे ममल्कतमदार ताा मोकदमानी देहाय कसबा सिरहटी प्रांत मिरज सुमा इहिदे अशरैन मया आलफ का माार चिरंजीव राजेश्री राणोजी घोरपडे याकडे मुकासा खेरीज मौजे आवरवाड श्रीचे करून मुकासा दिला आहे व मुतालिकी राा त्र्यंबक हरि यास सांगितली आहे तरी तुम्ही याचे आज्ञेत वर्तणूक करून मुकासबावेचा वुसूल याजकडे देत जाणे दुसऱ्याकड न देणे. जाणिजे. छ १२ रबिलावल पाा हुजूर

(शिका)

लेखांक १७ तारीख २-२-१७२१

श्री

अ. नं. ३०

चिरंजीव पीरखानास प्रति पिराजी घोरपडे आसीर्वाद उपरी मागे तुम्ही पत्र लिा। व आले त्यावरून तुम्हास यावयाविशई आज्ञा केली परंतु न आला हे कोण गोस्टी आहे ? हली प्रां मिरज चिरंजीव राजश्री राणोजी घोरपडे याकडे मुकासबाब व देशमुखी सर

देशमुखीचा ऐवज करार करून देऊन मुतालिकी रा त्र्यंबक हरि यास सांगितली आहे तरी तुम्ही व हे येकामते राहून प्रांतात चौका बसवणे येविशई अनमान न करणे. जाणिजे. रा॥ छ १५ रबिलाखर हे आसीर्वाद

लेखांक १८ तारीख १५-६-१७२१

श्री

अ. नं. ७७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४८ प्लवनाम संवत्सरे आषाढ शु॥ द्वितीया
गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी मो

कद्मानी मौजे कुरुंद्वाड त
र्फ आलते प्रांत पनाला यासी

आज्ञा केली ऐसीजे राजश्री पिराजी बिन संताजी घोरपडे हे स्वामीचे पुरातन सेवक याचे चालवणे आवशक जाणोन याजवर स्वामी कृपालु होऊन मौजे मार पेशजीच्या मुकासियाजकडून दूर करून हली मारनिलेस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने कुलबाब कुलकानु खेरीज इनामदार व हकदार इनाम दिल्हे आसे तरी तुम्ही याच्या आज्ञेत वर्तोन मौजे मारचा आकाराप्रमाणे यैवज मारनिलेकडे वसूल देणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटियास याज-पासी परतोन देणे. लेखनालंकार मोर्तब आसे.

लेखांक १९ तारीख १६-६-१७२१

(पारसनिसी)

श्री

अनु. नं. ९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४८ प्लवनामसंवत्सरे आषाढ शुध त्रितीया गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकद्मानी मौजे सिरो

ढोण तर्फ रुकडी प्रां॥ पनाला यासी आज्ञा केली
यैसीजे राजश्री पिराजी बिन संताजी घोरपडे हे

स्वामीचे पुरातन सेवक याचे चालवणे स्वामीस आवश्यक जाणून स्वामी याजवर कृपालु होऊन मौजे मजकूर पेशजीच्या मोकासियाकडून दूर करून हली + (पत्र त्रुटित असून पुढील भाग गहाळ.)

लेखांक २० तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ९३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया

सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे का ढालगांव प्रांत मिरज यासी आज्ञा केली

यैसीजे का मार राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याकडे पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रो करार आहे तरी तुम्ही कर्यात मारचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे खलेल न करणे. जाणिजे निर्देश समक्ष.

रुजू

सुरु सुद बार

लेखांक २१ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ८६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे का भिलवडी प्रां मिरज यासी आज्ञा केली यैसीजे

कसबा मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकड पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रो करार आहे तरी तुम्ही कर्यात मारचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे खलेल न करणे. निर्देश समक्ष

रुजू सुरु सुद बार.

लेखांक २२ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ८१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी मोकदमानी का मनेराजोरी प्रांत मिरज यासी आज्ञा केली

यैसीजे कसबे मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याकडे खासा वतनीचे यैवजी मोकासबाब दिल्ही असे तरी तुम्ही मशारनिलेस रुजू होऊन कसबे मारचे मोकासबाबेचा यैवज सालदरसाल वसूल देत जाणे. जाणिजे लेखनालंकार मोर्तब

रुजू सुमंत	संमत	संमत	संमत
	सुमंत	मंत्री	सरकार

तेरीख

मोहरम सलास अशरीन मय्या व अलफ

छ २१

बार सुद सुरु सुद बार बार बार बार

लेखांक २३ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ८२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख

व देशपांडे कसबे तासगाव प्रां

मिरज यासी आज्ञा केली ऐसीजे

का मार राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकडे पेशजी मोकासा दिल्हा आहे त्याप्रमाणे करार आहे तरी तुम्ही का मारचे मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे खलल न करणे.

निर्देश समक्ष सिका असे.

सुरु सुद बार रुजू.

लेखांक २४ तारीख १४-११-१७-२२

श्री

अ. नं. ८३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमु

ख व देशपांडे हवेली मिरज या-

सी आज्ञा केली यैसीजे हवेली म-

जकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकडे पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रो करार असे तरी तुम्ही हवेली मजकुरचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे. निर्देश समक्ष मोर्तब.

सुद मोर्तब असे रुजू.

सुरु सुद बार

लेखांक २५ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ८४

स्वास्ति श्री राज्याभिषेक शक ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी

याणी देशमुख व देशपांडे

का बेडग प्रां मिरज यासी

आज्ञा केली यैसिजे का मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याकडे पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रमाणे करार आहे तरी तुम्ही कर्यात मारचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे खलल न करणे जाणिजे निर्देश समक्ष मोर्तब.

सुद मोर्तब असे

रुजू

सुरु सुद बार

लेखांक २६ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ८७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व

देशपांडे का सावर्डे प्रां

मिरज यासी आज्ञा केली यैसीजे

का मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकडे पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रो करार आहे तरी तुम्ही कर्यात मारचा मुकासबाबेचा यैवज मशारनिलेकड पाववीत जाण दुसरेकड येक रुका वसूल न देणे. जाणिजे निर्देश समक्ष.

सुरु सुद बार

लेखांक २७ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं.८८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख

देशपांडे का आजनी प्रां मिरज

यासी आज्ञा केली यैसीजे

का मार राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकडे पेशजी मुकासा दिल्हा

आहे त्याप्रमाणे करार आहे तरी तुम्ही का मारची मोकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पावते करीत जाणे. निर्देश समक्ष.

रुजू

सुरु सुद बार.

लेखांक २८ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ८९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभक्ृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व

देशपांडे का कविटेयेकंद

प्रांा मिरज यासी आज्ञा केली

यैसीजे का मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकडे पेशजी पासून मुकासा आहे त्याप्रा करार असे तरी का मारचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकड पाववीत जाणे निर्देश समक्ष.

रुजू

सुरु सुद बार

लेखांक २९ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ९०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभक्ृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख

देशपांडे का मनेराजूरी प्रांा

मिरज यासी आज्ञा केली यैसीजे

का मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याकडे मुकासा आहे त्याप्रा करार आसे तरी तुम्ही का मजकुरचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे वसूल देत जाणे जाणिजे. निर्देश समक्ष. सिकेचे मोर्तब असे.

रुजू

सुरु सुद बार

लेखांक ३० तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ९१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनामसवंत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

देशमुख व देशपांडे कसबा

सांगली प्रांत मिरज यासी

आज्ञा केली येसीजे कसबा मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याकडे पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रमाणे करार आहे तरी तुम्ही कसबा मारचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे याकडील मुकासबाबेपैकी दुसरेकडे येक रुका वसूल न देणे. निर्देश समक्ष सिका आसे.

रुजू सुरु सुद बार.

लेखांक ३१ तारीख १४-११-१७२२

श्री

अ. नं. ९२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनामसंवत्सरे कार्तिक बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व

देशपांडे कसबा कविट माहंकाल

प्रांत मिरज यासी

आज्ञा केली येसीजे कसबा मजकूर राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याकडे पेशजी मुकासा दिल्हा आहे त्याप्रो करार आहे तरी तुम्ही का मजकुरचा मुकासबाबेचा यैवज मारनिलेकडे पाववीत जाणे याकडील मुकासबाबेपैकी दुसरेकडे येक रुका वसूल न देणे जाणिजे निर्देश समक्ष

रुजू

सुरु सुद बार

लेखांक ३२ तारीख १७-११-१७२२

श्री

रु. नं. १

अ. नं ५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतसंवत्सर कार्तिक वद्य ५ पंचमी

भ्रगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री व्यंकटराऊ नारायण उपनाम जोसी गोत्र शांडिल्य यासी दिले इनामपत्र ऐसीजे तुम्ही स्वामीच्या राज्यातील पुरातन शेवक वरून तुमचे चालवणे अवश्यक जाणून स्वामी तुम्हावर कृपाळु होऊन देहाय माहाल्हाय पेशजीच्या मोकासियाकडून दूर करून हल्ली तुम्हास इनाम देह चार ४ बी तपशील

का मनेराजूरी का मजकूर	मौजे माहापण ता पाट
प्रांत मिरज देह १	प्रां कुडाळ देह १
मौजे नांदणी ता आळते	मौजे आरग का वेडग
प्रां पनाळा देह १	प्रां मिरज देह १

येकूण देह चार कुळबाब कुळकानू देखील हलीपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार व इनामदार तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चातुसिमापूर्वक पूर्वमर्यादेप्रमाणे इनाम करून दिले असेत तरी तुम्ही सदर्हू देह आपले दुमाला करून घेऊन वंशपरंपरेने इनाम अनभवून सुखरूप राहाणे लेखनाअलंकार तेरीख १८ सफर सुा सलास असरीन मया–...

लेखांक ३३ तारीख ७-४-१७२३

श्री

अ. नं. ९५

आज्ञापत्र समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री पिराजी घोरपडे सेनापति ताा मोकदमानी मौज मतीवड का सोलापूर सुा सलास आशरीन मया अलफ मौजे मजकूर हा गाव दरोबस्त राजश्री व्यंकटराऊ नारायण यास इनाम करून देऊन हे आज्ञापत्र सादर केले असे तरी मारनिलेस रुजू होऊन मौजे मारचा अमल याजकडे याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुरलीत देत जाणे या पत्राची प्रत लिहून घेऊन हे पत्र भोगवटियास मारनिलेकडे देणे. रा छ १२ रजब मोर्तब.

लेखांक ३४ तारीख १९-९-१७२३

श्री

अ. नं. ८५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० शोभकृतनामसंवत्सरे आस्विन सुध प्रतिपदा गुरुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छपत्रति स्वामी याणी राजमान्य राजश्री उदाजी चवाण हिंमतबहादर यासी आज्ञा केली येसीजे राजश्री राणोजी घोरपडे वजारतमाब याजकडे मिरज प्रांतीचा सरंजाम आहे त्याप्रो करार आहे त्यास तुम्हाकडोन उपसर्ग होतो म्हणोन विदित जाहले तरी मशारनिले स्वामीकार्यावर येकनिष्ट आहेत त्याचे चालवणे आवश्यक आहे याकरिता तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले आसे तरी

याजकडील मिरज प्रांतीच्या सरंजामात काही तुम्ही उपसर्ग न देणे ते तुम्ही येकत्र स्वामी कार्य करीत जाणे मुकासबाबद तसवंद न जाणिजे. बहुत काय लिहिणे.

सुरु सुद.

लेखांक ३५

तारीख १४-११-१७२३

श्री

अ. नं. ९६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० शोभकृतनामसंवत्सरे कार्तिक बहुल त्रयोदसी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी रा। भानजी बलाल हेजीब मु।। सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले स्थलिकासी यैवजविषई रदबदल करिता म्हणतात की आपले संस्थानावरी अनेक कसाले पडले पर्जन्यामुले देशाची खराबी जाली नियतप्रा द्रव्याचा निर्वाह आपल्याच्याने होत नाही सोड मोकल केलियाने चाल्त आले विवेकास साल्दरसाल यैवज पाठवावयासी अंतर न पडे म्हणोन त्याचा भावार्थ विषंदे लिहिला व त्याकडील रामाजी सिवराम याणी विनंती केली ते सविस्तर अर्थ विदित जाला यैसियासी स्वामीकडील उपसर्ग घडीघडी लागो नये हे संस्थान स्वराज्यात यैसे चितात आणून प्रतिवार्षिक द्रव्याचा नियत + + + समयपरत्वे उपसर्ग लागलियाने निवारणही करीजे ते यैसे असोन क्षणक्षणा सोडीचे मुद्दे घालावे म्हणजे काय ? येणेकडून उभयपक्षी सौरस्य कैसे राहू पाहते प्रस्तुत राजश्री गंगाधर पंडित सुमंत याचे विनंतीवरून स्थलिकाचे निष्ठेचा अर्थ चितात आणून संस्थानाचे प्रतिवार्षिक द्रव्याचा नियत आहे त्यामधे सोडी केली आहे इ।। सन समान प्लवंग संवत्सर येकूण साले पांच बि।। रुपये

३०००	सन आर्बा	३०००	सन सबा
३०००	सन खमस	३०००	सन समान
३०००	सन सीत		
९०००		६०००	

येकूण पंधरा हजार रुपये पाच सालामधे सोड केली आहे सदरहू लिहिलेप्रमाणे संस्थानासही पत्र सादर केले आहे ते त्यास प्रविष्ट करणे आणि लिहिलेप्रो सन सलासापासून यैवज राहिला आहे त्याचा अशेष निर्गम करून घेऊन हुजूर पाठवणे सन तिसा किलकसंवत्सरापासून भाषापत्राप्रमाणे संस्थानकराकडून येवजाचा निर्वाह अशेष करून घेत जाणे जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते

तेरीख २६ माहे सफर
सु॥ आर्बा अशरीन मया व अलफ
बार.

लेखांक ३६ तारीख १८-३-१७२४

श्री

रु. नं. १
अ. नं. ७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० क्रोधीनाम संवत्सर चैत्र शु॥ ५ सौम्यवासरे क्षत्रियकुलवतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यानी मोकदमानी का उत्तूर तर्फ आजरे का मजकूर यासी आज्ञा केली ऐसीजे राजेश्री व्यंकटराव नारायण हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक याचे चालिविणे अवश्यक जाणून स्वामी याजवरी कृपाळु होऊन कसबा मजकूर पेशजीच्या मोकासियाजकडून दूर करून हल्ली मशारनिले यासी कुलबाब कुलकानू देखील हली पटी व पेस्तर पट्टी स्वराज्य व मोंगलाई येकूण दुतर्फा खेरीज हकदार व इनामदार पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करून दिले असे तर तुम्ही यासी रुजू होऊन याचे रजतलबेत वर्तोन कसबा मजकुरचा ऐवज यासी व याचे वंशपरंपरेने याजकडे वसूल देत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचे आक्षेप न करणे या पत्राची प्रती लिहून घेऊन हे पत्र भोगवटियास मशारनिले याजवळ परतोन देणे जाणिजे. लेखना अलंकार.

लेखांक ३७ तारीख ११-४-१७२४

श्री

अ. नं ९७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० क्रोधीनाम संवत्सरे चैत्र बहुल चतुर्दसी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री उदाजी चवाण हिंमतबहादर यासी आज्ञा केली यैसीजे शरयात पन्हा आबू महमद काजी बस्ती कसबे हवेली कोलापूर हे बहुत थोर वली आपले स्वधर्माची ठाई उत्तमप्रकारे आचरण करीत आहेत यास इनाम दिधलियान स्वामीस व स्वामीचे राज्यास कल्याण व्हावे याकरिता याजवरी कृपाळु होऊन कुलबाब कुलकानु खेरीज हकदार व इनामदार करून मौजे बालिंगे ता हवेली कोलापूर हा गाव नूतन इनाम दिलाह असे आणि सनद आलाहिदा सादर केली आसे तरी तुम्ही हे जाणून मौजे मार यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र काजी मार याजवल भोगवटियास परतोन देणे. बहुत काय लिहिणे.
मोर्तब.

लेखांक ३८ तारीख १२-५-१७२५

श्री

अ. नं. ९८

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधि ता कमाविसदारानी देहाये ता संगमेस्वर मौजे आंतरवेली मौजे कवले मौजे करबले मौजे सायले मौजे सोनवडे मौजे उमरधोंड मौजे औम्बाड मौजे बोरसूत सु॥ खमस अशरीन मया अलफ वेदशास्त्रसंपन्न राजश्री श्रीपताचार्य व श्रीकाराचार्य या उभयताची वृत्ती पुरातन देहावे मार होन हजार ल्हरीची आहे त्याप्रमाणे वृत्ती ठिकाणे चालवावयाची आज्ञा करून हे आज्ञापत्र सादर केले आसेत ही सदरहू ठिकाणेची वृत्ती पुरातन चतुःसीमापूर्वक यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्रचे आज्ञेचे न करणे हे पत्राची प्रती लिहोन घेऊन आसल पत्र भोगवटियास याजवली परतोन देणे. जाणिजे छ १० रमजान. निर्देश समक्ष मोर्तब.

लेखांक ३९ तारीख २४-१२-१७२५

श्री

अ. नं. २९

कौलनामा राजश्री उदाजी चव्हाण हिंमतबहादर ता भोजजी बिन नागोजी मान्ये पाटील मौजे नादाले ता वडगाव प्रां पनाला सु॥ सीत असरीन मया व अलफ दाद कौलनामा ऐसीजे तुम्हापासून पाटिलकीची शेरणी उतरकडे घेतली आम्हाकडील शेरणी यावी त्याकरिता तुम्हास हुजूर करवीरच्या मुकामी आणून आज्ञा केली की शेरणीचा भाग चुकविणे त्यास आपली कितेक नातवानी विदित केली त्याजवरून मनास आणून तुमचे माझ्या शेरणी करार रुो ३०१ तीनसेह येक व घोडा रास येक येणेप्रो करार केले असे सदरहुचा वसूल देऊन बेशकपणे आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने पटलगीचे वतन अनभऊन सुखरूप राहणे दरीखा व कौल असे जाणिजे. रा॥ छ २९ माहे रा॥खर मोर्तब असे.

लेखांक ४० तारीख २६-५-१७२६

श्री

रु. नं. १

अ. नं. १७३

राजश्री सवाई बसवलिंग संवस्थान

स्वामी गोसावी यासी—

थोरला शिक्का

करावा अखंडित लक्ष्मी आलंकृत

राजमान्य प्रति राजश्री

उपरी आपणाकडून बहुत वासर अतिक्रमिल्यानंतर पत्र आले ते सुसमयी माहाराजास प्रविष्ट होऊन चितास परम अनंदावाप्ती होऊन लेखनाभिप्राये निवेदन जाहाला याच रीतीने वरचेवरी पत्री सादेत कुशलाभिप्रायेस विषदे लेहून पाटवून माहाराजास संतोषावाप्ति होये ते करीत जावे कित्येक मजकूर आपणाकडील जुबानी अजम सर्जेखान यानी हुजूर निवेदन केला त्यास जी आज्ञा होणे ती खान मजकूर यास जाहाली आहे आपणास सांगतील त्यावरून कळू येईल रवाना छ ५ माहे शवाल बहुत काय लिहिणे मोर्तबा सिक्या

लेखांक ४१ तारीख १५-१०-१७२६

श्री

अ. नं.९९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५३ पराभवनाम संवत्सरे कार्तिक शुध प्रतिपदा मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री भानजी बलाल हेजीब मुा सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे बदल देणेवेत वेदमूर्ती उमापति भट पुराणीक दिा मातुश्री साहेब याजकडे देविले रुपये ६० साठी रास देविले असेत तोफियाचे यैवजी आदा करणे पावलियाचा जाब घेणे तेणेप्रो मुजरा असे जाणिजे. उजूर न करणे. बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते

तेरीख २९ माहे सफर

सुा सबा अशरीन मया व अलफ

बार

लेखांक ४२ इ. स. १७२६

श्री

रु. नं. १

अ. नं. १७५ तालीक

राजश्री सवाई बसवलिंग नाईक
सोंधे गोसावी यासी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रति राजश्री राजा शंभु छत्रपति उपरी

× × × स्वामीची स्वारी तुमच्या देशात जाहाली ते प्रसंगी घासदाणियाचा यैवज व इा सन सलास ता सन खमस येकून साले तीन हा यैवज तहाप्रमाणे हुजूर यावा त्यास सवणूरी होणास रुपये ३।= सवातीन रुपये चावलप्रमाणे नीर्ख करून यैवज पाववावयाची आज्ञा केली होती ऐसीयास संस्थानावरी कसाला पडिला देशात उत्पन्न नाही संस्थान रिक्त जाले आहे याकरिता पूर्वीपासून होणास साडेतीन रुपये चावलप्रमाणे नीर्ख चालवावा हिसेब रुजू करवावा म्हणून तुम्ही बहुता प्रकारे हुजूर लिहून पाठविले राजश्री भानजी बलाल तानाजी बलाल याणी तुमच्या आशयावरून विनंतीपत्री लिहिले तो सर्वही अर्थ विदित जाहाला येशास पहिले होणास धारण साडेतीन रुपये चावल होती त्यावरून तो नीर्ख चालविला प्रस्तुत सावणूरी होणास नीर्ख कम जाला आहे याकरिता सवातीन रुपये चावलप्रमाणे घासदाणियाचे यैवज व मागील सिसालियाचा हिषेब करावा पुढे तीन रुपयाप्रमाणे होणाचा नीर्ख चालवावा अशी आज्ञा केली होती परंतु तुम्ही आपले निष्टेचा व पुढे सालदरसाल + + + तेचा अर्थ सांगोन पाटविला व संस्थानचा सर्वप्रकारे अभिमान धरून चालवावे म्हणून राजश्री गंगाधर पंडित सुमंत याणी विनंती केली त्यावरून सालाबाद चालल्याप्रमाणे चालवावे ऐसी आज्ञा भानजी बलाल हेजीब व तानाजी बलाल यास केली ते सालाबादप्रमाणे सावणूरी होणास रुपये ३।।= साडेतीन चावलप्रमाणे हिसेब रुजू करून देतील तुम्ही एकरूप निष्टेने वर्तोन तहप्रमाणे सुरलित द्रव्य सालदरसाल पाववित असलीयामध्ये काही कालोचित प्रसंग अगर काल्हरण करीत नसलिया सालाबाद तहप्रमाणे सावणूरी होनास साडेतीन रुपये चावलाप्रमाणे चालविले जाईल जाणिजे बहुत काय लिहिणे.

शिक्का

लेखांक ४३ तारीख १९-५-१७२८

श्री

अ. नं. १०१

राजश्री मल्हार नारायण मुतालिक वतन देशमुखी व सरदेशमुखी प्रांत मिरज गोसावी यासी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्ये

श्री राणोजीराव घोरपडे सेनापति दंडवत सुा समान अशरीन मया व अलफ तुम्ही दरबारचे कदीम हुजूर उमेद होतसे स्वामीकार्याचे चौकस इमानइतबारे सेवा करणार आसे जाणऊन प्रां मारच्या वतनाची मुतालिकी सांगून पाठविले आहे तरी वतनी मामला चौकसिने करणे तुम्हास वेतन सालीना बरहुकूम माजी मुतालिकाप्रमाणे केले असे घेऊन येकनिष्ठेने सेवा करणे जाणिजे रवाना छ २० माहे शौवाल बहुत काय लिहिणे मोर्तब सुद मोर्तब आसे.

लेखांक ४४ तारीख २६-५-१७२८

श्री

अ. नं.१०२

आज्ञापत्र समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री राणोजी घोरपडे सेनापति ता॥ मोकदमानी मौजे रांगोली का नेज पो हुकेरी सुा तिसा अशरीन मया व अलफ राजश्री नारो खंडेराव हे स्वामीचे राज्यातील कदीम सेवक आमचे सोबतीने बहुत श्रम साहयास करून कितीक स्वामीकार्ये येकनिष्ठेने केली पुढेही सेवेसी सादर आहेत हे जाणून याचे विशेषात्कारे उर्जीत करून चालवावे हे बहुत अगत्या या निमित्य मौज मा॥र हकदार व इनामदार खेरीज करून हाली कुलबाब कुलकानु यासी इनाम करून दिल्हे आहे तरी याचे आज्ञेत वर्तोन अकाराप्रो यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वसूल देत जाणे दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे यास जो इस्कील करील त्यांस आपले माहाजब याची अण असे रवाना छ २७ शौवाल मोर्तब सुद.

लेखांक ४५ तारीख ११-१-१७३०

श्री

अ. नं. १०५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५६ सौम्यनामसंवत्सरे माघ शुध चेतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री नागोजीराव पाटणकर यासी आज्ञा केली येसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिले वर्तमान विदित जाहाले तारल्याचे देशमुखीविसी लिहिले व आज्ञा जाहालिया इंदुल्करास पाठऊन देऊ म्हणून लिहिले ऐशास प्रस्तुत धामधूम जाहाली आहे यामुळे मुल्क उद्वस होऊन गेला यास्तव वतनदार व रयत परागंदा जाहली आहे प्रज्यन्यकाळ जाला म्हणजे पुढे इंदूल्कर यास पाठऊन देणे स्वामी बरहक मनसुबी करतील. जाणिजे. बहुत काय लिहिणे. मोर्तब सिक्याचे आहे.

सुरु सुद बार.

लेखांक ४६ तारीख २१-७-१७३०

श्री

अ. नं. १०६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ साधारणनाम संवत्सरे श्रावण बहुल त्रितीया इंदुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री राणोजी बि॥ पिराजी घोरपडे यासी दिल्हे वतनपत्र ऐसाजे

तुम्ही स्वामीच्या राज्यातील
पुरातन सेवक येकनिष्ट तुमचे
वंशपरंपरेने चाल्वणे आवश्यक
जाणून तुम्हावर स्वामी कृपालु होऊन कर्याती सतरा येकूण देहे येकसे आडसष्ट मामले मिरज येथील देशमुखीचे वतन तपसील

किता कर्याती देहे ८४ एकूण

१ कर्यात हवेली मिरज देहे
१ कसबा मिरज
१ मौज ढवली
१ मौज बामणी
१ मौज धामणी
१ मौज वाडी
१ मौज ठिकली
१ मौज कलंबी
१ मौज तालक
१ मौज निलंजी
१ मौज बेंबल्वाड

११

१ कर्यात म्हैसाल देहे
१ कसबा म्हैशाल
१ मौज नरवाड
१ मौज कागवाड
१ मौज सिरगुपी
१ मौज चेंड्डर
१ मौजे उंगार बु॥
१ कर्यात रुकडी देहे
१ कसबा रुकडी
१ मौज मुडसिंगी
१ मौज आतीकेरे
१ मौज तिलवणी
१ मौज कबनूर
१ मौज शाहपूर

किता कर्याती देहे ८४ एकूण

१ कर्यात तासगाव देहे
१ कसबा तासगाव
१ मौज पारें
१ मौज चिंचणी
१ मौज मंगरूल
१ मौज हतनूर
१ मौज धामणी
१ मौज पाडली
१ मौज मुरची
१ मौज ढवली
१ मौज पुणसी

१०

कर्याती येक

१ कर्यात अजेनी देहे
१ कसबा अजेनी
१ मौज वानरचावडी
१ मौज गवाण
१ मौज जायगाव
१ मौज वायेदल
१ मौज सिराढोण
१ मौज हाणूर
१ मौज जरदू
१ मौज जरड्ड (मू)
१ मौज घाणवाड
१ मौज कानरवाडी

१२

१ मौज यडराव
१ मौज हराली
१ मौज कोडीकरे
—
९

कर्याती येक

१ कर्यात उदगांव देहे
१ का। उदगांव
१ मौज उमलवाड
१ मौज कोथली
१ मौज दानवली
१ मौज चिपरी
१ मौज जैनापूर
१ मौज नेज
१ मौज वाटार
१ मौज खोतसी
—
९

कर्यात येक

१ कर्यात कवटे माहांकाल पंधरा देहे
१ कसबा कवटे
१ मौज हिंगणगाव
१ मौज रांजणी
१ मौज धुलेगाव
१ मौज हवेली
१ मौज कोकिले
१ मौज खेलेगाव
१ मौज पाडेगाव
१ मौज जाबापूर
१ मौज कुंडलापूर
१ मौज नागाले
१ मौज कुंची
१ मौज अलगाड
१ मौज बाभुलगाव
१ मौज वघाली
—
१५

कर्यात येक

१ कर्याती देसिंग देहे
१ कसबे देसिंग
१ मौज हराली
१ मौज खरसिंग
१ मौज म्हैसाल
१ मौज सराटी
१ मौज कोगनोली

कर्याती येक

१ कर्यात बेडग देहे
१ कसबा बेडग
१ मौज अरंग
१ मौज येरंडाल
१ मौज साडेंराजोरी
१ मौज मलदंडी
१ मौज गुडेवाडी

१ मौज कुमटाली
१ मौज कराली
१ वौज आल्काडे
—
९
कर्याती येक

१ कर्यात सिरहटी देहे
१ कसबे सिरहटी
१ मौज हसूर
१ मौज कुडची
—
७

येकूण कर्याती

१ कर्यात सांगली देहे
१ का। सांगली
१ मौज पद्माले
१ मौज बीरनाल
१ मौज खटिंब
१ मौज कुपवाड
१ मौज बुदगाव
१ मौज बिसूर
१ मौज करनाल
१ मौज वाडी
१ मौज समडोली
—
१०
कर्याती

१ मौज येलीबमेकी
१ मौज माल्गाऊ
१ मौज कॆंपवाड
१ मौज खटराव
—
१०
कर्याती येक

१ कर्यात मनेराजुरी देहे
१ कसबे मनेराजोरी
१ मौज कराली
१ मौज कुमटे
१ मौज सोनी
१ मौजे घाटनांद्रे
१ मौज कुसुंबे
१ मौज दहिवाड
१ मौज वडगाव
—
१२ बारमाचे
कर्याती

१ कर्यात कविटेयेकंद
१ कसबा कविटे
१ मौज नजीकनागाव
१ मौज कविलापूर
१ मौज वसगडे
१ मौज नागाव बु॥
१ मौज मदकुणकी
१ मौज निंबाणी
१ मौज सिरगाव
१ मौज वसेंबे
—
९
कर्याती येक

१ कर्यात इसापूर देहे.
१ कसबा इसापूर
१ मौज आल्त
१ मौज निंब्र
१ मौज निंबलके
१ मौजे चिकलगाव
१ मौजे आंधली
१ मौजे वज्र
१ मौजे सिरगाव
—
८

कर्याती

१ कर्यात इचलकर्जी
१ कसबा इचलकर्जी
१ मौज चंदूर
१ मौज हुपरी
१ मौज रेणदाल
१ मौज कोडोली
१ मौज लाट
१ मौज दटवाड
१ मौज सुलकोंड
१ मौज सिरदवाड
—
९

कर्याती येक

१ कर्याती भालवणी देहे
१ कसबा भालवणी
१ मौज सेलकभावी
१ मौजे सिवणी
१ मौज कलंबी
१ मौज खांबले
१ मौज तांदुलवाडी
१ मौज कमलापूर
१ मौज बालवाडी
—
८

कर्याती येक

१ कर्यात इटे देहे
१ कसबे इटे
१ मौजे ढवलेस्वर
१ मौज नेवरी
१ मौज हणमंतवाडी
१ मौज येलगोड
१ मौज कुरली
१ मौज कारवे
१ मौज खेड
१ मौज नागेवाडी
१ मौज भावयाची वाडी
१ मौज पाटगाव
१ मौज उपलावी
१ मौज धुलगाउ
१ मौज जमसे
—
८

कर्याती येक देहे
८४

१ मौजे कनवाड
१ मौजे कुटवाड
१ मौज घालवाड
१ मौज सेडसाल
१ मौज धरणगुती
१ मौज आवैरवाड
१ मौज गोरवाड
१ मौज अलास
१ मौज बस्तवाड
१ मौज टिकली

—

१२

कर्यांती येक
देहे
८४

येणेप्रमाणे सदरहू देहे येकसेहे आडसष्ट येकूण कर्यांती सतरा मामलें मजकुरीचे देशमुखीचे वतन तुम्हास व तुमचे पुत्रपोत्रादि वंशपरंपरेने वतन मरहामत करून दिल्हे असे तरी तुम्ही वतनाचा हक व लाजिमा पान मान तसरीफ व इनाम हिसाफत व बाजे कानुकायदे पूर्वील सिरस्तेप्रमाणे वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहणे जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयं विराजते

रुजू सुरनवीस — समत सुमंत — समत मंत्री — समत सरकार

तारीख १६
मोहरम सु॥ इहिदे सलासीन मया अलफ
बार सुद सुरू सुद बार बार बार बार

लेखांक ४७ — तारीख १४-८-१७३०

श्री

अ. नं. ७८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ साधारणनाम संवत्सरे आधिक भाद्रपद शु॥

द्वादसी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी

याणी राजश्री देशाधिकारी

व लेखक वर्तमान भावी प्रां॥

पनाला यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक सेवा येकनिष्ठेने करीत आले याजकरिता याचे वंशपरंपरेने चालवणे स्वामीस आगत्य जाणोन स्वामी यावरी कृपालु होऊन प्रां॥ मजकुरी इनाम गाव बि तपसील

क॥ आलते	कर्यात रुकडी
१ कुरुन्दवाड १ आलास	१ इचलकर्जी १ सिरढोण १ चंदूर

येणेप्रमाणे पाच गाव पेशजीच्या मुकासियाजकडून दूर करून हाली यास कुलबाब व कुलकानु हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार व कदीम इनामदार नूतन इनाम दिल्हे आहेत तरी तुम्ही सदरहुप्रा॥ देहाय मजकूर चतुःसीमापूर्वक याचे दुमाले करून पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा उजूर न करणे या पत्राची प्रत लेहून घेऊन हे आसल पत्र भोगवटियासी याजवल परतोन देणे. जाणिजे लेखनालंकार मोर्तब असे.

रुजू	सामंत	स॥	स॥
सुरनिवीस	सुमंत	मंत्री	सरकार

बार सुद सुरु सुद बार बार बार बार

लेखांक ४८ — तारीख २०-८-१७३०

श्री

अ. नं. ७९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ साधारणनाम संवत्सरे आधिक भाद्रपद बहुल चेतुर्थी गुरुवासर क्षेत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी

राजश्री देशाधिकारी व लेख-

क वर्तमान भावी सुभा प्रांत

पनाला यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे हे स्वामीच्या राज्यातील पुरातन येकनिष्ट सेवक याच्या वडलानी स्वामी कार्यावरी श्रमसाहास विशेषात्कारे केले हाली हेही बहुतच निष्ठेने स्वामीसेवा करतात यांचे वंशपरंपरेने चालवणे स्वामीस आगत्य जाणोन स्वामी यावरी कृपालु होऊन प्रांत मजकुरचे सरदेशमुखीचे वतन आजरामरामत केले असे

कर्याती ब्रि॥ तपसील

किता कर्याती	किता कर्याती
१ कसबा ठाणे	१ कसबा वडगाव
१ कसबा कलंब	१ कसबा कडोली
१ कसबा रुकडी	१ कसबा सातवे
१ कसबा आष्टे	१ का आलते
१ कसबा बोरगाव	१ कसबा वालवे
५	५

येणेप्रमाणे कर्याती दाहा प्रांत मजकूर सरदेशमुखीचे वतन दिल्हे आसे तरी तुम्ही सदरहू वतनास हक व लाजिमा मानपान तश्रीप इनामत व बाजे कानु कायदा सुदामत सिरस्ते-प्रमाणे यासिवाय याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रती लेहून घेऊन आसल पत्र भोगवटियास याजवल परतोन देणे. जाणिजे लेखनालंकार मोर्तब असे.

रुजू सा सा सा
सुरनवीस सुमंत मंत्री सरकार
बार सुद सुरु सुद बार बार बार बार

लेखांक ४९ तारीख २०-८-१७३०

श्री

अ. नं. ८०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ साधारण नामसंवत्सरे अधिक माद्रपद बहुल चेतुर्थी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी या—
णी राजश्री देशाधिकारी व
लेखक वर्तमान भावी सुभा मा
मले मिरज यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे हे स्वामीच्या राज्यातील पुरातन येकनिष्ठ सेवक याच्या वडलानी स्वामीकार्यावरी श्रमसाहस विशेषा-त्कारे केले हली हेही बहुतच निष्ठेने स्वामीसेवा करतात याचे वंशपरंपरेने चालवणे स्वामीस आगत्य जाणोन स्वामी याजवर कृपालु होऊन मामले मजकुरचे सरदेशमुखीचे वतन आजरामरामत करून दिल्हे आसे कर्यात बि॥ तपसील

किता	किता
१ हवेली मिरज	१ कसबा देसिंग
१ कसबा सांगली	१ कसबा कविट म्हांकाल
१ कसबा तासगाव	१ कसबा बेडग
१ कसबा इसापूर	१ कसबा ढालगाव
१ कसबा कविटयकंद	१ कसबा म्हायसाल

१ कसबा अंजनी	१ कसबा सावर्ड
१ कसबा मनेराजोरी	१ कसबा नांद्रे
—	—
७	७

येणेप्रमाणे कर्याती चवदा मामले मजकूर सरदेशमुखीचे वतन दिल्हे आसे तरी तुम्ही सद्रहू वतनास हक व लाजिमा मानपान तश्रीफ इनामत व बाजे कानु कायदा सुदामत सिरस्तेप्रमाणे यास व याचे पुत्रपैत्रादि वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रती लिहून घेऊन हे आसल पत्र भोगवटियासी याजवल परतोन देणे जाणिजे लेखनालंकार मोर्तब असे.

रुजू सुरनवीस	सा	सा	सा
	सुमंत	मंत्री	सरकार

बार सुद सुरु सुद बार बार बार बार.

लेखांक ५०

माहे आगस्ट इ. स. १७३०

श्री

रु. नं. १

अ. नं. १८१

श्रीमंत सकल तीर्थरूप राजश्रियाविराजमान

राजश्री आबासाहेब वडिलाचे शेवेशी

आपले संभाजीराजे दंडवत विनंती उपरी अत्रत्य कुशल वडिलाचे आशीर्वादे वर्धाष्णु जाणोन निजकुशल्लाशीर्वाद पत्र प्रेषणेत सदेक्षीत चित्तास आनंदप्रद असिले पाहिजे विशेष सांप्रत राजश्री निलकंटराऊ त्र्यंबक या समवेत आशीर्वाद पत्र प्रेषिले ते प्रविष्ट जाले परस्पर विवेक होउन दर्शन व्हावे यैसा इत्यर्थ करून येतद्विषई मशारनुहेले याची निशा करावयाची तैसी केली आहे दर्शनोत्तर तुमचे सकल मनोभिष्ट सिधीस पावेल म्हणोन लेखन केला अभिप्राये व मशारनुहेले याणी प्रगट केला वडिलाची ममतातीशये आद्यंत अवगत होउन परमानंदावाप्ती जाली आम्ही धाकटे आमचे चित्तानरूप आमचा मनोदय सिधीस पाववावा हे वडिलास सुतराम विदित तदनरूप हे प्रसंगी हे आज्ञा केली बरी याज पेक्षा उत्तम ते काय येत्तद्विशई तेथून येणाराणी येउन आमची संशये निवृती करावी लागते याकरिता हा सर्व अर्थ निलकंटरावापासी सांगितला आहे हे विनंती करितील ते आमची वचणे यैसी जाणोन निःसंदेह पाटवावयाचे त्यासी पाटविले पाहिजे त्याचे दर्शनोत्तर अनुपदेचा योजिला अर्थ मनोदयानुरूप सिधीस पावेल विशेष लिहिणे वडिलाप्रती काय असे ?

केला असे.

निशाचे जागा सिका

लेखांक ५१ तारीख ४-२-१७३१

श्री

रु. नं. १
अ. नं. २९

तालीक बराबरी निल्कंठराऊ
त्र्यंबक मुा करवीर
छ ७ साबान

सौभाग्यवती विरुबाई वोहिनी यासी
प्रति राजश्री संभाजी राजे उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन संतोशवाप्ती होये ते केले पाहिजे विशेष सांप्रत राजश्री निल्कंठराऊ त्र्यंबक यासमवेत पत्र प्रेसिले ते प्रविष्ट ज़ाहाले तीर्थरूप राजश्री आबासाहेबाचे व आमचे दर्शन व्हावयाचा विचार व हा परस्पर विवेक होणे या प्रयोजनी सर्व प्रकारे आपली सादरता विषदे लेखन कली व येतधीपई तुमची ममता व साभिमान पुरसर सादरता मशारुनहेलेनी विदित केली त्यावरून परम संतोष जाला याजपेक्षा उत्तम ते काय ? आम्हास सर्व प्रकारे तीर्थरूपाची आज्ञा प्रमाण किंबहुना तुम्हीही प्रयोजनी साभिमानी असता संशय मानावा यैसे काय आहे ? हा अर्थ तेथील प्रमुख सामाजिकानी येऊन आमची निशा करावी लागते याकरिता हा समग्र अर्थ निल्कंठरावास सांगितला आहे हे सांगतील ती आमची वचणे यैसी जाणोन तदनरूप तीर्थरूप यास विनंती करून सामाजिकास पाटविले पाहिजे त्याचे दर्शनोत्तर मौजीक अर्थ अनुपदेचा सिधीस पावेल परंतु या प्रयोजनी आम्हास सर्वप्रकारे भरवसा तुमचा आहे जेणेकडून परस्पर विवेक होऊन तुम्हास निर्दोष येश ये ते करणे. जाणिजे बहुत काय लिहिणे.

(मोर्तब)

लेखांक ५२ तारीख ४-२-१७३१

श्री

रु. नं. १
अ. नं. ३०

तालीक राजश्री निल्कंठराऊ
छ ७ साबान मुा करवीर

सौभाग्यवती विरुबाई वोहिनी यासी
प्रति राजश्री संभाजी राजे उपरी कितेक वृत प्रत्यक पत्री लेखन केले आहे त्यावरून आवगत होईल सारांश तीर्थरूपाचे व आमचे दर्शन होऊन विवीक व्हावा हा प्रसंग साधारण आहे यैसे नाही या प्रयोजनी तुम्ही मध्यस्त होऊन उभयपक्षी संदेह निवृती करिता तरीच परिणाम लागतो तदनसार येतद्विषई तुमची पूर्ण साभिमानता राजश्री

निलकंटरायानी सांगितली त्या तुमच्या भरोसियावरीच हा आंगीकार केला आहे तदनरूप तुम्ही स्वता येऊन आमची निशा करावी हा आमचा हेतु तो अर्थ सविस्तर मारनुहलेस सांगितला आहे हे सांगतील ते आमची वचने येसे जानोन तीर्थरूपास विनंती करावयाची तैसी करून अगत्यरूप आले पाहिजे अनमान सहसा न कीजे समागमे प्रमुखासही घेऊन आले पाहिजे. जाणिजे बहुत काय लिहिने.

(मोर्तब)

लेखांक ५३

तारीख १३-४-१७३१

श्री

अ. नं. ३२

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यासी प्रति राजेश्री शाहू राजे याणी लिहून दिल्हे सु॥ इहिदे सलासीन मया व अलफ छ १६ सवाल विरोधीकृतनाम संवत्सरे चैत्र वद्य २ द्वितीया बितपसील

इ॥ वारुणा माहाल ता॥ संगम दक्षेणतीर कुल दुतर्फा मुलुक दरोबस्तदेखील ठाणी व किले तुम्हास दिल्हे आसेत. कलम १

वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षेणतीर तहद निवृतीसंगम तुंगभद्रापावेतो दरोबस्त देखील गड ठाणी तुम्हाकडे दिल्ही आसेत. कलम १

तुंगभद्रापासून तहद रामेश्वर देखील संस्थान निमे आम्हाकडे निमे तुम्हाकडे करार करून दिल्हे असेत. कलम १

कोकण प्रांत सालसी पलीकडे तहद पंचमाहाल आकोलपावेतो दरोबस्त तुम्हाकडे दिल्हे आसे कलम १

किले कोपळ तुम्हाकडे दिल्हे त्याचे मोबदला तुम्ही रत्नागिरी आम्हाकडे दिल्ही. कलम १

इकडील चाकर तुम्ही ठेऊ नये तुम्हाकडील चाकर आम्ही ठेऊ नये. कलम १

वडगावचे ठाणे पाडून टाकू. कलम १

तुम्हास जे वैर करतील त्याचे पारपत्य आम्ही करावे

मिरज प्रांत विज्यापूर प्रांतीची ठाणीदेखील आथणी तासगाव

आम्हासी जे वैर करतील त्याचे पारपत्य तुम्ही करावे तुम्ही आम्ही येका विच्यारे आसावे. राज्याभिवृधी करावी.

कलम
१

वगैरे तुम्ही आमचे स्वाधीन करावी.

कलम
१

येकूण नऊ कलमे करार करून तहनामा लिहून दिल्हा असे सदरहूप्रमाणे आम्ही चालऊ. यासी आंतराये होणार नाही. मोर्तब असे.
चिटणीसीकडील यादी.

लेखांक ५४ तारीख १६-४-१७३१

श्री

अ. नं. ३३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ विरोधकृत संवत्सरे चैत्र बहुल शष्टी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री हिंदुराव घोरपडे ममल्कतमदार यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीची व चिरंजीव राजश्री संभाजी राजे याची भेटी जाहाली सौरश्य जाहले वारणेपासून तुंगभद्रेपर्यंत मुलुक दरोबस्तदेखील गड कोट ठाणी दिल्ही ऐसीयासी तुम्हाकडे गड कोट ठाणी आसतील ती चिरंजीव राजश्री

याकडे देविली असेत तरी त्याची पत्रे घेऊन येतील त्याच्या हवाली करणे जाणिजे. बहुत लिहिण तरी सुज्ञ आसा. मोर्तब

लेखांक ५५ तारीख १६-४-१७३१

श्री

अ. नं. ११०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ विरोधीकृतनाम संवत्सरे चैत्र बहुल शष्टी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री बळवंतराव सिवदेव यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीची व चिरंजीव राजश्री संभाजी राजे याची भेटी जाहले वारणेपासून तुंगभद्रेपावेतो मुलुक दरोबस्त देखील गडकोट ठाणी त्याकडे दिल्ही किले कोपल चिरंजीव राजश्री याकडे देविले आस तरी त्याची पत्र घेऊन येतील त्याचे स्वाधीन कोपल किला करणे. जाणिजे बहुत काय लिहिणे. *

मोर्तब बार.

* वरील पत्राप्रमाणें मजकूर असलेलीं अ. नं. १०९ व अ. नं. १११ हीं शाहूमहाराजांचीं आज्ञापत्रें कोपल किल्ला स्वाधीन करण्याबद्दल गोविंदराव मोरे व सुभानराव मोरे यांना पाठविलीं आहेत.

लेखांक ५६ तारीख २५-६-१७३१

श्री

(चि. द. रु. नं. १ अ. नं. ३५)

अ. नं. ११२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधीनाम संवत्सरे आषाढ शु॥ द्वितीया गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राज-

श्री देशाधिकारी व कारकून व-
र्तमान भावी मामले मिरज यासी

आज्ञा केली यैसीजे राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे नवकस देशमुख मामले मजकूर याणी मनोलीचे मोकामी स्वामीसंनिध विनंती केली की आपले आजे राजश्री संताजी घोरपडे याणी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामीची सेवा मनोभावे केली याकरिता कैलासवासी स्वामी आपले आज्यावर मेहरवान होऊन मामले मिरज येथील देशमुखीचे वतन पूर्वी जे नव ब्राम्हणाचे होते त्यास थोरले माहाराज कैलासवासी याच्या पायापासी आनराहट केली यास्तव त्याचे वतन दूर केले होते ते मारनिलेस चंदीचे मोकामी मन्हामत करून दिल्हे त्याप्रो आपल्या आज्यानी आनभविले त्याप्रमाणे आपले चुलते राणोजी घोरपडे याणी आनभविले ते स्वामी कार्यावर पडल याउपरी आपले बाप पिराजी घोरपडे याणी आनभविले हली वतन सेवकास चालत आहे परंतु भोगवटियास पूर्वील पत्रे होती ती आवंतर प्रसंगामुले गेली.पुढे भोगवटियास पत्रे पाहिजेत यैसियास सातारेयास राजश्री शाहूराजे यासी विनंती केली त्याणी आपली पत्रे करून दिल्ही आहेत तरी स्वामीनी आपली पत्रे भोगवटियासी करून दिल्ही पाहिजेत म्हणोन विनंती केली आणि तीर्थस्वरूप राजश्री शाहूराजे आबासाहेब याची पत्रे दाखविली राजश्री संताजी घोरपडे याणी राज्याभिवृद्धी-विषई श्रम आसाधारण केले त्यामागे राणोजी घोरपडे याणी निष्ठेने सेवा केली राजश्री पिराजी घोरपडे याणी स्वामीची येकनिष्ट सेवा केली हली राजश्री राणोजी घोरपडे स्वामीची सेवा येकरूप निष्ठेने करीत आहेत याचे सर्वप्रकारे चालवणे हे स्वामीस परम आवश्यक यास्तव पूर्वी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामीनी याच्या वडिलास प्रांत मिरज कर्याती आठरा येथील देशमुखीचे वतन मन्हामत करून दिल्हे त्याप्रो स्वामी याजवरी कृपाळु होऊन राणोजी बिन पिराजी घोरपडे नवकस यास देशमुखीचे वतन पूर्ववत प्रमाणे आजरामन्हामत दिल्हे आसे. कर्याती बि तपसील.

किता

१ का। हवेली मिरज

१ कसबा
१ मौजे ढवली
१ मौजे धामणी
१ मौजे बामणी
१ मौजे वाडी
१ मौजे वाकली
१ मौजे कंबली
१ मौजे तानक
१ मौजे नीलजी
१ मौजे सावली
१ मौजे बोंबलवाड

—

११

१ कर्यात म्हैसाल

१ कसबा
१ मौजे नरवडे
१ मौजे कागवाड
१ मौजे सिरगोपी
१ मौजे चंदूर
१ मौजे उगार बु।
१ मौजे कुडची

—

७

२ कर्यात सांगली

१ कसबा
१ मौजे पदमाले

किता

१ का। तासगाऊ

१ कसबा
१ मौजे पारे
१ मौजे चिंचणी
१ मौजे मंगरूल
१ मौजे हतनुर
१ मौजे धामणी
१ मौजे पाडली
१ मौजे तुरची
१ मौजे ढवली
१ मौजे पुणदी

—

१०

१ का। आजनी

१ कसबा
१ मौजे वजरचावडी
१ मौजे गव्हाण
१ मौजे नायगव्हाण
१ मौजे वायफल
१ मौजे सिराढोण
१ मौजे बाणूर
१ मौजे जरडी
१ मौजे घाटनांदरे
१मौजे कुसुंब
१मौजे दहिवडी
१ मौजे वडगाव बारमाचे

—

१२

१ का। इसलामपूर

१ कसबा
१ मौजे आलते

१ मौजे बुरनाल
१ मौजे खटाव
१ मौजे कुपवाड
१ मौजे बुद्‌गाव
१ मौजे बिसूर
१ मौजे करनाल
१ मौजे वाडी
१ मौजे समडोली
—
१०

१ मौजे निंब
१ मौजे निंबलक
१ मौजे चिकलगोटे
१ मौजे आंधली
१ मौजे वोझर
१ मौजे सिरगाव
—
८

१ कर्यात कविटे येकंद
१ मौजे
१ मौजे निमकगाव
१ मौजे कोलापूर
१ मौजे वसगडे
१ मौजे नागाव
१ मौजे मद्‌गुणकी
१ मौजे निमणी
१ मौजे सिरगांव
१ मौजे वसबा
—
९

१ कर्यात भालवणी
१ कसबा
१ मौजे सलमबावी
१ मौजे सिवनी
१ मौजे कलंबी
१ मौजे खाबले
१ मौजे तांदुलवाडी
१ मौजे कोलापूर
१ मौजे बालेवाडी
—
८

१ कर्यात इचलकंर्जी
१ कसबा
१ मौजे चंदूर
१ मौजे हुपरी
१ मौजे रेणदाल
१ मौजे कोडोली
१ मौजे लाट
१ मौजे दटवाड
१ मौजे सुलकुड
१ मौजे ।सरदवाड
—
९

१ कर्यात इटे
१ कसबा
१ मौजे ढवलेश्वर
१ मौजे नवरी
१ मौजे हणमंतवाडी
१ मौजे येनगाव
१ मौजे कुराली
१ मौजे कारवे
१ मौज खेडी
१ मौजे नागेवाडी
१ मौजे भावकोच्चवाडी

१ मौजे धानबेडी
१ मौजे कोनेरवाडी
—
१२

१ कर्यात रुकडी
१ कसबा
१ मौजे मुडसिंगी
१ मौजे आतीकीरे
१ मौजे तीलवणी
१ मौजे कबनूर
१ मौजे शाहपूर
१ मौजे येडराव
१ मौजे हरोली
१ मौजे कोंडिकिरे
—
९

१ कर्यात कविटे माहांकाल
१ कसबा
१ मौजे हिंगणगाव
१ मौजे रांजणी
१ मौजे धुलगाव
१ मौजे इरली
१ मौजे कोकिल
१ मौजे खेलगाव
१ मौजे फेडगाव
१ मौजे जाखापूर
१ मौजे कुमलापूर
१ मौजे नागोल
१ मौजे कुंची
१ मौजे आलेगाव
१ मौजे बाभूलगाव
१ मौजे वाघोली
१ ————
—

१ कर्यात उदगाव
१ कसबा
१ मौजे उमलवाड
१ मौजे कोथली
१ मौजे दानोली
१ मौजे चिपरी
१ मौजे जेनापूर
१ मौजे नेज
१ मौजे वाठार
१ मौजे खोतसी
—
९

१ कर्यात बेडग
१ कसबा
१ कसबा
१ मौजे आरग
१ मौजे येरडाली
१ मौजे खेडराजुरी
१ मौजे मलेवाडी
१ मौजे बुडेवाडी
१ मौजे यलबेलकी
१ मौजे मालगाव
१ मौजे केपवाड

१ कर्यात देसींग
१ कसबा
१ मौजे हराली
१ मौजे सिरसिंग
१ मौजे म्हैसाल
१ मौजे सराटी
१ मौजे कोगनोली
१ मौजे कुमटोली
१ मौजे करोली
१ मौजे आल्काड
—
९

१ कर्यात सिरहटी
१ कसबा
१ मौजे हसूर
१ मौजे कनवाड
१ मौजे कुटवाड
१ मौजे घानवाड
१ मौजे उसाल
१ मौजे धरणगुती
१ मौजे आऊरवाड
१ मौजे गोरवाड
१ मौजे आलास
१ मौजे बस्तवाड
१ मौजे टाकली
—
१२

१ कसबा भिलवडी
१ कसबा
१ मौजे दुधारी
१ मौजे खटाव
—
१०

१ कर्यात मनेराजुरी
१ कसबा
१ मौजे करोली
१ मौजे कुमठे
१ मौजे सोनी
१ मौजे पाटगाऊ
१ मौजे उपकवी
१ मौजे धुलगाव
१ मौजे भोस
—
८

तेरीज येकंदर

	कर्याती	देह
का हवेली	१	११
का म्हैसाल	१	७

१ मौजे ताकारी	का सांगली	१	१०
१ मौजे तुपारी	का कविटे येकंद	१	९
१ मौजे घोगाव	का इचलकर्जी	१	९
१ मौजे बाबवडे	का रुकडी	१	९
१ मौजे नागराळा	का उदगाव	१	९
	का देसिंग	१	९
	का सिरहटी	१	१२
	भिलवडी	१	८
	तासगाव	१	११
	आजनी	१	१२
	इसालामपूर	१	८
	भालवणी	१	८
	इटे	१	१२
	कविटे माहांकाल	१	१५
	बेडग	१	१०
	मनेराजोरी	१	८
		१८	१७६

येणे प्रमाणे कर्याती आठरा येकून देहे येकसेह शाहतर मामले मजकूर येथील देशमुखीचे वतन आजरामऱ्हामत करून दिल्हे आसे या वतनास हक लाजिमा पान मान तश्रीफ बाजे कानु इनामती व इसाफत व मदत कदीम चालत आसल त्याप्रमाणे करार केले आसे तर तुम्ही मामले मजकुरची सेवा याचे हाते घेत जाणे आणि देशमुखीचे वतन राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणे या पत्राची प्रत लिहून घेऊन आसल पत्र भोगवटियास परतोन देणे. निर्देश समक्ष.

लेखांक ५७ तारीख २५-६-१७३१

श्री

अ. नं. ३४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरुधकृतनाम संवत्सरे आषाढ शुध द्वितीया गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वा

(सीका) (सीका) मी याणी मोकदमानी
देहाये कर्यात इचलकर्जी

सुभा प्रांत कोल्हापूर यासी आज्ञा केली यैसीजे राणोजी बिन पिराजी घोरपडे नवकस याणी मनोलीचे मुकामी विनंती केली की आपले आजे संताजी घोरपडे याणी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामीची सेवा मनोभावे केली राज्याभिवृद्धीविषई श्रमसायास बहुत केले याकरिता कैलासवासी स्वामीनी चंजीचे मुकामी मारनुलेवरी मेहरवान होऊन सरदेशमुखीचे वतन दिवाणचे होते ते मरहामत करून दिल्हे त्याप्रमाणे त्याणी आनभविले यामागे आपले चुलते राणोजी घोरपडे याणी वतन आनभविले ते स्वामीकार्यावरी खर्च जाहाले त्या उपरी आपले पिते पिराजी घोरपडे यानी स्वामीची सेवा निष्ठेन केली त्यानी वतन आनभविले भोगवटियासी पूर्वील पत्रे व्होती ती आवांतर प्रसंगामुले गेली पुढे भोगवटियासी पत्रे आसावी याकरिता सातारियाचे मुकामी राजश्री शाहूराजे यासी विनंती केली त्यानी आपली पत्रे करून दिल्ही आपण स्वामीची सेवा निष्ठेन करीत आव्हो तरी वतनाची पत्रे करून द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन विदित केले त्यावरून मनास आणिता राजश्री संताजी घोरपडे यानी तीर्थरूप राजेश्री कैलासवासी स्वामीची सेवा निष्ठेने केली व राजश्रो राणोजी घोरपडे स्वामी सेवा येकनिष्ठेने करीत आहेत याचे सर्व प्रकारे चालवणे हे स्वामीस परम आवश्यक याकरिता पूरवी राजश्री कैलासवासी स्वामीनी सरदेशमुखीचे वतन दिल्हे आहे त्याप्रमाणे राणोजी घोरपडे याजवरी स्वामी कृपालु होऊन मामले मिरज कर्याती बावीस हे सरदेशमुखीचे वतन दिल्हे आहे त्याप्रो सुभे माराकडे गाव वोढत आले आहेत बितपसील

ता॥ सदलगे पे॥ देह	ता॥ येकसंबे
१ मौजे कोडोली	१ मौजे टाकली
१ मौजे हुपरी	१ मौजे बस्तवाड
१ मौजे रणदाल	——
१ मौजे सुल्कोड	२
१ मौजे सिरदवाड	तेरीज
१ मौजे पटवाड	७ क॥ सदलगे
१ मौजे अबदुल्लाट	२ ता॥ येकसंबे
—	——
७	९

येणेप्रो देह नऊ सुभे मजकुराकडे वोढत आहेत सदरहू गावचे सरदेशमुखीचे वतन यासी आजराम्मरहमत करून दिल्हे असे या वतनास हाकलाजिमा पानमान तस-

रीफ बाजे कानु पूरवील चाल्त आले आहे त्याप्रमाणे राणोजी घोरपडे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभवितील देहमजकुरचे सरदेशमुखीचा आमल याकडे पाववीत जाणे निर्देश समक्ष.

रुजू संमत

मंत्री

बार सुरु सुद बार बार

लेखांक ५८ तारीख २५-६-१७३१

श्री

अ. नं. १३६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधकृतनाम संवत्सर आषाढ शुा द्वितीया गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी

याणी पुण्यसील सगुणाबाई

लिंबालकर यासी दिल्हे इनाम

पत्र यैसीजे तुम्ही स्वामीसंनिध विनंती केली की आपणास दानधर्मास हवेली कोलापूर प्रांत मौजे म्हावळुंगे हा गांव इनाम दिल्हा पाहिजे म्हणोन विदित केले त्यावरून तुम्ही स्वामीच्या पायापासी निष्ठा धरून त्रिकर्ण शुध्धीने वर्तत आहा तुमचे सर्व प्रकारे चालवणे स्वामीस परम आवशेक यास्तव स्वामी कृपालु होऊन तुम्हास नूतन इनाम कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौजे म्हावळुंगे ताा हवेली प्रांत कोलापूर हा गाव देहे १ येक पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून तुम्हास दानधर्मास इनाम आजरामरामत करून दिल्हा आसे तरी मौजे माार पूर्वमर्यादेप्रमाणे आपले स्वाधीन करून घेणे आणि इनाम तुम्ही वंशपरंपरेने अनभऊन सुरूरूप राहाणे. जाणिजे निर्देश समक्ष मोर्तब

रूजू सुा

मंत्री

ताा १

मोहरम सुा इसने

बार सुरु सुद बार बार

लेखांक ५९. तारीख ३०-६-१७३१

श्री

अ. नं. ११३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधीकृतनाम संवत्सरे आशाढ शुा ७ सप्तमी सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा संभु छत्रपति स्वामी याणी राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे नवकस

यासी आज्ञा केली यैसीजे
तुम्ही मनोलीचे मुकामी स्वा-
मीसंनिध विनंती केली

की आपले बाप राजश्री पिराजी घोरपडे स्वारीस गेले होते तेव्हा मौजे नागनूर का नूल येथील देसमुख बाहीर निघाला झुंज जाहाली ते प्रसंगी मारनिल्हे निधन पावले यास्तव मौजे मा॥र आपणास इनाम करून दिल्हे पाहिजे म्हणोन तुम्ही विदित केले त्यावरून स्वामी तुम्हावर कृपालु होऊन मौजे नागनूर का मुल्कात आजर हा गाव कुलबाब कुल्कानु हली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून इनाम आजरामन्हामत करून दिल्हे असे तर तुम्ही मौजे मजकूर पूर्वमर्यादे प्रा॥ आपले स्वाधीन घेणे आणि इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरन अनभऊन स्वामीच्या पायासी निष्ठा धरून सुखरूप राहाणे. निर्देश समक्ष मोर्तब असे.

रुजू संमत
मंत्री

तेरीख छ ५ (ता. २९-६-१७३१)
माहे मोहरम सुा इसने
बार सुरु सुद बार बार

लेखांक ६०

माहे जून इ. स. १७३१

श्री

अ. नं. १६६

श्रीगंगाजान्हवीसमान सगुणाबाई यासी प्रति राजेश्री राजा शंभु छत्रपति उपरी राजेश्री जानराव बिन केदारजी धारराऊ अमिरुलउमराऊ हे स्वामीचे येकनिष्ठ सेवा निष्ठेने करीत आहेत याचे सर्वप्रकारे चालवणे स्वामीस आवशेक याकरिता हाली यासी नूतन इनाम मौजे बोगरेनहाल पे॥ गोकाक हा गाव इनाम करून देऊन आलाहिदा सनदा सादर आहेत तरी तुम्हास मशारनिल्हे गावाचे साहित्याविसी सांगतील त्याप्रा॥ तुम्ही आगत्य धरून सर्वप्रकारे साहित्य करून महजुरी होऊन यैवज सुरलीत यासी पावे ते करणे जे कोणी उपसर्ग होतील त्यास ताकीद करून सांगणे बहुत काय लिहिणे मोर्तब.

सुरु सुद बार बार.

लेखांक ६१

तारीख ६–७–१७३१

श्री

नकलेची नकल
लक्ष्मी वयेकटेश

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ५८ विरोधीकृतनाम संवत्सरे आशाड शु॥
त्रयोदसी भोमवासरे क्षेत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी या

णी सखो देवाजी नाईक कुलकर्णी
मौजे रुइ त॥ रुकडी प्रांत पनाला

यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही मनोळीचे मुकामी स्वामीसंनिध विनंती केली की आपले वडिलानी श्री स्वामीची भक्ती बहुत केली श्री भजनासिवाये दुसरा निजध्यास नवता भक्तीस्तव श्री स्वामीने प्रतिमा गंडकीमूर्ति प्रसादिक दिधली * ते मूर्ति आपले वडिलानी गावास घेऊन आले आण मूर्तीची स्थापना मौजे मजकुरी केली श्रीची पूजा उत्साह ब्राम्हणसंतर्पण वडील करीत होते आपणही श्रीची पूजा करितो परंतु पूजा उत्साहाची अनकुलता नाही माहाराज धर्मपरायण देवब्राम्हणप्रतिपाल्क आहेत श्रीची पूजा उत्साहाची अनकुलता करून दिल्हेने श्रीची पूजा करून माहाराजास कल्याण चिंतून राहीन म्हणोन तुम्ही विदित केले त्याजवरून मनास आणिता श्रीचे मूर्तीची स्थापना तुमचे वडिलानी मौजे मजकुरी वेयकंटपूर (व्यंकटपूर) असे नांव ठेवून केली आहे याकरिता श्रीचे पूजा उत्साहास स्वामीनी नूतन इनाम कुलबाब व कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी सहित खेरीज हकदार व इनामदार करून काटी मूळ जमीन चावर ३ तीन चावर इनाम सर्वमान्य करुन दिल्ही आहे ती तुम्ही सदरहू तीन चावर जमीन मोजून चतुःसीमा करून आपले स्वाधीन करून घेणे आणि सदरहू जमीनीचा ऐवज होईल त्या ऐवजामध्ये श्रीची पूजा उत्साह ब्राम्हणसंतर्पण वंशपरंपरेने करीत जाणे. निर्देश समक्ष

मोर्तब असे.

रुजु संमत
मंत्री
बार सुरु सुद बार बार.

लेखांक ६२ तारीख १७-७-१७३१

श्री

अ. नं. ९४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधीकृतनाम संवत्सरे आशाड बहुल दशमी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री शिवलिंग सिवराम वजारतमाब देसाई परगणे गोकाक यासी आज्ञा केली यैसीजे सिदराम देसाई याकडे परगणे मार पेशजी दिल्हा होता तो दूर करून राजश्री राणोजी घोरपडे

* कांहीं नकलेंत "प्रतिमा मुहुर्ती गंडकीगिरीहून प्रसादीक दिधली" असेंही नकललें आहे.

सेनापति याकडे जमावाचे बेगमीस दिल्हा आहे तरी तुम्ही परगणे मार मारनिलेकडे देविल्याप्रमाणे सुरलीत चालवणे खलेल कांहीं न करणे. बहुत काये लिहिणे. मोर्तब.

बार सुरु सुद बार बार.

लेखांक ६३ तारीख २५-७-१७३१

श्री

अ. नं. ११४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधकृतनास संवत्सरे श्रावण शुध त्रितीया रविवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री भानजी बलाल हेजीब मुा सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे बदल देणे वेतन राजश्री बाबूराऊ शंकर दिनकरराऊ चिटणीस यासी ××× येकून रुपये येकसे सवायक्याइसी रास देविले असेत तोफियाचे यैवजी आदा करणे पावलियाचा जाब घेणे तेणेप्रमाणे मुजरा होईल जाणिजे. बहुत काय लिहिणे.

मयादयं
विराजते
माहे सफर

तेरीख १
सुा इसने सलासीन मया व अलफ.

लेखांक ६४ तारीख २०-११-१७३१

श्री

पारसनीस

अनु. नं. १५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधकृतनाम संवत्सरे मार्गसीर्ष शुा द्वितीया मंदवासरे क्षेत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी मौजे पांगिरे ताा कापसी यासी आज्ञा केली यैसीजे मौजे मजकूर पेशजी कारखान्याकडील सेनापतीकडे दिल्हे होते ते हाली दूर करून दुसरा वाडियाकडे दरोबस्त दिल्हे आहे कमाविसदार येईल त्यासी रुजू राहून आकाराप्रमाणे ऐवज दुसरा वाडियाकडे बीनकसूर पाठवीत जाणे. निर्देश समक्ष.

मर्यादेयं
विराजते
रुजू सा मंत्री

तेरीख १ जमादिलाखर
सुा इसने बार सुरु सुद बार बार
बार सुरु सुद बार
सुरु सुद बार

लेखांक ६५ तारीख २२-१२-१७३१

श्री

अ. नं. ११५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधीकृतनाम संवत्सरे वैश शुध पंचमी सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री भानजी बलाल हेजीव मुकाम सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे संस्थानकरास तुम्हाकडोन वस्त्राबाबत देविले होन १०० येकसे

राजश्री सवाई बसवलिंग नाईक यासी वस्त्रे खरेदी करून देणे. — मधेस्त उभयता यासी ४०

६०

येकून येकसे होन रास देविले आहेत याची वस्त्रे खरेदी करुन संस्थानकरास देऊन पावलियाचा जाब हुजूर पाठवून देणे. जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं विराजते

तेरीख ३ माहे रजब
सु॥ इहिदे सलासीन मया व अलफ.
(ता. २१-१२-१७३१)

लेखांक ६६ इ. स. १७३१

श्री

पारसनिसी

अनु. नं. २२

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री संभाजी राजे यासी प्रति शाहू राजे कृतानेक आसीर्वाद उपरी येथील कुषल जाणून स्वकीये कुषल लेखन करणे विशेष राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान पराभव संवत्सरी दक्ष प्रांते गेले ते समई संवस्थान सोंधे यावरी कसाला पडिला हे तुम्ही जाणतच आहा आलाकडे संवस्थानीकाकडून अया हुजूर येऊन संवस्थानाचे नातवानीचा प्रसंग निवेदन केला त्यास संवस्थानचा उपद्रव वारोन संवरक्षण व्हावे हा अर्थ चितात आणून दरसाल पांच हजार होन संवस्थानाकडे करार केले प्रस्तुत

तुमची आमची भेट जाहालियावरी संवस्थान तुम्हाकडे दिले त्यास संवस्थानची नातवानी पाहोन आम्ही आपणाकडील नियेत केला होता तो संवस्थानिकास माफ केला असे उभयेपक्षीं या संवस्थानिकाचे अगत्य धरून चालवावे उचित आहे याकरिता आम्हाकडील नियेताचे तोष्ट त्यास न लावणे तुम्ही आपल्या पूर्वील भाषापत्राप्रमाणे यैवज घेऊन संवस्थानिकाचे सर्वप्रकारे चालवावयास अंतर न करणे. बहुत काये लिहिणे.

लेखांक ६७ इ. स. १७३१ नंतर

श्री

अ. नं. २८

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री संभाजीराजे यासी प्रति शाहू राजे कृतानेक आसीर्वाद उपरी कृष्णे व वारणेपलीकडे तुम्हास पूर्वी तह करून दिल्हा आहे त्यास मिरज प्रांताच्या कर्याती च्यार पलीकडे आहेत त्याची मोगलाईकडील बाब तुम्हाकडे दिल्ही आहे कर्याती बिा कर्यात इचलकरंजी देह नव.

१ कसबा १ दटवाड, १ कोंडाली १ लाट १ हुपरी । ५

१ रेणदाल १ चंदूर १ सुल्कोड १ सिरदवाड । ४

कर्यात सिरटी देह बारा पैकी वजा कृष्णे अलीकडे देहे.

१ अलास १ गोरवाड । २ १ ओरवाड १ सेडसाल । २

यो वजा देहे च्यार बाकी देहे ८

१ कसबा १ कनवाड १ कुटवाड १ घालवाड १ टाकली १ हसूर १ धरणगुती १ बस्तवाड

८

कर्यात रुकडी देह नव

१ कसबा १ हरोली १ येडराव १ शाहापूर १ कोडकिरे १ कब्नूर १ तिलवणी १ मुडसिंगी १ अतिकिरे

कर्यात उपगाऊ

१ कसबा १ उमलवाड १ कोथली १ दानोली १ चिपरी १ जैनापूर १ नेज १ वाठार १ खोदसी (खोची) देह । ९

येणेप्रमाणे देह ३५ पंचतीस येकून कर्याती च्यार येथील मोगलाईबाब तुम्हाकडे दिल्ही असे इकडील दखलगिरी होणार नाही रौद्र संवत्सर माघ शुध पंचमी + पंचतीस ३५ गावची मोगलाईबाब मिरज प्रांतीची कृष्णा व वारणा पलीकडची दिली अस पूरवील तहातील आसीरवाद.

+ येथून पुढें अक्षर शाहू महाराजांचें.

लेखांक ६८ इ. स. १७३१-३२

श्री

अ. नं. ११६

यादी सेनापति पदाधिकारी त्याजकडे पेशजी सरंजामी देह सन इसने सलासीन ४०१ त्याजपा। अलीकडे कैलासवासी थोरले सेनापति याजकडे चालत आले ते

किता	किता
१ को। कापसी	१ का। लाट
१ नंदपाळ	१ पटणीकुडी
१ खडकेच्यावाडा	१ हिंगलज
१ मतेंगे	१ वालकी
१ कर्डेहाल	१ रामापूर
१ तमनाकवाडा	१ हरली (हरळी)
१ जेन्हाल	१ चिखलहाल
१ गलगले	१ नवलेहाल
१ हसूर बु॥	१ नांगनूर
१ हसूर खु॥	१ पांगरे
१ वडगांव	१ चिमगांव
१ कासारी	१ गवसे
१ मांगनूर	१ देवर्डे
१ मेंडवडे	१ सिराढोण
१ पांगरे	१ अबदुललाट
१ करंजीवणे	१ रांगोली
१ बोमवी	१ यमगरणी
१ बेलेवाडीकाल्मा	१ यलगुड
१ बामणे	१ मतीवडे
१ लिंगनूर	१ करमली
१ मुंगली	१ कडलगे
१ पाल	१ माहागोंड
१ धामणे	१ कुर्दवाड
१ माद्याल	१ मंगावती
१ हलदी	१ सुरुकुली
१ बेणीकरे	१ कुरुकुली
१ बोलघोल	१ भिवसी

१ बुदलमुख	१ नागनूर
१ पांगरे	१ भोज
१ सिवापूर	१ येकसंब
१ तवंद्री	१ जत्रवाट
१ वरवे	१ हुन्नरी
१ बेलेवाडीमासा	१ तलंदगे
—	१ बोरवाड
३३	१ हेरवाड
	१ संवदुती
	१ माहागाव
	—
	३७

लेखांक ६९ इ. स. १७३१-३२

श्री

नं. ११८

यादी राजशके ५८ श्री राजा शंभु छत्रपति याची सनद राणोजी बिन पिराजी घोरपडे नवकस यासी मनोलीचे मुकामी दिल्ही त्यात आपले आजे संताजी घोरपडे याणी तीर्थ॥ कैलासवासी राजारामसाहेब माहाराज याचे कालकीर्दीत मनोभाव स्वामीशेवा करून राज्याभिवृध्धी केली त्यामागे आपले चुलते राणोजी घोरपडे याणी आनभविले ते स्वामीकार्यावर खर्च जाहले त्या उपरी आपले पिते पिराजी घोरपडे याणी स्वामीशेवा केली त्याणी वतन आनभविले राणोजी घोरपडे ममलकतमदार राजश्री संताजी घोरपडे याचे नांवे पत्र रामचंद्र नीलकंठ अमात्य याचे सु॥ सलास तिसैन अलफ श्रीमन्माहाराज राजश्री राजारामसाहेब छत्रपति स्वामी कर्नाटकात जातेसमई तुम्हास या प्रांती ठेऊन गेल्यासमई इकडे गनीमाची धामधूम बहुत होऊन कुलदेशदुर्ग हस्तगत केले होते (ते विगली) + + + राज्यामध्य काही अर्थ उरला नाही कुल म्हराटे याणी इनाम खता करून गनीमाकडे गेले परंतु तुम्ही इमानन खता न करिता राजश्रीच्या पायासी बहुत यकनिष्ठा धरून जमाव करून सेख निजाम व सरजाखान व रणमस्तखान व जानसरखान असे उमदे वजीर बुडविले जागाजागा गनीमास काटगा घालून (घालोन) + + नेस्तनाबूद केले आणि देश सोडविला राज्य संरक्षणाच्या प्रसंगास असाधारण श्रम केले अरंगजेबास दहशत लावली पुढेही कितेक स्वामीकार्याचे ठाई हिमत धरिता याकरिता तुम्हावरी राजश्री स्वामी संतोष होऊन मामले मिरज कर्याती बावीस येथील देशमुख होते ते नेस्तनाबूद जाहाले त्याचे वंशी कोण्ही नाही त्याचे सुतालीक

होते ते बोलाऊन आणून देशमुखाचे वतन खात होते ते दूरबुधी धरून गनीमासी मिलोन फिसात केली येकनिष्ठा धरून इकडे येऊन भेटले नाहीत म्हणून याची देशमुखी दूर करून तुम्हास आजरामरामत देशमुखी मामले मजकुरची अवलाद अफलाद वतन करून दिल्हे असे.

लेखांक ७०   तारीख १९-२-१७३२

श्री

अ. नं. ११९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ विरोधक्रुतनाम संवत्सरे फाल्गुण शुध पंचमी मंदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री भानजी बलाल हेजीब मुकाम सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री नारो अनंत सबनीस दिमत कारखाने याच्या पुत्राच्या व्रतबंधाकारणे वेतनात होन १०० येकसे रास देविले आहेत तोफियाचे यैवजी आदा करणे आणि पावलियाचा जाब घेणें तेप्रमाणे मजुरा आसेत पेसजी मारनिलेस यात्रेसमधे यैवज देविला होता तो यास पावला नाही तरी पावता करणें जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते
माहे रमजान

तेरीख ५
सु॥ इसने सलासीन मया अलफ
बार

(ता. २१-२-१७३२)

लेखांक ७१   तारीख २१-३-१७३२

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ परिधावीनाम संवत्सरे चैत्र सुध सप्तमी भोमवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शंभु छेत्रपति स्वामी याणी राजमान्ये राजश्री भानजी बलाल हेजीब मुकाम सोंधे यासी आज्ञा केलीं यैसीजे वेदशास्त्रसंपन्न राजश्री हरिहराच्यार्य पंडितराये यास वेतनाचे यैवजी तुम्हाकडून होन पनास देविले आहेत तोफ्याचे यैवजी आदा करणे पावलियाचा जाब घेणे तेप्रमाणे मुजरा असे जाणिजे बहुत काय लिहिणे.

माहे शोवाल

मर्यादेयं
विराजते

तेरीख ६
सु॥ इसने सलासीन मया व अलफ.
बार

तारीख ९-४-१७३२

लेखांक ७२

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५८ परिधावीनाम संवत्सरे चैत्र बहुल येकादसी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री भानजी बलाल हेजीब मु॥ सोंधे यासी आज्ञा केली यैसीजे बदल देणे वेतनात राजश्री बालाजी माहादेव मुतालीक दि॥ मजमु यासी तोफियाचे यैवजी होन ५० पनास देविले आहेत आदा करणे पावलियाचे कब्ज घेणे तेणेप्रमाणे मुभा असे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते

तेरीख २४ माहे सवाल
सु॥ इसने सलासीन मया अलफ
बार

तारीख ३-८-१७३२

लेखांक ७३

श्री

अ. नं. १२१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५९ परिधावीनाम संवत्सर श्रावण बहुल नवमी गुरुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

राजेश्री पिराजी बागुल व
शाहाजी बागुल बिन मानाजी
बागुल यास दिल्हे इनाम

पत्र यैसीजे तुम्ही स्वामीचे पुरातन येकनिष्ट शेवक तुमचे पिते मानाजी बागुल याणी स्वामीच्या राज्यात श्रमसाहस करून शेवा निष्टेने केली ते स्वामी कार्यावर खर्च जाहले याकरिता तुमचे चालविणे स्वामीस अगत्य यास्तव स्वामीनी तुम्हास सनद दिल्हे आश्विनामधे प्लवनाम संवत्सरी + + + + मौजे येलगुड पा राइबाग सुभा कोलापूर हा गाव इनाम आजरामऱ्हामत करून दिल्हे होता त्यास आलीकडे घालमेल होऊन मौजे मजकूर रघुनाथगिरीबावा गोसावी यास दिल्हे होता प्रस्तुत तुम्ही व तुम्हाकडील रो राघो विठल करवीरचे स्वामीसंनिध येऊन विनंती केली की मौजे मार आपणास माहाराजानी पूर्वीपासून इनाम दिल्हा आहे व पत्रही माहाराजाची आपणाजवल आहेत हाली हा गाव गोसावियासी मौजे मार दिल्हा आहे यैशास आपला गाव आपणाकडे माहाराज कृपालु होऊन इनाम करार करून दिल्हा पाहिजे म्हणून विदित केले व सनदाही पेशजीच्या आणून दाखविल्या त्यावरून तुमचा गाव तुम्हास करुन द्यावा हे स्वामीस परम आवषेक आहे याकरिता स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन मौज येलगुड पा रायबाग प्रा मजकूर

हा गाव रघुनाथगिरीबावा याकडून दूर करून हली तुम्हाकडे इनाम कुलबाब कुलकानु जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौज मजकूर इनाम क़रार करून दिल्हे असे तरी तुम्ही मौजे मजकूर पूर्ववत प्रो आपले स्वाधीन करून घेणे आणि इनाम तुम्ही उभयता वडिलाचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहणे. निर्देश समक्ष.

मोर्तब
असे.

रुजू संमत
मंत्री

तारीख २२ सफर सुा सलास सलासीन
बार सुरु सुद बार बार

लेखांक ७४ तारीख १७-१२-१७३३

निवडी दप्तर रु. नं. १ (अ)

अ. नं. १२३

यादी बोली नि।। राणोजी घोरपडे सेनापति छ २० रजब सु।। आर्बा सलासीन मया व अलफ

वतनी पत्रे

किता पत्र राणोजी बिन पिराजी घोरपडे नौकस देशमुख व सरदेशमुख मामले मिरज सुभा प्रांत मार यासी आज्ञा केली येसीजे तुमचेविसी राजश्री सुभानराव सिंदे सेनाखासकील याणी कापसीचे मुकामी विनंती केली येसीजे देशमुख व सरदेशमुख मारनिल्हे स्वामीचे पायासी येकनिष्ठेने वर्तणूक करीत आहेत मनोलीच्या मु।। स्वामी कृपालु होऊन वतनाची पत्रे भोगवटियासी करून दिल्ही या वतनासी इनामगाव का।। इचलकर्जी व मौजे सिरढोण दोन गावाची इनामपत्रे जाहाली नाहीत स्वामीनी कृपालु होऊन दोन गावाची इनामपत्रे करून द्यावयास आज्ञा जाहलियाणे वतन व इनामगाव अनभवून येकनिष्ठन वतनी सेवा करतील आणि इनाम गावच्या प्रसंगास सेरणी माथा ठेवलियाणे मान्य करितील म्हणोन विनंती केली त्याजवरून मनास आणिता तुमचे आजे संताजी बिन माहालोजी घोरपडे याणी अवरंगजेब याच्या अवतारामध्ये आवघे मराठे याणी इमानासी खता करून गनीमास मिलाले असता हिमत धरून श्रमसाहास करून फौज मेलऊन सेखनिजाम व सरज्याखान व ज्यान+ सरखान व रणमस्तखान ऐसे उमदे वजीर बुडऊन देशदुर्ग संवरक्षण केली म्हणोन तीर्थरूप कैलासवासी स्वामीनी चंजीचे मुकामी मामले मिरज सुभा प्रांत मार येथील वतन देशमुखी व सरदेशमुखीचे आजरामरामत करून दिल्हे त्याणी वतन आनभविले त्या उपर तुमचे चुलते राणोजी बिन संताजी

घोरपडे याणी अनभविले मग तुमचे बाप पिराजी संताजी घोरपडे याणी आनभविले सांप्रत तुम्ही येकनिष्ठेन वर्तणूक करून आनभवीत आहा तुमचे चालवणे आवशक म्हणोन मनोलीचे मुकामी भोगवटियासी वतनाची पत्रे करून दिल्ही आहेत हाली स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन वतनासी इनामगाव दिल्हे का॥ इचलकर्जी कर्यात मा।र मामले मिरज हा गाव मामले मा।रच्या देशमुखीच्या वतनास इनाम देह येक मौज सिरढोण ता। रुकडी मामले मा।रच्या सरदेशमुखीच्या वतनासी इनाम देह येक यो। देह दोन का इचलकर्जी कर्यात मा।र व मौज सिरढोण ता। रुकडी हे दोनी गाव देशमुखी व सरदेशमुखीच्या वतनास दुतर्फा इनाम आजरामरामत करून द्यावा इनाम तिजाई सालदरसाल माप इनामगावास सेरणी तुमच्या माथा ठेविल आहे किंता पत्र मामले सिरज देशमुखी वतन करयाती १८ यो देह येकशेदेशाहातर पैकी कृष्णेआलीकड करयाती च्यार

करयाती उदगाव	करयात सिरटी
१ का	१ कसबा
१ उमळवाड	१ धरणगुती
१ कोथाली	१ सेडबाल
१ दानोली	१ हासूर
१ चिपरी	१ कनवाड
१ जैनापूर	१ कुटवाड
१ खोतसी	१ घालवाड
१ वाठार	१ औरवाड
१ नेज	१ गौरवाड
—	१ आलास
९	१ बस्तवाड
	१ टाकली
	—
	१२

का इचलकर्जी	ता॥ रुकडी
१ कसबा	१ कसबा
१ चंदूर	१ मुडसिंगी
१ कोडोली	१ कबनूर
१ हुपरी	१ येडराव
१ रेणदाल	१ हरोली
१ सुलकोड	१ कोंडकिरे
१ सिरदवाड	१ तिलवणी

१ दत्तवाड	१ आतिकिर
१ आबदुल्लाट	१ शाहापूर
—	—
९	९

तेरीज

९ किता

१२ किता

९ किता

९ किता

—

३९

यासी देशमुखीच्या वतनास हाक व इनाम पुरातन आपल शाई कारकीर्दीस आसे त्याप्रो आज्ञा करणार तीं आगर बोली देसकप्रमाणे करार करून चालवावयास स्वामी समर्थ आहेत.

कलम १ किता कृष्णे पलेकडे मिरज प्रांतीच्या करयाती चौदा आहेत.

देशमुखीच्या वतनास पत्रे.

माहाराज राजश्री शाहू राजे यास पत्र राणोजी बिन पिराजी घोरपडे नौकस यास देशमुखीचे वतन मरामत करून दिल्हे आहे पूर्वी आपण पत्रे करून दिल्ही आहेत त्यास सांप्रत साहितपत्र करून द्याव म्हणोन पत्र १ यक	उदाजी चवाण यास पत्र मामले मारचे देशमुखीचे वतन राणोजी बिन पिराजी घोरपडे नौकस यास आजरामरामत करून दिल्हे आहे तर वतनी कार्यभाग याच्या मुतालिकाच्या हातून घेऊन बोलावे इनाम कानु बाब सुरलीत चालवणे वतनी मामलियाबदल धामधूम होय ते गोष्टी न करणे. १

किता सरंजाम पो गावगना कबिले राहावे या कारणे जागे व वाडे केले आहेत त्यास कापसीच्या मुकामी चवथाईबाबती माफ होऊन सेवकाकडे गाव सुरलीत चालवावे म्हणोन विनंती केली आहे गाव बि तपसील

निा राणोजी घोरपडे शेनापति	निसबत आपाजी सितोले
३ तालुके सोहिराबाई	१ आंकली
१ पटणकुडी	१ कसबा लाट
१ वाळकी	१ कसबा रायबाग
१ कुरुन्दवाड	१ येडराव
	१ राजापूर
—	—
३	५

३ तालुक द्वारकाबाई

१ कापसी

१ मागनूर

१ कुडची

४ स्वता कबिलेस

१ गडहिंग्लज

१ नागनूर का नूल

१ सुल्कोड

१ महागाव

—

४

बाबाजी सिंगाडे

मौजे तलवदगे

मानाजी काले कसबा

सेंवदलगे १

सयाजी सांवत

१ कसबा येकंसंबे

१ दानवाड

१ कलोल

—

३

शेट्याजी फुनकर

कारदगे १

निंबाजी खाडवलकर

नसलापूर १

सिवाजी घोरपडे

१ कसबा आजरे

१ दटवाड

—

२

यडवोजी सांवत

मौज टाकली १

फिरंगोजी जाधव

मौज सिरगोपी १

खंडोजी पिसाल कसबा

नेज १

सताजी मोहिते

मौजे रदाल १

सुल्तानजी गाइकवाड

१ हुपरी

१ आबदूल लाट

मागूर ता। सदल्ग

—

२

आनंदराऊ बाबुराऊ

१ सिरदवाड

१ बेलवले खुर्द

—

२

नारायेण व्यंकटराऊ

१ कसबा उतूर

१ बारवाड

१ मतिवड

—

३

हुसेनखान फणी

१ येमगरणी

१ भिवसी

—

२

गोसावी नि।।

१ उदगिरी भोज

१ गणंब्राण गलगल

१ प्रलादपुरी कासारी

१ तारागिरी सवदत्ती

१ बसवंत बान

पांगेर दरवस

—

५

का मुनालीच्या मुकामी करार जाहले होते याचा तट पडला आहे याची विनंती करावी.

सगुणाबाई याणी सरदेशमुखीचा
मुदा घालून आमच्या सरंजामातून
गाव घेतले ते सरदेशमुखीकडून दूर
जाहले ते आम्हाकडे सरंजामात
करार करून द्यावे
१ बारवाड
१ सांगवाड

२
गोपाल कानर याचे वतन गारगो-
टीची पाटिलकीच आहे कज्या
निवडला आहे दुमाला मिसल
पाहिजे. १

का गाव सरंजामात दिल्हे होते
१ मौजे इचलहाल ता। आजर
१ बेलसवाड का म्हागाव

२
कऱ्हाड म्हाल म्हणोन दिल्हा होता
तो म्हाल नव्हे मुद्गल हावेली
खालसात खेडीयाची तरफ आहे
तरी याच्या मुबदला माहाल कृष्णगी
अगर मुद्गल म्हाल द्यावा. १

किता साहितपत्र राणोजी घोरपडे सेनापति व मुब्रानराव सिंदे सेनाखासकील यास स्वामी कार्याचे मसलतीस.

देसकासी
सरकार मुद्गल सरकार रायचूर
उभयेतास रुजू होऊन मुलुकची
खंडणी तहतरह देखरेख करून
मोकासा व चौथाईचा निकाल
करून देणे स्वामी कार्याप्रसंगा-
सी आज्ञा करतील त्या प्रो
वर्तणूक करणे म्हणोन पत्र २

सरकार तोरगल व सरकार बंकापूर
किता २
१ वेंकद्री बद्रीत्रिमल प्रांत कृष्णगी
मुकाम हणमंतसागर
१ दवडी नाइक किले बंदावी
(बदामी)
१ चनव्वा नाडगौडा तोरगल
१ नागोजी टाकवडी प्रांत गदग
१ खानगौडा प्रांत लक्ष्मश्वर
१ लिंगनगौडा प्रांत गुंतल

संवस्थानास

बिदनुरकरासी पत्रे तुमचेविसी
सेनापति व सेनाखासकील याणी
विनंती केली पत्रे पाठविली की
संवस्थानिकानी पूर्वी करार केला
आहे की व हली लेख केला आहे
की नेहमी ऐवज हुजूर बिलाकसूर
पावविती नेहमी हेजीब संनिध

सोंदेकरास पत्र उभयेतास आज्ञा करून
मसलतेस रवाना केले आहेत स्वामी
कार्याविसी लिहितील त्याजप्रो
फौज सामील करून देणे. वरकड
कार्यभाग करणे.

कलम १

पाठवितो आणि स्वामी का-
र्यास फौजेनिसी सरदेश येतो
आपली फौज सामील करितो
त्यावरून विदित जाहाले तरी
उभयतास रवाना केले आसे
सरदेश येताच फौज सामील करून
देऊन महतकार्य करून उभयेता लि-
हितील त्यावरून कलेल कल्म १

किता		ताले माहिदीन खान	१
आबजलमजीदखानास	१		
पिराजी घोरपडे मुधोलकर	१		

यासी पत्र उभयेतास स्वामी कार्यासी रवाना केले आहेत हरयेकविसीं लिहितील त्याप्रों मदती इकदाप करीत जाणे.

पालेगार

१ आलेगुपीकर	१ चित्रदुरगकर
१ पिंडेनाईक आहिरी वंगनगिरीकर	१ उडीकोटीकर
१ लिगवनाडगौडा प्रांत दरुर आजी गधालकर	१ चिंकलचखान फरजंद वासुदेव नाईक देंवदुर्गकर
१ कनकगिरीकर	१ हरपनहलीकर
	१ रायदुर्गकर
४	६

येणेप्रो विंनती यादी लिहून नारो खंडेराऊ व आनंदराऊ पाठविले आहेत सेवेसी विंनती करतील त्याप्रो आंज्ञा करावयासी स्वामी समर्थ आहेत.

लेखांक ७५ तारीख २७-१-१७३४

श्री

अ. नं. ३९

स्वस्ति श्री राज्याभिषक शके ६० प्रमोदीनाम संवत्सर माघ शुध चतुर्थी भानुवासरे क्षांत्रयकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

(सिका) (सिका) मोकदमानी मौजे कुर्दवाड
ता आलत यासी आज्ञा केली

यैसीजे मौज मजकुरची चौथाईचा यैवज पेषजी राजश्री चिंतो महादेव याजकडे जमावाचे

बेगमीस दिल्हा होता हली मारनिल्कडून दूर करून राजश्री राणोजी घोरपडे सेनापति याकडे देविला आहे तरी तुम्ही सेनापतीकडे मौजे मारचे आकाराची चौथाईचा ऐवज होईल तो वसूल देणे दुसरेकडे वसूल न देणे मौज मारापैकी हुजूर नजरेचे रुा १५० करार केले असत तो ऐवज हुजूर सिताब पाठऊन देणे जाणिजे.

निर्देस समक्ष मोर्तब.

रुजू संमत मंत्री

तारीख २ रमजान सुा आर्बा

बार सुरु सुद बार बार.

लेखांक ७६ माहे एप्रिल इ. स. १७३४ नंतर

श्री

नकल

पारसनिसी

अनु. नं. २०

श्रियासह चिरंजीव राजमान्ये राजेश्री संभाजी राजे यासी प्रति शाहू राजे आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे विशेष राजेश्री जिवाजी खंडेराव चिटणीस याणी विनंती केली की पूर्वी आपले वडिलानी स्वामीसेवा बहुत निष्ठेने केली त्याजवरून कृपालु होऊन संपूर्ण राज्यातील सरकारकून व सरदार व किलेकोट व जंजिरे येथील चिटणीसी व कारखाननिसी व जमीनिसी हे तीन धंदे वंशपरंपरेने करून दिल्हे आहेत याजप्रमाणे चालत आहेत व स्वामीनी प्रांत पनाला येथील नाडगवडीचे वतन करून दिल्हे त्यास सांप्रत दोही राज्यातील तह जाला याजमुले वारणेपलीकडील पनाल प्रांतीची नाडगवडीस दिकत पडली आहे व येकदोन गाव राजपत्री चालत नाहीत व तीन धंदें पूर्वीपासून चाल्तात त्याप्रमाणे सुरलीत चालावे येविसी येकदोन पत्रे नेली असता चालत नाही याजवरून हे पत्र लिहिले आहे तरी तीन धंदे व नाडगवडी पेशजीप्रमाणे चालते करावे तुम्हास येकदोनवेला चिटणिसीच्या धंद्याविसी लिहिले असता सुरलीत केले नाही हे उचित नसे याचे वडिलनी कैलासवासी तीर्थरूप माहाराजापासी सेवा येकनिष्ठे बहुत केली तेव्हा संतोष होऊन शफत करून राज्यातील तीन धंदे वंशपरंपरेने दिल्हे व चंदीवर संकट पडले तेव्हा जीवाभ्य श्रम करून काकासाहेबास काढून आणिले तेव्हा केली तर हे तुम्ही जाणत आहा तर सुरलीत तिनी धंदे याजकडे चालवावे. वारणेपलीकडीलहि नाडगवडी याची याजकडे चाल्वावी हा आसीर्वाद.

लेखांक ७७ तारीख १७-७-१७३४

श्री

अ. नं. १२५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६१ आनंदनाम संवत्सर आशाड बहुल त्रयोदसी सोमेवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजेश्री त्रिंब (क) राव कृष्ण यासी आज्ञा केली यैसीजे जानोजी नलवडे सरनोबत किले सामानगड हे स्वामी कार्यावरी जुंजात + पडले याचे चालवणे हे स्वामीस आगत्य याकरिता याचे भाऊ मालोजी बिन बाजी नलवडे यास नूतन इनाम कुलबाव कुलकानु खेरीज हाकदार व इनामदार करून हणीमनहाल का नूल प्रा आजरे हा गाव इनाम आजराहमत करून दिले आसे तरी तुम्ही हे जाणून मौजे माार यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे या पत्राची प्रती लिहून आसल देणे बहुत काय लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ आसा.

बार बार

लेखांक ७८ ता. २-४-१७३५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६१ राक्षसनाम संवत्सर चैत्र बहुल शेष्टी सोमवासरे क्षेत्रियकुलावतंस श्री राजा संभु छत्रपति स्वामी याणी वेाा राजश्री हरभट बिन लक्ष्मुमण-भट उपनाम लाटकर गोत्र काश्येप सूत्र आश्वलायन वास्तव्य

पाटगाव यासी दिल्हे इनाम

यैसाजे तुमचेविसी राजश्री बाबा-

जी नीलकंठ मुतालीक दिंमत सुमंत याणी विनंती केली की वेाा भले साक्षर विद्यावंत कुटुंबवत्सल आहेत योगक्षेमाची अनुकूलता नाही तरी काही इनाम करून दिल्हा तर तेथील उत्पन्न येईल ते भक्षून स्वामीस कल्याण चिंतून राहातील म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही भले सिस्ट वैदिक पुराणीक तुमची अनकूलता करून दिल्ही पाहिजे बहुत श्रेयसतकार आहे यास्तव हाली स्वामीनी तुम्हास योगक्षेमाची अनकुलतेस नूतन इनाम कुलबाब कुलकानु खेरीज हकदार करून जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित मौजे सुधाल तर्फ बनापूर या गावपैकी कीर्दीची भात जमीन विसापांडाचे बिघे पाा जमीन बिघे तीन रास इनाम सर्वमान्य करून दिल्हे असे तरी तुम्ही मौजे मजकूर पैकी सदरहू जमीन कीर्दीची

+ "तांब्राचे भांडणात पडले" असें वाक्य अ. नं. १२६ मध्यें आहे.

मोजून चतुःसिमा करून आपल्या सोधीन करून घेणे आणि इनाम तुम्ही वडिलाचे पुत्रपऊत्रादि वंशपरंपरेने अनभऊन स्नानसंध्या करून सुखरूप राहाणे. जाणिजे. निर्देश समक्ष.

तारीख १९ रुजू सुमंत

जिल्काद सुा खमस मंत्री

बार बार

सुरु सुद बार बार

लेखांक ७९ तारीख २१-१०-१७३५

श्री

रु. नं. १

अ. नं. ९

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री राणोजी घोरपडे सेनापति ता मोकदमानी मौजे रांगोळी कसबा नेज प्रांत हुकेरी सुा सीत सलासीन मया व आलफ मौज मजकूर हा गाव राजश्री व्यंकटराव नारायण यास हकदार व इनामदार वजा करून वरकड ऐवज कुलबाब व कुलकानु इनाम दिल्हा असे तरी तुम्ही याचे रजतलबेत वर्तणूक करीत जाणे सदर्हू मौज मजकूर पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम दिला असे या पत्राची नक्कल लिहून घेऊन असल पत्र रावजीकड भोगवटेस परतोन देणे जाणिजे.

छ १५ जाकर मोर्तब.

असल वरून नक्कल.

लेखांक ८० तारीख २१-१०-१७३५

श्री

रु. नं. १

अ. नं. १०

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री राणोजी घोरपडे सेनापति ता। मोकदमानी मौज अबदुललाट कसबा इचलकरंजी प्रांत मिरज सु॥ सीत सलासीन व आलफ मौजे मजकूर गाईकवाड याजकडे मोकासी आहे तो त्याजकडून दूर करून हाली राजेश्री व्यंकटराव नारायण यास हकदार व इनामदार वजा करून वरकड ऐवज कुलबाब कुलकानु इनाम दिले असे तरी याचे रजातलबेत वर्तनूक करीत जाणे सदर्हू मौजे मजकूर पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम दिल असे या पत्राची नक्कल लिहून घेऊन असल पत्र रावजीकडे भोगवटियास परतोन देण जाणिजे छ१५ जाखर मोर्तब.

असलवरून नक्कल.

लेखांक ८१ तारीख ३१-५-१७३६

श्री

अ. नं. ४२

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६२ नलनाम संवत्सरे ज्येष्ठ++शुध द्वितीया इंदुवासरे क्षात्रयकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री राणोजी घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली यैसीजे स्वामी तुम्हावरी कृपाळु होऊन पूर्ववतप्रमाणे तुमची सेनापति तुम्हास करार व सरंजाम आदीकरून पेशजी प्रमाणे करार करून दिल्हा असे तरी तुम्ही स्वामी सेवा येखतियारीपणे करून स्वामीस संतोष पावऊन सर्व प्रकारे निष्ठेस अंतर न करणे स्वामी तुमचे विशेषात्कारे ऊर्जित करून चालवितील येविषई आपले समाधान असो देणे. जाणिजे. बहुत काय लिहिणे तर सुज्ञ असा.

लेखांक ८२ तारीख ९--९--१७३८

श्री

अ. नं. १३५

राजश्री ब्रनसीपुरीमहंत गो--
सावी यासी

श्रो खंडोजी गोगावले हावल्दार माहाल भांडारग्रह ना नारायण विनंती उपरी बा हवाला राजश्री संभाजी राजे माहाराज याकडील कर्जाचा हवाला राजश्री स्वामीनी घेतला रुपये ३५००० पंचतीसहजार ते ती वरसामध्ये द्रसाल रुपये

११५०० पहिले साल
११५०० दुसरे साल
१२००० तिसरे साल
————
३५०००

येकून पंचतीस हजार रुपये पावते करून द्रसाल यैवजाचा झाडा करून देऊ. छ ९ जमादिलाखर सुा तिसा सलसेन मया व अलफ शके १६६० कालयुक्त नाम संवत्सरे अधिक सुध सप्तमी.

लेखांक ८३ इ. स. १७३८

श्री

अनु. नं. २१

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री संभाजी राजे यासी प्रति शाहू राजे कृता-

नेक आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करणे यानंतर तुम्ही पत्र पाठविले ते प्रा पावले लिहिला अभिप्राये अक्षरशाहा निवेदन जाहला त्रिंबकभट याणी स्वमुखे विदित केला व नारो राम व सोमाजी केशव व विठोजी सन्मुख याणीही विनंती केली येसीयासी तीन वर्षांनी वृध्धी होऊन पुत्र होतो ऐसे शास्त्रीपुराणी कथा ऐकिली नाही मागे कितेक म्हराटे यात भ्रष्ट जाहले त्यास आमच्या वडिलानी यातीत आणिले आणि पुढेही सर्वांस वरिष्ट आम्हीच आहो आणि आमच्या घरांतील यैसा लौकीक जाहल्याने शरीरसमधी हासतील आम्ही इतरास सांगावे ते आम्ही आणि-खयाजवल इनसाफास जावे यैसे होईल याकरिता आतःपर कोणेविसीचा विचार चितात न आणिता आपले घर शुध्ध करणे जेणेकडून शरीरसमधी लोक न हासेत ते करणे हे तुम्ही न करा तेव्हा तुम्ही आम्हास दाजी म्हणोन न लिहिणे तुम्हास आम्ही चिरंजीव लिहिणार नाही वडिलाची कीर्ति दिलीपासून रामेस्वरपर्यंत आहे त्यास कलंक न लगे ते करणे राणाजी व जैसिंग व चंदी याकडे कीर्तीचा घोष न जाये ते करणे ये गोष्टीस उदाजी काही लबाडी करी तरी आम्ही तुमचे साहित्य करून त्याचे पारपत्य करून येविसीचे नारो सामराज व सोमाजी केशव यास सांगितले आहे जबानी सांगता कलो येईल आपण हत्येविसी पातकाविसी संधेहे धरतील तरी हे त्रिवर्गाचे पातक आम्ही कबूल केले तुम्हास पातक नाही पातक कबूल करवेल परंतु कलंक कबूल करवत नाही तुम्हास मातुश्रीची व भावजेईची भीड पडेल तरी आमचे स्वाधीन करणे आम्ही पारपत्य करून इतकीही न करा तुमची इच्छा ज्यामध्ये लौकीक असेल ते करणे. वंशवृधीची लालूच न धरणे. वडिलाचे कीर्तीवरी नजर देऊन लौकीक राहे ते करणे बहुत काय लिहिणे आपण सुज्ञ आहा हे आसीर्वाद.

लेखांक ८४ इ. स. १७३८

श्री

अ. नं. २७

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री संभाजी राजे यासी प्रति शाहू राजे कृतानेक आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन संतोशावाप्ती करणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अक्षरशा निवेदन जाला वडिली भेटीस यावयाविसी आज्ञा केली त्यासी आमचा हेत वडिलाच्या दर्शनास यावे हा विशेषाकारे आहे यावेसा सिधांत केला तो मिरजकरानी आमचे गावीची गुरे नेली या प्रसंगात यावे तरी मुल्कात उपसर्ग जाला येतन्मुळे गेलेसे होईल याकारणे मिरजकरास आज्ञा करावी दर्शनास दसरा दिपवाली कारणे येऊन म्हणून लिहिले तरी वारणेपलीकडे स्वारी न करावी यैसी आज्ञा बालाजी सालोंखी यास केलीच आहे हाली आज्ञापत्र सादर केले आहे भेटीचा विचार जो आपण केला तो उतम ज्यामध्ये तुमचा संतोष तोच आमचा संतोष आहे रा भगवंतराव रामचंद्र याचे आचरण वडिलास विदित आहे

सांप्रत राजश्री सिवाजी राजे याचा बंदा येथे आहे तो काढून नेऊन फितूर रचावा या कर्मास प्रवर्तले त्याचे शोधात आम्ही होतो त्याकडील सिवाजी दिवश्या व देवजी पा आरलेकर हे दोघे सापडले वाजपुसी करिता त्यानी अद्यंत सांगितले भगवंतराऊ राज्यातील पुरान विश्वासु त्याणी यैसे करावेसे नव्हते हाली सिवाजी व देवजी व मना बंदा यैसे तिघे अटक करून ठेविले आहेत त्याचे पारपत्य करावे लागते आम्हास वडिलाचे आज्ञेविरहीत वर्तणे नाही राजनीतीप्रमाणे दंड करायाची आज्ञा करावी वडील सद्ये आहेत तद्नुरूप आज्ञा करतील परंतु आम्ही येथापराध दंड करीतच आहो मातुश्री आईसाहेबाजवळ सिवाजी खांडेकर व राणोजी मान्या व कृष्णाजी गाडया हे तिघेजण आहेत ते या फितुरात आहेत त्याचे पारपत्य करावे म्हणून लिहिले तरी बंद्याचे फितुराने काये होणे आहे बंदे कोण्ही असील जाले ऐसे कोठेही जाले नाही त्यास येथापराध शासन करायाची आज्ञा करावी आम्ही तो करीतच आहो यैसे लिहिले तरी वडिलाचे आज्ञेप्रमाणे वर्तावे हे विहित व श्रेयस्कर आहे आम्ही तो दंड करीतच आहो ऐसा शब्द लिहिणे करणे बुधीमंतास उचीत नाही घरचा गुलाम त्यास शासन करायाचे अगाध काय ? आमचा विचार म्हणाल तरी आम्ही आजीताा कोण्हास मारिले नाही आमचे भाऊ आम्हाजवल मुलेकेकरानिसी उघडे सुखरूप नांदत आहे तुम्ही जाणतच आहा रास्ती शासन तरी जे ऐसी कर्मे डोईवरी घेऊन करायास प्रवर्तले त्यास करावे हा विहिन मार्ग आहे बंद्याने काही उत्पात केला नाही करणारानी केला त्याचे पारपत्य राजनीतीप्रो करावे आम्हास सुचला विचार लिहिला असे जे गोष्टीने आपले पदरी दोश न पडे अपकीर्ती नव्हे तो विचार करावा मातुश्री आईसाहेबाकडे तिघे आहेत त्याचे पारपत्याविसी ला तरी तुमच्या हुजरे याचे रुबरु वाजीपुसी करून जामीन घेतले. हुजरे सांगता कलेल.

आसीर्वाद[1]

लेखांक ८५ इ. स. १७३८

श्री

रु. नं. १

अ. नं. २४

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री संभाजीराजे यासी प्रति सौभाग्यादीसंपन्न मातुश्री विरुबाई कृतानेक आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे याजवर तुम्ही पत्र पाटविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ आक्षरक कलो आला रा भगवंतराव रामचंद्र याचा आचरणाचा प्रसंग आपणास विदित आहे सांप्रत राजश्री शिवाजी राजे याचा बंदा येथे आहे तो कहाडून नेऊन फितूर रचावा या कर्मास प्रवर्तल त्याच्या

---

१ हा शब्द शाहूच्या हस्ताक्षरांत आहे.

शोधात आम्ही होतो त्याकडील शिवाजी दिवश्या व देवजी पाटील आरलेकर हे दोघे सापडले वाजपूस करिता त्यानी आद्यंत सांगितले भगवंतराव पुरातन विस्वासु त्याणी यैसे करावस नव्हते हाली शिवाजी देवजी व मना बंदा ऐसे तिघे आटक करून ठेविले आहेत त्याचे पारप्त करावे लागते आम्हास वडिलाचे आज्ञेविरहीत वर्तवणार नाही राजनीतीप्रो दंड करावा लागतो त्याची आज्ञा करावी मातुश्री आईसाहेबाजवल शिवाजी खांडेकर व राणीजी मान्या व कृष्णाजी गाड्या हे तिघे या फितुरात आहेत याचे पारत्प करावे म्हणोन कितीयेक तपशीले लिहिले येसीयासी बंदाचे फितुराने काय होणे आहे बंदे कोठे असल जाले यैसे नाही त्यास येथापराधे शासन करावयाची आज्ञा करावी आम्ही तो करीतच आहो यैसे लिहिले तरी वडिलाचे आज्ञेप्रो वर्तावे हे विहित व श्रेयस्कर आम्ही तो दंड करीतच आहो यैसा शब्द लिहिणे बुद्धीवंतांस ठीक नाही घरचा गुलाम त्यास शासन करावयाचे आबाध काये आमचा विचार म्हणाल तरी आम्ही आगर राजश्री स्वामीनी कोणास मारिले नाही रास्ती शासन तरी जे जैसी कर्म डोईवरी घेऊन करावयासी प्रवर्तरवयास कराव हा विहित मार्ग आहे बंदयाने काही उतपात केला नाही करणारानी केले त्याचे पारपते राजनीतीप्रो कराव आम्हास सुचला विचार लिहिला असे जे गोष्टीने आपले पदरी दोष न पडे आपकीर्त नव्हे तो विचार करावा मातुश्री आईसाहेबाकडील तिघे आहेत त्याचे पारपते हुजून्या देखता वाजपूस करून जमान घेतले आसत वरकड कित्येक भेटीचा मार लिहिलात उत्तम आहे मिरजकराचा मार लिहिला तरी बालाजी सालोखे यास पत्रप्रो आहे ते गुरे सोडतील याउपरी उपसर्ग लागणार नाही कलावे यास्तव लिहिले असे निरंतर आपले कुशल वृत लिहून पत्रद्वारे संतोषवीत जाणे वरकड सविस्तर वृत राजश्री स्वामीचे आशीर्वाद पत्र सादर आहे त्यावरून कलो येईल. जाणिजे छ २५ सफर हे आसीरवाद

लेखांक ८६ इ. स. १७३८

श्री

तालीक

रु. नं. १

अ. नं. २५

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री संभाजी राजे यासी प्रति शाहू राजे कृतानेक आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करणे विषेश विठाजी सन्मुख तुम्हाकडे आला आसे हा कितेक आर्थ मुखवचणे सांगेल त्याजवरून सविस्तर आवगत होईल व वेदमूर्ति त्रिंबक भट यासी यथून पाटविले आहेत याचे मुखोतरे साद्यंत निवेदन होईल जे गोष्टीने तुमास मागे व मोहरे शब्द न लागवे शरीर संमधी हासत व परकी शब्द ठेवी ते न करणे बहुत ल्याहावे तरी आपले घरचे चालीसी जाणतच आहा आशीर्वाद.

को. घ...

लेखांक ८७ तारीख ८-१-१७४०

श्री

रु. नं. १

अ. नं. १७९

श्रीमतर सकल तीर्थस्वरूप मातुश्री

जिजाबाई साहेब वहिनीजी वडिलाचे

सेवेसी

अपत्य प्रतापसिंगजी राजे दंडीवत प्रणंम्य विनंती विज्ञापना येथील कुशल बडिलाच्या अशीरवादेकडून यथास्तित असे विनंती विशेष मकरसंक्रमण प्रयुक्त तिलशर्करा वडिलाचे शेवेसी पाठविली असे ते वडील बालकावरी दया करून सदरीवार स्विकारिली पाहिजे आमचे व राज्याचे सर्वप्रकारे संरक्षण करायास वडील समर्थ असती तेथे वडिलाचे शेवेशी विशेष लेखन करायास शक्त नव्हे हे विज्ञापना.

सिक्का

लेखांक ८८ तारीख ८-१-१७४०

श्री

रु. नं. १

अ. नं. १८०

श्रीमतर सकल तीर्थस्वरूप राजश्रि

याविराजमान राजश्री संभाजी राजे

दाजी वडिलाचे सेवेसी

अपत्ये प्रतापसिंगजी राजे दंडवत प्रणंम्य विनंती विज्ञापना अत्रत्य कुशल तो पुष्य वद्य पंचमी इंदुवासर पर्यंत वडिलाचे आशीर्वादेकडून यथास्थित असे विनंती विशेष मकर-संक्रमण प्रयुक्त तिलशर्करा वडिलाचे शेवेसी पाठविली असे ते वडिली बालकावरी कृपा करून स्विकारिली पाहिजे राज्याचे व लेकराचे सर्व प्रकारे संरक्षण करायास वडील समर्थ असती तेथे वडिलाचे सेवेशी विशेष विनंती करावयास शक्त नव्हे हे विज्ञापना.

सि
क्का

लेखांक ८९ तारीख २९--८-१७४०

श्री

रु. नं. १ तालीक

अ. नं. ३५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६७ रौद्रनाम संवत्सरे

भाद्रपद बहुल त्रितीया गुरुवासरे क्षेत्रिय

कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यासी

(सिका) (सिका) मोकादमानी मौंजे लाट का इचल-- कर्जी प्रां मिरज यासी

आज्ञा केली यैसीजे राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे सेनापति याजविसी राजश्री अपाजी सितोले याणी हुजूर येऊन विनंती केली जे पूर्वी कैलासवासी थोरले महाराज याणी संताजी घोरपडे सेनापति यासी मौजे मजकूर हा गाव इनाम देऊन पत्रे करून दिल्ही होती त्याप्रमाणे भोगवटा चालत आहे परंतु पूर्वीप्रमाणे होती ती आवांतर प्रसंगामुळे गैरविल्हेस पडोन जाया जाहली याकरिता पुढा भोगवट्यास पत्रे असावी यास्तव महाराजानी कृपा करून नूतन पत्रे करून देविली पाहिजेत म्हणून त्यावरुन मनास आणिता कैलासवासी महाराज याजपासी संताजी घोरपडे सेनापति यानी एकनिष्टपणे सेवा करून चंदीचे मसलतीस फौज सुद्धा जाऊन असाधारण श्रमसाहास करून स्वामीस संतोष पाहून राज्य रक्षिले त्याअन्वये प्रस्तुत मशारनिल्हे उमद्‌वार आहेत परंपरागत येकनिष्टपणे सेवा करीत आले याचे चालविणे स्वामीस परम अवश्यक याकरिता स्वामी याजवर कृपाळु होऊन पूर्ववतप्रमाणे कुलबाब कुल काणु खेरीज हक्कदार व इनामदार करून मौजे उमर देहे १ येकरास इनाम जलतरुपाषाननिधीनिक्षेपसहित इनाम करून दिल्हे असे तरी तुम्ही याचे रजेतलबेत वर्तोन मौजे मजकुरचा येवज यास व याचे पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने चालवणे प्रतीवर्षी नवीन पत्राचा अक्षेपे न करणे या पत्राची तालीक लिहून घेऊन असलपत्र भोगवटियास परतावेन देणे निर्देश समक्ष मोर्तब

रुजु खत

मंत्री

बार सुरारुद्रहर समंत सुद्रहर

मोर्तब मोर्तब

लेखांक ९० तारीख २९-८-१७४०

श्री

अ. नं. ४३

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६७ रौद्रनाम संवत्सर भाद्रपद बहुल त्रितीया गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

(सिका) (सिका) राजश्री व्यंकटराव नारायण

(पेशवेचा) (प्रतिनिधी) उपनाम जोसी गोत्र शांडिल्य

(चा) यासी दिल्हे

इनामपत्र ऐसीजे तुम्ही स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक तुमचे पिते नारो माहादेव स्वामीच्या राज्याभिवृध्दीविशई बहुत श्रम साहास करून स्वामीचे आत्यंत कृपा संपादन

घेतली त्याचे पुत्र तुम्ही स्वामीसेवा त्रिकर्ण शुधीने करिता तुमचे दिवसे दिवस उर्जित करून चालवणे हे स्वामीस परम अवस्यक प्रस्तुत तुम्ही स्वामीसंनिध विनंती केली की आपणास काही नवीन गाव इनाम करून द्यावे म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही स्वामीचे कार्यकर्ते येकनिष्ठ सेवक यास्तव स्वामी तुम्हावर कृपाळु होऊन पेशजीचे मोकासियाजकडोन दूर करोन तुम्हास नूतन गाव इनाम करून दिल्हे

बितपसील

३ प्रो मिरज देहे ३

२ का इचलकर्जी

१ मौजे सिर्दवाड १ मौजे सुलकूड

१ मौजे टाकली का सिरहटी

—

३

१ मौजे सिर्दवाड को मांजरी प्रांत कागल

—

४

यो देहे च्यार कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार वजा करून अजरामरामत इनाम करून दिल्ह असेत तरी तुम्ही सदरहु चार गाव पूर्वमर्यादेप्रो॥ आपले ताबीन करून घेऊन तुम्ही वडिलाचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने गाव अनभवून स्वामीची सेवा येकनिष्ठपूर्ण करुन आपल उर्जित करून घेणे जाणिजे निर्देश समक्ष मो सिक्याचे

बार

रुजू सुरु संमत मंत्री

सुद बार संमत सुद बार

लेखांक ९१ तारीख ८-११-१७४१

श्री

नकल

रु. नं. १

अ. नं. १३

यादी बोली राजश्री व्यंकटराव नारायण यास मध्यस्थ राजश्री सेनाखासकील याजकडील लिहिले दिल्हे.

घाटाखालील व वरीघाटीची ठाणी	व्यंकटरायानी करवीरी हवेली
हाली जे व्यंकटरायाकडे आहेत व	बांधोन कबिलासह वर्तमान

श्रीमन्माहाराज स्वामीकडील
लोकांनी घेतली आहेत त्यावर
हुजूरचे मामलेदार ठेऊन व्यंकटरा
वाचे स्वाधीन करावी जोपरियंत
सेवा करितात तोपरियंत ठाणी
व्यंकटरायाकडे आसावी काळा-
नुसार स्वामी शेवकाचे चित न
मिळे तेव्हा सर्व ठाणी हुजूर
बोपून द्यावी येविषई श्रीमंत शाहू
महाराज आदिकरून कोणाचाही
उजूर न धराव या गोष्टीस हुजूर
जामिन द्यावा······ कलम १
सोंधे व बिदनूर व सावनूर या
तिनी संस्थानी नेहमी तोफा
आहे त्याची निशा हुजूर करून
देऊन तीन संवस्थानची देखरेख
व्यंकटरायानी करावी··· कलम १
घाटा खालील ठाणी घ्यावया-
बदल उपद्व्याप केला यासुळे कर्ज-
वाम जाहलेच आहे त्याचा परि-
हार करावा म्हणोन आज्ञा केली
त्यास रदब्रादलीमुळे जे सादेल
त्यास अंतर करणार नाही न
सादे तरी दया करावी शेवकावर
शब्द येऊ नये——— कलम १
आज्ञेप्रमाणे शेवा कराविंयास
अनमान न करावा——— कलम १
येखत्यारी सांगितल्या उपरी
महाराज स्वामीनी जे वचन
दिल्हे ते सात वर्षे पर्यंत अंतर न
करिता चालऊन शेवेची परीक्षा
याहावी——— कलम १

श्रीमंत महाराज स्वामीसंनिध
असावे······ कलम १
व्यंकटराव हुजूर दर्शनास आले-
समई माहाराज स्वामीस दोन
हाती ऊतम द्यावे······ कलम १
दर्शनसमई महाराज स्वामीस
नजर व्यंकटरायानी द्यावी
रुपये पूर्वी बत्तीस हजार रुपये
पौ राहिले बारा याखेरीज
आठरा असे तीस हजार करार
द्यावे यातून अधिक रदब्रादली-
मुले जे अधिक सादेल त्यास
आंतर करणार नाही—— कलम १
ज्या ज्या संस्थानी तोफा नेह-
मी पोो बाकी साकी राहिली
आसेल त्यास जबरदस्त पोहोचून
उसूल होईल तसा करून द्यावा
——— कलम १
श्रीमंत महाराज स्वामीस ज्याचे
आवश्यक असेल त्याचे आवस्यक
व्यंकटरायानी धरावे ज्यावर
वक्रता होईल त्यास तंबी पोहाचावी.
स्वकीय परकीय म्हणोन संशय
न धरिता आज्ञेप्रमाणे प्रवर्त
कराव——— कलम १
दर्शनाअंती व्यंकटरायास येक
हात्ती बहुमानाचा द्यावा
——— कलम १
श्रीमंत माहाराज स्वामीनी
राजश्री सेनाखासकील याची व
व्यंकटरायाची गाठ घातली
आहे उभयेतानी येक चित होऊन
मसलत करावी अंत करू नये
——— कलम १

सोंधे व बिदनूर या दोनी संस्था-
नी जबरदस्तीने चौथाई आमल
बसऊन यैवज हुजूर द्यावा— कलम १

येणेप्रमाणे लिहिले तेरा कलम करार करून द्यावयासी राजश्री व्यंकटरायाकडील राजश्री गोविंदराम ठकार यास हुजूर आणोन रुबरु करून लिहिलेप्रमाणे प्रत्ययास आणोन देऊन तदनंतर राजश्री व्यंकटरायास घेऊन येऊन माहाराज स्वामीचे दर्शन करावे छ १० रमजान सुरु सन इसने आर्बैन मया व आलफ.

लेखांक ९२ इ. स. १७४१

श्री

तालीक
अनु. नं २३

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री संभाजी राजे यासी प्रति शाहू राजे कृतानेक आसीर्वाद उपरी आत्रत्य कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन संतोषवाती कर्णे यानंतर तुम्ही दोन पत्र पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखन आभिप्राये आक्षरशा आवगत जाहल राजश्री व्यंकटराव नारायण यासी सोंधी प्रांतीची ठाणी द्यावयाविसी पत्रे देऊन हुजरे पाठविले असता त्याणी ठाणी सोडून दिल्ही नाहीत म्हणोन विशादे लि।। ते विदित जाहाले यैसियास प्रस्तुत व्यंकटराव वरघाटा प्रांती आले आहेत लवकरच स्वामीसंनिध येणार ते हुजूर आलेच तरी बरी नसीहत कर्णे ते करून तुमची ठाणी देविली जातील आम्ही तुमची ठाणी तुम्हास देविली यात कांहीं संवशेये आहे येसा अर्थ नाही व्यंकटराव यासी येविसीची आज्ञा करणे ते करीजेल वरकड सविस्तर राजश्री रेखोजी जाधव हावलदार लिहितील त्याजवरून कलो येईल निरंतर कुशल अर्थ लेखन करून संतोषवित जाणे. हा आसीर्वाद.

लेखांक ९३ इ. स. १७४१

श्री

रु. नं. १
अ. नं. १८२

श्रियासह चिरंजीव विजयीभव
राजश्री संभाजी राजे यासी प्रति

शाहूराजे कृतानेक असीरवाद उपरी येथील कुशल जाणोन स्वान्योदय निजकुशललेखने संतोषावाप्ती करीत जाणे विषेस कित्येक आज्ञा ते करून राजश्री रेखोजी जाधव हवालदार

पाठविले आहेत हे सांगता कलो येईल जरूर जानोन लिहील अस हे कारय तुमचे पदरच्यात अपन सर्व जाणतात आम्ही लेहावस काय आात्त गैर आात आपण सरवस्वे जाणता जे न करून आमच लौकिक प्रलोद्रिष्टी राहे रेखोजी जाधव हालदार प्रण साळु हे जरूर जाणोन पाटील आहेत राघेडा सिदे पाटील आहेत रा हालदार प्रण साळुखे कित्येक सांगतील ती आमची वचन वहु काय लिहीण अशीरवाद.

लेखांक ९४ तारीख २४-७-१७४२

श्री

पारसनिसी तालीक

अनु. नं. १६ बिश्वेश्वर

मा आनाम हवालदार व कारकून वर्तमान व भावी तर्फ देवरुख सुभा प्रांत राजापूर यासी कृष्णाजी परशराम प्रतिनिधी सुा सलास आर्बैन मया व अलफ राजश्री देव कसबे देव येथील राजग्रहीचा श्रावणमासीचा मासाभिषेक वो राजश्री विश्वनाथभट बिन नारायणभट उपनाम साठे गोत्र वासिष्ट सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबे मजकूर यासी सांगितला आहे हे श्रीस आभिषक करितील यासी देविले

रुपये

५ श्रीदेवाचे नैवद्य दक्षणा नंदादीप व किरकोली

१० ब्राम्हणास उलफा व दक्षणा

२॥ उलफा

७॥ दक्षणा

—

१०

—

१५

येकूण पंधरा रुपये देविले असेत तरी तर्फ मारपैकी प्रविष्ट कर्णे सदरहू अभिषेक भटगोसावी सालदरसाल करितील तरी मोइनीप्रो रुपये पाठवीत जाणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करणे या पत्राची प्रती लिहून घेऊन असल पत्र भोगवटियास वेदमूर्ती जवल परतोन देणे छ २ जाखर पा हुजूर मोर्तब.

बार सुरु सुद बार बार.

लेखांक ९५ तारीख १६-१०-१७४२

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६९ दुंदुभीनाम संवत्सर आश्विन बहुल चतुर्दसी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री नागोजीराव पाटणकर यासी आज्ञा केली येसीजे तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले शरीरी समाधान नाही म्हणोन लिहिले तरी आरोग्य जाहालियाचे वर्तमान लिहून पाठवणे पूर्वी तुम्हाकडील बोलीचाली हुजूर तारळे तर्फचे देशमुखीची आली होती ते सविस्तर स्वामीस निवेदन आहे ऐशास सांप्रत बालोजी देसाई ता। तारळे याची देशमुखी आमानत करून हुजूर ठेविली आहे यामध्य तुम्हास जर कांहीं आपली बोलीचाली करून घेणे असल तर पूर्वी लक्षमण खराडा या बराबर बोली तुम्ही सांगोन पाठविली आहे त्याप्रमाणे साहत्य करून वतन प्रसंगाचे पूर्वलि साहत्य काय असेल ते घेऊन मातबर कारकून हुजूर पाठवणे या प्रसंगी तुम्ही कारकून न पाठविला तर पुढे स्वामीकडे शब्द नाही तर लिहिले प्रमाणे साहित्यानिसी पाठवणे. तिवट तुम्ही पाठविले प्रा। हुजूर प्रविष्ट जाहले जाणिजे बहुत काय लिहिणे मोर्तब सिक्याचे असे.

असल बरहुकूम नकल.

लेखांक ९६ तारीख १७-१०-१७४३

श्री

अ. नं. १३८

स्वस्ति श्री राज्याभिषेक सके ७० रूधिरोद्गारीनाम कार्तिक शुद्ध १० इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

देशमुख व देशपांडे तर्फ

कागल

यासी आज्ञा केली येसीजे राजश्री शेषो नारायण गोत्र भारद्वाज याणी करवीरची मोकामी स्वामीसंनिध विदित केले की आपणास माहाराजानी इनाम गाव करुन देविल पाहिजेत म्हणोन त्यावरून मनास आणिता मा।रनिल्हे स्वामीची व राणीवास वाडा चौथा याची सेवा येकनिष्टेने केली याचा चालवणे आगत्य जाणोन स्वामी याजवर कृपालु होऊन यासी नूतन इनाम कुलबाब कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी जलतरुनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून तालोकी मा।रवौ इनाम गाव बालिंग पौ मा।र हा गाव इनाम करुन दिल्हासे तरी तुम्ही सदरहू मोजे मा।र पूर्वचयुरसीमा याच स्वाधीन करणे आणि इनाम यासी व याच पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे सालदरसाल ताजा सनदेचा उजूर

न करणे या पत्राची तालीक लिहून घेउन असल पत्र भोगवटेस परतोन देणे. जाणिजे निदेश समक्ष मोर्तब.

रुजू समत

मंत्री

सुरु सुद समत सुद

बार

सुरु सुद बार

समत सुद बार

लेखांक ९७ तारीख १८-११-१७४४

श्री

अ. नं. १३९

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षीनाम संवत्सरे कार्तिक बहुल दशमी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री भगवंतराव तमाजी वकी(ल) + + + बंकापूर यासी आज्ञा केली यैसीजे वो राजश्री वेंकणभट बिन + + भट अग्नीहोत्री उपनाम सप्तपुत्रे गोत्र अत्री सूत्र आश्वलायन वास्तव्य लोकापूर याणी हुजूर विनंती केली की आपण हुजूरचे आश्रित कुटुंबवत्सल आहो माहाराजानी संस्थानावरी काही वर्षासन करून दिल्हीया योगक्षेमाची स्वास्थ होऊन अग्नीसेवा घडेल म्हणोन विदित केले त्यावरून मनास आणिता वेदमूर्ती भले ब्राम्हण अग्नीहोत्री हुजूरचे आश्रीत याचे चालवणे अगत्य व श्रेयस्कर जाणोन + + + + तोफियाचे यैवजी वर्षासन होन २५ पंचवीस करार करून दिल्हे आसेत सदरहूप्रा प्रतीवर्षी वेदमूर्तीस प्रविष्ट करीत जाणे प्रतीवर्षी ताजे सनदेचा उजूर न करिता या पत्राची तालीक घेऊन असल पत्र भोगवटियाबदल भटजीकडे परतोन देणे. जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं

विराजते

तेरीख २३ माहे शौवाल

सुा खमस अर्बैन मया व अलफ

बार

लेखांक ९८ तारीख २५-२-१७४५

श्री

अ. नं. १४१ *

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षीसंवत्सरे फालगुण शुध पंचमी इंदुवासर क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी

[* पुढील पानावर

याणी देशमुख व देश
(१) (२) पांडिये पो यादवाड या-
सी आज्ञा केली यैसीजे तुम्ही चिरंजीव राजश्री यासी निष्ठा पूर्वक मर्यादेने वर्तत नाही म्हणोन हुजूर विदित जाहाले तरी हे गोष्टी कार्याची नाही या उपरी त्यासी निष्ठापूर्वक मर्यादेने वर्तणूक करून याची पत्रे तुम्ही निष्ठापूर्वक वर्तता यैसी स्वामीस येत ते गोष्टी करणे फिरोन तुमचे आमर्याद वर्तणुकेचा बोभाट हुजूर आलिया फौज पाठऊन पारपत्य करणे लागेल यैसे पष्ट समजोन वर्तणूक करणे जाणिजे लेखनालंकार

रुजू संमत सा संमत
सुमंत मंत्री सरकार

बार सुद सुरु सुद बार बार बार बार

लेखांक ९९ तारीख २१-२-१७४८

श्री

अ. नं. १५२

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ७४ प्रभवनाम संवत्सर फाल्गुण शुा चतुर्थी भानुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

मौजे सागवाड तो सीवगाव

यासी आज्ञा केली यैसीजे मौजे मार पेशजीपासून राजश्री हिंदुराव घोरपडे याकडे सरदेशमुखीच्या वतनास इनाम होता त्यास आलीकडे राजश्री मुरारराव घोरपडे हुजूर करवीरच्या मुकामी स्वामीच्या दर्शनास आले आणि स्वामीची शेवा निष्ठेने करून स्वामीस

---

* (१) शिक्का— बाळाजी बाजीराव पेशवे यांचा.
(२) शिक्का श्रीनिवास प्रतिनिधी यांचा.

	अ. नं.
चेनवा नायेगौडा देसाई पा नवलगुंद	— १४२
देशमुख देशपांडे पा तेरदल	— १४३
देशमुख देशपांडे पा गलगले	— १४४
रुद्रपा गौडा देसाई पा कित्तूर	— १४५
देशमुख व देशपांडे पा गुंतल	— १४६
देशमुख व देशपांडे पा हुकेरी	— १४७
देशमुख व देशपांडे पा रायेबाग	— १४८
देशमुख व देशपाडे पा जमखिंडी	— १४९

छत्रपति शाहूमहाराजांनीं त्याच रोजीं अ. नं. १४१ तील मजकुराबरहुकूम जीं आज्ञापत्रें पाठविलीं त्यांचे अनुक्रम नंबर त्या त्या अधिकाऱ्यासमोर दर्शविले आहेत.

संतोषी केले करिता स्वामी याजवरी कृपाळु होऊन मौजे मार पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हली राव मशारनिलेकडे सरदेशमुखीच्या वतनास इनाम जलतरुतृणकाष्टपाषाण-निधीनिक्षपसहित खेरीज हकदार व इनामदार करून देह १ येक रास इनाम दिल्ही आसे तरी तुम्ही सदरहू मौजे मजकूर पूर्वमर्यादेप्रमाणे चथुशीमा याचे स्वाधीन करणे आणि इनाम मौज मजकूर यासी व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने चालविणे सालदरसाल ताजा सनदेचा उजूर न करणे या सनदेची तालीक घेऊन आसल सनद भोगवटियास परतोन देणे आणि याचे + + + + वर्तत जाणे. निंदेश समक्ष मोर्तब सिक्याचे.

रुजू समत समत
मंत्री सरकार

तेरीख २
रबलावल सुा समान (ता. २०-२-१७४८)
बार सुरु सुद बार समत सुद बार
बार

लेखांक १०० माहे जानेवारी इ. स. १७५०

श्री

रु. नं. १ तालीक
अ. नं. १८३
श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी
चे शेवेसी बाळाजी बाजीराव व सदाशिव
चिमणाजी याणी लेहून दिल्हा + करारनामा ऐसाजे

सातारियासी तीर्थस्वरूप शाहू माहाराज राज्य करीत होते त्याजमुले वारणचा तह जाहाला होता त्यास तीर्थस्वरूप शाहू महाराज याणी कैलासवास केला त्याचे पोटी संतान नाही तेव्हा ते राज्य स्वामीचे आणि येकछत्री सिका माहाराजाचा चालावा.

शाहू महाराज आसतेसमई किले सातारेचे मु॥ सेवकानी विनंती केली होती जे शाहू माहाराज याचा जीवत्मा आहे तो बाहयात्कार त्याचे शेवक अंतरयामी स्वामीचे शाहू माहाराज याणी कैलासवास केल्यानंतर दोनी राज्य स्वामीची आणि आम्ही सेवक स्वामीचे आज्ञेप्रो वर्तणूक करू येसी शफत दिल्ही होती त्याचप्रमाणे द्रोनी राज्य यक करुन येक छेत्री स्वामीचा सिका चालवा आणि आम्ही शाहू

+ सन १७४० च्या भेटींत पेशव्यांनीं कोल्हापूरच्या छ० संभाजी महाराजांशीं वाटाघाट करून वरील करार केला. पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यावर (ता. २५-६-१७४०) तीन महिनेपावेतों पेशव्यांचा मुक्काम साताऱ्यासच होता.

माहाराज याचे कारकीर्दीप्रो सेवा करून असावे हे प्रमाण यासी अंतर करणार नाही.

वारणे येलीकडील तुंगभद्रा पावेतो खासगी प्रांत करून महाराजास द्यावा वारणे पासोन तुंगभद्रेपावेतो गडकोट किले ठाणी द्रोबस्त खासगीस देऊ सातारेस राजधाणीचा खर्च व खासगी खर्चास सरंजाम माहाराजाकडे द्यावा.………………………

शाहू महाराजाचे कारकीर्दीप्रो देवून वर्तणूक करू………………………

स्वामीसंनिध लहाण मोठे सेवक सेवा करून होते त्यास त्याचे योग्यतेप्रमाणे चालवावे.

योग्यतेनरूप स्वामीचे आज्ञेप्रमाणे चालवू

स्वामीकडे किले हुजूरातीस आहेत त्याचे सरंजाम पूर्वील वेवाटीप्रमाणे किलेचें तणकेस किलेकडे सुधामत चालवावे.

पूर्वील भोगवटे प्रो निर्वेद चालऊ…………

संवस्थान बिदनूर व सौंदे व अंतरज व सावनूर येथील चौथाई व तोफेचा येवज सरकारात घ्यावा.…………

पावत आलेप्रमाणे येवज पावता होईल आणि स्वामीचे आज्ञेप्रो निर्वेद देईतस करू

स्वामीत व तुम्हात किंभपी पडदा नसावा व स्वामीनी जे केले ते तुम्ही प्रणामास नेऊन स्वामीचे लक्षाणरूप चालऊन प्रांजेल रीतीने स्वामीचे सेवेसी सादर असावे.……

स्वामीची सेवा येकनिष्टेने करुन स्वामी आज्ञा करतील तदनरूप आज्ञेप्रो मनोदयानरुप वर्तणूक करू स्वामी चेरणी द्वैतभाव किमपि न धरू.…………

सिंदे नरगुंदे व पतके पूर्वी हुजूर पागेचे सरदार सरंजामसुधा पूर्ववतप्रमाणे स्वामीचे हुजूरातीस सेवा त्यानी करावी त्याचे सरंजामाचा व पागेचा फडशा हुजूर होणे तो होत असावा…………

स्वामीचे आज्ञेप्रो त्याचे हातून वर्तणूक होये येसी करुन देऊ आज्ञेप्रमाने त्याचे हातून वर्तणूक न होये तरी त्याजकडील सरंजाम गडकोट किले ठाणी सरकारात घेऊन देऊ

सरदेशमुखी व बाजे वतन जी सरकारात तालुकेस आहेत ती सरकारात असावी……

शाहू महाराजाचे कारकीर्दीप्रो सरकारात चालऊ हुजूरचे सनदेने लोकास गाव इनाम व वतने दिल्ही ती चालवावी अंतर करू नये…………

स्वामीनी कृपालु होऊन ज्यास इनाम गाव व वतन जी दिली असतील ती आज्ञेप्रो चालवू…………

सरदेश कुलकर्णाचे व इनाम गाव चालवावे आज्ञेप्रो चालऊ.…………

आंगरेकडील किले व जंजिरे व भुईकोट व पंचमहाल जयगडपर्यंत सरकारात यावे-आज्ञेप्रो आंगरेकडील किले व जंजिरे व भुईकोट व पंचमहाल जयगडपर्यंत द्रोबस्त मुलुक घेऊन स्वामीकडे देऊ.

लेखांक १०१ इ. स. १७५०

रु. नं. १

अ. नं. २७४

माहाराज राजश्री शंभु छ–
त्रपति गोसावी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत परोपकारपरायण स्नो सवाई इकदु सदाशिवराजे खरु सोंधा शरणार्थी येथील कुशल जाणोन माहाराज स्वामी यानी स्व साम्राज्याख्यखील वैभव लेखन करुन चित्ताल्हाद होय तो अर्थ करीत गेले पाहिजे सांप्रत राजश्री रामाजी भास्करपंत व रो भगवंत गणेशपंत हे उमयता हेजिबी संस्थानातून यलीकडे काही ऐवज उसूल होऊन आला नाही म्हणोन विनंती करून घेतले करिता अपूर्व वाटले अशास आता राजेश्री रामाजी मंगेष व नारो राम याचे विद्यमाने आजी तागायत नख्ती व चिटिया व हावाले व जिन्नस आधीकरुन जो पावला असेल त्याचा हिशेब रास्त लेहून पाठविणे तेनेप्रमाणे ऐवज जरा पडेल यास नौ दिगर करून ऐवज पावला असोन तफावतीने लिहिले या संस्थानास अप्रमाणिता येउन खराबीस कारण होईल व पावला ऐवजही मजरा पडणार नाही म्हणोन तपसिले लेखन करून पाठविले पत्र वरून अभिप्राये समजून व आले हुजूरे याने सांगितलेवरून अत्याश्चर्ये प्राप्त जाहाले का जे पूर्वीपासोन थोरले कैलासवासी महाराज स्वामी यानी संस्थानचे सर्वार्थी संरक्षण करावे म्हणोन भाषापत्रे सादर केल्यापासून आजवर एकनिष्टेने वर्तणूक करावे यास संस्थानातून अंतर न जहाले एखादे वख्ती संस्थानावर कसाला पडिला तरी माहाराज स्वामीस संस्थानचे सुखदुख निवेदन करवून काहीतरी सोडमामले करून संस्थानचे उर्जित करावे म्हणोन सांगून घेतलेवर माहाराज स्वामीनीही हे संस्थान सर्वार्ती स्वकीय तेव्हा सांगोन घेतले ते चित्ती धरून सोड सोकल करून देऊन संस्थानचे संरक्षण करून कीर्ति संपादिलीच परंत ऐसे हिषेबाविषयी अंतर दिसोन हे प्रकारे पत्र सादर जाहाले म्हणावे याचे किमपी घडोन आले नाही तैसेच आजच हे प्रसंगी घडोन आले तरी हेही संस्थानचे स्वहितच कां जे आजपावेतो भलता प्रसंग असला तरी हेजिबाचे विद्यमानेच अर्ज करवून कारण करुन घेत होतो अशास आता हे जिन्नस पत्र सादर जाहाले तेव्हा संस्थानची नातवानी जी आहे ती खुद्द चितास आणून चालऊन घ्यावे म्हणोनच यैनहून दुसरा विचारही तर संस्थानास काही हेजीब मारनिलेनीच कार्याही कार्यसेखर करून दिली व पुढेही तेच देणार म्हणावे याचा अर्थ नाही कोणही विचारास माहाराज स्वामीनीच पूर्वीही संस्थानची संरक्षणा केली होती आताही ततो अधिक करणार हा निश्चय पूर्ण केलाच आहे अशास मारनिले हेजीबचे मुलाने जे संस्थानातून पावला यैवज–करुन लेहून पाठवू म्हणावेयाचे नाहीच ह्याकरिता उभयता मारनिले हेजीबाचे विद्यमाने आजी साहा साला पोटी पावला ऐवज सदर्हू लेहिलेप्राो सेणवी मारनिलीच्या विद्यमाने लेहून

पाठवावा तरी रा।। रामाजी मंगेश आपले धंदे करिता आपले धन्यासंनिधस गेले आहेत यास्तव रा। नारो राम यास बोलाऊन घेऊन उभेता हेजिबे गुजारतीने साहा सालसंबंधे जो ऐवज पावला आहे तो रुजू पाहून प्रत्येक जाबिता लेहून पाठविला आहे तेणेवरून अवगत होईल व आणखी काही ऐवज पाठवून द्यावा म्हणोन कले असता गोमांतकचे फिरंगियाचा शाहा पंचमहालावर पडोन मुलूक सर्वही लूटलबाडी करून जाळून फना केले करिता फार काही नासाड जाहाला तंनिमित्य सध्या ऐवज पाठवावे यास अनुकूल घडोन आले नाही ऐसेच वर्ष प्रती वर्षी कसाला पडत जातो तेणेकरून पैकेचे उत्पन्न राहून संस्थान म्हणावेयाचे एक नाव मात्र राहिले आहे म्हणोन हे दूरचा ऐवज पावावे यास दारन नाही जाहालेकरिता पेशजी संस्थानचे जासूद जोडी समागमे पत्रे सादर केले मध्येही कांही सोडमोकले करिता लिहावेयाचे लिहून संस्थानचा बचाव होय व हुजूरचा ऐवज पावला म्हणावेयाचे करून संस्थानचे संरक्षणा केली म्हणावेयाचे यश पदरी घ्यावेच म्हणोन लेहिले होते तेणेवरून तो अवगत जहालेच असेल आताही लेहिले जाते जे संस्थान सकलार्थी नातवानीस पडले आहे तेंव्हा गोसावियानीच साभिमान धरून चालवून घेतले तरीच उर्जीत होऊन महाराज स्वामीस कीर्ती येईल न होण दुसरे विचारे संस्थानचा परिणाम किमपी लागणार नाही हा घट भोरसा धरिला आहे हे अर्थी कित्येक राजश्री शिवया मनवार्ती व वीर भद्रया लेखन करिता सर्वही चित्तारुढ होईल सर्वज्ञ प्रतिविस्तार काय लिहावे.

सिका

लेखांक १०२ तारीख ८-१-१७५२

श्री

तालीकची तालीक
अ. नं. १५५

आज्ञापत्र समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री राणोजी घोरपडे सेनापति ता मोकदमानी मौज आर्जुनी का कसबे लाट पा हुकेरी सुा इसने खमसैन मया व अलफ मौजे मजकूर हा गाव सालगुदस्ता मातोश्री येसूबाई याकडे दिल्हा होता हाली हकदार व इनामदार खेरीज करून दरोबस्त मौज मार हा गाव मातुश्री यासी इनाम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करून दिल्हा असे त्याप्रमाणे ते मौजे मारचा आनभव करतील तुम्ही त्याचे रजतलबेत राहून वर्तणूक करीत जाणे या पत्राची प्रती लेहून घेऊन हे पत्र मातुश्री येसूबाई याकडे भोगवटेयास देणे. छ. १ रबिलोवल मोर्तब असे.

असल बमोजीब नकल

लेखांक १०३ इ. स. १७५२–५३

श्री

नं. १५७

यादी संवस्थानचा ऐवज येगे सुा सन सलास खमसैन मया व अलफ

संस्थान बिद्रुर इा सन तीसा अर्बैन ता सन सलास खमसैन यकून वर्षे ५	सावनूर संस्थानचा हिसेब नवा सालाचा भगवंतरायाचे कारकीर्दीचा रुजू जाहला नाही. कलम १

लेखांक १०४ तारीख ७-३-१७५३

श्री

अ. नं. १५९ तालीक

यादी हिशेब शाहूपटी

२७९०० दुसाला यैन (यैन) बाकी ता

२४३५० सन खमस

३५५० सन सीत

———

२७९००

४३४५१ परवाने दिल्हे पो नावसूल

११२८७ बागडकोट

५७१४ बिलगी

४००० पादशापूर

५००० दो नुलगुंद

१७२५ मतेकटे

३५०० गोकाक

५२५ कालेवाड

१३०० अमीनब्रावी

५००० लक्ष्मेश्वर

६०० मो सिब्राजीपंत

३०० नवलूर

३०० मजीदपूर

———

६००

———

४३४५१

५३९०० सालमार सन सबा

१२५२५१

कमतीस हजार रुपये पैकी
१०२५१८= खर्च परभारा जाता बाकी

बाकी रुपये
११४९९९॥=

सदरहू यादी राजश्री यशवंतराव गाइकवाड बापूजी नाईकास आणावयाबदल गेले ते समई संस्थानच्या कारकुनाचे दस्तुरेकडून लिहून आणिली यादी असल पेशव्याकडे चित्रदुर्गचे मुकामी शेषोनारायण याजकडे पाठविली त्याची सदरहु नकल लेहून हुजूर ठेविली असे छ १ माहे जमादिलावल सुा सन सलास खमसेन मया व अलफ.

लेखांक १०५ तारीख २९-७-१७५३

श्री

अ. नं. १६० तालीक

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री रामचंद्र नारायण गो स

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा आर्बा खमसैन मया व अलफ तुम्ही छ १५ रमजानचे पत्र पाठविले ते छ २४ रमजानी पावले लिहिले वर्तमान विदित जाहाले सप्तरुषी हून फिरोन मातुश्रीनी व बाबाजी यादव व आणखी ग्रहस्ताची पत्रे आली व खुणेस हिऱ्याची मुद्रा पाठविली तुमचा मार्ग च्यातकन्याये पाहात आहो खोटा दागिना तुमच्या हावाली करितो तुम्ही तेथे येताच हावाली करितो श्री कुलस्वामीची शपथ या आन्वये पत्रे आली आम्हास पत्रे खूण दाखविली मुख्यासी श्रीमंत सौ बाईसाहेब याणी सांगितले कीं ज्याणी विष दिल्हे त्याचे हस्ते उतारे घेणे येणे करुन परिणाम उतम नाही जे होणे ते प्रधानपंताचे हाते होईल श्रीमंत सौ बाईसाहेब याणी उभयेता ग्रहस्तास विचारिले की आम्ही पेशव्याचे भरवशावरी आसता त्यासी क्रियेस गुंतलो यैसच म्हणतील कीं काय ? त्याजवरी भगवंतपंत व शेषोपंत बोलिले जे पेशव्याच्या विस्वासावरी स्वामी आसता स्वामीच्या मनोद्यानरूप त्याजकडूनच घडून येईल म्हणून विस्तारे लिहिले ते कलले यैसियासी समक्ष जे जे बोलिलो त्यात आंतर तिल्मात्र नाही जे काराग्रही आहेत ते पूर्ण लटिके आमका बाप आमकी आई व गाव आमका यैसा पूर्ण पता लावावा तो जगविख्यात व्हावा मग हा आर्थ ताराबाई करोत आथवा सौसंपन्न जिजाबाई करोत हा आर्थ जगविख्यात जाहलिया मग आम्हास तिल्मात्र आभिमान नाहीं आमचे आर्जमात्र खावंदाचे कार्यासिध्धी जाहल्यावरी आयकावे लागतील व जे आम्हाविरुध सांप्रतकालीचे सप्तरुषीतील मुख्य इछितील ते कर्ता येणार नाही व खावंदाचे

मनात ममता आहे तरी असे घडणारही नाही पूर्ण कार्यसिध्धी व्हावी आम्हास लोकानी बेमान मात्र न म्हणावे आम्ही भोसल्याचे वंशाचे चाकर तेच नाहीसे जाहल्यावरी आम्हास दोष नाही इतका मात्र आमचा अर्थ आताही व समक्ष बोलिलो तेव्हाही विस्तारे वारंवार काय लिहिणे छ २७ रमजान बहुत काय लिहिणे.

लेखांक १०६ तारीख २०-३-१७५४

श्री

तालीक नकल

रु. नं. १

अ. नं. १६

शिका मा। अजाम देशमुख व देशपांडे पा। कागल
यासी बालाजी बाजीराव प्रधान सुमा आर्बा

खमसैन मया व आलफ प्रा। मार पैकी देह २६ सवीस मुकासी राजश्री राणोजी घोरपडे सेनापती याजकडे राजश्री .... स्वामी करवीरवासी याजकडून पेशजी पासून आहेत याप्रमाणे करार असेत तरी यासी रुजू होऊन गावची मुकासबाबेचा आमल सुदामत प्रो याजकडे देणे जाणिंजे छ २५ जमादिलावल आज्ञा प्रमाण मोर्तब.

लेखांक १०७ तारीख २६-१०-१७५६

श्री

रु. नं. १

अ. नं. ८

करारनामा चिरंजीव सिवाजी घोरपडे अमिरुलउमराव याजकडील आजरे ठाणेसुधा देवणोंवसी राजश्री नारायणराव व्यंकटेश यासी आज्ञा होऊन करार जाहाला ऐसाजे सुा सीत खमसीन मया व आलफ येकूण देह ९६

ठाणे नि। शिबंदी वगैरे खर्च देहाय ३२ मशारनिलेस सरंजामास देहाय ३२ पैकी वजा देहाय पांच बाकी देहाय २७ ५	खासगीकडे ठेवाव देहाय ३२ घासदाणा व सरदेशमुखीचा ऐवज पेशजी वैहवाटी प्रमाणे हुजूर यावा ठाणेचे खर्चाकडे वगैरे देहाय ३२ नेमून दिले याची वहिवाट आमचे कारकुनाचे वि। व्हावी.

येणे प्रो करार ठरला त्याप्रमाणे वहिवाट व्हावी यात कोणी अंतर करतील त्यास कुल

स्वामीची शफत असे जाणिजे छ. १ सफर मोर्तबा असे कासीबा काळे ठाणे मौजे सिरदवाड विसाजी नारायण सीत खमसीन मया व आलफ.

लेखांक १०८ तारीख १५-५-१७५८

श्री

अ. नं. १६३

आज्ञा केली यैसीजे तुम्ही राजश्री वेंकाजी नानाजी याजसमागमे आर्थांची यादी कलमे लेहून पाठविली की साहेबाचे सेवेसी समक्ष साफ आर्ज करणे त्यावरुन त्याणी आर्ज केला त्यास कल्माकल्माची उतरे.

(डावी बाजू)

चिरंजीव कैलासवासी जालियावरी साहेबानी आम्हास खावंद करुन दिल्हा जो देव वडिलानी करून दिल्हा त्याची पूजा आम्ही करु लागलो म्हणोन आर्ज लिहिला यैसियासी याचा विचार तुम्हासही कलोन गेलाच आहे प्रथम दिवसीच श्री कोटेश्वरी साहेबाची स्वारी नेहली तेव्हा श्रीच्या देवालयात पुराणीक व गोपालराव यादव व गोविंद खंडेराव व बापूजी खंडेराव चिटनिवीस या चतुर्वर्गास साहेबी ततक्षणीक आज्ञा केली की ही वस्तू खरी नाही वंशास दाग लागतो तेव्हा मुरडोन चोघानी आर्ज केला की आता समय नाही म्हणावयाचा नव्हे घात होतो याप्रो साहेबाचे बुधीस भ्रंश करून तो समय याप्रो संपादिला साहेबाचे मानसी की तेक्षणीच तुम्हास समक्ष बोलाऊन हे आज्ञा करावी तो मध्यस्त कारभारी याचे चिती कीं समक्षता होऊ न द्यावी हे मानस त्यावर दुसरा प्रकार प्रायश्चित आरंभिले तेव्हा साहेबी आज्ञा निरोपिली की पुर्ता शोध होऊ द्या मग हा विधी करणे हेही कोणाच्या चितास न ये तोही विध केला त्यानंतर मुंजीबंधन व शरीरसंमधाच्या निकडी होऊ लागल्या ते समईही आंज्ञा करीतच गेलो कीं त्वरा कार्याची नाही कार्यभागी न समजत यैसी वर्तणूक करुन आपभ्रंसी पाडिले गोत्पत आरंभिली तेंव्हा साहेबी व रामाऊ भोसली याणी येक प्रहर तट केला की हे काय करिता ? ते वेलेस मराटे याणी तरी विचार करावा तर त्यास ताकीद तुमची सर्वांनी भिडेस्तव कईम केला आता तुम्ही तो आशय धरुन खरेखोटे प्रत्यास आणून द्यावे यसा दुराग्रह धरुन अभिमानात पडोन हा पर्यास पुढे आणून विनंती लिहिता तरी तुमच्या पक्षी अभिमान पूर्ण असता मराठे निषेध खोटे यैसे म्हणू सकतात की काये ? तुम्हीच याचा विवेक चितात आणून भोसल्याच्या वरदी राज्यास व वंशास दाग न लागे यैसे करावे हे तुम्हा मंत्रियास उचीत आहे खामखां दुराग्रहच करून येथील अमर्यादाच करावी हा निश्चय पुरता धरिला आसला तरी बेरड माहर मांग शहरात घातले आहेत ते आन्योन्य वर्ततात यातच तुमची मातबर सेवकाची कीर्ति आसली तरी हेही उतम आहे मागे पुढे जनास बोलावयास जाले जे तख्ताची मर्यादा ऐसी घडोन आली साहेबाचे मानसी कीं वंशास दाग लागोन राज्यभार करावा हे किमपि घडणार

नाही येहलोक आणि परलोक उतम आसेल तेच व्हावे मानवी देहास दुराग्रह नसावा कोणे गोष्टीचे शाश्वत नाही यैसे चितात आणून उतम मार्ग असेल करावतो यातच निर्दोष आहे.——१

राजश्री बालाजी माहादेव सेवकाचे इतबारी आहेत व तुकोजी सिंदेही इतबारी आहेत कर्तव्य आसेल ते साफ सांहेबी आज्ञा करावी मोघम भ्रम राखोन तुम्ही याल तेव्हा आज्ञा करू यैसी आज्ञेने शेवकाचे येणे कसे होते? साहेब वडील आहेत जे खरे असेल ते करावयास स्थापावयास काच कशास पाहिजे म्हणून विनंती लिहिलीं यैशियास साहेबाचे मानस की तुम्ही दर्शनास यावे तदोतर खरे आहे तेच तुमचे व साहेबाचे विचारे स्थापावे यात उत्तम तुम्ही न येता मध्यस्तीचेच विचारे कर्तव्य ध्यानास आले आसले तरी यासच निक्षूण पाठवणे म्हणजे यासच लिहून आज्ञा केली जाईल भोसल्याच्या वंशास दाग नसावा तुम्ही प्रधान मातबर सेवक सूज्ञ आहात दुराग्रहावरी दृष्टी किमपि न देणे हा खोटासा परिछिन्न तुमचे चिती कलेलेच आहे अतःपर संशय न धरणे खरे आहे तेच सर्वधा करावे विलंबावरी न टाकणे.——१

(उजवी बाजू)

साहेबी प्रथम मजला वचन दिल्हे की सर्वप्रकारे तुमचा विस्वास तुम्ही नातवापेक्षा साहेबास आधिक ऐसे आसता साहेबी गायकवाडास हुजूर पाठविले रामदासपंतास कागदपत्र लिहिले बाबूजी नाईक यास नेहले यमाजीपंताचे पारपत्य योजिले रात्रंदिवस सेवकास विरोध पडे येस राजकारण होत जातात मोंगल केवल हिंदूराज्यास शत्रू त्यास देखील अनुसंधाने होत असता शेवकच वाकडे वर्ततात हा दोश साहेबी आज्ञापत्री लेहून सर्वासी बोल्तात म्हणून विनंती लिहिली यैशीयास साहेबाची तुमचे ठाई पूर्ण कृपा म्हणूनच पुणीयासी साहेबाची स्वारी जाहाली होती की येणेकडून तुम्हास संतोष व्हावा आणि साहेबी प्रारंभापासून घडत आले त्याची निवल आज्ञा करावी चितातील संशय निःप्रांजल आज्ञा कर्तव्य ते करावे तुमचे चित पाहता साहेबास आस्तेचा आर्थ किमपि दृष्टीस न पडला यैसे साहेबास दिसोन आले यदंनिमित्य श्री सीखर यात्रेच्या उद्येशे करून स्वारी जाहाली तेव्हाच दर्शन घेऊन किले सातारियावरी मुकाम जाहला त्यानंतर तुमचे विचारे वेदशास्त्रसंपन्न नारायणबावा विद्यमानी आसता किलाहून खालते येणे जाहले तुम्हाकडून मध्येस्तीस राजश्री माहादाजी नाईक निंबाल्कर व दिनकर माहादेव नेहमी हुजूर होते साहेबाचा हेत कीं तुम्हास दर्शनांती आज्ञा कर्तव्य ते करून राज्याचा बंदोबस्त करावा हेच धनियाचे मानस तो तुमचे दर्शनास यावयाचा योग आजपर्यंत घडत न आला दिवसे दिवस विक्षेपावरच गोष्टी पडिल्या आताही या क्षण पावेतो साहेबाचे वचन जे प्रारंभी दिल्ही आहे तेच प्रमाण आहे तुम्हीही साहेबास आपल्या आराध्य देवताच्या दुर्वा व बेलभंडार क्रियापुरसर दिल्हया आहेत त्याचे स्मरण असो देणे राज्यभाराचा यख्त्यार तुम्हावरीच आहे तुम्हापेक्षा दुसरा सेवक उपयोगी सांप्रतकाली

कोण ? सर्व राज्यभाराचे कामकाज तुमचेच हाते घ्यावे हेच साहेबाचे मानस यदर्थी चितात किमपि संशय न धरणे.——१

वडुथावरी सेवक दोन वेल आलो परंतु कृपा न केली समीपवर्ती याणी संशय घातले तेच साहेबाचे मनात आले पुढे कोणे भरवशावर यावे हें कलतच आहे प्रथम साहेब पुण्यास सेवकावरी कृपा करुन आले तसे मन औदार्य करुन संशय टाकून कृपा केलीय सर्व गोष्टी उत्तम होतील म्हणून विनंती लिहिली येसीयासी तुम्ही वडूथाचे मुकामास आलेत तेव्हा साहेबी तुम्हास दर्शन द्यावे हाच निश्चय मुहूर्त पाहोन प्रस्थान देखील केले राजश्री माहादाजी नाईक निंबालकर व दिनकर माहादेव मध्यस्तीस होते बोलीत अंतर उभयतानीं तुम्हास काय समजाविले यामुले तुमचे चितास न ये उठोन गेलेस हे गोष्ट साहेबाकडे काय ? साहेबी कृपा करुन पुणीयासी यावे सर्व संशय दूर होऊन उतमच होईल म्हणोन लिा यैशीयासी साहेबाचे मानस कीं तुम्ही येकवेल येऊन दर्शन घ्यावे परस्परे कल्पना स्वामीशेवकपणाच्या दूर होतील तदोतर साहेब पुणियासी येउन तुम्हा सेवक लोकाचा सन्मान करावयाचा आगाध काय आहे ? तुम्ही येकनिष्ठ सेवक कृपेस योग्य आहात.——१

सदरहूप्रमाणे कलमाची आज्ञा उतरे च्यार चौकलमाची लिा आहेत. ही ध्यानात आणोन सेवकरीतीने वर्तणूक जाहालिया उतम आहे.. जाणिजे छ ७ माहे रमजान सुा समान खमसैन मया अलफ. सूज्ञ आसा.
(एकंदर पत्र पांच बंदांचें असून त्यांतील शेवटच्या बंदाच्या पाठीमागे पैवस्ता छ १४ माहे रमजान सन आर्बा ++ सबैन मया व अलफ हा मजकूर आहे; परंतु 'आर्बा सबैन' + हीं अक्षरे हस्तदोष मानावीं..)

लेखांक १०९ तारीख २७–७–१७५९

श्री

अनु. नं. १७

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बालाजीं पंडित प्रधान ताहा मोकदमानी मौजे कनहाल कर्यात जुगल पाा हुकेरी सरकार अजमनगर ऊर्फ बेलगाव सुभे विज्यापूर सुा सन सितैन मया व अलफ राजश्री विरुपाक्ष यमाजी गोत्र गौतम सुत्र आस्वलायन याणी कसबे पुणे येथील मुकामी हुजूर येऊन विनंती केली कीं आपले पिते यमाजी रुद्र याही स्वामीचे राज्यात बहुत दिवस श्रमसाहस करुन निष्ठेने सेवा केली त्याजवरून श्रीमंत माहाराज राजश्री संभाजी राजे छत्रपति स्वामी कृपालु होऊन मौजे मजकूर कुलबाब कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी देखील इनाम तिजाई व इनाम पटी व चौथाई जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करुन इनाम दरोबस्त वंशपरंपरेनेदेऊन राजपत्रे करून दिल्ही आहेत ती स्वामीनी पाहून भोगवटियास इनामपत्रे करून

दिल्ही पाहिजेत म्हणून त्याजवरुन मशारनिलेजवळ राजपत्रे आहेत ते पाहोन यास मौजे मजकूर कुलबाब व कुल्कानु हाली पटी व पेस्तर पटी देखील इनाम तिजाई व इनाम पटी व चवथाई जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करोन दरोबस्त राजपत्राप्रमाणे करार करून देऊन हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही यासी रुजू राहोन मौजे मजकुरचा दरोबस्त अमल राजपत्राप्रमाणे इ...न यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालविणे दरसाल ताजे पत्राचा उजूर न करणे यासी नकल घेऊन हे पत्र भोगवटियास मशारनिलेपासी परतोन देणे, जाणिजे छ २ जिल्हेज आज्ञा प्रमाण

लेखन

सीमा

लेखांक ११० तारीख १२-८-७७६०

श्री

पारसनिसी

अनु. नं. १९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ८७ विक्रमनाम संवत्सरे श्रावण शुध द्वितीया भोमवासरे क्षेत्रियेकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

रा जोत्याजी यादव हावालदार व कारकून

किलेमनोहरगड यासी आज्ञा केली यैसीजे

किले मारचा सुभा पेशजी हवलदाराचे निा होता त्याचे निा दूर करून हली राणीवासवाडा चौथा याजकडे सांगितला आहे कोण पा याचे हातून सुभेची सेवा घेत जाणे यासी वेतन सालीना होन पा २००० दोन हजार करार केले आसेत इा सनद पेवस्तीपासून दंड प्रमाणे वजावाट करून राहिले वेतन सिरस्त्याप्रमाणे पाववित जाणे हे व तुम्ही मिळून स्वामीसेवा येकनिष्ठपणे करीत जाणे. स्वामीसेवेसी अंतर न करणे जाणिजे. निदेश समक्ष.

मर्यादेयं

विराजते

रुजू सा मंत्री

तेरीख १ मोहरम

सुा इहिद सितैन बार सुरु सुद समत सुद

ता. ३१-८-१७६०)

सूची

व्यक्तीपुढील आंकडे लेखांकाचे आहेत.

———

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग दुसरा)

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद

छत्रपति शिवाजी महाराजांची कारकीर्द इ. स. १७०० ते इ. स. १७१४

व

छत्रपति संभाजीं महाराजांची कारकीर्द इ. स. १७१४ ते इ. स. १७६०

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८३ इ. स. १९६२

प्रस्तावना : भाग २

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनाचा हा दुसरा भाग आहे. यांत पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद प्रसिद्ध केले आहेत. पेशवे दप्तरांत चिटणीस दप्तर, जमाव दप्तर, पेशवे रोजनिशी, शाहू दप्तर असे अनेक विभाग आहेत. त्यांस अनुसरून शाहू दप्तरांतून निवडलेले कागद विभाग अ मध्यें छापले आहेत आणि चिटणीस दप्तर-जमाव दप्तर, पेशवे रोजनिशी यांतून निवडलेले कागद विभाग ब मध्यें छापले आहेत. या दोन्ही विभागांत अंकानुक्रमानें दिलेल्या लेखांची संख्या ११५ असून त्यांत छत्रपति शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीतील (इ. स. १७०० ते इ. स. १७१४) एकंदर २१ लेख आहेत. बाकीचे लेख छत्रपति संभाजीमहाराजांच्या कारकीर्दीतील (इ. स. १७१४ ते इ. स. १७६०) आहेत. प्रत्येक विभागास वेगवेगळी प्रस्तावना लिहून त्यांत ऐतिहासिक मजकुराचें दिग्दर्शन थोडक्यांत केलें आहे.

विभाग (अ)

या विभागांत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांची संख्या ५० आहे. पिराजी घोरपडे यांना हुजुरातचे पथकाकरितां एकंदर सरंजाम २४ महालांत दिला त्यांचा तपशील ले. १ मध्यें आहे. त्यांत कापशी या गांवाचा उल्लेख मिळतो. पिराजी घोरपडे, हिंदुराव घोरपडे व कृष्णाजी घोरपडे यांना प्रसिद्धगडाचे मुक्कामीं हुजुरांनीं २५८९७०० रुपये उत्पन्नाचा मुलूख फौजेच्या खर्चासाठीं इ. स. १७०४ मध्यें दिला ही हकीकत ले. २ मध्यें सांपडते. नीलकंठ बल्लाल चिटणीस यांचे स्वाधीन मिरज, कोल्हापूर, बेळगांव हे प्रांत व आजरें, गोकाक, हुकेरी, मुधोळ हे परगणे करून त्यांची नेमणूक सरसुभा म्हणून इ. स. १७०३–१७०४ सालीं केली. ही माहिती ले. ३ मध्यें आहे. धनाजी जाधव, सेनापति यांच्या हाताखालीं कामगिरीवर असलेले कृष्णराऊ मल्हार यांना ४४२४५० रुपये उत्पन्नाचा सरंजाम दिला, हा तपशील ले. ४ मध्यें आहे. जोगोजी गायकवाड सुभा यांस महिपालगड व मानगड या किल्ल्यांच्या तनख्यांत असणारीं खेडीं मिळालीं आणि नेमाजी शिंदे यांना ४७७३५० रुपये उत्पन्नाचा सरंजाम मिळाला, ही माहिती ले. ५ व ७ मध्यें आहे. परसोजी भोसले रांगण्याचे मुक्कामीं हुजूरदर्शनास गेले, त्या समयीं त्यांना १४३६००० रुपये उत्पन्नाचा सरंजाम करार करून दिला. तसेंच सिदोजी हिंदुराव घोरपडे यांना कर्नाटक प्रांतांत एकंदर २३ महाल सरंजाम म्हणून करार करून दिले, हा तपशील ले. ८ मध्यें आहे.

कृष्णाजी भोसले यांस शाहूमहाराजांनीं लष्करची सरदारी सांगून हिंदुराव घोरपडे यांचा सरंजाम त्यांजकडे देऊन त्यांस वस्त्रें दिलीं. (ले. ८, ९, १०) हणमंतराऊ पाटणकर यांना किल्ले प्रसिद्धगडचे मुक्कामीं सरंजाम करार करून दिला. उदाजी काटकर यांना फौजेच्या खर्चासाठीं दक्षिण प्रांतांत दोन लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख मिळाला. तसेंच नीळकंठ बल्लाळ यांना कोंकण व व्याघ्रगड प्रांत आणि मलकापूर हा मुलूख मिळाला. पुढें दुर्गोजी राजे महाडिक यांना दक्षिण प्रांतांत फौजेच्या खर्चासाठीं कांहीं मुलूख मिळाला, हा तपशील ले. १० मध्यें आहे. गिरजोजी यादव व शहाजी काटे या सरदारांना जो सरंजाम होता त्याचा तपशील सन १७०८-०९ या सालच्या यादींत आहे. ता. ७-१२-१७०९ रोजीं शाहूमहाराज, सातारा यांनीं अंताजी त्रिमल या सरदारास कोल्हापूर प्रांतांत अंमल स्थापण्यास आज्ञा करून त्याचे मदतीस उदाजी काटकर व शंकराजी राजे महाडिक या दोन सरदारांना नेमलें, ही माहिती ले. ११ मध्यें मिळते; परंतु सन १७११ च्या एप्रिल महिन्यांत सोमाजी जगथापराऊ, ममलकतमदार यांना दुर्गोजी राजे महाडिक यांच्या सरंजामापैकीं निम्मा सरंजाम करार करून दिला, ही हकीकत ले. १३ मध्यें सांपडते. मानाजी काटकर, सेनाबारासहस्त्री व उदाजी काटकर, सेनाबाराहजारी यांच्या कामगिरीची माहिती सदर लेखांमध्यें आहे.

पन्हाळकरांकडील म्हणजे छत्रपति शिवाजीमहाराज, करवीर यांजकडील विठोजी चव्हाण यांनीं शाहूमहाराज सातारा यांच्याकडे जाण्याचें योजिलें तेव्हां त्यासंबंधीं जे मुद्दे उभयपक्षांत मान्य झाले त्याचा तपशील ता. १३-९-१७१२ च्या करारपत्रांत आहे. हे विठोजी चव्हाण उदाजी चव्हाण हिंमतबहाद्दर यांचे पुत्र होत. (ले. १४) शाहूमहाराजानीं मुरारजी शिंदे ममलकतमदार यांना पन्हाळा प्रांतांत फौजेच्या खर्चासाठीं मुलूख ता. ८७-१-१७१३ रोजीं नेमून दिला. त्याच प्रांतांत शाहूमहाराजांचे लेकावळे कुसाजी व येसाजी भोसले यांना फौजेच्या खर्चासाठीं मुलूख मिळाला होता, ही माहिती ले. १५ मध्यें आहे. शिवाजीमहाराज, करवीर यांनीं रयतेस जमीनीचा नवीन धारा करार करून दिला. तसेंच संताजी गायकवाड सेनाबारासहस्त्री यांना फौजेच्या खर्चाकरितां मुलूख दिला. पुढें महाराजांनीं रामचंद्र पंडित हुकुमतपन्हा व येशवंतराव गायकवाड, मुद्राधारी कोट, शिराळे यांना राज्यकारभाराबाबत आज्ञा केली, ही हकीकत ले. १६ मध्यें आहे.

ता. १९-१-१७१५ रोजीं शाहूमहाराजांनीं सातान्याहून संभाजीमहाराज, करवीर यांना पन्हाळा मुक्कामीं मकरसंक्रमणाचे तिळगूळ पाठविले. पुढें ता. १२-१२-१७१५ रोजीं शाहूमहाराजांनीं जासुदास घोरपडे सरदार व रामचंद्रपंत अमात्य यांच्या लष्करांत जाऊन बातमी आणण्याबद्दल आज्ञा केली (ले. १७). मानसिंग मोरे, सेनापति यांना कोल्हापूर तारले, मलकापूर, पन्हाळा हे परगणे सरंजामासाठीं शाहूमहाराजांकडून इ. स. १७१५-१६ मध्यें मिळाले. पुढें शाहूमहाराजांनीं संभाजीमहाराजांन

पन्हाळा मुकामीं तिळगूळ व राजपत्रें ता. ११-१-१७१७ रोजीं पाठविली, हा मजकूर ले. १८ व १९ मध्यें आढळतो. संभाजीमहाराज, करवीर व शाहूमहाराज, सातारा यांच्या ताब्यांत कोणकोणते गडकिल्ले होते त्याची बाहिती ले. २० वरून मिळते. शाहूमहाराजांनीं पंचगंगेपासून रामेश्वरपर्यंत मुलूख अंमल बसविण्यासाठीं श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यांजकडे ता. २१-१०-१७१९ रोजीं दिला. पुढें प्रतिनिधींनीं रदबदल करून त्या प्रदेशापैकीं तुंगभद्रेपासून रामेश्वरपर्यंत असणारा देश सुभानजी थोरात दिनकरराऊ, वजारतमाब यांचे स्वाधीन केला, ही माहिती ले. २१ व २२ मध्यें आहे. त्यानंतर पिराजी घोरपडे यांनीं शाहूमहाराजांचा पक्ष स्वीकारण्यासाठीं त्याच्याकडे ज्या मागण्या केल्या त्याचे तपशीलवार वर्णन ता. २-११-१७२० च्या यादींत आढळते. पुढें शाहूमहाराजांनीं पिराजी घोरपडे यांना ममलकतमदार हा किताब देऊन मिरज व पन्हाळा प्रांतांतील सरदेशमुखीचे वतन वंशपरंपरेने करून दिले आणि पंचगंगेपासून तुंगभद्रेपर्यंत गड, किल्ले व हुजरातचा सरंजाम वजा करून बाकी मुलूख सरंजामासाठीं दिला. (ले. २१; २२, २३)

शाहूमहाराजांनीं मुरारजी शिंदे ममलकतमदार यांना तोरगल सरकारांत सरंजाम करार करून दिला. तसेंच सुलतानजी सितोळे यांस मौजे मांजरी परगणें कागल व मौजे आंकली प्रांत मिरज हीं गांवें ता. १९-५-१७२३ रोजीं इनाम दिली. (ले. २४, २५) पुढें शाहूमहाराजांनीं व्यंकटराव नारायण घोरपडे ममलकतमदार इचलकरंजीकर यांना पंचगंगेपासून तुंगभद्रेपर्यंत असणाऱ्या मुलुखापैकी निम्मा मुलूख ता. १८-३-१७२४ रोजीं दिला (ले. २६). शेवटी सिद्दोजी हिंदुराव घोरपडे हे शाहूमहाराज, सातारा यांचे सेवक झाले. तेव्हां महाराजांनीं त्यांना त्याजकडे पूर्वी जो प्रांत होता तो हल्ली सरंजाम म्हणून करार करून दिला. तसेच त्या प्रांतांतील कोपळ किल्ला सिदोजी घोरपडे यांना कुटुंब ठेवण्यासाठीं दिला. ही घटना ता. १९-१०-१७२५ रोजीं झाली. (ले. २७) शाहूमहाराजांनीं पन्हाळा, कोल्हापूर, आजरे, मलकापूर व तारळे हे परगणें सिदोजी थोरात या सरदाराचे स्वाधीन ता. २९-८-१७२६ रोजीं केले (ले. २८).

संभाजीमहाराज, करवीर यांनीं वऱ्हाड प्रांतांतील राजूरबोर परगणा मल्हराभाऊ रायाजी उमदेउलमुल्क यांना फौजेच्या खर्चाकरितां ता. २४-६-१७२७ रोजीं करार करून दिला. तसेंच धीराजी पवार विश्वासराव, भगवंतराव अमात्य व धोंडो भास्कर यांजकडे दिलेल्या गांवांचे अंमलासंबंधी कटकट करूं नये म्हणून तावजी थोरात, अमिरूल उमराव व संताजी थोरात, समशेरबहाद्दर मुक्काम नेवासे यांना संभाजीमहाराजांनीं ता. ४-१०-१७२७ रोजीं एक आज्ञापत्र पाठविले. संभाजीमहाराज, करवीर व निजाम हे उभयतां कूच करून येतात, त्यांना खंडेराव दाभाडे सेनापति यांनीं पायबंद द्यावा असा हुकूम शाहूमहाराजांनीं ता. ५-१०-१७२७ रोजीं फर्माविला. याच सुमारास संभाजीमहाराजांनीं हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार यांना सरदेशमुखीचे वतन ता.

२७-१०-१७२७ जीं दिलेकरार करून. पुढे शाहूमहाराजांनीं राणोजी घोरपडे यांचे ऊर्जित करून त्यांचे हातून स्वामीसेवा घेण्याचे योजिले. ही घटना ता. ९-१२-१७२७ रोजीं घडली. (ले. २९.)

उदाजी चव्हाण, हिंमतबहादर यांनीं श्रीचा बेलभंडार पाठवून विरोध न करण्याचे वचन शाहूमहाराजांना दिले हा मजकूर ता. ६-१-१७२९ च्या पत्रांत आढळतो. पुढें हिंदुराव घोरपडे यांनीं विनंती केली त्याप्रमाणें शाहूमहाराजांनीं नारो राम मंत्री यांना फौजेनिशी दक्षिणप्रांतांत पाठविले. या सुमारास संभाजीमहाराज यांनीं आपल्या चित्तांतील हेतु शाहूमहाराजांना कळविला, ही माहिती ता. १-९-१७२९ च्या पत्रांत आहे. पुढें सन १७२९ व सन १७३० इसवीमध्ये संभाजीमहाराज यांच्या विरुद्ध शाहूमहाराजांनीं ज्या सरदारांना पाठविले त्यांच्या हालचालींचीं वर्णने ले. ३०, ३१, ३२ या लेखांत आढळतात.

मुरारजी घोरपडे यांना शाहूमहाराजांनीं हिंदुराव हा किताब ता. २१–१–१७३१ रोजीं दिला. नंतर ते शाहूमहाराजांस भेटले तेव्हां त्यांना सरंजाम मिळाला. ही हकीकत ता. २८–१–१७३१ व ता. २–२–१७३१ च्या पत्रांत आढळते. शाहूमहाराज, सातारा यानीं कऱ्हाडास जाऊन संभाजीमहाराज, करवीर यांची भेट ता. २७–२–१७३१ रोजीं घेतली. पुढे संभाजीमहाराज यांच्याकडे जो प्रांत दिला त्याचा तपशील ४ ता.१६––१७३१ च्या पत्रांत दिला आहे (ले. ३३). उदाजी चव्हाण हिंमतबहादर यांनीं संभाजीमहाराजांचे मुलुखांस उपद्रव देऊं नये असें ताकीदपत्र शाहूमहाराजांनीं त्यांस ता. १०–११–१७३२ रोजीं पाठविले (ले. ३४). तसेंच भगवंतराव रामचंद्र अमात्य संभाजीमहाराजांचे विरुद्ध वागतात तेव्हा त्यांचे साहित्य कोणी सरदारांनीं करूं नये म्हणून शाहूमहाराजांनीं संभाजी आंगरे सरखेल व नाग सांवत भोसले यांना ता. २९–५–१७३६ रोजीं आज्ञापत्रे पाठविली. पुढे राणोजी घोरपडे यांस कोल्हापुरास घेऊन जाऊन छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांच्याशीं ठरलेल्या कराराप्रमाणे तेथे दोघांचे समाधान करून देण्याबद्दल शाहूमहाराजांनी मध्यस्थ असलेल्या सिदोजी थोरात, ठाणे अष्टे या सरदारास ता. ४–८–१७३६ रोजीं पत्र पाठविलें (ले. ३८). भगवंतराव पंडित अमात्य यांना शाहूमहाराजांनीं ता. ६–२–१७३७ रोजीं वर निर्देश केलेल्या प्रसंगाबाबत एक आज्ञापत्र पाठविले. त्यांतील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे : "तुम्ही परंपरागत सेवक तुमचे चालवावे तुम्हीहि निस्टेनें वर्तावे हे उचित आहे तुम्ही शाहाणे लोक आहा जेणे कडून धण्याची मर्जी राहे त्या विचारे अंतर न करणे." (ले. ३९) आबाजी सर्ज्याराऊ घाटगे यांनी संभाजीमहाराज, करवीर यांच्या आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून सेवा करून दाखवावी हा मजकूर ता. १४–४–१७३८ रोजीं शाहूमहाराजांनीं त्यांस पाठविलेल्या पत्रांत आढळतो. हिंदुराव घोरपडे ममल्कतमदार यांना शाहूमहाराजांनीं भोजन घालून, वस्त्रें देऊन बहुमान केला हा उल्लेख ता. २७–१०–१७३९

च्या पत्रांत आहे. शाहूमहाराज उदाजी चव्हाण हिंमतबहादर यांजवरी मोहिमेस गेले होते. ती मोहीम सर करून त्यांनीं ठाणीं काबीज केलीं. मिरजेचा कोट घेतला आणि तेथील मोगल अधिकारी दिलेरखान यांस धरून आणिलें ही माहिती ता. २७-२-१७४० च्या पत्रांत आहे. पुढें शाहूमहाराजांनीं ता. २९-२-१७४० रोजीं ज्या प्रमुख सरदारांना आज्ञापत्रें पाठविलीं त्यांत राणोजी घोरपडे सेनापति, दादोराव नवलगुंदकर, सगुणाबाई शिंदे, हिंदुराव घोरपडे, ममलकतमदार दौलतराव घोरपडे या सरदारांचीं नांवें आढळतात. या आज्ञापत्रांत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहे : "राजश्री संभाजी राजे यांच्या मुल्कात उपसर्ग देतात गड कोट किल्ले ठाणी घेतात याजकरिता त्यास ताकीदपत्रे देऊन हुजरे पाठविले आहेत तरी त्यांच्या प्रांतात उपसर्ग न देणे आणि रामचंद्र बावाजी प्रभु यास त्यानी फोंडे व सुपे कोंकण प्रांतात पाठविले आहे तर त्यास सामील होऊन ठाणी व गड किल्ले व प्रांत सोडवून देऊन संभाजी राजे यांचा अमल चाले यैसे करणे" यासंबंधीं अधिक माहिती ता. १८-२-१७४१, ता. ६-३-१७४४ व ता. ५-३-१७४ च्या पत्रांत दिली आहे. (ले. ४३, ४५, ४६.)

शाहूमहाराज, सातारा कैलासवासी झाले त्या समयीं संभाजीमहाराज, करवीर यांना वारणा नदी अलीकडे येण्यास प्रतिबंध करावा हें ठरवून ती कामगिरी नानासाहेब पेशवे यांनी शिदोजी थोरात या सरदारास नेमून दिली. हा उल्लेख ता. २७-७-१७५२ च्या पत्रांत आहे (ले. ४९). भगवंतराव पंडित अमात्य व संभाजीमहाराज, करवीर यांचा कलह आज दोन वर्षे लागला आहे; हा उल्लेख ता. १२-१०-१७५२ च्या पत्रांत आहे. संभाजीमहाराजानीं वडगांव व शिराळे या देशावर स्वारी केल्याचा उल्लेख ता. २५-११-१७५२ च्या पत्रांत आहे. या स्वारींत संभाजीमहाराज, करवीर यांच्याबरोबर आबाजी घाटगे सर्ज्याराऊ व राणोजी घोरपडे सेनापति कामगिरीवर आहेत. यासंबधीं अधिक माहिती ता. ३०-११-१७५२ च्या पत्रांत आहे. पुढें बालगोपाल भोसले व मिरजकर, चिकोडीकर, नारायणराव घोरपडे, इचलकरंजीकर व इसलामपूरकर या सरदारांना बरोबर घेऊन बाबाजी थोरात यांनीं संभाजीमहाराज, करवीर यांच्या शहावर जावें अशी आज्ञा महाराणी ताराबाईनें त्यांस केली हा उल्लेख माहे नोव्हेंबर सन १७५२ च्या पत्रांत आढळतो. यासंबंधीं अधिक माहिती ता. २४-१२-१७५२ च्या पत्रांत आढळते (ले. ४९). त्यानंतर संभाजीमहाराज, करवीर यांच्या मुलुखांत उपसर्ग करूं नये अशी आज्ञा शिवाजी साळुंखे या सरदारास ता. २-१-१७५३ रोजी केली, ही माहिती ले. ५० मध्ये आहे. या समयीं संभाजीमहाराज, करवीर यांची फौज कूच करून भिलवडी-वर आली. त्यांचे मदतीस उदाजी चव्हाण हिंमतबहादूर आपले फौजेनिशीं होते. तेव्हां त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं जगजीवन पंडित प्रतिनिधि यांस आज्ञा केली, हा उल्लेख ता. ७-१-१७५३ च्या पत्रांत आढळतो. पुढें संभाजीमहाराज, करवीर यांनीं आबाजी घाटगे सर्ज्याराव यांस बरोबर घेऊन कृष्णराव पंडित अमात्य यांच्या सालवण ठाण्यास

वेढा घातला ही हकीकत ता. १९-४-१७५३ च्या पत्रांत सांपडते. तसेंच प्रतिनिधि व तुळाजी आंग्रे यांची भेट होऊन विशाळगडचा तह घडून आला. हा मजकूर जगजीवन पंडित प्रतिनिधि यांना ता. २६-४-१७५३ रोजीं पाठविलेल्या पत्रांत आहे. या-संबंधीं अधिक माहिती ता. १-५-१७५३ व ता. १२-५-१७५३ च्या पत्रांत दिली आहे (ले. ५०).

विभाग (ब)

या बिभागांत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांची संख्या ६५ आहे. त्या लेखांतील ऐतिहासिक मजकुराचें वर्णन थोडक्यांत पुढें दिलें आहे.

नानाजी दत्तात्रय यांनीं स्वामीकार्याविषयीं निष्ठेनें श्रम करून दुहीचा प्रसंग असतांना देखील सेवा केली, सबब खारेपाटण तालुक्यांतील त्याचे शेत त्याजकडे चालवावे म्हणून महाराणी ताराबाईसाहेब यांनीं कान्होजी आंगरे सरखेल यांना सन १७०८ इसवीत आज्ञा केली हा उल्लेख ले. ५१ मध्यें आहे. शिवाजीमहाराज, करवीर यांना शाहूमहाराज, सातारा याजकडून समाधानपत्र आल्यास योजिलेलें कार्य घडून येईल असा विश्वास उदाजी काटकर या सरदाराने रामचंद्र पंत अमात्य यांना लिहिलेल्या पत्रांत प्रगट केला आहे (ले. ५२). तमाजी परवगोंडा देसाई सरनाईक परगणे हुकेरी हे स्वामीच्या पायाशीं निष्ठा धरून सेवा करीत आले. सबब त्यांना शिवाजीमहाराज, करवीर यांनीं एक गांव इनाम देऊन त्याचें सनदपत्र ता. २६-१-१७११ रोजीं दिलें. ही हकीकत ले. ५३ मध्ये सांपडते.

मातोश्री राजसबाई महाराणी यांनीं वेदशास्त्रसंपन्न देवदत्त परमानंद कवींद्र राज्यांतील आश्रित विद्वान् यांस एक गांव इनाम देऊन त्याबदल सनदपत्र तारीख १९-५-१७१८ रोजीं दिलें. श्रीची स्थापना अर्थात् करवीरनिवासिनी आंबाबाईची स्थापना करवीरक्षेत्रांत केली, सबब संभाजीमहाराजांनीं श्रीचे पूजेसाठीं एक गांव वेदशास्त्र-संपन्न शिवरामभट यांचे पुत्र नरहरभट यांना ता. ८-११-१७२३ रोजीं दिला, ही माहिती ले. ५६ व ५८ मध्यें मिळते. पाटगांवचे मठास गांव इनाम देण्याकरितां संभाजी-महाराज, करवीर यांनीं पिराजी घोरपडे यांना ता. २४-१०-१७२७ रोजीं जे आज्ञापत्र पाठविलें यांत नार सांवत कुडाळकर यांजवर होणाऱ्या मोहिमेचा उल्लेख आढळतो. [ले. ६०]

संभाजीमहाराज, करवीर व शाहूमहाराज, सातारा या दोघां राजबंधूमध्यें तह झाल्यावर संभाजीमहाराज यांच्याकडे जो मुलूख आला त्याचे तपशीलवार वर्णन ले. ६६ मध्यें आहे. पुढें संभाजीमहाराजांनीं राणोजी घोरपडे यांना ता. २५-६-१७३१ रोजीं जे वतन दिलें त्याचा तपशील ले. ६७ मध्यें आहे. यासंबंधीं अधिक माहिती

ले. ६९ व ले. ७० या लेखांत आहे. राणोजी घोरपडे यांना पुत्र झाला आणि व्यंकटराव नारायण घोरपडे, इचलकरंजीकर यांनीं त्या निमित्तानें साखर वांटली हा उल्लेख ले. ७० मध्यें आहे.

मुराररराव घोरपडे, वजारतमाब ममलकतमदार यांना आपल्या पक्षास वळविण्याचा जो प्रयत्न महाराणी जिजाबाई व संभाजीमहाराज करवीर यांनीं केला ती हकीकत ले. ७२ मध्यें आहे. त्यासंबंधीं अधिक माहिती ले. ७३, ७४, ७५, ७६, ७७ या लेखांत आहे.

शाहूमहाराज, सातारा यांची राणी सकवारबाई यांनीं संभाजीमहाराज, करवीर यांना फौज घेऊन साताऱ्यास बोलाविले त्याप्रमाणे ते फौजेसह कोल्हापुराहून कूच करून साताऱ्यास यावयास निघाले. पण संभाजीमहाराजांनीं बारणा नदी ओलांडून साताऱ्यास येऊ नये म्हणून प्रतिबंध करण्यासाठीं नानासाहेब पेशव्यांनी भास्कर हरि व सिदोजी थोरात या फौजबंद सरदारांना बारणा नदीचे कांठीं छावणी करण्यास आज्ञा केली. शाहूमहाराजांचे पश्चात् सातारचे गादीस वारस कोण असावे या गोष्टीचा निर्णय करण्याचा तो प्रसंग होता. ही हकीकत ले. ७८, ७९ मध्ये सांपडते. सोंधे बिदनूर व सावनूर या कर्नाटक प्रांतांतील संस्थानांची खंडणी ठरविणे व ती वसूल करणें हे दोन्ही हक्क नानासाहेब पेशवे यांजकडे सोंपविले होते ते त्याजकडून नंतर दूर करून हल्ली हुजूर ठेविले ही हकीकत संभाजीमहाराज करवीर यांनी सोंधे संस्थानच्या राजेसाहेबांस लिहिलेल्या पत्रांत दिली आहे. (ले. ८३) कर्नाटक प्रांतांतील मराठ्यांच्या राजकारणासंबंधीं सविस्तर माहिती ले. ८५, ८६ या लेखांत आहे.

ले. ८७ व ले. ८८ हे लेख महाराणी ताराबाई व महाराणी जिजाबाई यांनीं नानासाहेब पेशवे यांना पाठविलेलीं आज्ञापत्रें आहेत. या पत्रांत ध्वनित केलेलें राजकारण महत्त्वाचें आहे. पुढे संभाजीमहाराज, करवीर हे युद्धाची तयारी करितात हें वृत्त ले. ९१ मध्ये आहे. पंत अमात्य बावडेकर यांच्यावर महाराणी जिजाबाई, करवीर यांची इतराजी झाली, या गोष्टीचें सविस्तर वृत्त ले. १०१ मध्यें आहे. तसेंच संभाजीमहाराज, करवीर व त्यांचे सरदार यांच्या हालचालीबद्दल हकीकत ले. १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०७, ११० व ११३ या लेखांत सांपडते. उदाजी चव्हाण हिंमतबहादर यांना करवीरचे पक्षांत मिळविण्याची वाटाघाट महाराणी जिजाबाई, करवीर यांजकडून सुरू आहे हें वृत्त ले. १११ यांत आहे. अशा रीतीनें या दुसऱ्या भागांत आलेले ११५ कागद मी वाचकांपुढें मांडीत आहें.

१३२१ कसबा पेठ, पुणें २
मिति फाल्गुन कृष्ण ९ शके १८८३
ता. ३०-३-१९६२

मा. वि. गुजर

दुरुस्ती : भाग २

पृ. २ ओळ २२ ‘ दिगजरखुर्द ’ च्या ऐवजीं ‘ दिगरजखुर्द ’ वाचावें.

पृ. ९ ओळ १९ ‘ हमालवाड ’ च्या ऐवजीं ‘ हमीदवाड ’ वाचावें.

पृ. १७ ओळ २० ‘ पैका ’ च्या ऐवजीं ‘ पैकीं ’ वाचावें.

पृ. २१ ओळ १७ ‘ किलेमूशणगड ’ च्या ऐवजीं ‘ किले भूशणगड ’ वाचावें.

पृ. २२ ओळ खालून ५ ‘ वारीख ’ च्या ऐवजीं ‘ तारीख ’ वाचावें.

पृ. २९ ओळ खालून ७ ‘ १८१४ ’ च्या ऐवजीं ‘ १७१४ ’ वाचावें.

पृ. ३१ ओळ खालून १ ‘ क्षत्रपति ’ च्या ऐवजीं ‘ छत्रपति ’ वाचावें.

पृ. ४४ ओळ ८ ‘ सुभाप्रामनाला ’ ऐवजीं ‘ सुभा प्रा। पनाला ’ वाचावें.

पृ. ५९ ओळ १२ ‘ पाठविले पवार ’ च्या ऐवजीं ‘पवार पाठविले ’ वाचावें.

पृ. ८८. ओळ ४ ‘ तारीख १७-६-१७३१ ’ ऐवजीं ‘तारीख १२-७-१७३१’ वाचावें.

पृ. ९५ ओळ १७ ‘ पापू याचे ’ च्या ऐवजीं ‘ पावलीयाचे ’ वाचावें.

पृ. १०५ ओळ १४ ‘ तारीख ४-१२-१७४१ ’ च्या ऐवजीं ‘ तारीख ४-१२-१७४० ’ वाचावें.

पृ. १११ ओळ ४ ‘ रुजूत ’ च्या ऐवजीं ‘ रुजू ’ वाचावें.

पृ. ११७ ओळ १७ ‘ तारीख २९-११-१७४२ ’ च्या ऐवजीं ‘ तारीख २९-११-१७५२ ’ वाचावें.

पृ. १२१ ओळ खालून ६ ‘ देते ’ च्या ऐवजीं ‘ ते ’ वाचावें.

पृ. १३८ ओळ खालून ६ ‘ जिवराज ’ च्या ऐवजीं ‘ जिवराव ’ वाचावें.

पृ. १४१ ओळ १३ ‘ सासुदास ’ च्या ऐवजीं ‘ जासुदास ’ वाचावें.

पृ. १४१ ओळ खालून ८ ‘ तपासले ’ च्या ऐवजीं ‘ तपसिले ’ वाचावें.

पृ. १४३ ओळ १२ ‘ हाट ’ च्या ऐवजीं ‘ दाट ’ वाचावें.

पृ. १४३ ओळ २१ ‘ ग्लांती ’ च्या ऐवजीं ‘ ग्लांतीनें ’ वाचावें.

पृ. १४३ ओळ २७ ‘ जाऊन द्यावे ’ च्या ऐवजीं ‘ जाऊ न द्यावे ’ वाचावें.

पृ. १४४ ओळ १ ‘ बने स्नेह ’ च्या ऐवजीं ‘ बने तरी स्नेह ’ वाचावें.

पृ. १४४ ओळ ५ ‘ वादव ’ च्या ऐवजीं ‘ यादव ’ वाचावें.

पृ. १४६ ओळ १२ ‘ येकाजीपंत ’ च्या ऐवजीं ‘ येमाजीपंत ’ वाचावें.

पृ. १४७ वरील तळटीप अनावश्यक समजावी.

पृ. १५५ ओळ खालून ९ ‘ छ ५ रुप.र ’ च्या ऐवजीं ‘ छ ५ रबिलावल ’ वाचावें.

पृ. १५५ ओळ खालून १२ ‘ तारीख २०-११ १७५४ च्या ऐवजीं ‘ तारीख २०-१२-१७५४ ’ वाचावें.

पृ. १५७ ओळ ५ ‘ तारीख १९-१-१७५५ ’ च्या - ऐवजीं ‘ तारीख १०-२ १७५३ ’ वाचावें.

पृ. १५८ ओळ ४ ‘ तेचबजिनस ’ च्या ऐवजीं ‘ तेच बजिनस ’ वाचावें.

पृ. १६४ ओळ खालून ११ ‘ तारीख १०-६-१७५९ ’ च्या ऐवजीं ‘ तारीख ३०-५-१७६० ’ वाचावें.

पृ. १६५ ओळ १ ‘ जमा ’ च्या ऐवजीं ‘ जमाव ’ वाचावें.

पृ. १६५ ओळ २२ ‘ तारीख ११-१-१७६० च्या ऐवजीं ‘ तारीख ३०-१२-१७६० ’ वाचावें.

पृ. १६५ ओळ २९ ‘ तारेख ’ च्या ऐवजीं ‘ तोरव ’ वाचावें.

पृ. १६६ ओळ १ ‘ भरता ती ’ च्या ऐवजीं ‘ भरताती ’ वाचावें. ओळ २ ‘ घेता ती ’ च्या ऐवजीं ‘ घेताती ’ वाचावें; ओळ ११ ‘ असता ती ’ च्या ऐवजीं ‘ असताती ’ वाचावें.

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपद्पातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्., बी. ए

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग २

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग दुसरा)

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

विभाग (अ) शाहू दप्तर

लेखांक १ तारीख ११-११-१७०३

श्री

शाहू दप्तर रुमाल नं. २०
राजमंडल दि॥ मजमू सरंजाम सु॥ आर्बा (मया व अलफ) लस्कर
दिमत राजश्री पिराजी घोरपडे हुजरातचे पथकास
सालगुदस्ता प्रमाणे सालमजकुरी करार करून दिल्हे.
छ १२ रजब

सुभा प्रांत कोल्हापूर १ ता येकसंबे
७ कर्यांत येकसंबे पा रायेबाग पो
१ कसबा १ सिरगाऊ १ मोज १ दानवाड १ येलगोड
१ अकीवाट १ घोसरवाड

७

पा हुकेरी पैकी देहे ५ कर्यात नेज ९ कर्यात जुगुल २ कर्यात सिरहटी
प्रा॥ मिरज १ टाकली १ बस्तवाड । २
१ का॥ मांजरी पा कागल

२४ तर्फ

१ ता सदलगे १३ का॥ हुकेरी पैकी

....

१ कर्यात रांगोली का॥ नेज
७ का॥ इचलकरंजी प्रा मिरज पैकी

....

२ का। सिरवल पा। रायबाग पैकी
१ सिर्देवाडी का। मांजरी पा। कागल
———
२४ माहाल
१३ पा। हुकेरी पैकी त। ऊसगाऊ
१४ पा। रायेबाग ३ कोल्हापूर
२ हवेली कोलापूर सुभा आजिरे
१ कर्यात सोलापूर । २५
१ कर्यात अडगल पा। रायेबाग पैकी १७
१ कर्यात कबूर पा। हुकेरी पैकी
———
३३

१ का। कापसी गड किलियाचे गाव वजा करून बाकी प्रां। मिरज १२ तर्फा
१ का। हवेली मिरज.........१ कर्यात सांगली
......१ का। कविटे.........१ का। मनेराजुरी
......१ का। म्हैसाल.........
———
१२

११ फुटगाव
४ का। नांदेर पा। रायेबाग पैकी

....

५ का। कागल पैकी १ का। अल्संद
१ दिगजरखुर्द १ आंकली १ मलणगाऊ
१............
२ पा। हुकेरी पैकी............
सुभा पनाला पैकी देहे ६ ....
माहाल
पा। यादवाड पा। जमखंडी ० पा। लोकापूर
मुधोल पंचमहाल   मुधोल लोकापूर
ढवलेस्वर   जमगी माचनूर
इनाम गांव पेशजी प्रा। करार
१ विग ता। हवेली कराड १ वेचले ता। सातारा १ निवकणे ता। पाटण प्रा। कराड १ संभापूर ता। मरली
———
४

नवा सरंजाम साल मजकूर
प्रा गलगले प्रा विजापूर
छ ११ रजब बार
कर्यात भालवणी सुभा प्रांत खटाव
देहे ८ येकून
बार
मौजे मुगली ता मनोली सुभा आजिरे
बार
मौजे नेलकरजी ता आटपाडी प्रांत माण
बार

लेखांक २ तारीख १३--११--१७०३

शाहू दप्तर रु. नं. २०

राजमंडल

स्वारी राजश्री पंत प्रतिनिधि

दिा राजश्री पिराजी घोरपडे

सरंजाम छ १४ रजब सुा आर्बा मारनुलेचे पिते रा संताजी घोरपडे यास मामले मिरज येथील अठरा कर्यातीचे देशमुखी वतन दिली होती तेणे प्रो त्याकडे करार करून दिले कर्याती मामले १८...
मारनुलेचे वडील बंधू रा राणोजी घोरपडे स्वामी कार्यावरी पडिले यानिमित्य त्याची स्त्री संतुबाई घोरपडी इजवरी कृपाळु होऊन तिचा योगक्षेम चालवियानिमित्य कसबे कापसी सुभा आजिरे हा गाव कुलबाब कुलकानु देखील इनाम दिले १

सरदेशमुखीचे वतन मारनुलेस पेसजी पासून होते तेणे प्रो करार बि ता
१ सुभा पनाला १ मामले मिरज
रा नारो माहादेऊ दिा मारनुले यानी कस्टमेहनत बहुत केली या बा त्यास कसबे भिलवडी सुभा प्रां मिरज हा गाव कुलबाब कुलकानुदेखील इनाम करून दिला १
मारनुलेकडे वजारतमाब सरंजाम करून सरदार दिले.
१ संभाजी चेरनोजीधरराऊ निंबालकर हजार घोडेचे दौलत जातीस तैनात होनू ३०००
यास जमान सुलतानजी सितोले सेनाहप्तसहश्री दिा मारनुले
१ वेंकटराऊ नारायेण पंचसदी जमाव वागववा तैनात जातीस होनू २००० जमान संभाजी धारराऊ वजारतमाब सदरहू

....

कसबे कविठे यमेख प्रा मिरज या गावाविसी पत्रे
१ गावास कौल
१ संताजी पांढरे यानी पटेलगीसी कथला आहे मणऊन तोतया करून
गुरे नेहली त्याबा त्यास ताकीद
२

इ. स. १७०४

शाहूदप्तर रु. नं. २०

श्री

राजमंडल सरंजाम लस्कर

सरंजाम राजश्री पिराजी घोरपडे व हिंदुराव घोरपडे व कृष्णाजी घोरपडे याचा सरंजामा
प्रसिधगडचे मुकामीचा

६६९००० सुभे ७
१७८४००० माहाल १०९
१३६७०० देहे ६३ येकून

२५८९७०० रुपये

कदीम
१२८४००० कदीम
५२५००० सुभे ५
१३६७०० देहे ६३ येकूण

१९४५७००
नवीन माहाल ४७ येकून बेरीज रुो
५०००००

नलगुंद व नवलगुंद सुभे २ पैकी वजा पथकास यैवज देविला
१४४०००

हिंदुराऊ घोरपडे
५२५००० सुभे ५ येकून
९४५००० माहाल ४३ येकून
१८००० देहे ११ येकून

१४९८०००

पिराजी घोरपडे

३२९००० माहाल १९ येकून सो

११८७०० देहे ५२ येकून सो

४४७७००

खासा पथक	५९०००
खंडोजी निकम	१०५०००
मानाजी बागुल	१६१२००

....

लेखांक ३ इ. स. १७०४

श्री

राजमंडल स्वारी राजश्री पंत प्रतिनिधि सुा आर्बा मया व अलफ राजश्री नीलकंठ बलाल याचे स्वाधीन प्रांत मिरज व प्रांत कोलापूर व प्रांत बेलगाऊ + + + आजिरे व पा गोकाक व पा हुकेरी + + + + मुधोल + + + + + व तेरदल येणे प्रमाणे याचे स्वाधीन करून नामजाद सरसुभा सांगितला आणि यैसी आज्ञा केली कीं खंडणी बाबती देखील करून निमे यैवज मुकासियास पाववावा व निमे यैवज वसूल घेऊन हुजूर रसद यावावावी त्यापैकी निमे यैवज माहाल मजकूर खर्च करावा व निमे रसद राजश्री श्रीनिवास माधवराव याजकडे यैवज पावावी यैसे करून हुजूरून पत्रे देऊन पाठविले

लेखांक ४ इ. स. १७०४

राजमंडल

दि॥ मजमु सरंजाम सु॥ आर्बा मया व अलफ

सरंजाम राजश्री कृष्णराऊ मल्हार किले पनाल्याचे मुकामी हुजूर दर्शनास आले ते समयी सरंजाम करून दिल्हा रुपये ४४२४५० त्यापैकी जाधवराव सेनापति याणी त्याजसाली मागोन घेतला रुपये १७५००० यासी बयान

लेखांक ५ इ. स. १७०४

राजमंडल सरंजाम दि॥ लस्कर

सु॥ आर्बा मया व अलफ

सुभा जोगोजी गायेकवाड

महिपालगडच्या तनखियाचे खेडी होती ते दिल्ही

३ कर्याती सुभा बेलगाव पैकी

समानगडच्या तनखियाचे गाव होते ते राजश्री जोगोजी गायेकवाड याजकडे दिल्हे + + आजिरे

१ कर्यात नूल हुजरातच्या सनदेने फुटगाव दिल्हे असतील ते खेरीज करून किले मजकुरचे तनखियाचे दिल्हे

१ कर्यात येनापूर ता आजिरे.

लेखांक ६ तारीख १९–३–१७०४

राजमंडल

जमा साल मजकूर सु॥ आर्बा

कृष्णाजी विठल छ २३ जिल्काद

सुभा तारळे १ पंचगंगेपलीकडील

सुभा पनाळा १ मुलुक येकंदर १

सदरहू माहालीची गावगना खंडणी होईल त्यास दरसदे रुपये २५ हुजूर खर्चास रसद पाठवावे बाकी रुपये ७५ पैकी निमे सरदारी खर्चास रुपये ३७॥ बाकी रु॥ ३७॥

निमे मुकासा निमे बाबतीचे

१८॥। मुकासा १८॥।

येणे प्रा॥ येवज पावणे.

लेखांक ७ इ. स. १७०४–०५

शाहू दप्तर रु. नं. ३४

राजमंडल देह झाडा सुभा प्रा॥ आजिरे

सु॥ खमस

....

दि॥ रा॥ गिरजोजी यादव

......................ता॥ कापसी

१ कसबा कापसी

....

तारीख ५-६-१७०५

रा सुा सीत ताबिनाती
ताबीन सिद्दोजी घो (घोरपडे)
छ २३ सफर

तारीख २८-९-१७०५

राजमंडल सरंजाम दिा सुा सीत
(मया व अलफ) छ २० जमादिलाखर
राजश्री नेमाजी सिंदे कदीम सरंजाम होता तो काढून दुसरियास मुकासे दिल्हे होते ते हाली मारनिले प्रसिधगडचे मुकामी दर्शनास आले ते समई करार करून दिल्हे

कदीम	रुपये
	१०९००
कदीम करार	३७६४५०
नवा सरंजाम	९००००
	४७७३५०

लेखांक ८ इ. स. १७०५-०६

शाहू दप्तर रु. नं. २०
राजमंडल दिा लस्कर सरंजाम सुा सीत
दिमत राजश्री परसोजी भोसले रांगण्याचे मुकामी हुजूर दर्शनास आले ते समई सरंजाम करून दिल्हा

कदीम सरंजाम प्रांत वराड	रुपये
नवा सरंजाम	६६१०००
	७७५०००
	१४३६०००

सालमजकुरी नवा सरंजाम

....

प्रांत माल्वा हुजरून मुकासे चालिले असतील ते वजा करून बाकी सारा प्रांत
प्रांत नेमाड
येकंदर प्रांतास सनद मोघम खेरीज हवेली मातुश्री साहेब सरकार राजपिंपले १ प्रांत ज्वार

इ. स. १७०५–०६

शाहू दप्तर रुमाल नं. २०

राजमंडल सरंजाम सु॥ सीत

(मया व अलफ)

स्वा॥ रा॥ पंतप्रतिनिधि लस्कर

मलजी सर्जाराऊ घाटगे

माहाल १

पा॥ कागल ताकीद रोखा

तारीख २६–४–१७०६

शाहू दप्तर रु. नं. १९

राजमंडल प्रांत दक्षण सु॥ सीत

सरंजाम राजश्री सिदोजी हिंदुराऊ घोरपडे

देशमुख देशपांडे प्रांत हुकेरी यासी पत्र जे मारनिले स्वामीच्या पायासी येकनिस्ट याबदल तो प्रांत त्यास पूर्वीच आहे त्याप्रमाणे त्यास करार असे तुम्ही त्याचे आज्ञेत वर्तोन स्वामी कार्य करणे म्हणोन कागद १

किता माहाल यास पत्र जे हा सरंजाम पूर्वीपासून त्याजकडे आहे तो करार माहाल त्रि ताा

१ प्राा रायबाग १ प्राा अडगल १ प्राा गोकाक १ प्राा माचनूर

१ प्राा बागडकोट १ प्राा होनगुंदे १ प्राा केरुर १ प्राा कडकोल

१ प्राा कितूर १ प्राा ढवलेस्वर १ प्राा मुधोल १ प्राा नंदगी

१ प्राा यादवाड १ प्राा गलगले १ प्राा जमखंडी १ प्राा तेरदल

१ प्राा तोरगल १ प्राा जालेहाल १ प्राा नवलगुंद १ प्राा येलबरगे

१ प्राा कृष्णगी १ प्राा गदक १ प्राा लखमेस्वर

२३

छ २३ मोहरम

तारीख २६–४–१७०६

किता किले कोपल कबिला ठेवावयासी ताबीन केला

कृष्णाजी भोसले किता माहाल

पाा रायबाग पाा गोकाक पाा माचनूर पाा जमखिंडी पाा

बागडकोट पा॥ तेरदाल

लेखांक ९ इ. स. १७०६–०७

शाहू द्प्तर रु. नं. २२

श्री

राजमंडल दि॥ मजमु सु॥ सबा

सरंजाम लस्कर

राजश्री पिराजी घोरपडे यासी मातुश्री आईसाहेबी राजश्री हिंदुरायाची समजावीष करून त्याच्या मते सरंजाम करार करून दिला

तारीख १२–६–१७०७

शाहू द्प्तर रुमाल नं. १९

राजमंडल सरंजाम राजश्री कृष्णाजी भोसले मोघम सु॥ समान
किता माहाल प्रांत दक्षण राजश्री सेनापतीकडे सनदा दिल्हा छ २२ रबिलोवल ..पा॥२८

लेखांक १० इ. स. १७०७–०८

राजमंडल रोजकीर्द लस्कर

दिमत मजमु संनिध राजश्री पंत प्रतिनिधि सु॥ समान (मया अलफ) सरंजाम राजश्री हणमंतराऊ पाटणकर किले प्रसिधगडचे मुकामी सरंजाम करून दिल्हा

देह १०

प्रा हुकेरी पैकी २ का सद्लगे १ कसबा १ बोरगाऊ
२

१ कसबे सावगाऊ बु॥
६ कर्याती कबूर १ करगाऊ १ हमालवाड १ बागवाड १ नागनूर
१ इटनहाल १ कुरली
१ मौजे केरुर कर्याती ६ जुगवे
१० मौजे टाकली प्रा मिरज १
११

तारीख २७–१–१७०८

राजमंडल प्रांत मिरज सु॥ समान

प्रांत मजकूर पैकीं निमे रा॥ येसाजी भोसले दि॥ कृष्णाजी भोसले छ १४ जिल्काद सन समान मया

तारीख ११-२-१७०८

राजमंडल

जमा सालमजकूर   सुा समान

लस्कर

रा॥ कृष्णाजी भोसले याजवर स्वामी कृपाळु होऊन लस्करची सरदारी सांगोन हिंदुराऊ घोरपडे याचा सरंजाम करार करून वस्त्रे दिल्ही

रुजू रोजकीर्द छ २९ जिल्काद

तारीख ११-२-१७०८

शाहू दप्तर रु. नं. ४५

राजमंडल   सुा समान

जमा साल मजकूर

रा कृष्णाजी भोसले

सरंजाम

छ २९ जिल्काद

रा कृष्णाजी भोसले याजवर स्वामी कृपाळु होऊन राजश्री हिंदुराऊ याचा सरंजाम करार करून लस्करची सरदारी सांगितली वेतन सालीना दिले   चाकर होनू पा यास वस्त्रे भूषणे

१ मंदिल कुसंबी निमे

१ सेला अष्टगोली १ तरवार निमचा

१ कटार १ पटका २ तिवटे झगे बदल

७

१ घोडा

तारीख १४-३-१७०८

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारीनाम संवत्सरे चैत्रसुध त्रितीया रविवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकादमानी मौजे गोजेगाऊ ता तारगाऊ यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री साबाजी भोसले हे राज्यातील पुरातन सेवक त्यास स्वामी दक्षण प्रांते आले ते समई खानदेशात सेनेसमुदायेनसी स्वामीची सेवा बहुत येकनिष्टेने केली म्हणोन स्वामी कृपाळु होऊन मौजे मजकूर इनाम दिल्हे आहे..

तारीख २२-३-१७०८.

राजमंडल

जमा साल मजकूर   सुा समान

लस्कर

दि॥ कृष्णाजी भोसले

कलबीलबेग याजवर स्वामी कृपाळु होऊन सरदारी सांगितली रुजू रोजकीर्द छ १० मोहरम

(सु॥ समान) वेतन सालीना

५००० होन पा

यासी जमान

मारनिलेकडे ताबीन महाल दिल्हे छ १४ मोहरम

(ता. २६-३-१७०८)

१ पा कागल १ पा गोकाक १ पा तेरदल १ पा जमखिंडी १ पा हुकेरी १ पा रायेबाग

६

शाहू दफ्तर   तारीख ३०-५-१७०८

रु. नं. ३४

राजमंडल प्रांत मिरज सुा तिसा

कर्यात मनेराजूरी

कसबे मनेराजूरी

१ मुा रा परसोजी भोसले छ २० रबिलावल

शाहू दप्तर रु. नं. ४६   तारीख ८-६-१७०८

राजमंडल   सरंजाम

सेनालस्कर   सु॥ तिसा

वाजोजीराऊ वाजेकर पाटणकर मौजे वाजेगाऊ ता। पाटण प्र॥ कऱ्हाड निमे पाटणकरास निमे वाजेकरास

·॥·

राजमंडल   खर्च सेनालस्कर

सु॥ तिसा

वाजोजीराऊ व येसवंतराऊ पाटणकर वाजेगावकर

छ २९ रबिलोवल मुकासा देहे २

राजमंडल   सरंजाम सेनालस्कर

सु॥ तिसा नागोजीराऊ पाटणकर

तारीख २८-६-१७०८

राजमंडल सरंजाम दि॥ मजमु सुभे लस्कर दि॥ नरसिंगराऊ जगताप छ २० रबिलाखर सन तिसा (मया अलफ) देहे ४८

सुभा पनाला क॥ रुकडी ३ क॥ आलते ७ त॥ खानापूर सुभा तारले

———

१०

सुभा कोलापूर क॥ सावगाव	५
क॥ सदलगे ४ त॥ कागल	१०
त॥ सिराले सुभा मलकापूर	९

तारीख २५-८-१७०८

राजमंडल खर्च सेनालस्कर सु॥ तिसा
(मया व अलफ)
राजश्री मानसिंग मोरे
सुभा प्रां॥ मल्कापूर।५....................

....

सुभा प्रांत वाई
सुभा प्रांत पनाला

....

सुभा प्रांत कऱ्हाड देखील बाबती

....

बाबती त॥ रो छ १९ जमादिलाखर

....

सुभा तारले

....

सुभा प्रांत माण

....

राजमंडल सरंजाम दि॥ मजमु
लस्कर (सु॥ तिसा मया व अलफ)
सजणाजी सालोखी
सुभा पनाला मौजे आडूर त॥ टाणे
मुकासा दिला बाबती.

तारीख ४-१०-१७०८

शाहू दप्तर रु. नं. ५४
राजमंडल रोजकीर्द सु॥ तिसा
माहे रजब तेरीख ३० रजब रोज सोमवार मु॥ कोल्हापूर
हजीर
जासूद बातमी हिंदुराऊ घोरपडेच्या गेले होते.

तारीख २८-१०-१७०८

शाहू दप्तर रु. नं. ४६
राजमंडल सरंजाम दि॥ मजमु
सु॥ तिसा सेना लस्कर
जमाव बसप्रभु देसाई प्रा॥ हुकेरी छ २४ शाबान माहाल मुकासे माहाल
१०

माहाल देहे १
९

पा॥ हुकेरी १ का॥ मुनोली १ का॥ मजती १ मौजे बेनाडी का॥ सावगाऊ
३

१ का॥ कबूर पैकी गाऊ ६ उदाजी काटकर
१ का॥ नेसरी—

५

१ का॥ सोलापूर फुट मुकासा बजा करुन.........रुपये ५००००
सुभा बेलगाव १ का॥ कागती १ का राजापूर उर्फ येलूर
१ का कोडोली १ का सांबरे
४

..........................रुपये ५००००

राजमंडल रोजकीर्द छ २४ साबान
सुा तिसा मया अलफ
सरंजाम बसप्रभु देसाई पा चिकोडी का
१०

सदरहु पैकी का कबूरचे गाव ६
छ मारी उदाजी काटकर यास दिले

तारीख २८-१०-१७०८

शाहू दप्तर रुमाल नं. १२

राजमंडल सरंजाम

दि॥ मजमु सु॥ तिसा

सेनालस्कर दि॥ सेनापति उदाजी काटकर दि॥ सेनापति

छ २४ शाबान

प्रांत बेलगाऊ अजमहाल

वजा बस प्रभु देसाई हुकेरी माहाल

४

पंचमाहाल प्रा मुधोल

१ मुधोल १ जमगी १ लोकापूर

१ माचणूर १ ढवलेस्वर

श्री

सरंजाम उदाजी काटकर

२०००००

त्यासी मुकासे

६०००० मुधोल पंचमहाल

१ मुधोल १ जमगी १ लोकापूर १ माचणूर १ ढवलेस्वर

५

२०००० गोकाक

२५००० यादवाड

१०००० कडकोल

२०००० सत्यगिरी

२०००० मुरगुड

२५००० बेलगाऊ बसप्रभुचे माहाल वजा करून शिल्क

२२५०० अलिकडील गाव

१०००० सदलगे २००० बीरगाव २००० सावगाऊ २००० केरूर

५००० कसूर १००० कणगले ५०० + +

तारीख १५-१२-१७०८

राजमंडल

सुा तिसा

दिमत राजेश्री नीळकंठ बळाळ याचे स्वाधीन प्रांत कोकण व मलकापूर व्याघ्रगड प्रांत येथील जिल्हा स्वाधीन केला. छ १३ सोवाल आज्ञापत्रे बि तपसिले

तारीख २६१२-१७०८

राजमंडल सरंजाम दि॥ मजमु सु॥ तिसा लस्कर
साखोजी माहाडीक व दुर्गोजी माहाडीक
सुभा पनाला मौजे कुरुंदवाड ता॥ आलते मुकासा १
मौजे सिराले नूरखानाचे बाबती १
२

शाहू द्प्तर तारीख २६-१२-१७०८

रु. नं. २०

राजमंडल सरंजाम राजश्री दुर्गोजी माहाडीक सु॥ तिसा (मया व अलफ)
छ २४ सोवाल बाबती माहालनिहाये
किता १ पा॥ आजिरे कर्याता सात कुली माहाल
१ पा॥ चंदगडे
१० पा॥ हुकेरी कर्याता
१ का॥ सावगाऊ १ सोलापूर १ कापसी १ मुनोली १ लाट
१ नूल १ मुगुल १ नेसरी १ सदलगे १ मजती
१०

१ पा॥ गोकाक १ पा॥ मुरगोड १ पा॥ कडकोल १ पा॥ सत्यगीर
१ पा॥ मुधोल १ पा॥ लोकापूर १ माचनूर १ पा॥ जमगी
१ पा॥ बागडकोट कर्याता १२ येकून
२१

लेखांक ११ इ. स. १७०८-०९

शाहू द्प्तर

रु. नं. ४६

राजमंडल झाडा बा॥ राजश्री गिरजोजी यादव सु॥ तिसा रा॥ साबाजी भोसले.

....

रा॥ साबाजी भोसले याकडे देहे ४० या पैकी ३५ देह करार होतात बाकी पाच देहे हवेली कोल्हापूर याचे लिहिले होते ते रुजू कोट कोल्हापूर याकडे लिहिले नांवनिसी आलाहिदा कोट कोल्हापुराकडे आहे. १

....

सरंजाम शाहाजी काटे सुा तिसा मया अलफ स्वार ५००

येकूण सरंजाम रुपये

५००००

सुभा पनाला ——— का रुकडी १०

१०

का अल्ते

किा मुकासे १३ ताा खानापूर ५ ताा सोलापूर

२ का सावगाऊ

तारीख १३–७–१७०९

शाहू दप्तर

रु. नं. ४८

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३६ विरोधीनाम संवत्सरे आशाढ बहुल त्रितीया सौम्यवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याचे सेवेसी सेवक आज्ञाधारक बालाजी जनार्दन सबनीस जंजिरे रत्नागिरी सेवेसी लिहून दिला कतबा यैसाजे स्वामी कृपालु होऊन राजश्री मोरो रायाजी यास महिपतगड प्रांतीचा सुभा सांगितला त्यास जमानाची आज्ञा केली त्यावरून आपण त्यास हाजीर जमान असो जाये पलत तरी हाजीर करुन देऊन हाजीर करू न सको तरी तालुकातीचा जाब करून देऊन लेखनालंकार रुजू.

तेरीख १६ जमादिलोवल सन सुा अशर मया

बार सुरु सुद बार

तारीख ११–८–१७०९

राजमंडल प्राा हुकेरी कर्यात नेज

देहे ८ सु।। तिसा

मुकासा राजश्री दुर्गोजी राजे माहाडीक छ १५ जा।।खर सन आशर

तारीख २५–८–१७०९

शाहू दप्तर

रु. नं. ४६

राजमंडल सरंजाम लस्कर सु।।

आशर रा। विरोजी माने

मौजे हांचणी ता।। हवेली पा।। कोल्हापूर

छ २९ जमादिलाखर मु।। दि।। बाबती १

तारीख १४-९-१७०९

शाहू दप्तर
रु. नं. ४८

श्री

राजमंडल सरंजाम लस्कर

सु॥ अशर

दि॥ राजेश्री दुर्गोजी राजे माहाडीक सरंजाम साल्गुदस्ता पैकी करार बेरीज ३५५५००

ता

५५५०० कि॥ म्यानमुलुक
१००००० प्रांत भागानगर बाबती सरकार येलगंदल
२००००० हुकेरी पलीकडील दक्षिण देश

३५५५००

प्रांत भागानगर बाबती सरकार येलगंदल माहाल २२ येकून बेरीज १०००००

कि॥ माहाल हुकेरी पासून पलीकडील दक्षिण प्रांत करार छ जमादिलाखर
१७ मुकासबाब माहाल
२४ बाबती महाल

४१

साल्गु॥ बाबती होत्या त्या दूर करून मुकासे करार केले माहाल
२ पा हुकेरी पैका : १ का॥ नेज १ का॥ नूल —

२

१ संमत अडगल १ तपेच्चंदगडे १ प॥ बागडकोट १ क॥ येकोंडी
१ पा संपगाऊ १ पा नरगुंद

बाबती साल गु॥ प्रा करार माहाल
९ पा हुकेरी १ का॥ सावगाऊ १ का॥ सदल्गे १ का॥ लाटी
१ का॥ कापसी १ का॥ सोलापूर १ का॥ नेवरी १ का॥ मजती
१ का॥ कबूर १ का॥ मुनोली ।९
१ ता आजिरे.

तारीख १४-९-१७०९

राजमंडल सरंजाम लस्कर दिा
सुा अशर रा दुर्गाजी राजे माहाडीक
रा सर्वोतमराऊ सरंजाम
को. घ. इ. २...२

छ २० रजब सन अशर माहाल ५ बेरीज : पा केरूर सलाबतखानाचे १ पा येलबरगे १ कर्यात तावरगीर १ प।। कृष्णगी १ प।। करडी १ ———

५

सदरहू माहाल दक्षण प्रांतीचे

राजमंडल सरंजाम लस्कर दि।। राजश्री दुर्गोजी राजे माहाडीक सु।। अशर

१ पा. नवलगुंद १ पा गदक १ पा लक्ष्मेश्वर १ पा धारवाड

१ मामले बंकापूर १ पा नरगुंद १ पा जालेहाल १ पा कोपलहवेली

१ पा होनगुंद

१७

१ पा बेलगाऊ ५ पंचमाहाल मुधोल : १ मुधोल १ ढवलेस्वर १ जमगी

१ लोकापूर १ माचनूर ———

५

किता माहाल : १ पा गोकाक १ पा यादवाड १ पा कडकोल

१ पा सत्यगिरे १ पा मुरगुड १ पा तेरदाल १ पा जमखिंडी ———

७

१ का जुगुल

———

२४

येकून बेरीज तकदमा

२०००००

श्री

शाहू दप्तर

रु. नं. ४८

तारीख २१-९-१७०९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधीनाम संवत्सरे भाद्रपद बहुल चतुर्दसी सौम्यवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामीचे सेवेसी सेवक मलार खंडेराऊ जमेनीस दि।। राजश्री खंडेराऊ दाभाडे सु।। आसर मया व अलफ सेवेसी लिहून दिला जमान कतबा यैसाजे स्वामी कृपाळू होऊन राजश्री आत्माजी कृष्ण यास राजेश्री दुर्गोजी राजे माहाडीक याचे जमेनिसीचा कार्यभाग सांगितला त्यास हाजीर जमानाविसी आज्ञा केली त्यावरून म।।रनिलेस आपण हाजीर जमान असो जातील तर हाजीर करून हाजीर न करो तर याचा तालुकातीचा जाब करून सेवेसी श्रुत होय. लेखनालंकार.

रुजू

तेरीख २७ रजब

सुहूर सन अशर मया

सुरु सुद बार.

तारीख २६-९-१७०९

राजमंडल सरंजाम दि॥ हिंदुराव घोरपडे सु॥ अशर
दि॥ राजश्री रत्नोजी पांढरे साल मजकुरी जाजती सरंजाम दिल्हा छ ३ शाबान

....

तारीख ९–११–१७०९

राजमंडल सरंजाम लस्कर हुजूर सु॥ अशर पथके
जमेत नरसिंगराऊ जगथाप सरंजाम साल गु॥ ता॥ पत्रे छ १७ रमजान मुकासा देहे

——————— देहे १० येकून ....

सुभा प्रा पनाला

ता रुकडी

१ मौजे अतिकिरे १ मौजे जाहले १ मौजे चिंचवड——

३

ता अलते

१ चिपरी १ गोरवाड १ अर्जुनवाड १ घालवाड १ हिंगणगाऊ १ सिरगाऊ
१ जैनापूर——

७

शाहू दप्तर रु. नं. १४ तारीख ७–१२–१७०९

राजमंडल सुभा कोल्हापूर सु॥ आशर

किता पत्रे छ १६ शोवाल मारफत राजश्री अंताजी त्रिमल
राजश्री संकराजी राजे महाडीक यासी लिहिले जे कोल्हापुरचे कोटा मध्यें राहोन पलीकडील मुल्कात जप्त बैसऊन कमावीस करणे पनाला तारले कोल्हापूर या प्रांते रोखा करून उपसर्ग न देणे म्हणून पत्र १

+ चे सेडीखान + कर्यात पा हुकेरी यास पत्रे जे नूतन दाहिजा व साहात्रा व वतनपटी व ला पटीची बाकी येस रा॥ अंताजी त्रिमल याचे विद्यमाने उसूल देणे. १
उदाजी काटकर यासी आज्ञा केली येसीजे त्या प्रांतीचे पारपत्य राजश्री अंताजी त्रिमल यासी सांगितले आहे तरी कोल्हापूर सुभ्याचे माहाल आहेत त्यासी बाबतीचे मुकासा

असे + + + दाहिजा व + + + वतनपटी + + + बाबतीचा मुकासा नसेल तो बाबती व पटी बा।। घेतील त्यास सुरलीत चालो देणे. पत्र १

देशमुखानी पा कागल यास लिहिल जे सदरहू पटी बाब मारइलेकडे उसूल देणे १

लेखांक १२ इ. स. १७०९-१०

शाहू दप्तर
रु. नं. ४६

राजमंडल सु।। आशर

दिमत राजश्री साबाजी भोसले
माहाल......................
ता आलते प्रां पनाला..................
पा कागल...........................
का। सोलापूर पा हुकेरी तो आजिरे
दि।। रा परसोजी भोसले

....

दि।। रा।। रंभाजी मम्इलकर

....

दि।। रा।। केरोजी पवार

....

रो। रायेभानजी बावा

....

दि।। रा।। हमीरराऊ
दि।। बसप्रभु

....

इ. स. १७०९-१०

राजमंडल सरंजाम सु।। अशर
दि।। रा।। परसोजी भोसले म्यान मुलकी बाबती देहे
१०००० प्रांत पनाला १८
प्रांत मिरज

इ. स. १७०९–१०

राजमंडल सरंजाम सेनालस्कर
सु॥ अशर हुजूर पथके
राजेश्री हमीरराऊ जाधव बा॥ साल गुदस्ता सरंजाम बेरीज
माहाल १ देहे०

प॥ कागल
१ यैन माहाल सुभा कोल्हापुराकडील फुटमुकासे वजा करून माहाल १
(ता. १२-१-१७१२) छ १४ जिल्हेज इसने
१ मौजे बुरली ता॥ वाळवे सुभा पनाळा देहे
प्रांत मिरजेकडे वाढतात देहे
१ डोंगरसुनी १ गोरगाऊ १ मळणगाऊ

इ. स. १७०९–१०

शाहू दप्तर
रु. न. ४६

झाडा सरंजाम राजेश्री गिरजोजी यादव सु॥ अशर

राजमंडल
किले हाय
किले भूशणगड १ किले सातारा किले सजनगड वर्धनगड
३

किले गगनगड

(शाहू दप्तर) तारीख ११–१–१७१०
रुमाल नं. ५१

राजमंडल

छ २१ जिल्काद सु॥ आशर
राजश्री सिदोजी घोरपडे याजकडून कारकून व जासूद आल यास वस्त्रे दिल्ही सनगे ५

तारीख ५–१०–१७१०

राजमंडल सरंजाम दि॥ राजश्री कानोजी भोसले छ २२ शाबान
सु॥ इहिदे (अशर)
प्रांत मिरज

लेखांक १३ माहे एप्रिल इ. स. १७११

शाहू दप्तर
रू. नं. १९

राजमंडल सेनालस्कर सु॥ इहिदे
दिमत राजश्री सोमाजी जगथापराऊ ममलकतमदार

....

किता सरंजाम छ सफर पेसजी दुर्गोजी माहाडीक याकडे होते त्या पैकी निमे याकडे दिले.

तारीख १६-४-१७११

राजमंडल सरंजाम दि॥ राजश्री दुर्गोजी माहाडीक दक्षिण प्रांत मुकासे माहाल पैकी निमे रा॥ सोमाजी जगथाप याकडे दिल बाकी निमे मा॥रइलेकडे करार केले
माहाल छ ८ रबिलोवल इहिदे १५॥

किता माहाल १५ ये॥

.॥. ता॥ चांदगडे .॥. त॥ खानापूर ठिकरी .॥. त॥ हल्याल
.॥. देवर हुबली .॥. येकोडी .॥. धारवाड .॥. रायेर हुबली
.॥. तडमोट .॥. बंकापूर .॥. तेगूर, .॥. उगरगोल .॥. उतल
.॥. कुकनूर .॥. कलकिरे .॥. ताल्कोट.——

७॥

॥कि माहाल १६ ये॥
.॥. सपगाऊं .॥. इटगिरे .॥. नवलगुंद .॥. नरगुंद .॥. कोणूर
.॥. आणगिरे .॥. गदक .॥. लक्षुमस्वर .॥. हवेली तोरगल
.॥. बागडकोट .॥. जालेहल .॥. मुलगुंद .॥. कोपल .॥. हेज
खुर्द .॥. रेटेहली .॥. हेजहली.——

८

१०००००

तारीख १७-६-१७११

शाहू दप्तर
रु. नं. १८

राजमंडल सरंजाम लस्कर सु॥ इहिदे अशर दि॥ राजश्री दुर्गोजी राजे माहाडीक
किता माहाल हुकेरी पासून पलीकडील पेशजी म॥ रइलेकडे होते त्यापे॥

रा सोमाजी जगथाप याकडे दिल्हे बाकी मा॥रइलेकडे करार केले माहाल
बाबतीचे माहाल १७
पा हुकेरी कर्याती १० हे सारे माहाल मा॥रइलेकडे करार केले छ ११ जमादिलोवल
सन इसने
१ कर्यात मजती १ कर्यात मनोली १ का॥ सोलापूर
१ का॥ कबूर १ का॥ नेसरी १ का॥ लावी १ का सदलगे
१ का॥ जुगुल १ का॥ सावगाव १ का॥ कापसी——
१०

४००००
किता बाबतीचे माहाल पैकी रा॥ सोमजी जगथाप याकडे निमे देऊन निमे मा॥रइलेकडे
करार केले
छ ११ जमादिलोवल सन इसने माहाल निमे
.॥. ता आजिरे .॥. पा॥ बेलगाव, .॥. मुधोल .॥. ढवलेस्वर
.॥. जमगी, .॥. लोकानूर .॥. माचनूर .॥. गोकाक .॥. यादवाड .॥. कडकोल .॥. सत-
गिरे .॥. मुरगोड .॥. तेरदल .॥. जमखिंडी

७
५००००

शाहू दप्तर
रु. नं. ४५

तारीख ९–७–१७११

राजमंडल सु॥ इसने खर्च लस्कर
सुभेहाये सुभा मानाजी काटकर सेनापागाबारासहश्री सरंजाम
छ ३ जमादिलाखर सनद बनाम मानाजी काटकर सेनाबारासहश्रीपागा यास कीं तुम्ही स्वागीच्या राज्यातील पुरातन शेवक हाली सेवेची उमेद धरिता म्हणून विदित जाले त्यावरून तुम्हावर स्वामी कृपालु होऊन सेनापागाबारासहश्रीचा कार्यभाग सांगितला असे जमाव करून इमाने इतबारे येकनिष्ट स्वामीसेवा करीत जाणे तुम्हास वेतन सालीना-देखील चाकर

होनू पा
५०००

किता सनद छ २१ सोवाल
कार्तिक वद्य अष्टमी
(ता. २१–११–१७११)

तारीख १४-८-१७११

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३८ खरनाम संवत्सरे अधिक भाद्रपद शुध द्वादसी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस माहाराजा राजश्री

स्वामीचे सेवेसी सेवक अंताजी पांडुरंग कारखानीस किले पनाळा लिहून दिल्हा जमान कतबा ऐसीजे स्वामी कृपाळु होऊन रा। कृष्णाजी गुणाजी यास कोल्हापूरचे सुभाची मजमु सांगितली आणि जमानाविसी आज्ञा केली त्यावरून मारनुलेस आपण हाजीर जमान आसो गैरहाजीर होतील तरी हाजीर करून देऊ हाजीर न करू तरी मारनुलेचे तालुकातीचा जाब करू लेखनालंकार

तेरीख १० माहे रजब सु॥ इसने अशर मया अलफ

बार सुद बार सुरु सुद बार

तारीख २४-९-१७११

श्री

शाहू दप्तर

रुमाल नं.१४

अये पत्र माहाल तोफखाना सु॥ सन इसने असर मया अलफ

अज रवानगी रा। कृष्णाजी परशुराम याणी किले विशालगडीहून केली बा। केदारजी निकम अफराद बा। बखैर जमा दारु वजन कचे मण -।।- व पोती सुमार ८ वजा नुकसान दारु वजन सेर कचे ८।≡ बाकी + + जमा तेरीख २१ माहे साबान

माहे आक्टोबर इ. स. १७११ नंतर

शाहू दप्तर

रुमाल नं. ११

राजमंडल

रा। बावाजी गुजर यांचे भाऊ तानाजी गुजर हे चंद्रसेनाचे जुंजी पांडवगडी राजश्री बालाजी विस्वनाथ याजबरोबर भांडणी पडले याचे चालवणे स्वामीस अवशक.

तारीख ११-११-१७११

राजमंडल सरंजाम

लस्कर सु॥ इसने

सुभा उदाजी काटकर सेनाबाराहजारी

किता सरंजाम छ ११ सोवाल मु॥ किले सातारा

प्रांत पनाला .... देहे ८
प्रांत कोल्हापूर माहाल॥

तारीख २२-११-१७११

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३८ खरनाम संवत्सरे कार्तिक बहुल अस्टमी * सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री छत्रपति स्वामींचे सेवेसी सेवक दादो मलार कारकून दिा पोते सेवेसी कतबा लिहून दिल्हा ऐसाजे स्वामी कृपालु होऊन राजेश्री मानाजी काटकर बारासहश्री याची मुजमुचा कार्यभाग रंगो माणकेस्वर यास सांगितला जामिनीविसी आज्ञा केली तरी मारनुलेस आपण हाजीर जामीन असो गैरहाजीर होतील तरी हजीर करून देउ. हजीर करू न सको तरी यांचे निसबतीचा जाब करू लेखनालंकार बार सुद सुरु सुद बार.

तारीख २७-११-१७११

शाहू दप्तर
रु. नं. ४५

राजमंडल सु॥ इसने खर्च सुभा मानाजी काटकर
किता सनद छ २७ सोवाल कार्तिक बहुल चतुर्दसी भोमवासर बनाम राजश्री मानाजी काटकर यास तुम्ही स्वामीचे पुरातन येकनिष्ट सेवक तुमचे ऊर्जित करणे स्वामीस आवशक म्हणून स्वामी कृपालु होऊन त्या प्रांतीचा जिल्हा अहद चिकोडी तहद प्रा सिरे तुमचे स्वाधीन जिल्हा केला आहे तरी तुम्ही येकनिष्टपणे त्या प्रांते राहोन चौका बैसऊन खंडणिया करून निम यैवज सरदारी खर्च करणे निमे यैवज रसद हुजूर पाठविणे त्या प्रांतीचे गडकोट घेऊन आपला मुजरा करून घेणे.

लेखांक १४ तारीख ५-१-१७१२

शाहू दप्तर
रु. नं. ३०

राजमंडल ताबिनात सु॥
ताबीन राजश्री बालकृष्ण पंडित अमात्य सरमोकदमी सरकार जुनर वा॥ खंडोजी दाभाडे याणे हरामखोरी केली म्हणऊन त्याकडून सदरहू वतन दूर करऊन हुजूर ठेऊन मारइलेचे

* टीप. कार्तिक बहुल सप्तमी ही तिथि बुधवार (ता. २१-११-१७११) रोजीं आहे.

ताबीन केले आणि सदरहू कमावीस बाा मारइलेकडून रामाजी खंडो कमाविसदार पाठविले याकडे सरमोकदमीचा हकलाजिमा इनामत इसाफत पेसजी चालिले प्राा वसूल देणे म्हणऊन पत्रे दिली माहालहाये दि॥ जकाती

छ ७ जिल्हेज सन इसन माहाल ४

प्राा जुनर प्राा पुणे ६

१०	१०	कि॥
		८

प्राा हरिश्चंद्र

३	४

शाहू दप्तर तारीख १४–८–१७१२

रु. नं. ४७

राजमंडल खर्च लस्कर सुाा सलास

सुभा सखोजी सिंदे पंचसहस्री लस्कर यास छ २२ रजबी पंचसहस्त्रीचे प्रयोजन सांगितले जिल्हा राजश्री पंतप्रधान याकडे दिल्हे सरंजाम छ २२ रजब सखोजी सिंदे यासी पेशजी हशमाची हत्फसहस्री होती स्वामी कार्याचे मर्दाने येकनिष्ठ जाणोन पागेचे पंचसहस्रीचे प्रयोजन सांगितले तैनात सालीना होनू २००० जमान शिवाजी भोसले सेनापंचसहस्री दि॥ फतेसिंग भोसले.

तारीख १३–९–१७१२

शाहू दप्तर

रु. नं. ४६

राजमंडल सु॥ सलास (असर)

विठोजी चवाण पनालकराकडील जमाव साल मार

छ २२ साबान कलगिरी गोसावी याजबराबर विठोजी चवाण याणी पत्र व मुखवचने कितीयेकनिष्ठेचे वर्तमान सांगोन पाठविले त्यावरून स्वामी कृपालु होऊन येणे प्रमाणे त्याचे मुदे मान्य करून अभयेपत्र पाठविले

नक्षा दोनी लक्ष रुपये द्यावे म्हणोन लिहिले होतें त्यास दोनी लक्षाचा सरंजाम देऊन

मोत्याचिया जोडीया १० देऊ
कडी १० लिहिली त्यास पाच देऊ
१ हस्त कडग ४ सुवर्णाची—
५

घोडे पाच ५ देऊ
किा पाच गांव देऊ
हती दोन लिहिले त्यास येक देऊ.

तुरा मोत्याचा देऊ
पदके च्यार देऊ
येकूण कल्मे आठ द्यावयाचे नियेत करून अभयेपत्र पार्ठावले.

तारीख २५–९–१७१२

राजमंडल. खर्च लस्कर. सुा सलास
सुभा राणोजी निंबाळकर यास पागेची बारासंहस्त्रीचे प्रयोजन सांगितले सरंजाम छ ४
रमजान राणोजी निंबाळकर कामाचे मर्दाने देखोन यास पागेचे बारासहस्त्री सांगितली
वेतनदेखील + + + होनू ४०००
जमान राजश्री पंत अमात्य घेतील.

लेखांक १५ तारीख २७–१–१७१३

राजमंडल
सु॥ सलास

राजश्री मुरारजी सिंदे ममल्कतमदार

छ ११ मोहरम
मौजे खोद्सी ता आलते प्रांत पनाला
मौजे बेद्री पा रायबाग
मौजे वासंबे

राजमंडल रोजकीर्द माहे रबिलाखर सु॥ सलास तेरीख ११ रोज रवासुदगी

(ता. २६–४–१७१३)

किा रा किल्ले विचित्रगड
राजश्री बालकृष्ण पंडित अमात्य याचे घर मुस्तद करून[१] देणे

१ भक्कम.

इ. स. १७१३

शाहू दप्तर
रु. नं. ५०

पनालाच्या सुभा पैकी पिराजी घोरपडे यास इनाम गाव दिल्हे होते ते तुकोजी गुजर यास द्यावे देहे ५

सरंजाम पेशजी पासून रा कुसाजी व येसाजी भोसले याकडे आहे त्या प्रा करार आहे त्याचे तरफेने राजश्री तुकोजी गुजर फौजेनिसी पाठविले आहेत तुम्ही यासी रुजुवात वर्तोन स्वामी कार्य करीत जाणे मुकासाबाबेचा वसूल याकडे देणे.

पालेगार व पाली

पाली
१ गुडगुटे लिंगस जया
१ चंदनकेर वासुदेव नाईक
१ आबाजी सोमणा
१ गदवाल १ पा तरेकिरे सिताराम नाईक
५

पालेगार
१ पा कनकगिरी १ पा आनेगोंदी १॥ हरपनहली
१ पा गुडीकोटे १ पा रायेदुर्ग १ पा चित्रदुर्ग १ पा बलारी
१ पा हचीमलयाची १ पावगड १ रतनगिरी १ निडगूल
१ चिकबालपूर——
१२

लेखांक १६ तारीख १–४–१७१४

शाहू दप्तर
रु. नं. ४१

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४० जयनाम संवत्सरे चैत्र बहुल त्रयोदसी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी देशमुख व देशपांडे यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही व गावगनाचे पाटील स्वामी संनिध येऊन विनंती केली कीं पूर्वी जमीनीस धारा बांधोन दिल्हा होता त्या प्रा रयेत उगवणी करीत होती मध्यें मोंगलाची धामधूम होऊन ठाणी बैसिली त्यामुळें रयतेस दुतर्फा वसूल द्यावा लागला ते समई राजश्री परशरामपंती जमीनीस धारा ज्याजती बसविला आणि रयतेचे समाधान केले कीं मोंगल वारलियावरी पूर्वील प्रमाणे

धारा करार करून देऊन म्हणून परंतु धारा कम जाला नाही धामधुमेमुळें रयतेस सारे पीक जाऊन नागवण बैसते याकरिता रयेत देशांतरास चालली आहे तरी स्वामीनी पूर्वील धारा मोकरार करून अभय दिल्हे पाहिजे म्हणून त्यावरून स्वामीनी रयतेवरी दृष्टी देऊन धारा जमीनीस कीर्दीस येणे प्रा॥ करार केला असे भात जमीनीस दर बिघा नवसेरी सोलुले

.।३ रोपास आठ मण

.।१ कुरीस साहा मण

.४ वावीर च्यार मण

....

येणे प्रा॥ जमीनीस धारा करून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही रयतेचे समाधान करून पेस्तर सालीचे कीर्दीस लावणे आणि पेस्तर साला पासून कीर्दीची मोजणी करून सदरहू धारे या प्रा॥ आकार करून उगवणी करवणे धारा पूर्वील कीर्दी व्हावी म्हणोन स्वामीने दिल्हा असे तरी साल मारचे दस्त पेस्तर साली भरून द्यावे म्हणजे सदरहू धारा चालेंल साल मारचे दस्तास पेस्तर साली कम आले तरी जो धारा हाली चालत आहे त्या प्रा॥ उगवणी करावी लागेल यैसे समजोन रयतेचा माहाल करून पेस्तर सालीची कीर्दी करविणे स्वामी सदरहुप्रमाणे धारा चालवितील येविषई समाधान असो देणे. जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

तारीख २२।४–१८१४

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४० जयनामसंवत्सर वैशाख बहुल चतुर्थी गुरुवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति याणी मोकदमानी मौजे............
सांगाव ता॥

यासी आज्ञा केली ऐसीजे

मौजे मजकूर राजश्री संताजी गायेकवाड सेनाबारासहस्त्री ....

याजकडे जमावाच्या बेगमी बदल मुकासा दिल्हा आहे तरी मारनिलेच्या रजातलब वर्तोन खंडणी प्रमाणे यैवज पावणे. *

लेखनालंकार

मर्या

देय विरा

जते

....

तारीख २२-४-१७१४

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४० जयनाम संवछरे वैशाख बहुल चतुर्थी गुरुवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी मोकदमानी मौजे कापूसखेड ——— यासी आज्ञा केली यैसीजे मौजे मजकूर रा संताजी गायकवाड सेनाबारासहश्री दिमत याजकडे जमावाच्या बेगमीबदल मुकासा दिल्हा आहे तरी मारनिलेच्या रजातलब वर्तोन यैवज पावणे लेखनालंकर

मर्या

देय विरा

जते

तारीख २८-४-१७१४

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४० जयनाम संवत्सरे वैशाख बहुल दशमी भौमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी पारपत्यगार व लेखक ता सातवे व कोडोली यासी आज्ञा केली यैसीजे अंदोजी बिन फिरंगोजी देसाई ता मजकूर याणी जमाव घेऊन येऊन आबटीच्या पाटलाचा लेक जीवे मारून त्यास जखमा केल्या हे हरामखोरीचे वर्तणुके करितां याचे देशमुखीचे वतन अमानत केले आहे तरी तुम्ही या वतनाची कमावीस करून हक इनामाचा यैवज होईल ———

....

---

* (वरीलप्रमाणें राजपत्रें मोकदमानी मौजे सरुड, मौजे कानदे, मौजे रेठरे, मौजे वाकुरडे खुर्द मौजे वाकुरडे बुा मौजे कारवे यांना काढलेलीं आहेत.)

लेखनांल्कार मर्या
देय विरा
जते

तारीख १४-६-१७१४

शाहू द्प्तर
रु. नं. ४०

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४१ जयेनाम संवस्सरे अधिक आषाढ सुध त्रयोदशी इंदु वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी समस्त राजकार्यधुरंधर विस्वास-निधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित हुकुमतपन्हा यासी आज्ञा केली यैसीजे मानाजी बिन खंडोजी सिंदे हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक स्वामीची सेवा आजवरी येकरूप निष्ठेने करीत आहेत स्वामीच्या पायाविना दुसरे जाणत नाही स्वामीसही याचे दिवसेदिवस ऊर्जित करून चालविणे अत्यावश्यक आहे सांप्रत याणी स्वामी संनिध विनंती केली की आपल्यास येक वतन लेकराचे लेकरी चाले यैसे करून दिल्हे पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणिता मौजे कुडची ताा तारळे या गावीचा पटल पूर्वी होता तो मृत्य पावला त्याचे संतान कांहीं नाही अगदी नकल जाले पाटीलकीचे वतन अमानतच आहे गावी पाटील वतनदार असिल्यावेगळे गावाची लावणीसंचणी होत नाही त्यावरून हाली मौजे मजकुरचे पाटीलकीचे वतन पानमान नागर पोलीहक व लाजिमा इनामती-सहित मानाजी शिंदे यावरी कृपालु होऊन वतन अजरामन्हामत करून दिल्हे तरी तुम्ही सनद निराली सादर आहे त्याप्रो मौजे माारचे पाटीलकीचे वतन मानाजी सिंदे यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुरलीत चालवणे. बहुत लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा

मर्या
देय विरा
जते

तारीख १६-६-१७१४

शाहू द्प्तर
रुमाल नं. ५०

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ४१ जयनाम संवत्सरे अधिक आशाढ शुध पौर्णिमा सौम्यवासर क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शिव क्षत्रपति याणी राजश्री येसवंतराव गायेकवाड

मुद्राधारी कोट सिराले यासी आज्ञा केली ऐसीजे मौजे बावची ता आष्टे सातारा किले पनालाचे तनखीयासी आहे यैशासी मौज मारचा संताजी यादव पाटील याणे हरामजादगी करून किले मा।रासी गैर रुजू होऊन नालसपणा करावयासी लागला याज करिता रा। गोंदजी गायेकवाड नामजाद किले मार याणी स्वारी पाठवून पाटील मार दस्त करून आणिला तेसमई पाटिलाची घोडी निली व सिंगरू निली अंबरी चौसंदी यैसी दोनी घोडी आणून स्वामीस विदित केले गावही सुरलीत वर्ते यैसी दहशत पाडिली या करिता घोडी निली पागेकडे देऊन सिंगी निली अंबरी तुम्हास बकसीस दिधली असे तरी तुम्ही ही घोडी वागऊन निघा करून बैसत जाणे घोडी विषई तुम्हासी कथला करावयासी कोणास प्रयोजन नाही. जाणिजे लेखनालंकार

मर्या
देय विरा
जते

लेखांक १७ तारीख ९–१–१७१५

शाहू दप्तर
रु. नं. ९
सुा खमस तेरीख १३ रोज आदितवार
(माहे मोहरम)

मुकाम सातारा
बातमी चंद्रसेन जाधव व किलिजखान याजकडे जाऊन बातमी घेऊन हुजूर येणे.

तारीख १०–१–१७१५

सु।। खमस माहे मोहरम तेरीख १४ रोज सोमवार मुकाम सातारा चंद्रसेन जाधव व किलिजखान याजकडे जासूद जोडा बातमीस रा। केले.

तारीख ११–१–१७१५

राजमंडल रोजकीर्द सु।। खमस मोहरम तेरीख १५ रोज मंगलवार मुकाम सातारा चंद्रसेन जाधव याजकडे बातमी गेले होते बातमी घेऊन आले. दर्याजी नाईक·

तारीख १९–१–१७१५

सु।। खमस माहे मोहरम तेरीख २३ रोज गुरुवार मुकाम सातारा तिलगूल घेऊन पनालास गेले होते.

तारीख ११-२-१७१५

राजमंडल रोजकीर्द सुा खमस
माहे सफर तेरीख १७ रोज सुकुरवार मुकाम जेजुरी
चंद्रसेन जाधव याची बातमी बीड पावेतो गेले होते बातमी घेऊन आले.

तारीख १०-४-१७१५

राजमंडल

सुा खमस

माहे रबिलाखर तेरीख १६ रोज आदितवार
बातमी मानसिंग मोरे व सरलस्कर याच्या लस्करास जाऊन बातमी घेऊन येणे.

तारीख २७-४-१७१५

सु।। खमस माहे जमादिलोवल
तेरीख ४ रोज मु।। सातारा
बातमी निंबाळकर याची सेनापति याची घेऊन आले जा। दर्याजी.

तारीख २२-१०-१७१५

राजमंडल रोजकीर्द सु।। सीत माहे जिल्काद तेरीख ५ रोज मु।।
सातारा
र।। कागद घोरपडे पत्रे देऊन उत्तर जाब घेऊन येणे.

तारीख २६-१०-१७१५

सु।। सीत माहे जिल्काद तेरीख ९ रोज बुधवार मुकाम सातारा
सिदोजी घोरपडे कडून पत्रे घेऊन आले १ लिंगोजी यादव १ गुजाजी
नलवडे

२

तारीख ४-११-१७१५

सु।। सीत माहे जिल्काद तेरीख १८ रोज सुकुरवार मु।। पाडली
बातमी धोरपडे याजकडून बातमी घेऊन आले
कागदपत्रे र।। अमात्य याच्या गावास जाऊन काम असेल ते करून येणे
कोंडजी च्व्हाण जासूद.

तारीख ४-११-१७१५

श्री

छ १८ जिल्काद मु॥ पाडली नांवनिसी जासूद बातमी घोरपडे याची
घेऊन आले यासी इनाम रु॥

तारीख ५-११-१७१५

माहे जिल्काद तेरीख १९ रोज मुकाम पाडली संनवार सु॥ सीत
रा सिदोजी घोरपडे पत्रे देऊन र॥ (रवाना) केले
राणोजी पारख जोत्याजी कदम र॥ बातमी जोडा
खंडोजी इंगले साबाजी वाघ
र॥ मानसिंग मोरे सेनापतीकडे पत्रे

तारीख ६-११ १७१५

माहे जिल्काद सु॥ सीत तेरीख २० रोज आदितवार मु॥ वडगाव
र॥ सिदोजी घोरपडेकडून आले
लिंगोजी यादव
यासी इनाम वगैरे
६ घोरपडेकडून जासूद आले.

तारीख ७-११-१७१५

माहे जिल्काद तेरीख २१ रोज सोमवार मुकाम किले वसंतगड सु॥ सीत
घोरपडेकडून कागद घेऊन गुजाजी ··· ··· ··· ··· यासी इनाम

तारीख २६-११-१७१५

शाहू दप्तर

रु. नं. ५४

राजमंडल रोजकीर्द सु॥ सीत

माहे जिल्हेज तेरीख १० रोज मुकाम सातारा
जजिरी
र॥ घोरपडे सिदोजी याजकडे पत्रे घेऊन गेले यासी जाब घेऊन येणे.

तारीख १२-१२-१७१५

राजमंडल रोजकीर्द सुाा सीत माहे जिल्हेज तेरीख २६ रोज सोमवार मुकाम सातारा का बातमी घोरपडे व रामचंद्रपंत याचे लस्करास जाऊन बातमी घेऊन येणे.

लेखांक १८ इ. स. १७१५-१६

शाहू दप्तर

रु. नं. ४७ श्री

सरंजाम दिा राजश्री मानसिंग मोरे सेनापति सुहूर सन सीत अशर मया अलफ तेरीज सरंजाम दिा सेनापति सन सीत

सुभा प्रा कोल्हापूर	माा	देहे	येकून
	०	७	१६०००
सुभा प्रा तारले	०	१	१५०
सुभा प्रा पनाळा	०	५८	४९२२५
मल्कापूर	०	१६	१०४००

तारीख ३-१-१७१६

राजमंडल रोजकीर्द सुाा सीत

माहे मोहरम तेरीख १८ रोज मुकाम सातारा

किा राा बातमी दमाजी थोरात याची जाऊन हिंगणगावीहून जाऊन घेऊन येणे बाबूराव सबनीस दिा सरदेशमुख.

तारीख ३१-८-१७१६

श्री

राजमंडल रोजकीर्द

दिा मजमु सुाा सबा अशर मया

माहे रमजान छ २४ रोज

राजश्री सिदोजी हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार कोल्हापूरच्या मुकामी हुजूर दर्शनास आले त्याचा बहुमान करून पंचगंगे

\+ + + + +

(पुढील पत्राचा भाग तुटला आहे)

सुाा सबा

तेरीख १ मोहरम तारीख ५-१२-१७१६

बातमी सिदोजी घोरपडे याची घेऊन आले.

तारीख १४–१२–१७१६

सुा सबा

तेरीख १० मोहरम
चंद्रसेन जाधव याची बातमी घेऊन हुजूर येणे.
सेनापति यास पत्रे देऊन जाबसाल घेऊन येणें.

तारीख ३०–१२ १७१६

छ २६ मोहरम सु॥ सबा
८ राजपत्रे राजश्री प्रधानपंत व खंडेराव दाभाडे वगैरे यासी पत्रें देऊन जाब घेऊन येणे.

तारीख ३०–१२–१७१६

तेरीख २६ माहे मोहरम सु॥ सबा
चंद्रसेन जाधव याची बातमी घेऊन आले
राजपत्रे राजश्री मानसिंग मोरे सेनापति यासी पत्रे देऊन जाब घेऊन येणे.

तारीख २–१–१७१७

लेखांक १९

शाहू दप्तर
रु. नं. ५४
तेरीख २९ रोज बुधवार माहे मोहरम
सु॥ सबा
बातमी अवरंगाबाद सैयेद याची बातमी घेऊन हुजूर येणे.

तारीख–८–१–१७१७

राजमंडल दि॥ मजमु सु॥ सबा
दुर्मुख संवत्सरे माहे सफर तेरीख ५ रोज माघ शुध सप्तमी भोमवासरे
मु॥ पनाला
रा॥ कुसाजी घाटगे हे रा॥ नारायेणजी घाटगे नामजाद कोपल याचे पुत्र स्वामीच्या दर्शनास आले त्या समागमे किले मा॥रचे लोकही आले त्याणी बराबर यैवज व नजर.

श्री

तारीख ९–१–१७१७

सु॥ सबा

छ ६ माहे सफर
मुकुमसिंग व चंद्रसेन जाधव याचे बातमीस (जासूद) गेले होते छ

मजकुरी खबर घेऊन आले की लस्कर घाटाखाले उतरोन गेले म्हणोन बातमी हुजूर सांगितली.

तारीख ११-१-१७१७

राजमंडळ रोजकीर्द

सु॥ सबा

माहे सफर छ ८ रोज सुकुरवार
४ कि॥ राजपत्रे र॥ पणाला तिलगूल राजश्री संभाजी राजे यासी
देऊन जाब हुजूर घेऊन येणे नि॥ दर्याजी नाईक
२ पिराजी नलवडे
२ खंडोजी इंगले.

लेखांक २० इ. स. १७१७-१८

शाहू दप्तर

रु. नं. ३३

श्री

यादी किले झाडा सुा समान अशर मया व अलफ

हुजूर माहाराज राजश्री स्वामी

२ सुभा सातारा १ सातारा १ सजनगड परली — २ | १ सुभा राजापूर १ प्रचीतगड — १

३ सुभा पुणे १ पुरंदर १ वज्रगड रुद्रमाल १ सिंहगड — ३

५ सुभा कराड १ वसंतगड १ गुणवंतगड १ सुंदरगड दातेगड
१ मछिंद्रगड १ सदाशिवगड — ५

७ सुभा वाई १ चंदनगड १ वंदनगड १ पांडवगड १ मनमोहनगड
१ कमलगड १ वैराटगड १ कल्याणगड नांदगिरी — ७

६ सुभा जावली
१ + पगड १ मकरंदगड १ मंगलगड
१ व्याघ्रगड वासोटा १ महीमंडणगड १ गहनगड — ६

४ सुभा दाभोल

१ सारंगगड १ जयगड खुर्द १ सुमारगड १ महिपतगड

४

२ सुभा माण

१ महिमानगड १ + वडा

२

८ सुभा मावल

१ राजगड— १ बालेकिला १ सुंवेफ

१ संजीवनी १ पद्मावती

४

किला १

१ प्रचंडगड १ लोंहगड १ कठीणगड

१ वितंडगड १ घनगड १ कुवारी

१ विचित्रगड रोहिडा

८

१ सुभा चेऊल १ सुधागड भोरप

१

१ सुभा जुनेर नारायेणगड

४ सुभा खटाव १ वर्धनगड १ भूशणगड १ संतोशगड १ वरूगड

४

१ किले रायगड १ मिंरज भूपालगड

४६

नि॥ कानोजी आंगरे

किता

४ सुभा चेऊल

१ कुलाबा १ खांदेरी १ मृगगड १ सारंगगड

४

६ सुभा कल्याण १ माणीकगड १ विकटगड १ बहिरवदुर्ग १ श्रीवर्धन

१ मनरंजन १ कोथला

६

३ सुभा राजापूर १ विजयदुर्ग १ डुंगरा १ जयगड

३

६ सुभा दाभोल

१ रसालगड १ फतेगड १ कनकदुर्ग १ सुवर्णदुर्ग
१ गोवा १ पालगड
६

१९

प्रा राजश्री संभाजी राजे

किता

३ सुभा पनाला
१ पनाला १ पावनगड १ विलासगड
३

१ कोट कोलापूर

४ सुभा राजापूर
१ विशालगड १ गगनगड बावडा १ रत्नागिरी
१ महिमतगड
४

१ नरगुंद महिमतगड —१

२ तोरगल १ तोरगल १ रामगड २

२ सुभा कोपल १ कोपलकोट १ बहादुरबिंडा २

१ सुभा तारलें भुदरगड १

५ सुभा आजरे
१ समानगड १ कलानिधी १ पवित्रगड १ वलभगड
१ गंधर्वगड ५

२ बेळगांव १ महिपालगड १ राजहंसगड २

५ सुभा कुडाल
१ प्रसिधगड रांगणा १ सिंदुदुर्ग मालवन १ कोटकुडाला
१ संतोशगड १ + + + ५

१ + + +

सुमार २७

तेरीज सुमार

४६ हुजूर

१९ कानोजी आंगरे

२७ राजश्री संभाजी राजे

९२

लेखांक २१ तारीख २१-१०-१७१९

शाहू दप्तर
रु. नं. १३

राजमंडल सु॥ आशरीन
जिल्हा प्रतिनिधि
कि॥ तह राजपत्र छ १८ जिल्हेज
अजहद पंचगंगा तहद श्री रामेस्वर हा जिल्हा राजश्री प्रतिनिधि यांजकडे दिल्हा सदरहू प्रांताचे कुल येख्तयार मशारनिलेकडे दिल्हा आहे माहालाची खंडणी करून मुकासदारास यैवज नेमून देतील बाबतीचा यैवज पंडित मारनिले वसूल घेतील.

लेखांक २२ इ. स. १७१९-२०

राजमंडल सु॥ अशरीन जमा साल
मार लस्कर
सुभा सुभानजी थोरात दिनकरराऊ वजारतमाव याचेविसी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि याणी रदबदल केली त्यावरून अजहद तुंगभद्रा तहद रामेस्वरपावेतो देश स्वाधीन करून सरंजाम करून सनदा दिल्हे ५३ एकूण सरंजाम

शाहूदप्तर तारीख २-११--१७२०
रु. नं. २२

श्री

यादी सरंजाम...पिराजी घोरपडे
छ १२ मोहरम सु॥ इहिदे अशरीन
गडकोट हुजरात व नरगुंदची पथके खेरीज करून निमे सरंजाम पंचगंगेपलीकडे देऊ
सालपेचे घाट धरून रामेस्वर पावेतो मुलुक द्यावा कलम १
पनालेचे सरदेशमुखीचे वतन पूर्वीप्रमाणे करार करून द्यावें कलम १
गडकोट हशम हुजरात खेरीज करून देऊ.
म्यान मुलकी वतनी गाव व मुकासे गाऊ आहेत ते इनाम करून द्यावे
कलम १

दाहा गाव देऊ
सेनापति अभिधान करार करून द्यावे कलम १
ममलकतमदार देऊ
भिरज प्रांतीचे सरदेशमुखी वतन + + + करार करून द्यावे कलम १
देऊ

सरदेशमुखी करार करून द्यावी कुल कलम १

दूर

कोल्हापूर आमचे जिल्हेतील घ्यावावे कलम १

होत नाही.

फौजेचे उस्तवारीस व बहुमान द्यावा

फौजेचे उस्तवारी करणे तूर्त घ्यावे नख्त १००००० रुपये रोख

पनास हजार देऊ

कलगिया

२ उतम खासे ५० सरासरी

५२

खाशास येक व लोकास कापड देऊ

मोतीयाचे तुरे जडाऊ उत्तम २

येक देऊ

घोडे

५ खासे साजसमेत ५०

सरदारास द्यावेत

५५

पांच घोडे देऊ

लोकास वस्त्रे व बहुमान आम्ही सांगो त्याप्रो द्यावी कलम १

देऊ

सिद्राम देसाई याचा थोरला हती यास द्यावा कलम १

हती देऊ

कडी

४ जडाऊ हस्तकडी ५० लोकास कडी

५४

दहा देऊ

जडावाची दोन देऊं

मोती जोडीया

५ उतम ५० सरासरी

५५

खाशास तीन लोकास सात

पदके जडावाची उतम

२ उतम खासे २५ लोकाकारणे

सरासरी । २७
दोनी देऊ

हती द्यावे ५

येक हती देऊ

सिदराम देसाई याचा लेक सोडून द्यावे कलम १

सिदराम देसाई चाकरीस आलियावरी
सिदराम देसाई याचा बहुमान करावा कलम १

करू

वजारत माब

कृष्णाजी घोरपडे याचा सरंजाम करून द्यावा कलम १

देऊ.

राणोजी घोरपडे याचा सरंजाम करून द्यावा

देऊ

विरुपाक्षराऊ अनंत याचा सरंजाम करून द्यावा कलम १

देऊ

इलाची बेग याची बोली पेसजी तुम्हाकडे जाहली आहे त्याप्रमाणें करून द्यावी बहुमान करावा.

देऊ

तारीख २९-११-१७२०.

शाहू दप्तर
रु. नं. २०

राजमंडल सरंजाम लस्कर सु॥ इहिदे आशरीन मया (अलफ) दिमत राजश्री पिराजी घोरपडे

छ ९ सफर मशारनिलेवरी स्वामी कृपालु होऊन ममलकतमदार किताब दिल्हा १
राजश्री पिराजी बीन संताजी घोरपडे याजवरी स्वामी कृपालु होऊन सरदेशमुखीचे वतन पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें वतन करून दिल्हे असे
१ प.। मिरज १ प्रांत पनाला
२

निमे जोत्याजी केशरकर

सरंजाम पंचगंगेपासून तुंगभद्रा पर्यंत खेरीज गड किले व हुजरातचा सरंजाम वजा करून बाकी सरंजाम मारनिलेस दिल्हा १

तारीख २९-११-१७२०

राजमंडल वतनें सु॥ इहिदे

(अशरीन)

राजश्री पिराजी घोरपडे ममल्कतमदार

छ ९ सफर मारनिलेवरी स्वामी कृपालु होऊन सरदेशमुखीचे वतन पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने वतन करून दिल्हे असे. या वतनास हकलाजिमा सुधामतप्रमाणें १ प्रांत पनाला १ प्रांत मिरज २

पैकी दूर केले छ ४ जमादिलाखर सन इसने प्रा पनाला येथील सरदेशमुखी दूर करून केशरकर याकडे दिली १

लेखांक २३ तारीख १५-६-१७२१

माहे साबान सु॥ इसने अशरीन

तेरीख ३० रोज

राजश्री पिराजी बिन संताजी घोरपडे याजवरी स्वामी कृपालु होऊन इनाम देह नूतन करून दिल्हे असे बि ता

२ ....
२ ता आलते कुरंदवाड.........
२ ता रुकडी इचलकरंजी....... ..
१ सिरढोण.......................
१ ....सा कोरेगाव प्रा वाई
१ ....प्रा कराड
१ कुरले ता आऊद
१०

कुलबाब कुलकानु खेरीज हकदार व इनामदार करार करुन दिले.

तारीख १५-६-१७२१

शाहू दप्तर

रु. नं. ११

राजमंडल इनाम देहे सेवक लोक

सुा इसने

राजश्री पिराजी बिन संताजी घोरपडे

किता इनाम छ ३० साबान सन इसने अशरीन मारनिलेवरी स्वामी

कृपालु होऊन वंशपरंपरेने इनाम दिल्हे देहे

सुभा प्रा खटाव

१ कसबा मालवगो १ मौजे कारवे ता इठे १ मौजे कुल कयात आऊद
३

मौजे नाहावी खुर्द ता कोरेगाव प्रा वाई १ मौजे विंग ता हवेली
प्रा कराड १
७

सुभा प्रा मनाला
३ ता रुकडी १ मौजे इचलकरंजी १ मौजे सिरढोण १ मौजे चंदुर
३

२ ता आलते १ मौजे कुरुंदवाड १ मौजे आलास
२
८

लेखांक २४ तारीख ११–१०–१७२२

राजमंडल सरंजाम लस्कर सुा सलास
(अशरीन) दिमत राजश्री मुरारजी सिंदे किताब ममलकतमदार
सरंजाम छ ११ मोहरम प्रांत तोरगल वगैरे माहाल
सरकार तोरगल
१ कर्यात हवेली तोरगल १ का बनूर १ का सतगिरे १ कडकोल १ मुरगोड १ लोकापूर
१ येकोडी १ सवदत्ती १ मोरब १ नवलगुंद १ जाऊरहवेली १ इगलहली १ हुली
॥. मुलगुंद देहे १४ पैकी निमे १ बेटगिरे १ अनगिरे १ अमनबावी १ तडकोल तेऊर
१ अनवले १ केरूर सलाबतखानाचे १ का गोवनखाप २१॥
इनाम गांव खासा मुरारजी सिंदे
१ मौजे खोदसी ता आलते प्रा पनाला
१ मौजे बेदरी १ पा रायेबाग १ मौजे वासंबे का कविठेबिराड सिधाचे प्रांत मिरज
३

१ किता माहाल
१ मामले हुबली + + संपगाव माहाल
१४ पैकी ७ येकून निमे
१ पा धारवाड १ पा हलपल १ का देवरहुबली २ प्रा बेलगाव
१ पा लक्षमेस्वर तिजाईचा मोकासा रुपये १००००० १ पा रायेर
हुबली तीनसे १ पा गदक माहाल दोंन तकसीमाचे ९
फुटगाव पा बदामी देह १३० पैकी घोरपडे व देसक हुजूर ठेविले देह
५० बाकी मारनिलेकडे दिले देह ८०
दरबारी सनदा तनखा रुपये

५००० प्रांत सोंदे पैकी
१५००० प्रांत बिदनूर पैकी
२००००

तारीख १२-१०-१७२२

राजमंडल प्रांत दक्षिण किता माहाल मुकासा राजश्री कुसाजी व येसाजी भोसले ता तुकोजी गुजर सरनोवत छ १२ मोहरम सन सलास अशरीन.

तारीख १९-५-१७२३

लेखांक २५

राजमंडल सुा सलास

रा सुल्तानजी सितोले यास इनाम छ २४ शाबान सन सलास अशरीन

देहे
१ मौजे मांजरी पा कागल
१ मौजे आंकली पा दिगरज प्रा मिरज
२

तारीख २८-७-१७२३

माहे जिल्काद सु॥ आर्बा अशरीन श्रावणमास तेरीख ६ रोज श्रावण शुध सप्तमी भानुवासर

बदल देणे वेतनात लोकानी दि॥ लबे कामगारी लस्करचे सरदारास पत्रे पाठविली जे संताजी पांढरे याणी चंद्रसेन जाधव यासी युद्ध केले युधामधे संताजी पांढरे पडिले ते वर्तमान पहिले तुम्हास लिहिले आहे यैशास गनीमास नतीजा पावावा लागतो ये गोष्टीचा मनसबा विचारे करणे आहे तरी तुम्ही फौज घेऊन हुजूर येणे म्हणून पत्रे पाठविली या कामास लोक पाठविले यास वेतनात देविले.

केरोजी पवार .... कालोजी भोसले ....

देवजी सोमवंसी माणकोजी वायेसे.

तारीख २१-१२-१७२३

राजमंडल

सु॥ आर्बा

रा चिमणाजी पंडित

कि॥ पत्रे

छ ३ रबिलाखर पौष शुध पंचमी मंदवार राजपत्रे राजश्री फतेसिंग बावा व

खंडेराऊ दाभाडे व चिमणाजी पंडीत यास जे दिलावरखान सुभा विज्यापूर याणी राघो अनंत याजबा स्वामीस पत्र पाठविले की शाहमत सुभा भागानगर याचा आपला भाऊपणा आहे.
स्वामीकडील फौजा भागानगर प्रांते जातात परंतु त्यावरी सख्यत्वाचा प्रसंग न केला सांप्रत येविशी खानमशारनिले याणी आपणास लिहिले आहे की दरम्यान होऊन तह होये ऐसे करणे म्हणोन लिहिले आहे यैशास सभ्य मनुश्य दरम्याने होऊन सख्य जालियाने उतम आहे या निमित्य खान मारनिलेकडील राघो अनंत यासी तुम्हाकडे पाठविले आहेत त्यासी बोलीचाली करून याचा बहुमान घोडे वस्त्रे खर्चाची बेगमी करून देऊन आपली पत्रे देऊन रवानगी करणे हे जाणून खान मारनिले यास सांगोन मातबर मनुश्य आलिया सख्यत्वाचा विचार करणे
येविशी

पत्रे

१ फतेसिंग भोसले
१ खंडेराऊ दाभाडे सेनापति
१ चिमणाजी पंडित राजाज्ञा

लेखांक २६

तारीख १८–३–१७२४

राजमंडल दिा राजेश्री वेंकटराव नारायेण ममल्कतमदार सुा आर्बा (आशरीन)
छ ३ रजब मानिलेचे नांवे सर सनद जे तुम्हाकडील लष्करेच्या जमावास सरंजाम पंचगंगेपासून तुंगभद्रेपावेतो मुलुक आहे त्यापैकी गड किले व हुजरात व हशम यासी सरंजाम दिल्हा आहे तो वजा करून बाकी मुलुकपैकी निमे सरंजाम तुम्हाकडे दिल्हा आसे तरी तुम्ही निमे मुलुकगिरीचा ऐवज वसूल घेऊन जमाव फौजबंदी करून स्वामीकार्य करीत जाणे म्हणून सनद १

लेखांक २७

तारीख २१–७–१७२५

तेरीख २१ रोज जिल्काद सुा सीत
वस्त्रे राजश्री सिदोजी हिंदुराव याजकडून कारकून आले होते त्याची
रवानगी

सोनो येमाजी यासी
१ तिवट
१ सेला अष्ट गोली

गोपाल गणेश
१ तिवट
१ सेला अष्ट गोली

संताजी नाईक जासूद
यासी तिबट १

तारीख १९-१०-१७२५

राजमंडल रोजकीर्द माहे सफर छ २३ सुा सीत
राजश्री सिद्दोजी हिंदुराव घोरपडे याकडील पत्रे
किले कोपल कबिला ठेवावयास ताबीन केला असे १
देशमुख व देशपांडे प्रा हुकेरी यास पत्र कीं मारनिले स्वामीच्या पायासी निष्टा धरून स्वामीचे सेघक जाले याबद्दल तो प्रांत पूर्वीपासोन त्याकडे आहे त्या प्रा करार असे तुम्ही याचे आज्ञेत वर्तोन स्वामीकार्य करणे १
किता पत्रे सदरहू प्रमाणे

१ पा रायेबाग	१ पा अडगल	१ पा गोकाक	१ पा माचनूर
१ पा बागडकोटी	१ पा होनगुंदे	१ पा केरुर	१ पा कडकोल
१ पा कितुर	१ पा सविस्वर	१ पा मुधोल	१ पा जेबगी
१ पा यादवाड	१ पा गलगले	१ पा जमखिंडी	१ पा तेरदल,
१ पा तोरगल	१ पा जालेहाल	१ पा नवलगुंद	१ पा येलबरगे
१ पा कृष्णगी	१ पा गदक	१ पा लक्ष्मेश्वर ——	

२३

तारीख १-११-१७२५

शाहू दप्तर
रु. नं. २

पत्रे साहोत्रा सचीव रोजकीर्द
छ ६ रावल सुा सीत (आशरीन)
१ जगजीबन गोविंद यास पत्र
पत्र पा कोलापूर व पा कागल व प्रांा पनाले व तारले येथे जमीदारास ताकीद करून तुम्हीं खंडणी कराल त्याचे साहोत्रा देवणे.

लेखांक २८ इ. स.–१७२५–२६

श्री

शाहू दप्तर
रु. नं. २१

झाडा सरंजाम राजश्री कान्होजी भोसले सुा सन सीत अशरीन
कदीम सरंजाम —————————————————— माहाल
....

दुई तोडोन सरलस्कराकडे माहाल करार केले होते ते पनालेंचे मसलतीस राजश्री कान्होजी भोसले यासी दुईचे माहाल सन आशरीनमधे दिले.

तारीख २–३–१७२६

छ ८ रजब सुा सीत
पत्रे चिटनीसी
श्रीमंत सकल तीर्थस्वरूप मातुश्री आईसाहेब मुा पनाला यास पत्र जे वडिली आसीर्वाद पत्र पाठविले ते पावले लेखनार्थ अवगत जाला
मानाजी घोरपडे जेजुरीस श्रीचे दर्शनास जातात त्यास मार्गीचे दस्तक पाठविले पाहिजे म्हणून लिहिले त्यावरून दस्तक पाठविले आहे म्हणून मातुश्री
पत्र १

तारीख ६–३–१७२६

छ १२ रजब
मातुश्री आईसाहेब मुा पनाला यास पत्र जे राजश्री नारो राम मंत्री याच्या पुत्रास कुडाल प्रो वधु योजिली आहे गतबर्षी लग्न निश्चये करून वडिलास मार्गीचे दस्तक पाठविले होते परंतु गतवर्षी लग्नप्रसंग राहिला येंदा वैशाखमासी लग्नाचा सिधांत करून हे पत्र वडिलास लिहिले आहे तरी वडिली मार्गाचे दस्तक पाठवावे.

तारीख १७–३–१७२६

माहे रजब सुा सीत
तेरीख २३ रोज फाल्गुण बहुल
चिटी मसाले
रा सिदोपंत दिा सरलस्कर यास पत्र जे उदाजी चव्हाण पनालेकर याची खबर आणऊन हुजूर लिहून पाठवणे या कामास लोक जासूद
जथे लतीब नाईक यास बेतनात देविजे रुपये

५ माहादाजी तोडकर
५ सिदोजी यादव

---

१० मो

तेरीख १ माहे रमजान रोज वैशाख शुध तृतीया मंदवासर सुा सीत चिटनीसी पत्रे
(ता. २३–४–१७२६)
१ सिदोजी थोरात यास पत्र जे घोरपडे व उदाजी चव्हाण येकत्र होऊन या प्रांते स्वारी करणार म्हणून लिहिले तरी त्याणी वलवल केली तरी शह देऊन राहणे तुम्ही आष्टे यास राहणे.

रु. नं. २

तारीख २७-६-१७२६

शाहू रोजकीर्द

सीत आसरीन व सबा आसरीन

छ ७ जिल्काद सुा सबा

राजश्री सिदोजी थोरात यास पत्र जे तुम्हाकडून रा धनाजी थोरात हुजूर आले त्याणी तुमचे निश्चेचा अर्थ विदित केला यैशास तुम्ही येकनिष्ट सेवक तैसेच आहा तुमचा अभिमान स्वामीस आहे ऊर्जित करून तुमचे हाते सेवा घ्यावी हे अगत्य येविशी स्वमुखे धनाजी थोरात यास आज्ञा केली आहे हे सांगतील ते स्वामीची वचने जाणोन हुजूर दर्शनास येणे वडगावचे ठाणे तुमचे स्वाधीन केले असे तरी तुम्ही धनाजी थोरात यास बा फौज प्यादे देऊन वडगावास पाठवून ठाणे घालणे तुम्ही हुजूर आलियावरी जे आज्ञा करणे ते स्वामी करतील.

तारीख ३०-७-१७२६

तारीख ११ जिल्हेज रोज श्रावण शुध त्रयोदशी मंदवासरे

रा सिदोजी थोरात यासी पत्र जे रा धनाजी थोरात यासी जाऊन च्यार पाच दिवस जाले अद्यापि काही वर्तमान कलत नाही तरी हली हे आज्ञापत्र सादर केले असे तरी पत्रदर्शनी आपल्या जमावानसी वडगावी ठाणे घालून वर्तमान लिहून पाठविणे ठाणियामध्ये धनाजी थोरात यासी ठेऊन तुम्ही पत्रदर्शनी स्वार होऊन येणे कितेक मनसुबियाचा विचार तरी विलंबावरीं न घालविता येणे गनीम कोठे आहे पुढे काये विचार करिता हे लिहून पाठविणे म्हणून पत्र.

तारीख ५-८-१७२६

राजमंडल

माहे जिल्हेज छ १७ रोज सुा सबा

चिटनिसी

राजश्री खंडेराव दाभाडे सेनापतीचा जाब कीं स्वामींनी तुम्हास स्वमुखे आज्ञा केली होती त्या उपरी आज्ञापत्र पाठविले त्यावरून तुम्ही विचार लिहिला यैसीयास स्वामीस सर्वप्रकारे भरोसा तुमचा आहे येविसी कितीक आज्ञा राजश्री भास्कर राम यास करून तुम्हाकडे पाठविलें आहेत हे सांगतील हे वचने स्वामीची यैसे जाणोन वर्तणूक करून संतोशवीत जाणे १

तारीख १४-८-१७२६

छ २६ जिल्हेज सु॥ सबा (अशरीन)

राजश्री सेनापति यास पत्र जे......

को. घ. इ.२...४

पोटात याप्रो शूळ वेथा जाली........
उपाये करून वेथा निशैल्य जालीयाचे वर्तमान लिहिविणे १

माहे मोहरम सु॥ सब्रा (अशरीन) तारीख २९-८-१७२६
छ १२ रोज
फडनिसी सनदा
राजश्री सिदोजी थोरात यास सनद जे तुमचे स्वाधीन खालसा व बाबती प्रांत हाये केले असे तरी तह प्रमाणे वर्तणूक करणे
५ खालसा व बाबती
१ प्रा पनाळा १ प्रा मल्कापूर
१ प्रा कोलापूर १ प्रा तारले
१ प्रा आजिरे
१ प्रा मिरज येथील बाबती
राजमंडल
माहे मोहरम सु॥ सब्रा (अशरीन)

तेरीख १२ रोज भाद्रपद शुध चतुर्दशी ता. २९-८-१७२६
त्रयोदशी इंदुवार
चिटनिसी
किता पत्रे देशमुख देशपांडिये माहालानिहाये यास जे राजश्री कुसाजी व येसाजी भोसले यास प्रा मजकुरी मुकासे आहेत तेणे प्रा साल मजकुरी करार केले आहेत तरी तुम्ही यासी रुजू होऊन प्रा मजकुरचे मुकासबाबेचा यैवज वसूल देणे पत्रे
१ माहाल हाये प्रा पनाळा
१ प्रा मिरज
१ प्रा मल्कापूर १ प्रा तारले १ प्रा कोलापूर
१ प्रा आजिरे
६

छ १४ रोजी सिके जाले.
खालसा व बावती हुजूर ठेऊन र॥ सिदोजी थोरात याचे स्वाधीन केले असे तरी यासी रुजू होऊन खालसा बाबतीचा वसूल मारनिल्हेकडे देणे म्हणून देशमुख व देशपांडे यास

१ प्रा पनाला १ प्रा मल्कापूर १ प्रा कोलापूर
१ प्रा आजिरे १ प्रा तारले ० प्रा मिरज
येथील वाबती खालसा नाही

---

५ मो श्री
छ १४ रोजी सिके जाले.

तारीख १-९-१७२६

राजमंडल इनाम देहे सेवक लोक
सुा सबा
राजश्री सिदोजी बिन सिवाजी थोरात
छ १५ मोहरम सन सबा
हाली माारनिलेस इनाम
१ मौजे कारवे पा हवेली कराड
१ मौजे बहे ताा वालवे प्रा पनाला.
माहे सफर सुा सबा (अशरीन)

तारीख २२-९-१७२६

तेरीख ६ रोज आस्विन शुध अष्टमी गुरुवासर
चिटनिसी
किता पत्रे

१ सिदोजी थोरात यास जाब जे चवाण व घोरपडे येकत्र होवून जमाव करीत आहेत आपणही लोक ठेविले म्हणून लिहिले उतम केले गनीमाचे वर्तमान वरचेवरी लिहिणे मिरजकर मोगल मेहरअली बेग आला बोलीचाली जाली गुदस्ताचे रुपये सद्दया द्यावे लागतात म्हणून लिा तरी गुदस्ताचे पैकेचा विचार करून मागाहून पटवून देऊन तुम्ही मिरजकर येकत्र होऊन गनीमास नतीजा देऊन हालखुद ठेवणे

२ किता पत्रे दिा सिदोजी थोरात देशपांडे माहालहाये यास जे त्या प्रांतीचा मामला राा सिदोजी थोरात याचे स्वाधीन केला आहे तरी तुम्ही त्याचे भेटीस जाणे त्याचे आज्ञेप्राो वर्तणूक करणे.

१ शामजी नरसिंह देशपांडे पनाला
१ विठल राऊ देशपांडे पाा सिराले

लेखांक २९

तारीख २४-६-१७२७

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे आषाढ बहुल द्वितीया मंदवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे पा राजूर बोर प्रा वराड यासी आज्ञा केली ऐसीजे पा मार पैकी इनाम गाव व खासगीचे गाव व फुट मुकासे वजा करून उरला माहाल पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हाली राजश्री मल्हारराऊ[1] रायाजी उमदेउलमुल्क याकडे जमावाचे बेगमीस मुकासा दिल्हा असे तर यासी रुजू होऊन आकारा प्रमाणे मुकासबाबेचा ऐवज मारनिलेकडे बिकसूर सुरलीत पाठवित जाणे जाणिजे निर्देश समक्ष

मर्यादेय
विराजते

तारीख २४-६-१७२७

श्री

शाहू दप्तर
रु. नं. २१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे आषाढ बहुल द्वितीया मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व मोकदम कसबे येवधें सरकार गोवल प्रांत वराड यास आज्ञा केली ऐसीजे कसबे मार पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हाली राजश्री मल्हारराऊ रायाजी उमदेउलमुलक याकडे जमावाचे बेगमीस मुकासा दिल्हा असे तर तुम्ही रुजू राहोन आकारा प्रा मुकासबाब मारनिलेकडे पावीत जाणे निर्देश समक्ष.

मयादेय
विराजते

रुजू

तेरिख १६
जिल्काद सुा समान सुरु सुद,
बार

---

१ हा सरदार या वेळीं कान्होजी भोसले याच्याबरोबर वऱ्हाडांत आहे, अशी नोंद राजमंडल रोजकीर्दीत छ १५ जिल्काद सुा सन समान अशरीन या तारखेस आहे.
(ता. २४-६-१७२७)

तारीख २३–७–१७२७

राजमंडल माहे जिल्हेज छ १४ रोज

सुा समान

राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यास सरदेशमुखीच्या चिटणिसीकडील ताकीद पत्रे दिली

सुभा प्रांत वराड

सरकार वासीम ।९ पा सरकार मेहकर[1] ।१२ पा सरकार वेतालवाडी ।९ पा सरकार पाथरी ।७ पा सरकार माहूर ।२० पा सरकार नरनाला ।१७ पा

तारीख २०–८–१७२७

राजमंडल रोजकीर्द दिा मजमू

सुा समान छ १३ मोहरम

हिंदुराव घोरपडे ममलकतमदार

सरदेसमुखीची पत्रे

सुभा खुदस्त बुा सरकार संगमनेर

१ पा त्रिंबक	१ पा दिंडोरी	१ पा वण
१ पा संगमनेर	१ पा पसावदे	१ पा सिनेर
१ पा चांदवड	१ पा बेल्हे	१ पा नासिक
१ पा धांधरफल	१ पा अकोले	१ कसबे राहते
१ कसबे पुणतांबे		१ कसबे वावी

——

१४

तारीख २२–८–१७२७

शाहू दप्तर

रुमाल नं. ३

सु॥ समान अशरीन

छ १५ मोहरम चिटी मसाले

सिदोजी थोरात ठाणे अष्टे यास पत्र जे मुलकात रोखे करून धामधूम न करणे-

१ मेहकर बुलढाणा.

तारीख ४-१०-१७२७

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे कार्तिक सुध प्रतिपदा सौम्य-वासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री तावजी थोरात अमिरूलउमराव व संताजी थोरात समशेरबहादर यासी आज्ञा केली ऐसीजे मौजे कात + + नेवासे हा गाव राजश्री भगवंतराव अमात्य याकडे आहे व कसबा जिऊर बाईजीचे राजश्री धोंडो भास्कर दिा अमात्य याकडे व मौजे ताहारा-बाद पाा पारनेर हा गाव राजश्री धीराजी पवार विश्वासराव याकडे आहे येणेप्रमाणे गाव मुकासे दिल्हे आहेत तुमच्या सरंजामात दिल्हे नसता कटकट करितां हे कोण गोस्ट ? याउपर सदरहू तिन्ही गावास कोण्हेविसी उपसर्ग न देणे जाणिजे बहुत काये लिहिणे.

रूजू सुरनवीस — मर्यादेय

बार सुरु सुद बार. — विराजते

तारीख ५-१०-१७२७

शाहू दप्तर

रुमाल नं. ९

राजमंडल रोजकीर्द

छ ३० सफर चिटनिसी सुा समान

राजश्री खंडेराऊ दाभाडे सेनापति यास पत्र जे तुम्ही विनंती पत्र हुजूरच्या वार्तिकासमवेत पाा आपण स्वार जाहालो फौज जथून गनीमाच्या शहावर जातो म्हणून तर ब्रहस्पतवारी निजामन्मुलुक व संभाजी राजे कूच करून आडीच कोसावरी आले यैसी बातमी आली त्यावर दुसरी बातमी सेनवारी कूच करून येवतेस आले तर तुम्ही फौज-बंदी सत्वर करून गनीमास पायेबंद देऊन नतीजा देणे राजश्री पंतप्रधान व तुम्ही येकत्र होऊन गनीमावर जाणे म्हणून पत्र १

राा हसन चोपदार मिंधे तुलाराम

माहे रबिलावल सुा समान तेरीख ५ रोज कार्तिक शुध सप्तमी भोमवासर

तारीख १०-१०-१७२७

भोमवासर

चिटनिसी

शामजी नरसिंह देशपांडे प्राा पनाला याचे पत्राचे जाब तुम्ही विनंती पत्र पाठ-विले कीं मौजे इंगली ताा टाणे प्राा मार हा गाव आपणास इनाम दिल्हा आहे त्यास सिदोजी थोरात इनाम तिजाईचा तगादा करितात त्यास आज्ञा कर्तव्य ते करावी आपण येकनिष्ट सेवक असो सेवा करून दाखऊ म्हणून पहिलेच लिहिले तरी प्रस्तुत समय आहे जलद प्यादे घेऊन स्वामीचे भेटीस येणे इनाम तिजाईची रयात केली जाईल.

तारीख १३-१०-१७२७

छ ८ रबिलोवल सुा समान
सरदारास पत्रें पाठविली कीं आपलाल्या फौजानिसी किलिजखान मोगल याचे पिछावरी येऊन पायेबंद देऊन नतीजा पोहचाऊन स्वामी तुम्हावरी संतोषी होत ते गोष्ट करणे. कानोजी आंगरे दावलजी सोमवंसी पिलाजी जाधव रायाजी जाधव कान्होजी भोसले कंठाजी कदमराऊ व पिलाजी गायेकवाड

तारीख १७-१०-१७२७

माहे रबिलोवल छ १२ सुा समान (अशरीन)
सिदोजी थोरात ठाणे अष्टे यास पत्रे किता पत्र तुम्ही विंनती पत्र पाठविले प्रविष्ट जाले उदाजी चवाण तेरदल प्रांते आहे फौजेचा व प्यादेयाचे जमावाचे तरतुदेमध्यें आहे म्हणून लिहिले विदित जाले पुढे त्याकडील तत्वता बातमी आणऊन लिहून पाठवणे ठाणे याचे मजबुदी करून खबरदार राहणें.

तारीख २७-१०-१७२७

श्री

स्वस्ति श्री राज्यात्रिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे कार्तिक बहुल नवमी भृगुवार क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे पा सुभे खोदस्तेबुनियाद यासी आज्ञा केली ऐसीजे सरदेशमुखीचे वतन पूर्वी तीर्थरूप राजश्री[1] कैलासवासी स्वामीनी राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार यांसी दिल्हे आहे. देवाब्राम्हणाचा इनाम सर्वमान्य वजा करून हकल्वाजिमा याची मोईन करून दिल्ही आहे तेणेप्रो पूर्ववत् स्वामीने करार केले असे या वतनाचा अमल राऊ मारनिलेकडे सुरलीत देत जाणे.

मर्यादेय
विराजिते

तारीख २७-१०-१७२७

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे कार्तिक बहुल नवमी भृगुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे + + + प्रा विजापूर यासी आज्ञा केली ऐसीजे सरदेशमुखीचे वतन पूर्वी तीर्थरूप राजश्री

---

१ अशाच मजकुराचीं आज्ञापत्रें पा बारामती, पा सिरवल सुभा खोदस्तेबुनियाद येथील देशमुख व देशपांडे यांना याच तारखेचीं व सालचीं आहेत.

कैलासवासी स्वामीनी राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यासी दिल्हे आहे देव ब्राम्हणाचा इनाम सर्वमान्य वजा करून हकलवाजिमा याची मोईन करून दिल्ही आहे तेणे प्रमाणे स्वामीनी करार केले असे या वतनाचा अमल राऊ मारनिलेकडे देणें.

मर्यादेयं
विराजते

माहे रबिलाखर सु॥ समान तेरीख ११ रोज मार्गशीर शुध द्वादसी भोमवासर
चिटनिसी (ता. १४-११-१७२७)
जाब्र
रा॥ सिदोजी थोरात यास पत्र तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रा जाले घोरपडे चवाण मुलखावरी चालोन आलेच तरी स्वामी तुमचे कुमकेस फौज पाठऊन गनीमास नतीजा देतील

तारीख २०-११-१७२७

माहे रबिलाखर तेरीख १७ रोज मार्गशीर बहुल त्रितीया इंदुवासर चिटनिसी
राजश्री सिदोजी थोरात टाणे अष्टे यास पत्र जे श्री मौनी बावा याचा मठ पाटगावी आहे तेथील पूजाअर्चा चालवावयास ता खानापूर प्रा तारले येथील दोनी गाव स्वामीनी पूर्वीपासून इनाम दिल्हे आहेत वासणोली कोडोसी
या गावास तुम्हाकडून चौथाई बाबतीचा उपद्रव लागतो तरी सदरहू गावास तुम्ही उपद्रव न लावणे पत्र १

तेरीख २१ रबिलाखर (ता. २४-११-१७२७)
लखमगौडा देशमुख पा हुकेरी आपली मदत करणे म्हणून लिहिले तरी रा॥ सिदोजी थोरात यास आज्ञा केली असे ते मदत तुमची करतील.

तारीख ३-१२-१७२७

छ ३० रबिलाखर सुा समान
यादी कागदबार रसानगी मयाराम चोपदार बिरादर जगनाथ मिर्धा पत्रे साबाजी नाईक निंबालकर यासी जे तुमचे पत्र अगत्य आहे तुमच्या मनोदयान उस्तवारी करावी येविसी रा पंतप्रतिनिधि यास आज्ञा केली आहे ते तुमची उस्तवारी मनोदयानरूप करून देईल सांप्रत कराड प्रांती रा उदाजी चवाण टालेटोल जमाव करून आले आहेत यास त्याजवर जावया आज्ञा केली आहे तर तुम्ही आपले जमावानिसी आविलंबे येणे तुमची उस्तवारी तुमच्या मनोदयानरूप होऊन येईल म्हणून पत्रे.

तारीख ५-१२-१७२७

माहे जमादिलोवल सुा समान तेरीख २ रोज पौष शुध चतुर्थी भोमवासरे चिटणीसी

१ दावलजी सोमवंसी व राणोजी घोरपडे यास जे तुम्ही विनंति पत्र पाठविले व आबाजीपंतास पाठविलेत तर जमावानसी येणे

तारीख ९-१२-१७२७

माहे जमादिलोवल सुा समान तेरीख ६ रोज पौष शुध अष्टमी भृगुवासर रुजू मंदवासर
चिटनिसी

राणोजी घोरपडे यास पत्र तुम्ही कितेक निष्ठेचा अर्थ गुणाजी नाईक
बिदनूरकर याजबा सांगोन पाठविला त्याणी सेवेसी विनंती केली तुम्हीं पुरातन येकनिष्ठ सेवक तुमचे चालवणे अवश्य स्वामीनी कितेक अर्थ स्वमुखे मारनिलेसी आज्ञापिला आहे ते लिहितील त्यावरोन कलो येईल तुमचे ऊर्जित करून तुमचे हातून सेवा घडावी हे स्वामीस आवशेक आहे.

लेखांक ३०　　　　　　　　इ. स. १७२७-२८

शाहू दप्तर
रु. नं. ४२

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे पा मूर्तजापूर पा कराड यासी आज्ञा केली ऐसीजे पा मार पैकी इनाम गाव व खासगीचे गाव व फुट मुकासे वजा करून उरला माहाल पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हाली राजश्री मल्हारराव उमदेउलमुल्क याजकडे जमावाचे बेगमीस मुकासा दिल्हा असे तर यासी रुजू राहोन आकारा प्रो मुकासबावेचा ऐवज मारनिलेकडे पाववीत जाणे. निदेश समक्ष.

मयदिय
विराजते

श्री

तारीख ३०-१-१७२८

राजमंडल　　दिा मजमू　　सुा समान
प्रांत पुणे ता पाटस सरंजाम
छ २९ जमादिलाखर राजश्री भगवंतराऊ अमात्य मौजे वाळूंज
मुकासा १

तारीख १-२-१७२८

राजमंडल
सुा समान
राजश्री फतेसिंग भोसले
छ १ रजब

रा। फतेसिंग भोसले यास राजपत्र जे तुम्ही व कान्होजी भोसले समेत फौजा मोगलाचे पिछावरी येणे

तारीख ९–३–१७२८

शाहू दप्तर

रुमाल नं. ३

छ ८ साबान सुा समान (अशरीन)

चिटनिसी पत्रें

नागोजी घाटगे यास पत्र जे विनंति पत्र पाठविले ते पावले उदाजी चवाण कल्ढोणावर आला आहे म्हणून लिहीले तर त्याचे बातमीत असणे म्हणून पत्र १

तारीख १५–३–१७२८

छ १४ रोज चैत्र बहुल प्रतिपदा

सिदोजी थोरात यास पत्र तुम्ही पत्र पाठविले जे आज्ञा होईल तर दर्शनास येऊ म्हणून लिहिले तर प्रस्तुत काली चवाणाचे शाहास बसोन असणे न येणे.

तारीख २२–५–१७२८

छ २३ सोवाल सुा समान

सिदोजी थोरात ठाणे आष्टे यास पत्र तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट जाले चवाणाने डफळापूर तासगाव प्रांते जमाव केला आहे बुधाकडे (वडुथाकडे ?) धावणार म्हणून लिहिले तरी तुम्ही तोंडावर असता फिकीर काय आहे ? त्यास नतीजा देणे.

भोजजी मोकदम मौजे आकलखोप ताा आष्टे प्राा पनाला यास यत्र जे तुम्ही बिनंती पत्र पाठविले प्रविष्ट जाले आपणास चवाणाने दस्त करून नेले होते तेथून मुक्तता होऊन गावास आलो म्हणून लिहिले उत्तम जाले.

लेखांक ३१ तारीख ६–१–१७२९

छ १६ जमादिलाखर सुा तिसा

चिटनिसी पत्रे

उदाजी चव्हाण हिमतबहादर यासी पत्र जे तुम्ही विनंती पत्रे दोन पाठविली ती प्रविष्ट जाहाली लिंगोजी जाधव यानी स्वामीसंनिध विनंती केली ते सेवकानेच केली त्या बोलीप्रो वर्तावयास अंतर न पडे म्हणून लिहिले त्यावरून स्वामी संतोश पावले तुम्ही येक वचनी आहा तुम्हापासून बोलिले वचनास वर्तावयास अंतर न पड हा निशा आहे इमान श्रीचा बेलभंडार पाठविला तो पावला प्रस्तुत सेनेसह वर्तमान ·······················

पाठविले आहेत तुम्ही याची भेटी घेणे तुम्हापासी बोलतील ते स्वामीची वचने आहेत तुम्हास वस्त्रे……
…………पाठविली आहेत ती घेणे
म्हणून पत्र

	१
लिंगोजी जाधव यास जाब	१
	२

ता. ६--१--१७२९

माहे जमादिलाखर छ २५ रोज सुा तिसा पौष्य बहुल द्वादसी सौम्यवार

(ता. १५--१--१७२९)

राजश्री हिंदुराव घोरपडे याकडे रामोजी भाबकर व दर्याजी नाईक पाठविले पवार त्याच्या भेटी होऊन विनंती पत्रे आली त्याचे जाबसाल केले जे राजश्री नारो राम मंत्री यास फौजेनिसी पाठविले आहेत हे व तुम्ही येकातः करणे राहोनू स्वामीकार्य करणे स्वामी तुमचे सर्वप्रकारे चालवितील म्हणून पत्रे वदी येकादसी मंगलवार दिमत मजकूर

१ रा हिंदुराऊ १ मुरारजी घोरपडे १ केदारजी सूर्यवंशी
१ नारो साबाजी १ अंबाजी हणमंत १ दौलतराऊ घोरपडे
१ सगुणाबाई १ मलपा

तारीख ४--२--१७२९

माहे रजब सुा तिसा
तेरीख १६ रोज मुाा जेजुरी

मिरजकरास ठेचगा देऊन शाहारकोट घेतला तेसमई तुम्ही कस्त मेहनत केली हे वर्तमान राजश्री नारो राम मंत्री याणी लिाा त्यावरून तुमचे सेवेचा मजरा जाहला पुढेही मााारनिल्हेसमागमे राहून स्वामीसेवा करून संतोश पाववणे म्हणून समाधान पत्रे
१ माणकोजी वाइसे १ कृष्णाजी दाभाडे १ कृष्णाजी पवार १ कालोजी भोसले

राजश्री नारो राम मंत्री यास जाब जाब मिरजेचा शाहारकोट घेऊन मुख्यकोटास मोर्चे चालविले होते परंतु सर्वांचे विचारे गुंतोन राहोन सार्थक नाही म्हणून मोर्चे काढिले म्हणून तर तुम्ही जे कराल ते विचारेच कराल कुसाजी भोसला याणी अंगेजणी बरी केली म्हणून लिावरून संतोश जाहाल उदाजी च्व्हाण यासी हाती द्यावा लागतो तर तेथे लस्करांत मुबाला करून देणे नाहीतर चिमाजी आले उपर उत्तम हाती देऊ नाही-तर दर्शनास आल्येवर देऊ. (ता. ४--२--१७२९)

राज सुभा प्रांत खटाव तारीख १०-४-१७२९

उदाजी चव्हाण हिमतबहादर याकडील खंडणी साल गु॥ जाहाली असल त्याप्रा साल-मजकुरी द्यावी याची आज्ञा केली असे तर साल गुा प्रा साल मारी वसूल देणे गुाची बाकी राहिली आसल ते देणे म्हणून पत्रे छ २१ रमजान तिसा.

१ ता खटाव १ ता बूध
१ ता मलवडी
३

माहे जिलकाद सु॥ सलासीन तारीख २-६-१७२९

तेरीख १५

चिटनिसी पत्रे

रा॥ बलवंतराऊ यासी पत्र जे तुम्हास कोपल प्रांते राजश्री नारो राम मंत्री याणी ठेविले आहे आणि बंदोबस्ताविशई आज्ञा केली आहे तरी या प्रांते राहून आज्ञेप्रो वर्तणूक करून वरचेवरो वृत्त लिहून पाठवीत जाणे म्हणोन पत्र १

ता. २--६-- १७२९

रा हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यास पत्र जे रा कुसाजी भोसले याची तुमची भेटी जाहाली मुरारजी घोरपडे यासी स्वामीसंनिध पाठवावे म्हणोन करार केला यैसियास मुरारजी घोरपडे यासी हुजूर पाठवून देणे स्वामी सर्वस्व उर्जित करितील म्हणून पत्र १

तारीख ४-६-१७२९

शाहू दप्तर
रु. नं. ४
माहे जिलकाद तेरीख १७ सु॥ सलासीन
सुभानजी मोरे वगैरे नामजाद कोपल यासी पत्रे + +
१ सुभानजी मोरे + + +
१ बलवंतराव यास पत्र जे तुम्हास नारो राम मंत्री याणी बंदोबस्तास ठेविले आहे तर बंदोबस्ती करून वरचेवर वर्तमान लिहीत जाणे
१ गोविंदराव मोरे यास पत्र
३

किता पत्रे
१ हिंदुराव घोरपडे ममलकतमदार याकडे मल्हारजी लाड व सेटयाजी सिंदे जासूद नि॥ दर्याजी नाईक यास पाा यास खर्चास देणे म्हणून

तारीख २७–६–१७२९

त्रयोदसी भृगुवासर

साहित्य पत्रे

१ केंचापा देसाई पा हवेली कोपल

१ खानगौडा देसाई पा लक्ष्मेश्वर

१ श्रीनिवास व्यंकटाद्रिबहादर देसाई पा गदक

३

१ जयंतीबाई

४

जाब

१ रा।। बलवंतराव सिवदेव यास पत्र जे तुम्ही विनंती पत्र पाठविले पावोन अर्थ अवगत जाला व रा।। मंत्री याणी निवेदन केले यैशास तुम्ही येकनिष्ट सेवक आहा प्रस्तुत रा।। मंत्री याणी तुम्हास लिहिले आहे त्याचे आज्ञे प्रमाणे वर्तोन त्याप्रांते चौका बसविणे आपले सेवेचा मुजरा करून घेणे म्हणून पत्र.

२ सुभानजी राऊ मोरे व गोविंदराव मोरे यास पत्रे जे तुमचे सेवेचा व निष्ठेचा अर्थ रा।। मंत्री याणी विदित केला यैशास तुम्ही पुरातन सेवक आहा निष्ठेने सेवा करून आपले सेवेचा मुजरा करून घेणे साहित्य पत्राविसी रा।। मंत्री याणी विनंती केली त्यावरून साहित्य पत्रे आलाहिदा सादर केली असेत म्हणून उभेयतास.

३

ता. २७–६–१७२९

राजश्री हिंदुराव घोरपडे यास पत्र जे किले कोपल व बहादूरबंडेकर यानी समाधाने राहोन पहिलेपासून चालत आले प्रो ज्याचा यैवज त्याणी घ्यावा यैसा तह असता तुम्हाकडील लोक तहाप्रमाणे वर्तत नाही हे कांहीं उतम नाही लोकास ताकीद करून तह प्रो वर्तत ते करणे म्हणून पत्र १

माहे जिल्हेज आषाढमास सु।। सलासीन तेरीख ११ रोज चतुर्दसी मंदवासरे मु।। सातारा

तारीख २८–६–१७२९

रा।। बलवंतराव सिवदेव यास राजश्री नारो राम मंत्री याणी कोपल प्रांतीचा मामला सांगोन ठेविले आहे ती व रा।। सुभानजी राऊ मोरे व गोविंद राऊ मोरे किले कोपल येथे आहेत त्याणी विनंती पत्रें हुजूर पाठविली त्याचे जाब व किले मा।।चे बेगमीविसी पत्रे सादर केली.

किले म॥राकडे सालाबाद ऐवज पावतो त्याप्रो पावऊन रुजुवात राहणे म्हणून पत्रे
१ तिरलापा देसाई पा हवेली कोपल
१ बालाजी रुद्र गु॥ नाडगौडा प्रा कोपल
३ देशमुख देशपांडे माहालानिहाय
१ पा येलबरगे १ पा कुकनूर
१ पा कृष्णगी
—
३
१ सिद्पगौडा व परवतगौडा पाटील मौजे इटगे पा कुकनूर.
—
६

तारीख ४–७–१७२९

माहे जिल्हेज आषाढमास सु॥ सलासीन
तेरीख १७ रोज पंचमी भृगुवासर मु॥ सातारा
प्रांत पनाला येथील सरदेशमुखीची कमावीस साल्गुदस्ता राजश्री मानाजी केशरकर अजहत सरदेशमुख याचे तरफेने बोगोजी माने यास होती ते दूर करून हाली.........
............सांगोन पाठविले आहेत तरी तुम्ही प्रांत मजकुरच्या जमीदारास ताकीद करून येकंदर आकारदेखील जकाती सायर व कमाविसबाब होईल त्यास दरसदे साहोत्रा प्रो रयत निसबतीने वसूल देवणे म्हणून पत्रे
१ रा॥ उदाजी चवाण हिंमतबहादर

तारीख ७–७–१७२९

छ २१ जिल्हेज सुा सलासीन मया.
राजश्री राजजी राजे व गुणाजी राजे यास पत्र की तानाजी घाटगे यास पत्र जे तुम्ही दर्शनास येतो म्हणून लिहिले तर प्रस्तुत पर्जन्यकाल आहे पुढे प्रसंगोचित स्वामी आज्ञा करणे ते करितील म्हणून पत्रे
१ राजश्री राजजी राजे व गुणाजी राजे
१ तान्हाजी घाटगे सर्जाराऊ
—
२

आषाढ बहुल सप्तमी रविवार.
(ता. ६–७–१७२९)

तारीख ८–८–१७२९

शाहू दप्तर
रु. नं. ४
तेरीख २३ मोहरम रोज श्रावण वदी दशमी भृगुवासर सु॥ सलासीन

राजश्री हिंदुराव घोरपडे ममल्कतमदार यास पत्र जे मुराराऊ घोरपडे यास श्रावणमास जालियावर दर्शनास पाठवितो म्हणून लिहिले तर श्रावणमास जाला याउपर हे पत्र पावताच मारनुलेची रवानगी करून विजयेदशमीस स्वामीसंनिध पावेत ते करणे सकल अर्थ सकल अर्थ तुमच्या मनोगतानरूप होऊन येईल कितेक आज्ञा राजश्री नारो राम मंत्री यास केली आहे ते तुम्हास लिहितील त्यावरून कलो येईल म्हणून पत्रे १

तारीख १८-८-१७२९

माहे सफर तेरीख ४

मातुश्री आईसाहेब व चिरंजीव राजश्री संभाजी राजे याचे पत्राचे जाब कीं रा माहादाजी घाटगे याकडील शरीरसंबंधाचा विचार विशदे लिहिलावरी आम्ही येतद्विषई लेहावे येसी त्याची स्थितरीत नाही म्हणून उभयतास पत्रे २

शाहू दप्तर
रु. नं. ४

तारीख १-९-१७२९

माहे सफर भाद्रपदमास सु॥ सलासीन

तेरीख १८ रोज बहुल पंचमी इंदुवार मुा पेठ सातारा

श्रियासह चिरंजीव राजश्री संभाजी राजे याचे पत्राचा जाब की तुम्ही पत्र पाठविले प्रविष्ट जाले कितेक चिताचे हेतू तुम्ही लिहिला तरी आम्हास लेहावे आम्ही तुमचा हेतू पूर्ण करावा विहित आहे प्रस्तुत राजश्री नरसिपंतासमागमे हती झुलफीकारगज पाठविला आहे घेणे हती थोर उतम अशरफाचा आहे चिता येप्रसंगी नव्हता पुढे पाठविला जाईल नरसोपंती कितेक विनंती केली त्याचे उतर यापासी सांगितले आहे मुखवचने सांगता कलो येईल म्हणून पत्र १

तारीख १५--१०--१७२९

माहे रबिलाखर छ ३ रोज बुधवार

सु॥ सलासीन

स्वामी पनाले प्रांती मसलत मोहिमेस जातात तर तुम्ही फोजेनसी पत्र दर्शनी स्वार होऊन हुजूर येणे येक घडीचा दिरंग न लावणे म्हणून

१ कालोजी भोसले
१ देवजी सोमवंसी
१ मलोजी पवार
१ कृष्णाजी पवार

तारीख १०-११-१७२९.

श्री

शाहू दप्तर
रु. नं. ५५

तालीक

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री संभाजी राजे यासी प्रति राजश्री शाहू राजे कृतानेक आसीर्वाद उपर येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखने संतोवाप्ती करणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले लेखनार्थ श्रवणे चित सानंदीत जाले कितेक तुमचा अभिप्राये रा गोंविंद्राव नीलकंठ यानी निवेदन केला तो चितास आणून आज्ञा कर्तव्य ते यास केली आहे सांगतील यावरून कलो येईल हे सांगितील ते चितात आणून उतर पाठऊन देण मार्गशीर्ष श्रुध प्रतिपद्स पत्र पाठविल असे सद्रहू प्रमाणे मातुश्री आईसाहेबास पत्र
येकूण पत्रे दोनी २

तारीख १४--१२--१७२९

माहे जमादिलाखर सुा सलासीन
तेरीख ४ रोज

राजश्री दावलजीराव सोमवंसी सरलस्कर व सिदोजी थोरात व राणोजी घोरपडे यांच्या परस्पर भेटी जाहाल्या तर तुम्ही व ते येकविचारे राहोन उदाजी चव्हाणास नतीजा देणे त्या प्रांतीची ठाणीठुणी हस्तगत करून संतोशाचे वर्तमान लिहिणे म्हणून पत्रे.

१ दावलजीराव सोमवंसी सरलस्कर
१ जाब दावलजीराव सोमवंसी
१ जाब सिदोजी थोरात
१ भिवराव गोविंद
१ राणोजी घोरपडे यास
———
५

किता पत्रे तुम्ही स्वामीच्या पायासी निष्टा धरून सेवा करून दाखवावियाची उमेद धरिली आहे यैशास हुजरून राजश्री दावलजीराव सोमवंसी सरलस्कर फौजेनिसी पाठविले असेत त्याच्या व राजश्री राणोजी घोरपडे सिदोजी थोरात याच्या तुमच्या भेटी जाल्या असतील या उपर उदाजी चव्हाणास नतीजा देऊन त्याची ठाणीं हस्तगत करून फतेचे वर्तमान लेहून पाठविणे तुमचे ऊर्जित होईल जाणिजे.

१ रघुनाथ देसाई पाा हुकेरी
१ लखमगौडा देसाई पाा हुकेरी

१ सिवलिंगपा देसाई पा गोकाक
१ मुरार रघुनाथ देसाई पा आडगल
१ आपाजी सितोले १ मुरारजी सिंदे याजकडील संताजी जाधव
१ त्रिंबकजी घोरपडे १ सिवाजी घोरपडे
१ नागोजी सांवत

९

१ हुसेनखान यास पत्र

१०

माहे जमादिलाखर सु॥ सलासीन अंदोजी बिन नाईकजी खराडा कापूसखेडकर याचा बाप नाईकजी खराडा आस्टावर उदाजी चव्हाणाचे जुझी स्वामी कार्यावर खर्च जाहाला (ता. १४–१२–१७२९)

तारीख २५–१२–१७२९

पौष वदी प्रतिपदा गुरुवासर
माहे जमादिलाखर छ १५ रोज सु॥ सलासीन
रा॥ त्रिंबकजी घाटगे सर्जाराव याजकडे जमावाचे बेगमीबद्दल मुकासे देहे कर्यात मुरगुड पा कागल
(ता. २७–१२–१७२९) पौष बहुल त्रितीया

तारीख २६–१२–१७२९

माहे जमादिलाखर पौषमास सु॥ सलासीन
तेरीख १६ रोज शुक्रवार मु॥ पाली
रा सिदोजी थोरात यास पत्र की तुम्ही तमाम मुल्कात चौथाईचे रोखे करून उपद्रव मांडिला आहे म्हणून विदित जाले तर तुम्हास सनद पत्र नसता उपद्रव करावयास गरज काये ? हे गोष्टी बरी नाही याउपर रोखे केले असतील ते मना करणे पंचगंगेपलीकडे रोखेपत्र करणे आलीकडे रोखापत्र येकंदर न करणे म्हणून पत्र.

लेखांक ३२ तारीख १८–१–१७३०

माहे रजब सु॥ सलासीन तेरीख ९ रोज
चिटणिसी पत्रे
राणोजी घोरपडे यासी पत्र समाधान पत्र कीं तुमचे सर्वप्रकारे स्वामीस आवश्यक आहे सरलष्कर[1] यानी बोली केली त्याप्रो निर्वाह केला जाईल म्हणून पत्र व सरदारास

---

१ दावलजीराव सोमवंशी सरलष्कर

१ राणोजी घोरपडे
१ त्रिंबकजी घोरपडे
१ आपाजी सितोले
१ सिदोजी थोरात
१ नागोजी सांवत
१ भुसपा

—

६

तारीख ७–२–१७३०

तेरीख २९ रजबु फाल्गुन सुध प्रतिपदा मंदवासर सुा सलासीन मुा उंबरज सेखोजी आंगरे सरखेल यास पत्र जे किले सुधागडासी तुम्ही घसघस लाविली आहे पंचमाहालात उपसर्ग दिला म्हणून हुजूर विदित जाहले तर रा कानोजी आंगरे याचे वेलेस तह चालत आला असेल त्या प्रा चालणे फिरोन बोभाट येऊ न देणे १

तारीख १६–२–१७३०

माहे साबान सुा सलासीन तेरीख ९ रोज मंगलवार

राजश्री त्रिंब्रकराव दाभाडे सेनापति याचा जाब्र कीं तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट जाले आपण व घोरपडे व सरलष्कर त्रिवर्ग येकत्र होऊन हेरलेवरी जाऊन हेरले घेतले वाडा मात्र राहिला आहे तोही घेतो म्हणोन करिता वाडा घेऊन कोल्हापूराभवते राहून चव्हाणास तंबी पोहचवणे लांब न जाणे म्हणून पत्र.

माहे साबान तेरीख १० रोज बुधवार

सु।। सलासीन मु।। उंबरज ता. १७--२--१७३०

श्री शंकराचार्य स्वामीचा मठ संकेस्वरी व करवीरी आहे तेथील अन्नछत्रास गाव त्या प्रांते आहेत त्यास फौजेचा तोष्ट लागेल याकरिता हे आज्ञापत्र सादर केले असे त्याच्या गावास तोष्ट न लगे ते करणे म्हणून पत्रे

१ सेनापति १ सरलष्कर १ राणोजी घोरपडे

३

फाल्गुण शुध त्रयो गुरुवार (ता. १९--२--१७३०)

तारीख २०--२--१७३०)

माहे साबान सु।। सलासीन

तेरीख १३ रोज फाल्गुण सुध चतुर्दसी भृगुवासर मु।। उंबरज

संताजी सर्जाराव घाटगे याचा जाब कीं तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेख-नार्थ विदित जाला त्र्यंबकजी घाटगेविसी लिा तरी ते स्वामीपासी सेवा करितात त्याचे चालवणे आवशक त्याचे चालवणेस अंतर होणार नाही तुमचे स्थलाविसी पेसजी सरलस्कर व घोरपडे यासी लिहिले आहे हली सेनापतीसही लि।। आहे पत्र १

सेनापति १

माहे रमजान सुा सलासीन तेरीख १६ रोज चैत्र बहुल त्रितीया
सौम्यवासर मुा उंब्रज

चिटनिसी पत्रे (ता. २५--३--१७३०)

मौजे अलते येथील ठाणे हस्तगत करून भिवराव गोविंद याचे स्वाधीन केले त्याविशी समाधान पत्रे

१ सेनापति यासी १ दावलजीराव सोमवंसी १ राणोजी घोरपडे
१ विठोजी सर्ज्याराव घाटगे १ सिदोजी योरात
५
१ भिमराव गोविंद यासी पत्र कीं ठाणे चौकसीने राखून स्वामीसेवा करणे
६

राजश्री भगवंतराव पंडित अमात्य यासी पत्र कीं तुम्ही आपल्या सरंजामाविषई लिहिले तरी प्रस्तुत स्वामी स्वारीत आहेत + + हुजूर भेटीस आलियाउपरे जो विचार करणे तो तुमच्या मनोदयानरूप होईल हुजूर राजश्री सिवराम पंत आहेत त्याचे स्वामी चालवीत आहेत म्हणून समाधान पत्र चैत्र बहुल द्वितीया भाले काठ्या व + + +
पाठऊन देणे म्हणून पत्र १

(ता. २५-३-१७३०)

माहे रमजान तेरीख २० रोज चैत्र वद्य सप्तमी भानुवासर सु।। सलासीन

तारीख २९-३-१७३०

मु।। उंब्रज

डोंगरोजी यादव यास पत्र कीं सिवाजी हरि ठाणेदार ठाणे सिराले याणे ठाणि-यासी कौल देऊन पनालियाकडून सिरालीयासी आणविले ते पुढे कराडवरून लस्करात येत आहे त्यासी तुम्ही दबाविता तर सिवाजी हरीने कौल दिल्हा आहे त्याप्रो येऊन देणे फिरोन बोभाट येऊ न देणे

तारीख ९–७–१७३०

राजमंडल माहे मोहरम छ ४ सु॥ इहिदे सलासीन मया व अलफ सरंजाम दिा राजश्री राणोजी घोरपडे इनाम देहे व जमीनी खासा सुलतानजी व आपाजी सितोले इनाम देहे तीन कुलबाब व कुलकानु हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार

१ मौजे आंकली पा रायेबाग

१ मौजे मांजरी पा कागल

१ मौजे पडवी ता पाटस पा पुणे

सिदोजी बिन सिवाजी थोरात याकडे इनाम देहे व जमीन

२ खासा सिदोजी थोरात देह

१ मौजे बाहे का वालवे

सुभा पनाला

१ मौजे कारबे पा हवेली कऱ्हाड

तारीख ९-७-१७३०

राजमंडल प्रांत मल्कापूर

सरंजाम दिा राजश्री राणोजी घोरपडे माहाल हाय प्रा मार पैकी देवब्राम्हण याची इनाम वजा करून बाकी माहाल पैकी उदाजी चव्हाण वसूल घेत होता तो यैवज मशार-निलेस जमावाचे बेगमीस दिल्हा असे सनद बनाम देशाधिकारी व लेखक प्रां मार माहालहायेचा आकार करून चौथाईचा यैवज मारनिलेकडे देणे छ ४ मोहरम सन इहिदे सलासीन माहाल बि ता

१ ता हवेली मलकापूर १ ता सिराले पैकी वजा मौजे कोकरूड

बाकी माहाल १ ता कासेगाव १ ता वारुण —

४

तारीख ९--७--१७३०

शाहू दप्तर

रु. नं. २२

श्री

तेरीख सरंजाम दिमत हिंदुराऊ घोरपडे रुपये

२६३५२५ राणोजी घोरपडे

३२९२०० मुरारजी घोरपडे

९६००० पथक नरगुंद

२८४००० खासा मोघम

१३४००० मोघम
१५०००० सरदेशमुखी
———
२८४०००

———
९७२७२५
५००० नवेगाऊ
———
९७७७२५

तारीख ९--७--१७३०

श्री

यादी साहित्य पत्रे निसबत राजश्री राणोजी घोरपडे पत्रे चिटनिसी
छ ४ मोहरम सन इहिदे
पत्रे
१ विठोजी घाटगे व आबाजी घाटगे कागलकर यास पत्र जे मारनिलेस त्या + + + (प्रांतात पाठविले) आहेत तुम्ही आपल्या जमावानिसी याजसमागमे राहोन स्वामी सेवा करणे पत्र
६ देशमुखास पत्र जे तुम्ही मारनिलेचे आज्ञेत राहोन स्वामीसेवा करणे
१ लखमगोडा देसाई पा हुकेरी
१ तमापा परवगौडा देसाई पा हुकेरी
१ मुरार रघुनाथ देसाई पा आडगल
१ राचापा भरमदेव देसाई पा रायेबाग
१ सिवलिंगापा देसाई पा गोकाक यास पत्र जे तुम्ही या समागमे सेवा करणे स्वामी तुमचे ऊर्जित करतील
१ बालपा हेब्रदुली देसाई पा यादवाड
———
६
७ येकून सात पत्रे दणे.

तारीख ९–७–१७३०

शाहू दप्तर
रु. न. २२

राजमंडल सरंजाम दि॥ राजश्री राणोजी घोरपडे सु॥ इहिदे सरंजाम जमावाचे बेगमीस उदाजी चव्हाण याजबा॥ चौथाईचे माहाल ८१ मुकासे माहाल व देह

किता सरंजाम माहालव्हाय पैकीं देव ब्राम्हणाच इनाम वजा करून उदाजी चव्हाण वसूल घेत होता तो यैवज म॥रनिलेकडे जमावाचे बेगमीबदल मुकासा दिला असे तर प॥ मजकुरचा आकार होईल त्यापैकी चौथाई ऐवज म॥रनिलेकडे वसूल देणे म्हणून देशमुख व देशपांडिये व देशाधिकारी यास पत्रे माहाल छ ४ मोहरम
(ता. ९-७-१७३०)

किता सुभा पनाला पेकी वजा देव ब्राम्हणाचे इनाम वजा करून बाकी पैकी ठाणे इस्लामपुरचे तनखियाचे गाव

३ कर्यात वालवे १ मौजे उरूण १ मौजे कामेरी १ मौजे दुधारी १ मौजे साकराले का॥ आस्टे १ कसबा पेठ कर्यात कोगली

सुभा कऱ्हाड ता॥ ५

बाकी माहालव्हायची चौथाई

सुभा खटाव का॥ ७ सुभा पनाला कर्याती ११ सुभा मलकापूर ता॥ ४

प्रा॥ जमखिंडी १ प्रा॥ रायेबाग १ सुभा माण का॥ ११ सा॥ हवेली विजापूर १८

ठाणे ९ = २७

सुभा मिरज का॥ १५

तेरीज माहाल चौथाई ब॥ चव्हाण

	माहाल
सुभा कऱ्हाड	५
सुभा पनाला	१०
सुभा खटाव	७
सुभा मलकापूर	४
प॥ जमखिंडी	१
सुभा माण	११
सुभा मिरज	१५
हवेली विज्यापूर	२७
का॥ माहाल विज्यापूर	१
	८१

मुकासे माहाल फ़ुट मुकासे वजा करून मुकासे
प्रांत हुकेरी कर्याती १३

किता महाल .।।. पा। हवेली कोलापूर .।।. पा। कागल .।।. सुभा तारले

किता माहाल (निमे निमे)

येकून माहाल सवीस यास राणोजी घोरपडे याचे नावे पत्र जे सदर माहाल तुम्हास जमावाचे बेगमीबदल मुकासा दिला असे सदरहू माहाल अबदुल सतार याजकड हुजरून बिलमक्ता तह करून दिला आहे त्यापैकी तुम्हास नेमणूक रुपये बेरीज

... .

करून दिली आहे हे अबदूल सतार याजकडून वसूल घेणे तुम्ही आपला दाखला माहालास न करणे म्हणून राणोजी घोरपडे याचे नावे सवीस माहालाचे पत्र १

तेरीज मुकासे माहाल

	माहाल	देह
पा। हुकेरी कर्याती		
१३	१	०
कोलापूर कागल तारले	१।।	०
पनाला पैकी	०	२
कीता महाल	१६	०
	———	———
अबदूल सतार	१८।।	२
याजकडील माहाल	२६	

तारीख ९–७–१७३०

शाहू दप्तर

रुमाल नंबर ११

राजमंडल इनामदेह सु।। इहिद

सेवक लोक

दिमत राजश्री राणोजी घोरपडे इनाम देह ४ मोहरम इहिदे सलासीन मया अलफ साधारण संवत्सर

	आज देह
खासा रा। राणोजी घोरपडे	१०
सिदोजी थोरात	३
आपाजी व सुलतानजी सितोले	५
नागोजी सांवत	३
हुसेनखान	१
बाबूराव	१
प्रल्हादपुरी	१
गणेशबन	१

तमाजी पवरगौडा १
तिमाजी भांडवलकर १
अंताजी नरसी १
सुल्तानजी गायेकवाड १

———

२९

तारीख ९--७--१७३०

राजमंडल छ ४ मोहरम सन इहिदे सलासीन

खासा आपाजी व सुल्तानजी बिन बाजी सितोले यास कुल्बाब कुल्कानु हाली पटी पेस्तर पटी

खेरीज हकदार व इनामदार देहे

१ आंकली पा रायेबाग

१ मांजरी पा कागल

१ पडवी ता पाटस पा पुणे

—

३

राजमंडल सरंजाम इनाम सुा इहिदे

तारीख ९--७--१७३०

नागोजी सांवत बिन सयाजी सांवत यास इनाम देह कुल्बाब व कुल्कानु हाली-पटी पेस्तरपटी खेरीज हकदार व इनामदार देहे

१ मौजे दानवाड पा रायेबाग

१ मौजे कलोल कर्यांत जुगुल पा हुकेरी

१ मौजे कोरटी ता रासीन पा कडीवलीत

—

३

छ. ४ मोहरम सन इहिदे सलासीन ता. ९–७–१७३०

छ ४ मोहरम सन इहिदे सलासीन

हुसेनखान बिन दिलावरखान पणी यास इनाम मौजे येमगरणी पा कागल कुल-बाब कुल्कानु खेरीज हकदार व इनामदार इनाम देह १

प्रल्हादपुरी महंत यास मौजे कासारी कर्यांत कापसी प्रांत हुकेरी कुल्बाब कुल-कानु खेरीज हकदार व इनामदार देह १

शाहू दप्तर

रु. नं. ११ तारीख ९–७–१७३०

राजमंडल इनाम देहे नि॥ राजश्री राणोजी घोरपडे इहिदे (सलासीन) तमाजी परव-

गौडा वलद सिदगौडा देशमुख पा। हुकेरी यास इनाम मौजे तारदल ता। आलते पाा हुकेरी सुभा पनाला हा गाव कुलबाब कुलकानु हाली पटी पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार इनाम देह १
सुलतानजी बिन बहिरजी गायेकवाड यास मौजे हुपरी कर्यात इचलकरंजी प्रांत मिरज कुलबाव कुलकानु खेरीज हकदार इनामदार इनाम देह १
बाजी बिन माहादजी सितोले यास इनाम मौजे रणदल कर्यात इचलकरंजी प्रांत मिरज कुलबाब कुलकानु हाली पटी पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार देह १

शाहू दप्तर

रु. नं. १० तारीख ११–७–१७३०

राजमंडल

प्रांत खटाव

राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे यासी कर्यात भालवणी मामले मिरज येथील सरदेशमुखीचे वतन वंशपरंपरेने दिल्हे
छ ६ मोहरम सन इहिदे सलासीन
देहाये बि ताा
१ कसबा भालवणी १ मौजे कलंबे १ मौजे कमलापूर १ मौजे खांबले
१ मौजे तांदुलवाडी १ मौजे दालवडी (दानवाड?) मौजे सिवनी १ मौजे सलमबावी

सरंजाम दिल्हा राजश्री राणोजी घोरपडे पैकी देवब्राम्हणाचे इनामे वजा करून बाकी माहाल पैकी उदाजी चव्हाण वसूल घेत होता तो यैवज मारनिलेकडे जमावाचे बेगमीबदल यैवज देविला असे सनद बनाम देशाधिकारी माहालाचा आकार करून चौथाईचा यैवज मारनिलेकडे देणे माहाल पो छ ४ मोहरम सन इहिदे सलासीन
१ ताा हवेली खटाऊ १ कर्यात निंबसोड माइणी १ कर्यात आऊंद १ कर्यात खानापूर
१ कर्यात इटे भालवणी १ कर्यात मलवडी १ कर्यात वांगी

७

शाहू दप्तर

रु. नं. ४

माहे मोहरम सु। इहिदे सलासीन (ता. १२–७–१७३०)

तेरीख ७ मोहरम श्रावण शुध अष्टमी भानुवासर

संभाजी आंगरे यास पत्र जे तुम्ही विशालगडाखाले चौकी बसविली आहे म्हणून वर्तमान आइकोन स्वाम संतोसी जाहले चौकी जबरदस्त बैसऊन गडावर दाणा येकंदर जाऊ न देणे म्हणुन पत्र १

राजमंडल रोजकीर्द सु॥ इहिदे सलासीन माहे मोहरम छ ४ रोज श्रावण शुध षष्टी भृगुवासर सरंजाम राजश्री राणोजी घोरपडे सरंजाम माहाल (तारीख १०-७-१७३०) येकूण महाल सवीस तुम्हास जमावाचे बेगमीबदल मुकासा दिले आहेत माहे मोहरम सरंजाम राजश्री राणोजी घोरपडे वतने वंशपरंपरेने दिल्ही

सरदेशमुखीचे वतन मशारनुलेस वंशपरंपरेने दिल्हे ब्रि तपसील सुभा प्रांत पनाला कर्याती
१०

सुभा प्रांत मिरज कर्यात
१४

येणे प्रमाणे दोनी सुभाचे सरदेशमुखीचे वतन वंशपरंपरेने करून दिल्हे यास हक लाजीमा पान मान तश्रिफा व इनामती व बाजे कानु काइदे पूर्वील सिरस्ते प्रमाणे देणे म्हणून पत्रे

श्रावण बहुल द्वितीया (ता. २०-७-१७३०)

१ वतन पत्र बनाम रा। राणोजी घोरपडे

२ माहाल सुबे हाये पत्रे

१ सुभा पनाला

१ सुभा प्रांत

३

राजमंडल रोजकीर्द सु॥ इहिदे सलासीन माहे मोहरम छ ४ रोज श्रावण
(ता. ९-७-१७३०)

श्रावण मास सरंजाम राजश्री राणोजी घोरपडे बिन पिराजी घोरपडे वतने मशारनिलेस वशपरंपरेने मन्हामत करून दिधली

मामले मिरज कर्याती १७ येकून देहे १६८ येथील देसमुखीचे वतन मन्हामत केले

तारीख ३१-७-१७३०

राजमंडल

सरंजाम राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे पत्रे छ २६ मोहरम सन इहिदे सलासीन मया अलफ श्रावण बहुल त्रयोदसी साधारण संवत्सर

वतने कर्यात सागली मौजे १० कर्यात इसापूर मौजे ८ कसबे भालवणी प॥ खटाव०

देसमुखी मामले मिरज

कर्यात इचलकरंजी ९ कर्यात रुकडी ९ कर्यात सिरहटी १२ कर्यात उदगाव ९ कर्यात

आजनी कर्यात देसिंग १२ कर्यात भालेवणी ९ कर्यात कविटेयेकंद ८ कर्यात तासगाव ९ १०

कर्यात बेडग कर्यात इटे १० कर्यात कविटे माहांकाल १२ कर्यात मनेराजूरी १५ कर्यात ८

म्हैसाल ७

तेरीज

....

देहे १६८ कर्यात १७

येविसी पत्रे २ फडनिसी १ वतनपत्र माारनिलेचे नांवे १ मोकादम व देशपांडयेच नांवे १ चिटनिसी पत्र देशाधिकारी याचे नांवे

तारीख १-८-१७३०

राजमंडल सरंजाम मुा इहिदे

सलासीन रा। विठोजी सर्जाराव घाटगे कागलकर

छ २७ मोहरम पाा कागल माहाल माारनिलेचे जमावाचे बेगमीस देऊन राजश्री राणोजी घोरपडे यासी सामील होणे म्हणून पत्र १

इहिदे सलासीन

तेरीख १६ सफर रोज अधिक भाद्रपद वद्य चतुर्थी गुरुवासर मुा कसबे उंबरज (ता. २०-८-१७३०)

जाब रा संताजी सर्जाराव घाटगे तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाला तुमचे सर्व प्रकारे चालवणे अगत्य हाली त्रिंबकजी घाटगे हुजूर सेवा करितात चालवितील व तुमचे गाव मुरगूड व येमगे व चिमगाव यासी उपसर्ग न देणे म्हणून पत्रे

१ माारनिलेचा जाब

१ राजश्री राणोजी घोरपडे

१ सिदोजी निंबालकर देसाई पाा हुकेरी

१ आपाजी सितोले

१ विठोजी सर्जेराऊ घाटगे यासी मुरगुड चिखली निमे पूर्वी आहे त्यास उपसर्ग न देणे

तारीख १-९-१७३०

श्री

छ २९ सफर सन इहिदे

यादी राणोजी घोरपडे यास पत्र जे ठाणे इसलामपूरच्या तनखियास मुकासे गाव

३ कर्यात वालवे १ मौजे उरुण १ मौजे कामेरी १ मौजे दुधारी
३

१ मौजे सांकराले कर्यात आस्टे
१ कसबा पेठ कर्यात कोडोली
५

येकून पाच गाव ठाणियाच्या तनखियास आहेत तेथे तुम्ही आपणाकडीस चौथाईचा वसूल न घेणे पूर्वी तुम्हास माहलास पत्रे दिली आहेत त्यामधे सदरहू गाव वजा करून पत्रे दिली आहेत तर तुम्ही आपणाकडील उपसर्ग येकंदर न देणे म्हणून पत्र १
सिदोजी थोरात १
२

येकून पत्रे दोनी देणे

तारीख १–१०–१७३०

माहे रबिलोवल सुा इहिदे सलासीन
तेरीख २९ रोज
फोंड सांवत यासी पत्र जे विशालगडकरी कजिया करितात त्याचे पारपत्याबद्दल रा अंताजी सिवदेव कोकण प्रांते पाठविले असत तरी तुम्हास साहित्याविसी हे लिहितील तरी तुम्ही त्याचे साहित्य करणे म्हणून पत्र १

तारीख ७–१०–१७३०

तेरीख ५ रबिलाखर सुा इहिदे सलासीन आस्विन सुध सप्तमी पत्रे चिटनिसी सगुणाबाई निंबालकरीण यास हुजूर दर्शनास यावयाची आज्ञा केली आहे तरे आपाजी सितोले व नागोजी सांवत
यास फौजेनसी पाठऊन येथपर्यंत सुखरूप पावेत ते करणे म्हणून राणोजी
घोरपडे यास पत्र १
सिदोजी थोरात १
२

तारीख १६–१०–१७३०

माहे रबिलाखर सुा इहिदे सलासीन
तेरीख १५ रोज आश्विन बहुल द्वितीया भृगुवासर
राजश्री सिदोजीराव निंबालकर यासी पत्र जे तुम्हास दोन तीन पत्रे पाठविली परंतु अद्यापि

आले नाही राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि विशालगडास हस्तगत करावयास गेले त्यासमागमे फौज गेली येथे स्वामी ब्रा फौज आसिली पाहिजे तरी फौंजेनसी येणे

तारीख १४–११–१७३०

माहे जमादिलोवल छ १४ रोज कार्तिक बहुल प्रतिपदा सुा इहिदे सलासीन.
राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार यासी पत्र जे सगुणाबाई व रा मुरारजीराव घोरपडे स्वामीसंनिध आले उभयेताची स्वामीची भेटी जाली तुम्ही केल्या निश्चयाप्रमाणे यास दर्शनास पाठविले यावरून स्वामी संतोषी जाले स्वामीनी सर्वप्रकारे याचा अभिमान धरिला आहे येविसी कितेक आज्ञा राजश्री नारो राम मंत्री यास केली आहे त्याणी तुम्हास लिहिले आहे ते वचने स्वामीची मानून आपले समाधान असो देणे म्हणून चिटनिसी पत्र १

तारीख २७–११–१७३०

तेरीख २७ जमादिलवल सुा इहिदे सलासीन
रा राणोजी घोरपडे व सिंदोजी थोरात याचे पत्राचे जाब जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले लेखनार्थ विदित जाला फौजेनसी चव्हाणावर गेले तरी उतम केले मान पाहोन नतीजा पोहचावणे राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यावर त्याणे तोंड टाकीले तर त्यास नतीजा पोहचावणे म्हणून पत्रे चिटनिसी २
रा गोविंदराऊ मोरे यास जाब जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले लिहिले वर्तमान कलो आले रा नारो राम मंत्री याणी या प्रांते बलवंत राऊ ठेविले त्याणी फौज ठेऊन नकश बराच केला मातबर फौज वेगला काटकावरी शह बसत नाही म्हणोन व कोपलचे उस्तवारीविसी कितेक लिहिले येशास त्या प्रांते जप्त बैसवावा हे स्वामीस अगत्य आहे प्रस्तुत हिंदुराव घोरपडे याचे पुत्र रा मुरारजी घोरपडे हुजूर आले आहेत मनसबयाचा विचार कर्तव्य तो करून त्या प्रांते जप्त बैसे तोच अर्थ केला जाईल म्हणून पत्र

राजमंडल रोजकीर्द
माहे जमादिलाखर मार्गशीर मास सुा इहिदे सलासीन तेरीख २ रोज शुध चतुर्थी
सोम्यवासर मुकाम उंब्रज (ता. २--१२--१७३०)

रा संताजी सर्ज्याराऊ घाटगे याचे गाव मौजे मुरगुड व चिमगाव यास उपद्रव न देणे व येमगे येथील ठाणे घेतले आहे ते याचे स्वाधीन करणे याचे भाऊ राणोजी घाटगे यास आपलियाजवली आणून कजिया आरंभिला आहे हे गोष्टी बेहिसाब आहे ते आपले आपल्यात समजतील येविसी पत्रे चिटनिसी

१ राणोजी घोरपडे १ आपाजी सितोले १ सिदोजी थोरात

१ सिदापा देसाई निपाणीकर

—

४

१ संताजी सर्जाराऊ यास पत्र जे राणोजी सर्जाराऊ व तुम्ही येकाविचारे वर्तणे त्याचा तुमचा पूर्वीपासून विभाग चालत असेल तो त्याचा त्यास देणे चिखली निमे त्याची आहे ते त्यास देणे कलह न करणे म्हणून पत्र

—

५

तारीख २६–१२–१७३०

तेरीख २६ जमादिलाखर सु॥ इहिदे सलासीन

किता पत्रे जे चव्हाणाचे बातमीचे वर्तमान लिहिले ते कलले मागती त्याचे बातमीत राहोन वर्तमान वरचेवर लिहित जाणे म्हणून पत्र

१ भिवराऊ गोविंद

१ बावाजी थोरात

किता पत्रे ता। तारले व आरले व आसडोली प्रांत तारले या माहालात रा। कुसाजी भोसले व येसाजी भोसले याकडील अमलास तुम्हाकडून खलेल होते म्हणून विदित जाले तरी निमे माहाल तुम्हाकडे निमे मा।रनुलेकडे मुकासा आहेत आकार होईल त्यापैकी निमे उभयाकडे पावेल बाकी निमे यैवज तुम्ही घेणे त्याचे अमलास खलेल न करणे म्हणून पत्रे.

१ राणोजी घोरपडे १ सिदोजी थोरात

१ आपाजी सितोले

मौजे रासिवडे व सांगरूल हे दोनी गाऊ हुजूर खासगीकडे आहेती तेथे तुम्हाकडून उपद्रव लागतो म्हणून विदित जाले तरी खासगीचे गावास उपद्रव लागावा हे गोष्टी उतम नाही देहाय मा।रास उपद्रव न देणे तेथील अमल खासगीकडील कमाविसदाराकडे सुरलीत चाले ते करणे व वाडी रत्नागिरी व मौजे कुसुर व आसुरली येथील गुरे नेली आहेत ते सोडून देणे म्हणून पत्रे

१ राणोजी घोरपडे २ सिदोजी थोरात

१ आपाजी सितोले

लेखांक ३३ तारीख २१–१–१७३१

राजमंडल माहे रजब पौषमास

सु॥ इहिदे सलासीन तेरीख २३ मुकाम कसबा उंबरज

राजश्री मुरारजी बिन सिदोजी घोरपडे हिंदूराव यांजवरी स्वामी कृपालु होऊन छ मारीं हिंदूराईचा किताब दिल्हा

तारीख २३–१–१७३१

राजमंडल माहे रजब सु।। इहिदे सलासीन तेरीख २५ रोज पौश वद्य येकादसी मंदवासर मुा का उंबरज
रा आबाजी घाटगे सर्ज्याराव याचा जाब की तुम्ही विनंती पत्र पाठविले तें प्रविष्ट जाहले कितेक आपला अर्थ लिहिला व प्रांतास घोरपडे याचा उपसर्ग लागतो म्हणून लिा तरी घोरपडे यास तुम्हाविसी आज्ञा करावी ते स्वामी करितील. संक्रमणाचा तिलगूल पाठविला तो प्रविष्ट जाहला १

तारीख २८–१–१७३१

माहे रजब छ ३० रोज सुा इहिदे सलासीन
राजश्री संताजी सर्ज्याराव घाटगे यासी पत्र जे साहोत्रेचे वतन राजश्री सचीवपंत याचे आहे तरी याकडील कमाविसदारास मुरगुडास जागा देऊन सर्वप्रकारे साहित करणे म्हणून पत्र १

तारीख २–२ १७३१

शाहू दप्तर
रु. नं. २२

राजमंडल सरंजाम लस्कर सु।। इहिदे
सलासीन
दिमत राजश्री सिदोजी बिन बहिरजी घोरपडे हिंदूराव
किता वतनपत्र माघ शुध सप्तमी भौम्यवासर शके ५७ साधारण संवत्सर दिल्हे वतनपत्र यैसीजे तुमचे पुत्र राजश्री मुरारजीराव घोरपडे यानी स्वामीसनीध कसबे उंबरज पा कऱ्हाड येथील मुकामी विनंति केली की आपल्या वडिलास पूर्वी माहाराज राजश्री

काकासाहेब कैलासवासी यानी सरदेशमुखी वतन करून दिल्हे होते ते माहाराज स्वामीनी दूर करून हुजूर ठेविले आहे ते अजऱ्हामऱ्हामत करून देऊन वंशपरंपरेने चालविले पाहिजे म्हणून विनंती केली त्यावरून मनास आणून तुम्ही स्वामीच्या राज्यातील पुरातन येकनिष्ट सेवक तुमच्या वडिली निष्ठेने सेवा केली तुम्हीही निष्ठेने सेवा करिता तुमचे चालवणे आवश्यक जाणून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन अजहद पंचगंगा तहद रामेस्वर पावेतो सरदेशमुखीचे वतन तुम्हास व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने मऱ्हामत करून दिल्हे असे तरी तुम्ही सदरहू प्रमाणे सरदेशमुखीचे वतन आपले दुमाला करून घेऊन कुली जमाबंदीदेखील सायेर जकायेत व फुरोई आकार होईल त्यास सरदेश-

मुखीचा हक रयेत निसबतीने दरसदे १० दाहोत्रा प्रमाणे व कानुकाइदे पानमान तश्रीफ वसूल घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वतन अनभऊन सुखरूप राहाणे छ ५ साबान सु॥ इहिदे सलासीन मया अलफ सनदा फडनिसी कोनाडेची पत्रे

१ वतनपत्र राऊ मारनिले नांवे

१ पालेगारानी व देशमुखानी व देशपांडियानी माहालानिहाय अजहद पंचगंगा तहद रामेस्वर सरदेशमुखीची सनद

२

तारीख २-२-१७३१

राजमंडल

राजमान्य राजश्री मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही का उंबरज पाा कराड येथील मुकामी येऊन विनंती केली जे पूर्वी आपल्या वडिलास माहाराज राजश्री काकासाहेब कैलासवासी याणी दौलत देऊन सेवा घेतली होती त्याप्राा माहाराज स्वामीनी कृपाळू होऊन आपणास दौलत दिलेया सेवा करू म्हणून विनंती केली...... स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन राजश्री सिदोजी हिंदूराव घोरपडे यासी दौलत दिली होती ते दूर करून तुम्हास दिली असे तरी तुम्ही दौलत अनभऊन स्वामी सेवा निष्ठेने करीत जाणे शके ५७ साधारण संवत्सर माघ शुध सप्तमी भोमवासर सुा इहिदे सलासीन मया अलफ छ ५ साबान सनद १

(ता. १४-२-१७३१)

माघ बहुल चतुर्थी रविवासर

फडणिसी पत्रे तपसीलवार बार आलाहिदा आहेत

१ सरदेशमुखी अजहद पंचगंगा तहद रामेश्वर राजश्री सिदोजी हिंदूराव घोरपडे यासी मारनिलेचे नांवे

१ हिंदूराव घोरपडे याचे नांवे पत्र

अजहद पंचगंगा तहद रामेस्वर जिल्हा सांगितला आहे आकार होईल निमे यैवज हुजूर निमे मारनिलेकडे

गंगाजल निर्मल सगुणाबाई निंबाळकर यासो मौजे.........................

इनाम दिला

चिटनिसी पत्र मोर्तबी भागा सिका दकाराचे राा मुरारजी हिंदुराऊ घोरपडे वजारतमाब यासी दौलतीचा किताब

१

राजश्री मुरारजी घोरपडे वजारतमाब यासी सिकेनिसी

सनद

१

तारीख १५--२--१७३१

राजमंडल सरंजाम सुा इहिदे

सलासीन दिा राजश्री सिदोजी हिंदुराव घोरपडे छ १८ शाबान किता सनदा राऊ मारनिलेचे नांवे समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री हिंदुराव घोरपडे ममलक्तमदार यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही स्वामीचे येकनिस्ट सेवक निस्टेने सेवा करिता तुम्हावरी स्वामी कृपाळू होऊन अजहद पंचगंगा तहद रामेस्वर पावेतो तुम्हास जिल्हा सांगितला आहे तरी तुम्ही निमे यैवज हुजूर पावीत करून निमे यैवज तुम्ही घेऊन स्वामी सेवा निस्टेने करीत जाणे येविसी पत्र माग शुध सप्तमी भौमवासर फडनिसी पत्र १

(ता. २--२--१७३१)

राजमंडल रोजकीर्द

तारीख १५--२--१७३१

माहे साबान सुा इहिदे सलासीन

तेरीख १८ रोज माघ बहुल पंचमी इंदुवासर (मु॥ उंबरज)

चिटनिसी पत्रे पालेगारानी व देशमुखानी व देशपांडियानी माहालानिहाय अहद पंचगंगा तहद रामेश्वर यासी पत्र जे त्या प्रांतीचा जिल्हा राजश्री हिंदुराव घोरपडे ममलक्तमदार याचे स्वाधीन केला आहे त्यासी रुजू होऊन यैवज देणे निमे हुजूर पावीतील निमे म॥रनिले घेतील म्हणून

तारीख १८-२-१७३१

राजमंडल किले हाय

किले कोपल

सरंजाम छ २१ साबान माघ बहुल अष्टमी सन इहिदे सलासीन साधारण संवछर किले मारच्या तनखेयास पेशजी पासून मुकासे आहेत त्याप्रमाणे करार

१ पा हवेली कोपल १ पा गदक १ पा कृष्णागी १ पा कुकनूर

सुदामत तहा प्रा वसूल देणे—

४

तारीख २२–२–१७३१

माहे साबान सुा इहिदे सलासीन

तेरीख २५ रोज माघ वद्य द्वादसी इंदुवासर

रा आबाजी घाटगे सर्ज्याराव याचा जाब कीं विनंती पत्र पाठविले प्रविष्ट जाले तेथे लिा कीं कागल प्रांत स्वामीनी आपणास दिल्हा तेथे चौकडून उपद्रव लागतो

म्हणोन लिा तरी ज्याकडून उपद्रव लागतो त्यास ताकीद केली जाईल पकवान्य जिनस केलियेला पाठविली ते प्रविष्ट जाहली म्हणून पत्र १

तारीख २७-२-१७३१

माहे रमजान सुा इहिदे सलासीन

तेरीख १ रोज फाल्गुण शुध द्वितीया मंदवासर मुा कसबे उंबरज छ मारी राजश्री स्वामी कऱ्हाडास जाऊन राजश्री संभाजी राजे याची भेट १४ चवदावे घटकेस जाहाली आणि सायंकाली माघारे कसबे मारास येऊन सवेच रात्रौ माघारे कऱ्हाडास गेले मुा कसबे कऱ्हाडास केले

कऱ्हाड व जखीणवाडीमधे मालावरी भेटी होऊन कसबे मारी श्री कृष्णा ककुदमतीवरी मुकाम केले शके ५७ साधारण नाम संवत्सर फाल्गुण शुध द्वितीया मंदवासर

तारीख १-३-१७३१

शाहू दप्तर
रु. नं. ३७

श्री भवानी प्रसन्न

विनंती उपरी राजश्री संभाजी राजे याची भेटी जाहालीयाचे पत्रे घेऊन जासूद जातात यास रुपये भरोन देणे

३०० राजश्री प्रधान पंत ४०० राजश्री फत्तेसिंग भोसले व दावलजी सोमवंसी सरलस्कर व कानोजी भोसले ३०० त्रिंबकराव दाभाडे सेनापति २५ राजश्री संभाजी आंगरे याकडे २५ राजश्री सेखोजीं आंगरे २५ उमाबाई दाभाडे

....

येकून पावणेअकरासे रुपये भरोन देणे हे विनंती

छ ३ रमजान

तारीख ७-३-१७३१

राजमंडल रोजकीर्द

माहे रमजान सुा इहिदे सलासीन

तेरीख ८ रोज फाल्गुण शुध दशमी भानुवासर मुा कसबे उंबरज छ मारी स्वामीचे कूच लस्करे समुदायानसी उंबरजेहून होऊन सातारा चौ घटका रात्रौ राजश्री संभाजी राजे यांसी समागमे घेऊन आले १

माहे सवाल चैत्रमास सुा इहिदे सलासीन तेरीख १५ रोज प्रतिपदासह

द्वितीया इंदुवासर (ता. १२-४-१७३१)
रा आबाजी सर्ज्याराऊ घाटगे यास जाब जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिले वृत कळले घोरपडे याकडील व वडगावाकडील उपसर्ग कागल माहालास बहुत लागतो म्हणून लिहिले तरी पूर्वी त्यास आज्ञा कर्तव्य ते केली आहे हालीही आज्ञा केली असे ते उपसर्ग देणार नाहीत म्हणून पत्र १

तारीख १६-४-१७३१

शाहू दप्तर
रु. नं. ३८

राजमंडल सुा इहिदे सलासीन

सरंजाम राजश्री संभाजी राजे छ १ रमजान फाल्गुण शुध द्वितीया मंदवासर सुहूर सन इहिदे सलासीन मया व अलफ साधारण नाम संवत्सरी उभयेताच्या भेटी कसबे कराडी चवदा घटिका दिवस आला ते समई भेटी जाहाल्या सरंजाम छ १९ सौवाल चैत्र बहुल शस्टी भृगुवासर इहिदे सलासीन विरोधकृत संवत्सर मुलुक नेमून दिल्हा चिटनीसी...... ....पत्रे

(डावी बाजू)

अजहद वारणा तहद संगमकृष्णा तदपासून निवृतीसंगम तुंगभद्रापावेतो दरोबस्त मुलुक देखील गडकोट ठाणी देविली येविसी देशमुख व देशपांडे माहालानिहाय यास पत्र जे तुम्ही याचे आज्ञेत वर्तोन वसूल देणे येविसी पत्रे

१ पा॥ कागल १ पा॥ हुकेरी १ पा॥ गोकाक १ पा॥ जमखंडी
१ पा॥ तेरदल १ पा॥ तोरगल १ पाा कितूर १ पा॥ गदक
१ पा॥ लखमेश्वर १ पा॥ जालेहाल १ पा॥ बदामी १ पा॥ हावनूर
१ कर्यात अडगल १ पा॥ मुधोल पंचमाहाल १ पा॥ नवलगुंद
१ पा॥ नरगुंद
१६

१ देशमुख व देशपांडे अजहद तहद
१ सिदपा देसाई पा॥ हुकेरी
१ हिंदुराव घोरपडे यासी पत्र जे तुम्हाकडे गडकोट ठाणी आहेत ती स्वाधीन करणे

ठाणेदारास पत्र जे ठाणी स्वाधीन करणे
१ बावाजी थोरातास पत्र वडगावचे ठाणे पाडून स्वाधीन करणे
१ ठाणेदार आलते नांदणी घुणकी हेरले हातकणंगले ही ठाणी हवाले करणे

उजवी बाजू)

कोकण प्रांत अजहद सालसी पलीकडे तहद पंचमाहाल आकोले दरोबस्त दिल्हा येविसी पत्रे

१ देशमुख व देशपांडे अजहद तहद यास पत्र जे तुम्ही चिरंजीवाचे आज्ञेत राहोंन
अमलदाराकडे वसूल सुरलीत देणे
१ फोंड सांवत भो॥ सरदेसाई पा॥ कुडाल
४ देशमुख व देशपांडे यास पत्रे
१ सुभा कुडाल १ सुभा फोंडे १ सुभा भीवगड १ सुभा आकोले.
४

कोपलचा किला चिरंजीव राजश्रीकडे दिल्हा येविसी पत्रे जे चिरंजीवाची पत्रे घेऊन त्याचे स्वादीन किला करणे
१ मुद्राधारी १ गोविंदराऊ मोरे १ सुभानराव मोरे
१ बलवंतराऊ सिवदेव
४

कुसाजी भोसले यास पत्र जे अजहद वारणा तहद तुंगभद्रापाबेतो मुलुक व गडकोट ठाणी चिरंजिवाचे स्वाधीन केला असे तुम्ही त्या प्रांते उपसर्ग न देणे पत्र १
किले गगनगड ऊर्फ बावडा हा किला चिरंजिवाचे पत्र घेऊन येतील त्याचे स्वाधीन करणे म्हणून पत्रे
१ भगवंतराव पंडित
१ मुद्राधारी यास
२

तारीख १६-४-१७३१

श्री

छ १९ सवाल सन इहिदे सलासीन
यादी देशमुख व देशपांडिये माहालानिहाय यासी पत्र जे ता प्रांत चिरंजीव राजश्री संभाजी राजे याजकड दिला आहे तर तुम्ही चिरंजीवाकडील अमलदारासी रुजू होऊन पा मजकुरचा यैवज सुरलीत वसूल देणे म्हणून पत्रे
१६ देशमुख माहालनिहाय
१ पा कागल १ पा हुकेरी १ पा गोकाक १ पा जमाखिंडी
१ पा तेरदल १ पा तोरगल १ पा कितूर १ पा गदक १ पा लखमेस्वर
१ पा जालेहाल १ पा बदामी १ पा हावनूर १ कर्यात आडगले
१ पा मुधोल पंचमहाल १ पा नवलगुंद १ पा नरगुंद
———
१ फोंड सांवत कुडाल
१ संवस्थान कनकगिरी
———

१ सिदापा देसाई पा हुकेरी
——
१९
येकून पत्रे येकोनास देणे

श्री

यादी पत्रे चिरंजीव राजश्री संभाजी राजे याजकडता प्रांत दिला असत देसक
१ फोंड सांवत १ कागल १ चिकोडी १ गोकाक १ जमखिंडी १ तेरदल
१ तोरगल १ कितूर १ गदक १ लक्ष्मेश्वर १ जालेहाल १ बदामी १ हावनूर
१ अडगल १ नणदी १ मुधोल १ नवलगुंद १ नरगुंद———
१८

कनकगिरी

तारीख १६–४–१७३१

राजमंडल रोजकीर्द माहे सवाल सु॥ इहिदे तेरीख १९ सवाल चैत्रबहुल शस्टी भृगुवासर चिरंजीव राजश्री संभाजी राजे याजकडील पत्रे चिटनिसी पत्रे ३०

(डावी बाजू)

आजहद वारणा तहद संगम कृष्णा तद पासून निवृतीसंगम तुंगभद्रापावेतो दरोबस्त मुलुक दिला येविसी पत्रे जे तो प्रांत चिरंजीव राजश्रीकडे देविला आहे तुम्ही याचे आज्ञे प्रमाणे वर्तणूक करून चिरंजीवाकडील अमलदारासी रुजू होऊन पा मजकुरचा दरोबस्त वसूल देणे देखील गड कोटाचे ठाणी दिली

————————देशमुख व देशपांडिये

————————————————माहालनिहाय

१ पा कागल १ पा हुकेरी १ पा गोकाक १ पा जमखंडी १ पा तेरदल १ पा तोरगल १ पा कितूर १ पा गदक १ पा लखमस्वर १ पा जालेहाल १ पा बदामी १ पा हावनूर १ पा कर्यात आडगल १ पा मुधोल पंचमहाल १ पा नवलगुंद १ पा नरगुंद
——
१६

१ देशमुख व देशपांडे आजहदतहद
——
१६

१ सिदपा देसाई पा हुकेरी
——
१७

१ ठाणेदार अलते व नांदणी व घुणकी हेरल व हातकणंगल यासी पत्रे चिरंजीवाकडील पंत्रे घेऊन येतील त्याचे स्वाधीन करणे

१ बावाजी थोरात यास पत्र जे वडगावचे ठाणे पाह्रून स्वाधीन करणे व हेरले व अलते

नांदणी हातकणंगले घुणकी येकून पांच ठाणी ठाणेदारास ताकीद करून स्वाधीन करणे
२०

१ हिंदुराव घोरपडे यास पत्र जे तुम्हाकडे गडकोट ठाणी आहेत ती स्वाधीन करणे
२१

(उजवी बाजू)

कोंकण प्रांते अहद सालसी तहद पंचमाहाल आकोले दरोबस्त दिले येविसी पत्रे देशमुख व देशपांडे अजहद तहद यास पत्र जे तो प्रांत चिरंजीव राजश्री याजकड दिला आहे तुम्ही याचे आज्ञेत वर्तोन अमलदाराकडील वसूल दणे

१ फोंड सांवत भोसले पा कुडाल यास पत्र

१ देशमुख व देशपांडे अजहद तहद यासी

१ सुभा कुडाल १ सुभा फोंडे १ सुभा भीवगड १ सुभा आकोले
४

कोपलचा किल्ला चिरंजीवाचे पत्र घेऊन येतील त्याचे स्वाधीन करण पत्रे

१ मुद्राधारी १ गोविंदराव मोरे

१ सुभानराव मोरे १ बलवंतराव सिवेदेव
४

कुसाजी भोसले यासी पत्र जे अजहद वारणा तहद तुंगभद्रापावेतो मुलुक व गडकोट ठाणी चिरंजीवाचे स्वाधीन केली आहेत तुम्ही त्या प्रांते उपसर्ग न देणे हेरले व आलते नांदणी हातकणंगले घुणकी सदरहू ठाणीं याचे स्वाधीन करणे व वडगावचे ठाणे पाडून स्वाधीन करण पत्र १

गगनगड ऊर्फ बावडा हा किल्ला चिरंजीवाचे पत्र घेऊन येतील त्याचे स्वाधीन करण पत्रे

१ भगवंतराऊ पंडित यासी

१ मुद्राधारी यास

पत्रे ३०

तारीख १७–४–१७३१

राजमंडल सन इहिदे सलासीन

राजश्री संभाजी राजे छ १ रमजान फाल्गुण सुध द्वितीया मंदवारी दर्शण होऊन भेटी जाल्या ते छ २० शौवाल चैत्र बहुल सप्तमी मंदवासरे ते दिवसी चंद्रोदई स्वार होऊन कोडोलीवर गेले

माहे सवाल छ २० रोज सप्तमी मंदवासरे (ता. १७–४–१७३१)

देशमुख देशपांडये कर्यात नाझरे यास पत्र जे सिदोजी सेटगे उदाजी चव्हाणा बराबर इंदापूर परगणियांत गेले त्याणी मौजे निबसाकर येथील माणसे आठ धरून आणून

कैदेत ठेविली आहेत आणि त्याजवली पेका मागतात त्यास सांगोन माणसे सोडून देवणे म्हणून पत्र १

पत्र चैत्र बहुल प्रतिपदा रविवार

माहे एप्रिल इ. स. १७३१

शाहू दप्तर

रु. नं. ३३

राजमंडल किले हाये

किता किले

१ किले रायेगड १ ठाणे इसलामपूर १ ठाणे कसबे मिरज

१ ठाणे सोनी १ किले कोपल तहमुले राजश्री संभाजी राजे याजकडे गेले ५

तारीख १३-५-१७३१

माहे जिल्काद वैशाखमास सुा इहिदे सलासीन तेरीख १७ रोज मुकाम पेठ शाहूनगर चिरंजीव राजश्री संभाजी राजे याकडे ठाणे देविली येविसी पेसजी आज्ञापत्रे सादर केलीच आहेत हाली आज्ञापत्रे + + + तरी ठाणी त्याचे स्वाधीन करणे म्हणून पत्रे देऊन भिवजी सिंदे व माहदजी पवार हुजरे पाठविले यास देविले

रुपये

१० बावाजी थोरात यास पत्र जे वडगावचे ठाणे पाडून देणे व हेरलाचे ठाणे देणे म्हणून पत्र या कामास मसाला

१० वेंकटराऊ नारायेण ममलकतमदार यास नांदणीचे ठाणे देणे म्हणून पत्र

१० आनंदराऊ सालोखी व भिवराऊ गोविंद यास अलते येथील ठाणे येविसी

३०

तारीख १७-६-१७३१

राजमंडल रोजकीर्द

माहे जिल्हेज जेष्टमास सुा इसने सलासीन तेरीख २२ रोज बहुल नवमी गुरुवासर मुकाम पेठ शाहूनगर

चिरंजीव राजश्र संभाजी राजे याचे पत्राचा जाब जंजिरे रत्नागिरी व तासगाऊ या ठाणियाविसी

पत्र

रा नीलप्रभू यास पत्र जे १

तुम्ही अविलंबे दर्शनास येणे १

२

तारीख १७–६–१७३१

शाहू दप्तर
रु. नं. ४

राजमंडल रोजकीर्द

माहे मोहरम आषाढमास सुा इसने सलासीन तेरीख १६ रोज वदी द्वितीया मंदवासरे मुा पेठ शाहूनगर ताा छ १८

ताा सालसी प्रांत राजापूर येथे चिरंजीव राजश्री संभाजी राजे याकडील अमल होता त्यास तहमध्ये ताा माार या तर्फेस आला याकरिता तेथील अमल राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि याचे स्वाधीन केला आहे याणी आपले तर्फेने ताा मााराास कमाविसदार पाठविले आहेत तरी पेसजी चिरंजीवाकडे निमे यैवज पावत होता त्याप्रमाणे यैवज याकडे वसूल देवणे म्हणून पत्रे

१ ताा मााराास पत्र बनाम देसमुख देसपांडिये
१ सेखोजी आंगरे सरखेल
१ फोंडसांवत भोसले

---

३ योा

पत्रे छ माार

सिके पाा हुजूर रसानगी
मदारी चोपदार बिराद-
री तुलाराम

तारीख २५–९–१७३१

राजमंडल सुभा सातारा सुाा इसने तह मुकासे दिाा राा फतेसिंग भोसले छ ४ रबिलाखर इसने मुाा देाा बाा व सरदेशमुखी व साहोत्रा व बिघावणी जो आकार होईल त्यास पनाल्करियाचा अमल जेथवरी असेल तेथे तह प्राा त्यास पावल बाकी यैवज पैकी सरदेशमुखी साहोत्रा बिघावणी वजा करून राहिल्या यैवजाची वाटणी दरसदे रुाा

५० निाा खालिसा
५० स्वराज्य
  २५ मुकासा
  २५ निाा जिल्हे

  ५०

१००

यास गाव
ता उंब्रज ता हवेली सातारा

....

१० ४॥

ता तारगाव

....

३॥

राजमंडल तारीख १०--१०--१७३१

दिमत मजमु सुा इसने सलासीन माहे रबिलाखर छ १९ रोज

राजश्री पिराजी घोरपडे व सिदरामपा + पलोन राजश्री शाहू राजे याकडे गेले होते त्यास मध्यस्त विठोजी चव्हाण घेऊन रेखाजी जाधव हुजरून पाठऊन हुजूर आणिले पनाला + + + (बाकीचें पान गहाळ)

तारीख २४--१०--१७३१

शाहू दप्तर
रु. नं. ४

राजमंडल

रोजकीर्द

माहे जमादिलवल सुा इसने सलासीन तेरीख ३ रोज पंचमी रविवार मुकाम शाहूनगर

किता चिटनिसी पत्रे जे तुम्ही विंनती पत्रे पाठविली ती प्रविष्ट जाली लिहिले वर्तमान कलो आले स्वामीची आज्ञा घेऊन राजश्री

समागमे मनोलीस येऊन तेथून निरोप घेऊन राजश्री हिंदुराऊ घोरपडे याकडे जाऊन स्वामीचे आज्ञे प्रो त्यास सांगितले राजश्रीकडून रा निल्कंठराऊ आले त्याची व हिंदुरायाची भेटी होऊन निश्चय जाला हिंदुरायानी आपले पुत्र रा दौल्तराऊ घोरपडे फौजेच्या धंद्यास राजश्रीचे स्वाधीन केले आपण पूर्वी मनसबियाचा अर्थ सेवेस निवेदन केलाच आहे प्रस्तुत साहेता करून सेवा होऊन ये तो अर्थ केला पाहिजे म्हणून लिहिले व राजश्री नारो राम मंत्री याणी स्वामीस विदित केले त्यावरून स्वामी बहुत संतोष पावले तुम्ही बुधीमंत तुम्हापासून अंतराये न होये यैसा निश्चये मानिला होता तदनुरूपच कर्तव्यार्थ तुम्ही संपादिला उतम केले पुढील मनसब्याचा अर्थ तर चिरंजीव राजश्रीची साह्यता करून ते प्रांतीचा बंदोबस्त करावा हे स्वामीस अवश्यक आहे रा॥

+ हे सिदरामपा परगणे गोकाकचे देसाई आहेत.

नीलकंठराऊ आले आहेत विचार अवलंबे कर्तव्य ते केले जाईल म्हणून पत्रे

१ सगुणाबाई निंबाळकर — १ हिंदुराऊ घोरपडे
१ मुरारजी घोरपडे......... — १ नारो साबाजी
१ केशवराऊ रघुनाथ

५

....

तारीख २९-११-१७३१

माहे जमादिलाखर सुा इसने सलासीन तेरीख १० रोज द्वादसी (मार्गसीर्षशुध) इंदुवासर मु॥ पेठ सातारा

ता सालसी प्रांत राजापूर हा माहाल तहमुले या तर्फेस आला या करिता पेसजी चिरंजीव राजश्री संभाजीराजे याकडील अमल होता तो हुजूर ठेऊन राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि याचे स्वाधीन केला आहे याणी आपले तर्फेने कमाविसदार पाठविले आहेत हे चिरंजीवाकडे अमल होता त्याचा वसूल घेतील चिरंजीवाचे सनदेने खासगी व किलेकोटचा तनखा व मुकासे गाव होते ते दूर केले असेत तेथील अमल हे करतील तर कमावसदाराचे सर्वप्रकारे तुम्ही साहित्य करून याकडील अमल सुरलीत चाले ते करणे म्हणून पत्रे चिटनिसी

१ रा॥ फोंडसांवत भोसले सरदेसाई पाा कुडाल यास सदरहू मजकूर लेहून आपणाकडील दखलगिरी न करणे व कितेक आज्ञा करणे आहे तर

आपणाकडील भला माणूस हुजूर पाठवणे म्हणून पत्र

१ संभाजी आंगरे

१ चंदोजी घाटगे मु॥ जंजिरे सिंधुदुर्ग सदरहू मजकूर लेहून जंजिरे मा॥रचे यैवजाविसी पंडित मा॥रनिल्हे आज्ञा करणे ते केली आहे तुम्ही माहालात दखलगिरी न करणे म्हणून पत्र

१ देशमुख व देशपांडे ताा माार

४

तारीख ३०-११-१७३१

श्री

यादी पत्रे ताा सालसी बार कीर्द छ ११ जमादिलाखर सन इसनें सलासीन देशमुख व देशपांडे ताा मजकूर यासी पत्र कीं राजश्री संभाजी राजे याजकडील मुकासी गाव व खासगीकडील गाव किले व कोटचा तनखा आहे तो दूर करून राजश्री श्री निवास पंडित प्रतिनिधि याच्या जिल्ह्यात आहे त्याणी आपले तर्फेने रा .... कमाविसदार पाठविले आहेत तर तुम्ही माारनुलेस रुजू होऊन ताा माारचा उसूल माारनुलेकडे देणे — पत्र १

चंदोजी घाटगे हावलदार जंजिरे सिंदेदुर्ग यासी पत्र कीं ता मजकूर राजश्री संभाजी राजे याचा तह जाहला तेसमई ता मजकूर इकडे जिल्हा आहे त्यास राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि याच्या जिल्हयांत आहे त्याणी आपले तर्फेने कमाविसदार रा.......... पाठविले आहेत तर ता मजकूर मुकासे वगैरे त्याचे सनदेने आहेत ते दूर करून हुजूर खासगीकडे ऐवज आणविला आहे हे हुजूर ठेऊन पाववीतील सांवताकडील माहालामध्ये उपसर्ग होतो याकरिता त्याचाही बंदोबस्त करणे ते केली आहे जंजिरे मारचे ऐवजाविसी जे आज्ञा करावयाची ती राजश्री पंतप्रतिनिधि यास केली आहे

तारीख १२-१-१७३२

लेखांक ३४

शाहू दप्तर

रुमाल नं. ३५

राजमंडल मुलुकगिरी प्रांत दक्षण

राजश्री संभाजी राजे यास पत्र जे रा बाजीराव पंडित प्रधान पराभव संवत्सरी दक्षण प्रांते गेले होते ते समई संस्थान सोंधे यावरी कसाला पडला हे तुम्ही जाणतच आहा अलाकडे संस्थानिकाकडून अया हुजूर येऊन संस्थानाची नातवानीचा प्रसंग निवेदन केला त्यास संस्थानाचा उपद्रव वारोन संरक्षण व्हावे या अर्थे दरसाल पाच हजार होन संस्थानाकडे करार केले त्यास तुमची आमची भेटी जालियावरी संस्थान तुम्हाकडे दिले त्यास संस्थानाची नातवानी जाणोन आम्ही आपणाकडील नियेत केला होता तो त्यास माफ केला असे तरी तुम्ही त्यास त्वष्ट न लावणे त्याचे सर्व प्रकारे चालवणे म्हणून पत्र १

छ २५ रजब सन इसने सलासीन

तारीख १३-१-१७३२

राजमंडल रोजकीर्द

माहे रजब पौषमास सु॥ इसने सलासीन तेरीख २५ रोज बहुल द्वादसी गुरुवासर मु॥ पेठ किले सातारा.

चिरंजीव राजश्री संभाजी राजे यास पत्र जे संस्थान सोंधे येथून रामचंद्र नाईक रुसवा करून निघोन सावनूराकडे गेले आहेत तेथून संस्थानास उपद्रव करावा या कल्हावरी आहेत व तुम्हाकडे अनुसंधान लाविले आहे म्हणुन कलो आले येशास संस्थानचे संरक्षण होऊन उपद्रव लागो न द्यावा हे उभयेपक्षी आगत्य आहे तरी रामचंद्र नाईकास अनुमोदन सहसा न देणे संस्थानिकाचे संस्थानिकाकडे जात ते करणे म्हणून पत्र १

तारीख २२-१-१७३२

राजमंडल मुल्कगिरी

सु।। इसने सलासीन

किता सनद छ ५ साबान पूर्वी दौलत राजश्री सिदोजी हिंदुराव घोरपडे यासी दिल्ही होती ते दूर करून हाली राजश्री मुरारजी बिन सिदोजी हिंदुराव घोरपडे यासी दौलत दिली असे किताब वजारतमाब दिल्हा असे चिटनिसी १

तारीख १२-२-१७३२

माहे साबान छ २६ इसने सलासीन

उदाजी चव्हाण यांचे युधप्रसंगी ठाणे आष्टे येथे स्वामी कार्यावर खर्च जाला याकरिता याचे चालवणे आवश्यक जाणोन प्रांत पनाला पैकी पड जमीन तीन प्रतीची (फिरंगोजी बिन संताजी फालके) या सेवकाचे वंशपरंपरेनें इनाम दिल्हा

माहे फेब्रुवारी, मार्च इ. स. १७३२

माहे रमजान फाल्गुनमास सु।। इसने सलासीन

द्वारकाबाई घोरपडे यास जाब कीं तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले र।। राणोजी घोरपडे याचे ल्ग्न योजिले आहे म्हणून लिहिले तरी ल्ग्नसिधी करून संतोषाचे वर्तमान स्वामीस लिहिणे म्हणून पत्र चिटनिसी १

माहे रमजान सु।। इसन्ने सलासेन ता. ७-३-१७३२

तेरीख २० रोज फाल्गुण बहुल सप्तमी मुकाम शाहूनगर

सरंजाम सनदा राजेश्री उदाजी चव्हाण हिमतबहादर ममलकतमदार याजकडे जमावाचे बेगमीबदल मुकासे सनदा फडनिसी फाल्गुण बहुल पंचमी भानुवासरे विरोधकृत संवत्सरे (ता. ५-३-१७३२)

प्रांत विज्यापूर देवब्राम्हणाचे इनाम गाव वजा करून चौथाई मा।नुलेच्या जमावाच्या बेगमीबदल मुकासा दिला आसे तरी यासी रुजू होऊन पा मारचा आकारदेखील जकात होईल त्यापैकी चौथाई मारनुलेकडे उसूल देणे म्हणोन सनदा

१८

प्रांत माण पैकी..कर्यात

१०

किता सनदा कर्यात..प्रांत मिरज

पैकी

९

ठाणी

९

१ पा तालेकोट सरकार
१ पा केमबावी सरकार
१ सरकार सगर
सरकार मलेखेड प्रांत बेदर
येथील.................................
९

किता पंचमहाल सा मजकूर पैकी पेशजीच्या मुकाशियाकडून दूर करून हाली मारनुलेच्या जमावाचे बेगमीस मुकासा दिला आसे

५ पा

देशमुख व देशपांडे माहालानिहाये अहद तुंगभद्रा तहद कावेरी प्रांत कर्नाटक निमेपैकी निमेमुकासा जमावाचे बेगमीबदल मुकासा दिला असे तरी यासी रुजू होऊन प्रांत मजकुरचे मुकासबाब निमेपैकी निमे व जकात निमेपैकी तह प्रा यैवज याकडे उसूल देणे म्हणोन सनद

१

सनदा ६४

तारीख ५-४-१७३२

माहे सोवाल तेरीख १९ रोज चैत्र बहुल शष्टी सौम्यवासर मुा शाहूनगर सुा इसने सलासीन

रा उदाजी चव्हाण बिन विठोजी चव्हाण हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक निष्टेने सेवा करितात त्याचे चालवणे आवश्यक जाणून स्वामी याजवरी कृपाळू होऊन मौजे + + पा मंगलवेढे प्रांत विजापूर हा गाव वंशपरंपरेने इनाम १ येविसी पत्रे

तारीख १९-४-१७३२

श्री

माहे जिल्काद सु॥

इसने सलासीन

यादी मालजी चव्हाण यास राजपत्र जे सरदेशमुखी भिरज प्रांतीची राजश्री नारो राम मंत्री याकडे आहे तरी तुम्ही साहिताकता सरदेशमुखीचा अमल सुरलीत चालत ते करणे म्हणोन लेहून दिल्हे पाहिजे म्हणोन पत्र येक देणे

तेरीख ४ रोज वैशाख शुध शष्टी सोम्यवासर मुा शाहूनगर

तारीख २५–६ १७३२

शाहू दप्तर
रुमाल नं. ४

माहे मोहरम सलास सलासीन

तेरीख १३ रोज आषाढ शुध त्रयोदशीम्हे चतुर्दशी रविवासरे सु॥ शाहूनगर

रा भूपतराऊ देसाई पा अथणी यास समाधानपत्र जे चव्हाणास तुम्हाविसी ताकीद केली आहे चालवितील म्हणून पत्र १

तेरीख ७ सफर श्रावण शुध अष्टमी

सौम्यवासरे (ता. १९–७-१७३२)

रा रत्नोजी पांढरे शाहामतमुलुक यास जाब

तारीख ३१–७–१७३२

तेरीख १९ सफर श्रावण बहुल षष्टी इंदुवासर सु॥ सलास सलासीन राजश्री उदाजी चव्हाण हिमतबहादर ममलकतमदार यासी पत्र जे विजापूर प्रांतीचे सरदेशमुखीच्या अमलास राजश्री नारो राम मंत्री याणी रा बसवंतराऊ यास पाठविले आहेत तरी तुम्ही माहाली माहालाच्या जामीदारास ताकीद करून एकंदर आकारदेखील जकाती व कमाविस बाब होईल त्यास सरदेशमुखीचा रुसूम दरसदे दाहोत्रा प्रमाणे वसूल घेणे आपले तर्फेच्या अमलदारास ताकीद करून अमलास खलेल न करणे व मलाबादेवरून मार्गाची रहदारी चालत आहे त्याप्रो चाले ते करणे म्हणून चिटनिसी पत्र १

तारीख १४-८–१७३२

राजमंडल

माहे रबिलोवल भाद्रपदमास सु॥ सलास सलासीन छ ३ रोज शुध पंचमी इंदुवासर

किता पत्रे चिटनिसी

दक्षण प्रांतीच्या बंदोबस्तानिमित्य रा उदाजी चव्हाण हिमतबहादर ममलकतमदार यास तुंगभद्रेपलीकडे रवाना केले असे तरी सनदे प्रमाणे अमल करितील तुम्ही आपणाकडील कमाविसदारास ताकीद करून याचा अमल सुरलीत चाले ते गोष्टी करणे कोणेविसी खलेल होऊन न देणे म्हणून चिटनिसी पत्रे

१ हिंदुराऊ घोरपडे
१ सगुणाबाई निंबाल्कर
२

पत्रे श्रावण बहुल अष्टमी सौम्यवासर सिके पा फेरिस्त चिटनीस
(ता. २–८–१७३२)

तारीख १०-११-१७३२

राजमंडल

माहे जमादिलाखर मार्गसीर मास सु॥ सलास सलासीन

तेरीख २ रोज चतुर्थी भृगुवासर मु॥ शाहूनगर

रा उदाजी चव्हाण हिमतबहादर ममलकतमदार यास खास दस्तकाचे पत्र जे चिरंजीव राजश्री संभाजी राजे याच्या मुल्कात तुम्ही धामधूम करून गुरेढोरे वलिता व पैका घेता म्हणून विदित जाले तर त्याच्या मुल्कात उपसर्ग करावया दरकार आहे तह जाला आहे त्यास तफावत न होय ते करणे गुरे ढोरे आणिली आसतील ते सोडून देणे व पैका घेतला असेल तो फिरोन देऊन पावलियाचे कबज घेणे या कामास संकराजी सेलार व मानाजी जगदले हुजरे पाठविले आहेत यास दर आसामीस रु॥ ५ पाच प्रो वेतनात देविले असेत आदा करणे म्हणून पत्र मसाला रु॥ १०

तारीख ३-१२-१७३२

छ २५ जमादिलाखर सुा सलास सलासीन

राजश्री आनंदराऊ सोमवंसी सरलष्कर यास पत्र जे चिरंजीव राजश्री संभाजी राजे याकडील मोरेश्वर भट कासीकर याचे देणे याची वरात अकरासे रुपयाची तिगस्तां रा दावलजी राऊ याकडे दिल्ली होती ते आपसुख जाली नाही म्हणून विदित जाले तरी सदरहू रुो कासी नाईक पैठणकर याचे पदरी घालून पापू याचे कबज घेणे म्हणून पत्र १

तारीख ३-१२-१७३२

शाहू दप्तर
रुमाल नं. २२

श्री

यादी सनद सरलस्कर याकडे जे चिरंजीव राजश्री संभाजी राजे याकडील कासीकराचे देणियाबदल तुम्हाकडून रुपये ११०० अकरासे रास देविले आहेत तरी सदरहू येवज चिरंजीव संभाजी राजे याकडील कासी नाईक पैठणकर याचे पदरी घालणे म्हणून सनद.

लेखांक ३५ — तारीख २५-५-१७३३

शाहू दप्तर
रु. नं. ५

माहे जिल्हेज जेष्टमास सुा आर्बा सलासीन तेरीख २१ रोज बहुल अष्टमी भृगुवासर मुकाम शाहूनगर

रा मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब यास जाब जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले लिहिले वर्तमान कलो आले या प्रांते स्वामीच्या फौजा आल्या त्यास

आपण सामील होऊन स्वामीकार्य कर्तव्य ते केले आपली वासना स्वामीचे पाय पहावे यसी आहे म्हणून लिहिले व रा नारो राम मंत्री याणी सविस्तर विदित केले यैसीयास प्रस्तुत पर्जन्यकाल आहे चातुर्मासानंतर केशवराव रघुनाथ यास पाठऊन देणे विचार मनास आणून आज्ञा कर्तव्य ते केली जाईल म्हणून पत्र १

तारीख २५-८-१७३३

माहे रबिलोवल श्रावणमास सुा आर्बा सलासीन तेरीख २५ मुा शाहूनगर
पिराजी सर्ज्याराव घाटगे यासी पत्र जे तम्ही विनंती पत्र पाठविले लेखनार्थ अवगत जाहाला सुलतानजी इंगले आले त्याणी निस्ठेचा अर्थ निवेदन केला तुम्ही पुरातन येकनिस्ट तुमचे हाते सेवा घेऊन उर्जित करावे हे स्वामीस आवशक आहे दर्शनास यावयाचा विचार लिहिला त्यावरून दर्शनास यावयाची आज्ञा केली असे स्वार होऊन दर्शनास येणे पत्र १

तारीख २१-११-१७३३

रांजमंडल रोजकीर्द

माहे जमादिलाखर सुा आर्बा सलासीन तेरीख २४ जाखर कार्तिक बहुल येकादसी सोम्यवासरे राणोजी घोरपडे यास जाब जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविस्ट जाहले लिहिला अभिप्राय अवगत जाहला रा बालोजी सालोंखी यानीही निवेदन केले ऐसीयास तुम्ही राज्यातील पुरातन येकनिस्ट सेवक तुमच्या वडिली श्रमसाहस करून यशकीर्ति संपादिली तुम्हीही त्याचप्रमाणे लौकिक संपादिला स्वामी संतोसी कराल हा निशा आहे स्वामीसही तुमचे ऊर्जित तुमचे हाते स्वामीकार्ये घेणे अवशक आहे वरकड बालोजी सालोंखी यास आज्ञा केली आहे ते लिहितील त्यावरून अवशत बाबी पत्र १

लेखांक ३६ तारीख १९-१-१७३४

माहे साबान पौषमास सुा आर्बा सलासीन तेरीख २४
रा फोंड सांवत भोसले सरदेसाई पा कुडाल याचे पुत्र नागसांवत

तारीख १४-२-१७३४

माहे रमजान माघमास सुा आर्बा सलासीन तेरीख २० रोज वदी अष्टमी गुरुवार मुा शाहूनगर

रा फोंडसांवत सरदेसाई पा कुडाल यास पत्र जे रा नागसांवत याचा तुमचा हर्षामर्ष वाढला होता ते समई त्याणी बैल लुटिले त्यामध्ये राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि याचे कोटीचे बैल लुटिले त्याउपर नागसांवत याचा तुमचा तह जाला नागावा तुम्ही द्यावा ते गोष्टी केली नाही यैशास तुम्ही वतनदार लोक प्रामाणिक तुम्हाकडे यैसे

कजिये असो नयेत त्यामध्ये पंडित मारनिल्याकडील लूट नागावा ठेवावा हे उचित नाही याउपर ये गोष्टीस दुसरा विचार न करिता मारनिलेकडील कोठीचे बैल लुटिले त्याचा निकाल बरहुकूम जाबिता जराबाजरा करून देणे दीर्घ दृष्टीने विचार करोन वर्तणूक करणे म्हणोन पत्र १

तारीख १०-४-१७३४

राजमंडल रोजकीर्द

माहे जिल्काद चैत्रमास सुा अर्बा सलासीन तेरीख १६ रोज बहुल त्रितीया सौम्यवासर मु॥ शाहूनगर

रा॥ आबाजी सर्ज्याराऊ घाटगे यास पत्र की तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट जाले लिंहले वर्तमान कलो आले येसियास तुम्ही पुरातन येकनिष्ट सेवक आहा तुमचे चालवणे स्वामीस अवश्यक आहे

रा नीलकंठराव त्रिंबक हुजूर आले होते त्यास तुमचेविसी आज्ञा करणे ते केली आहे ते तुमचे चालवावयास अंतर करणार नाही म्हणून पत्र १

माहे आक्टो., नोव्हें. इ. स. १७३४

राजमंडल रोजकीर्द माहे जमादिलाखर सुा खमस सलासीन मया व अलफ राजश्री भगवंतराऊ रामचंद्र यास जाब की तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले कितेक निष्ठेचा अर्थ लिहिला तो कलो आला कलसपाकी तिवट व सेला पाठविला तो पावला म्हणून पत्र १

लेखांक ३७ तारीख १८-९-१७३५

शाहू दप्तर
रु. नं. ५
रोजकीर्द
राजमंडल

माहे जमादिलावल आश्विनमास राक्षस संवत्सर तेरीख ११ रोज शुध त्रयोदसी गुरुवासर मुा शाहूनगर राजश्री भगवंतराऊ पंडित यास पत्र जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले लिहिले वर्तमान अवगत जाले रा संभाजी आंगरे सरखेल याणी आपणासी कटकट वाढवून उत्पात आरंभिला आहे येविसी त्याकडील कारकून हुजूर आले आहेत त्यास आज्ञा करून कलह न करीत तो अर्थ करावा म्हणून विस्तारे लिहिल येसियास गतवर्षी खोचन्याची गढी त्यानी घेतली त्यामुले कलह वाढला त्यास स्वामीनी आज्ञा करून गढी देवविली येसे असता तुम्हीच कलहास प्रवर्तोन राजापूर मारिले मुलूख खराब केला येगोष्टीस त्याचा अपाये काये आहे याउपर तुम्ही विवेक

वर्तलियाने तेही मुरलीत वर्ततील स्वामीनीही येविसी त्यास आज्ञा करणे ते केलीच आहे उभयेपक्षी सौरस राहून मुल्काची खराबी न होये तो अर्थ करणे म्हणून पत्र १

पत्र छ मजकूर

लेखांक ३८ तारीख २०-५-१७३६

श्री

शाहू दप्तर

रु. नं. ५

राजमंडल

माहे मोहरम सुा सीत सलासीन

तेरीख १९

राजश्री फोंडसांवत भोसले सरदेसाई प्रा कुडाल यासी जंजिरे सिंधुदुर्ग हे स्वामीचे माहास्थल येथील तनखा पावावयास तुम्ही उपसर्ग विशेश्यातकारे लाविता केवल मर्यादा सोडून वर्तणूक मांडली आहे तरी हे गोष्टी कार्याची नाही याउपरी मर्यादेस अंतर न होय आसी सूचना योजावी लागेल जेणेकरून हर्शामर्श न वाढे ते करणे व किले प्रसिधगडच्या तनखीयास उपद्रव करिता हे वर्तणूक स्वामीस मानणार नाही सर्व प्रकार चिरंजीव राजेश्री सी मर्यादेने वर्तावयास अंतर न करणे भगवंतराव रामचंद्र यास निग्रह केला आहे त्याकडील उपराला किमपी न करणे किले मारास दाणा जवारा सामानाचा निग्रह न होय ते करणे म्हणून पत्र १

फेरिस्त चिटनिसी पत्र १

तारीख २९-५-१७३६

शाहू दप्तर

रुमाल नं. ५

राजमंडल माहे मोहरम सु॥ सबा सलासीन तेरीख २८ रोजमंदवासर अधिक जेष्ट बहुल अमवाशा नल संवत्सर माहाराज राजश्री संभाजी राजे यांजकडील ताकीद पत्रे परवानगी हुजूर रसानगी मुलुकचंद चोपदार चिरंजीव राजश्री यासी रा भगवंतराव रामचंद्र अमर्यादेने वर्तणूक करितात त्यावरी निग्रह केला आहे तरी तुम्ही त्याचे साहित्य सर्वथी न करणे चिरंजीव राजश्री आज्ञा करितील त्याप्रा याकडील साहित्य करीत जाणे व जंजिरे सिंधुदुर्ग येथील आरमारासी तुम्हाकडील आरमार मुजाहीम होऊन स्वारी सिकारी चालोदेत नाही सतत[1] वाढविली आहे तरी हे गोष्ट कार्याची नाही कलह न करणे तिकडील कौल नसिला तरी ते पारिपत्य करितील तुम्ही मुजाहीम[2]

१ वैर. २ प्रतिबंध करणारा.

न होणे तुमचा कौल नसिला त्याचे पारिपत्य तुम्ही करणे ते मुजाहीम होणार नाहीत तिकडील तनखियासी उपद्रव करिता हे उतम नव्हे याउपरी तनखियासी उपद्रव न लावणे जंजिरियासी सतत न वाढवणे म्हणून

१ राजश्री संभाजी आंग्रे सरखेल यासी येणे प्रा पत्र

१ राजश्री नाग सांवत भोसले यासी कीं चिरंजीव राजश्री

यासी तुम्ही मर्यादेने वर्तत नाही किले कोटच्या तनखियासी मुल्कास उपद्रव करिता हे गोष्टी कार्याची नाही तनखियासी मुलकास उपसर्ग न देणे आज्ञे प्रमाणे याचे वर्तत जाणे अंतर केलिया क्षमा होणार नाही म्हणोन

—

२

राजश्री नीलकंठराव त्रिंबक याजकडील कर्ज व नालबंदी घेऊन चाकरीस आला नाही तरी सदरहू रुपये कर्ज नालबंदीचे असतील ते करवीरास जाऊन राऊ मारनिलेकडील माग वारणे म्हणून ताकिद पत्रे

तारीख ४-८-१७३६

शाहू दप्तर

रु. नं. ५

राजमंडल रोजकीर्द

माहे रबिलाखर श्रावणमास

सु॥ सबा सलासीन नलसंवत्सर

तेरीख ८ रोज शुध नवमी सौम्यवासर मु॥ शाहूनगर

रा सिदोजी थोरात यास खास दस्तकाचे पत्र जे कसबा कोडोली चिरंजीव राजश्रीकडील खासगीचा गाव तेथे वारणे नदीत सरकारचा टोकरा सालाबाद चालतो त्यास आपणही हासील घेऊ म्हणून तुम्ही कथला करिता म्हणून हुजूर विदित जाले तरी सालाबाद त्याकडील टोकरा चालतो हासील तिकडे पावतो ऐसे असता तुम्हास खलखल करावयास प्रयोजन काय आहे ? हे गोष्टी कार्याची नाही हाली हे आज्ञापत्र सादर केले असे तरी टोकऱ्याच्या हासीलास कजिया न करणे सुदामत प्रमाणे हासील तिकडे पावेल तुम्ही कजिया केलिया स्वामीस मानणार नाही र॥ राणोजी घोरपडे याचे मध्यस्तीत तुम्ही होतेस स्वामीसनीध करार जाल्याप्रमाणे तुम्ही निभाऊन द्यावे त्यास ते गोष्टी अद्यापि न जाली हे अपूर्व आहे याउपर देखत आज्ञापत्र स्वार होऊन राणोजी घोरपडे यास कोल्हापुरास घेऊन जाऊन जाल्या कराराप्रमाणे समाधान करून देणे या कामास जोत्याजी मान्या हुजऱ्या पाठविला यास मसाला देविला रु॥ १०

तारीख २८-११-१७३६

माहे साबान सु॥ सबा सलासीन

तेरीख ५ रोज मार्गसीर्ष शुध सप्तमी भानुवासरे शके ६३ नलनाम संवत्सरे मु॥ शाहूनगर

किता पत्रे सरंजाम राजश्री संभुसिंग जाधवराव यास पेशजी राजश्री उदाजी चव्हाण याजकडे यैन मुकासे माहाल व चौथाईचे माहाल मुकासे दिल्हे होते ते दूर करून हाली मारनिलेस जमावाचे बेगमीबदल फुटमुकासे व देवब्राम्हणाचे इनामगाव वजा करून यैन मुकासे महाल व चौथाईचे

माहाल व जकाती तह प्रा करार करून देऊन सनदा फडनिसी नलनामसंवत्सरी दिल्हया पत्रे.

लेखांक ३९ तारीख ६-२-१७३७

राजमंडल रोजकीर्द

माहे सवाल सुा सबा सलासीन

तेरीख १६ रोज माघ बहुल द्वितीयासह त्रितीया भानुवासरे शके ६३ नलनामसंवत्सरे मुा कसबे उंब्रज

किता पत्रे तिलगूल पाठविला तो पावला म्हणून पत्र राजश्री भगवंतराऊ पंडित यास आज्ञा केली यसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रा होऊन लिहिला अभिप्राय सविस्तर अवगत जाला कदीमीचा निस्टेचा अर्थ विशेष लिहिला ऐशास तुम्ही परंपरागत सेवक तुमचे चालवावे तुम्हीही निस्टेने वर्तावे हे उचित आहे तुम्ही शाहाणे लोक आहा जेणकडून धण्याची मर्जी राहे त्या विचारे वर्तावयास अंतर न कर्णे स्वामीही त्यास लिहिणे ते लेहून तुमचे चालवावयास अंतर न करीत तो विचार केला जाईल म्हणऊन जाब माघ बहुल चतुर्थी इंदुवासर पत्र १ (ता. ७-२-१७३७)

तारीख २१-१०-१७३७

राजमंडल रोजकीर्द दिा मजमु सुा समान सलासीन माहे

रजब तेरीख ६।७ रोज कार्तिक शुध नवमी भृगुवासर शके ६४ पिंगल नाम संवत्सरे मुकाम कसबे उंब्रज

किता पत्र चिटनिसी जाब राजश्री आबाजी सर्ज्याराऊ घाटगे याणी विनंती पत्र पाठविले प्रा होऊन वर्तमान विदित जाले कितेक निस्टेचा अर्थ व पुढे सेवा करून दाखवावी हा अर्थ लिहिला व सखो देवाजी याणी स्वमुखे निवेदन केला त्यावरून कलो आला तुमचे चालवावे सेवा घ्यावी हे स्वामीसही अवशक आहे येसियास चिरंजीव फतेसिंग भोसले ते प्रांते येतील तेव्हा तुम्ही याची भेटी घेणे स्वामीनीही त्यास सांगणे ते रीतीने सांगितले आहे ते तुमचे चालवावयास अंतर करणार नाहीत म्हणऊन पत्र

लेखांक ४० तारीख २६-३-१७३८

माहे जिल्हेज तेरीख १६ सुा समान सलासीन मुा मौजे कोणगाऊ
राजश्री स्वामी चव्हाणावरी मसलतीस चालिले
म्हणऊन नांवनिसीवार नजर केली रुो ७०

तारीख १४-४-१७३८

राजमंडल रोजकीर्द

दिा मजमु सुा समान सलासीन छ ५ मोहरम ताा मिनहू

किता येक पत्र चिटनिसी वर्ते नांव राजश्री आबाजी सर्ज्याराऊ घाटगे यास आज्ञापत्र कीं तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय सविस्तर अवगत जाला चिरंजीव राजश्री चे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून सेवा करून दाखवणे आपले निस्टेचा अर्थ लिहिला तरी तुम्ही तैसेच सेवक आहा स्वामीसेवा करून दाखवून स्वामी तुम्हावर संतोषी होत तो अर्थ करणे म्हणून जाब पत्र १

राजमंडल पाा रायेबाग ताा हवेली
मौजे कविठे

१ मुा माहदर्जः सिंदे यासी जमावाचे बेगमी बदल फडनिसी सनद छ ११ सफर सन समान सलासीन (ता. २०-५-१७३८)

तारीख २०-५-१७३८

माहे सफर सुा समान सलासीन

तेरीख ११ रोज जेस्ट शुध त्रयोदसी मंदवासर मुकाम वाडी कसबे मिरज शके ६५ काल्युक्तनाम संवत्सरे नजीक कृष्णातीर

किता येक पत्रे चिटनिसी राजश्री स्वामीची स्वारी उदाजी चव्हाण याजवरी जाली असता त्याचे कबिले व ठाणियातील लोकाचे व ऱ्यादियाचे कबिले गावगना आसरा देऊन ठेविले आहेत त्यास कैद करून हुजूर घेऊन येणे उजूर कराल तरी मुलाहिजा होणार नाही म्हणऊन मसालियाची पत्रे............................गावगना

१ मोकदम कसबे अलास १ मौजे नांदगी १ कसबे येकसंबे १ मौजे दानवाड १ कसबे इचलकरंजी १ कसबे ऐनापूर
६

देसाई १ पाा जमखिंडी १ पाा सप्तसागर
१ सिदापा देसाई पाा रायबाग
३

तारीख १९-६-१७३८

शाहू दप्तर

रु. नं. १८

राजमंडल पथके सुा तिसा सलासीन.

रा। आबाजी घाटगे याजकडे जमावाचे बेगमीबद्दल मुकासे छ १२ रबिलोवल सन तिसा प्रांत मिरज देहे

कर्यात तासगाव २

१ मौजे ढवली १ मौजे तुरची। २

कर्यात मनेराजूरी पैकी मौजे कुमठे १

३

लेखांक ४१ तारीख ३-२-१७३९

माहे जिल्काद सु।। तिसा सलासीन

तेरीख ४ रोज माघ शुध शस्टी

राजश्री आबाजी सर्ज्यारिाव घाटगे याचा जाब कीं तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविष्ट जाहले लिहिले वर्तमान विदित जाले व सखो देवाजी याणीही निवेदन केले सामान पाठविले ते तुमचे लि।। प्र।। प्रविष्ट जाहाले म्हणून जाब १

तारीख २३-२-१७३९

दि।। मजमू सु।। तिसा सलासीन

तेरीख २४ रोज माघ बहुल येकादसी गुरुबासरे शके ६५ काल्युक्त नाम संवत्सरे मुकाम कसबे म्हैसाल नजीक कृष्णातीर

कि।। येक पत्र वर्ते नांव बनाम राजश्री खानगौडा बहादर देसाई पा लक्ष्मेस्वर यास आज्ञा कीं तुम्ही पाठविले प्रविस्ट होऊन लेखनाअभिप्राय अक्षरसाहा अवगत जाला सावनूरकर नवाब यास सख्य प्रसंग निमित्यें प्रेत्न कर्तव्य ते केला तथापि विवेकावरी न येता सावनूरीहून कूच करून लक्ष्मेस्वरास आले कोटास वेढा घालून हस्तगत केले पुढे स्थले घ्यावी संस्थान उछेद करावा हे वासना धरून निकर्श मांडिला आहे त्यास आपण पूर्वीपासून माहाराजाचे स्थापित आसो अभिमान धरून संस्थानाचे सवरक्षण होऊन संकट निवारण करावे म्हणून लिहिले व रायाजी दिवाकर हेजीब पाठविले याणी मुखता सविस्तर अर्थ विदित केला व रा नारो राम मंत्री याणीहि विनंती केली ऐशास तुम्ही पुरातन निस्टायुक्त वर्तत आला आहा ते स्थल स्वामीचे यैसे पूर्ण चितात कल्पून पहिले ही संस्थापना युक्त साहित्यास आंतर जाले नाही पुढेही अभिमानपूर्वक तुमचे संकट निवारण करून देशश्वस्त राहावा तुमच्या हाते कितेक कार्यप्रयोजने संपादून घ्यावी हेच आवश्यक आहे सांप्रत राजश्री येसाजी भोसले व घनशाम नरहर यास

फौजेनिसी राकेले आहे जे आज्ञा कर्तव्य ते त्यास केली आहे जेणेकडून तुमचे स्थलाचे संरक्षण होऊन संकट निवार होये तोच अर्थ करितील वरकड राजश्री नारो राम मंत्री लिहितील व रायाजी दिवाकर मुखवचने सांगतील त्यावरून कलेल म्हणऊन पत्रे तुम्ही वस्त्रे पा। ती पावली येथून तुम्हास वस्त्रे पा। असेत ते घेणे म्हणून जाब

तारीख ३-३-१७३९

शाहू दप्तर
रु. नं. ५४

राजमंडल रोजकीर्द दि॥ मजमू सु। तिसा माहे जिल्हेज
तेरीख ३ रोज फाल्गुण शुध पंचमी मंदवासरे शके ६५ काल्युक्तनाम संवत्सर मु॥ कसबे म्हैसाल कर्यात मजकूर नजीक श्री कृष्णातीर

तारीख २७-३-१७३९

श्री

कि॥ येक इनाम पत्र बनाम बाजी बिन बालोजी मोरे याणे हुजूर स्वामीसनीध कसबे म्हैसालचे मुकामी विनंती केली कीं अथणीचे युध्य प्रसंगी आपला वडील भाऊ स्वामी कार्यावरी खर्च जाला आहे तरी स्वामीनी येक गाव इनाम करुन देऊन वंशपरंपरेने चालविले पाहिजे म्हणून सु॥ तिसा छ २७ जिल्हेज शके ६५ काल्युक्तनाम संवत्सरे

माहे आगस्ट-सप्टेंबर इ. स. १७३९

माहे जमादिलाखर तेरीख सु। आर्बेन मु॥ मौजे वाडी प्रांत मिरज
किता पत्र चिटनिसी जाब राजश्री आबाजी सर्जेराऊ घाटगे कागलकर यास कीं तुम्ही विनंती पत्र पा। ते प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जाले

तारीख २७-१०-१७३९

रोजकीर्द
राजमंडल

दिमत मजमु सुा आर्बेन तेरीख ५ रोज कार्तिक शुध सप्तमी मंदवासर शके ६६ सिधार्थीनाम संवत्सरे मुा मौजे वाडी प्रांत कसबा मिरज
मेजवानी राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यास भोजन करू घालून आज्ञा दिल्ही ते समई बहुमान

वस्त्रे खासा व पुत्र वगैरे तमाम	भूषणे
लोकास दिल्ही	१ तुरा मोतियाचा
मंदीले जामेवारे किनखाप चादर	माला (माळा) पदके

दुपटे पटके सेले अस्टगोली

पासोडी तिवटे

कडे जडावाचे

तरवार
हती १
घोडा

लेखांक ४२ तारीख २७-२-१७४०

सुा आर्बेन माहे जिल्हेज तेरीख १० रोज फालगुण शुध येकादसी सौम्यवासरे शके ६६ सिधार्थीनाम संवत्सरे मुकाम पेठ किले सातारा उर्फ शाहूनगर जमा नजर राजश्री स्वामी उदाजी चव्हाण याजवरी मोहिमेस गेले होते ते मोहीम सर करून त्यास पराभवाते पावून आपली ठाणी बसविली आणि मिरजेचा कोट घेऊन दिलेलखानास धरून आणिले तीन वरसे मोहिमेस जाऊन फते करून आले याजकरिता नजर केली.

तारीख २९-२-१७४०

शाहू दप्तर
रुमाल नं. १

श्री गुरुवर्य प्रसन्न

यादी छ १२ जिल्हेज हातरोखे कीं

चिरंजीव राजश्री याच्या मुल्कात उपसर्ग देताती त्यास ताकीद पत्रे जे त्याच्या मुलकात उपद्रव न करणे व रामचंद्र बावाजी यास फोंडे व सुपे प्रांती ठाणी घ्यावयास पाठविले आहेत त्यास सामील होऊन येकमत विचार करून कोंकण प्रांतीची ठाणी हस्तगत करणे राजश्री आज्ञा करतील त्याप्रमाणे वर्तणूक करणे

येविसी पत्रे १

१ राजश्री राणोजी घोरपडे सेनापति

१ राजश्री दादोराव

१ गंगाजल निर्मल सगुणाबाई शिंदे

१ राजश्री हिंदुराव घोरपडे

१ राजश्री दौलतराव घोरपडे

दस्तक फालगुण शुध त्रेदशी सु॥

तारीख १२-४-१७४०

राजमंडल रोजकीर्द छ २५ मोहरम सुा आर्बैन

किता पत्र जाब राजश्री आबाजी सर्ज्याराऊ कागलकर घाटगे यास आज्ञा कीं तुम्ही विनंती पत्र पाठविले प्रविस्ट होऊन वर्तमान विदित जाले मिरजेहून स्वारी येऊन आपले प्रांतातील गुरे व मेंढरे वळून नेली म्हणोन कितेक तपसिले लिहिले यैसियास तुमच्या प्रांतात राजश्री सुभानजी शिंदे व आपाजी सितोले याणी येऊन स्वारी करून गुरेढोरे नेली त्यासमागमे इकडीलही दाहावीस स्वार गेले असिले तरी त्याणी नेले असतील मिरजकराकडे काहीं तालुक आहे यैसे नाही तुमच्या लिहिल्यावरून राजश्री बालोजी सालोंखी हुजूर आले आहेत त्यास ताकीद करणे ती केली आहे तुमचे स्थल पूर्वीपासोन स्वामीचे पदरचे सर्वप्रकारे स्वामीस तुमचे अगत्य आहे तुम्ही आपले समाधान असो देणे म्हणून उतर लिहून दिले पत्र १

तेरीख २५ रोज चैत्र बहु द्वादसी सह त्रयोदसी मंदवासरे शके ६६ रौद्रनाम संवत्सर मुकाम सातारा ऊर्फ शाहूनगर

तारीख ४-१२-१७४१

माहे रमजान तेरीख २५ सुा इहिदे (आर्बैन)

किता पत्र चिटनिसी तीथवार छ मजकूर ते दिवसी राजश्री भगवंतराव रामचंद्र यानी जलशाक पाठविली ती पावलियाचे उतर पाठविले येकून पत्र १

लेखांक ४३ तारीख १२-१-१७४१

राजमंडल रोजकीर्द माहे जिल्काद सुा इहिदे (आर्बैन) तेरीख ५ रोज माघ शुध रथसप्तमी इंदुवार शके ६७ रौद्रनाम संवत्सर सुा सातारा

किता खास दस्तक पत्र राजश्री त्रिंबक हरि यासी ताकीद चिरंजीव

राजश्री कडील प्रतिवार्षिक नियेत द्रव्यासी खलेल होऊन बाकी यैवज बेमबलगा राहिला संस्थानकर सुरलीत तोफियाचा यैवज देत नाहीत म्हणऊन हुजूर विदित जाले तरी तुम्ही ते प्रांती असता स्थलीकाकडील ऐवज राजश्रीकडे सुरलीत पावत नाही हे गोस्ट कार्याची नाही तरी जिकडे ऐवज थारला असेल तिकडे ताकीद करून देववणे राजश्री कडे पावे ती गोष्ट करणें या कामास लोक पाठविले आहेत यास वेतनात देणे रुपये हुजरे दिा बुबाजी नाईक पवार

५० मानाजी मोरे
५० कृष्णाजी गोडसे
५० रामजी वणजारा
——
१५०
१०० सुभानजी यादव व सिदोजी गोडसे दिा राजश्री कडील

तारीख १८–२–१७४१

शाहू दप्तर

रुमाल नं. ६

राजमंडल रोजकीर्द माहे जिल्हेज सुा इहिदे (आर्बैन) तेरीख १२ रोज फाल्गुण शुध चतुर्दसीसह पुर्णिमा हुताशनी सौम्यवासरे शके ६७ रौद्रनाम संवत्सरे मुकाम सातारा. हातरोखे राजश्री संभाजी राजे याच्या मुल्कात उपसर्ग देतात गडकिले कोट ठाणी घेतात याजकरिता त्यास ताकीदपत्रे देऊन राजश्रीकडील हुजरे पाठविले आहेत तरी त्याच्या प्रांतात उपसर्ग न देणे आणि रामचंद्र बावाजी यास त्याणी फोंडे व सुपे कोकण प्रांतें पा आहे तर त्यास सामील होऊन ठाणी व गडकिले व प्रांत सोडऊन देऊन त्याचा अमल चाल यैसे करणे येविसी पत्रे

	पत्र
रा राणोजी घोरपडे सेनापति	१
रा दादूराव नवलगुंदकर	१
गंगाजल निर्मल सगुणाबाई सिंदे मामी	१
रा हिंदुराव घोरपडे ममलकतमदार	१
दवलतराव घोरपडे	१
	५

तारीख १८–२–१७४१

श्री भवानी प्रसन्न

कीर्दीस बार छ १२ जिल्हेज सु॥ इहिदे आर्बैन मया अलफ

विनंती उपरी राजश्री हिंदुराव घोरपडे ममल्कतमदार व राणोजी घोरपडे वगैरे यासी तुम्ही चिरंजीव राजश्री कडील मुल्कात उपद्रव न करणे म्हणोन खास दस्तक पत्रे देऊन हुजरे जासूद पाठविले यास मसाला रुपये

१ सुभानजी नाईक पवार १ येसजी कदम ३ नि॥ आखोजी नाईक

जासूद आसामी ३

येकूण पांचजण पाठविले यासी

३०० राजश्री हिंदुराव घोरपडे

१०० सिंदे

१०० दादाजीराव

१०० दौलतराव

६००

येकूण साहसे रुपये देविले असेत मसाला भरून देविलें पाहिजेत हे विनंती.

तारीख २७-३-१७४१

माहे मोहरम सु॥ इहिदे (आर्बैन)

तेरीख २० रोज चैत्रबहुल शस्टी भृगुवासरे शके ६७ दुर्मतीनाम संवत्सरे मुकाम मौजे रेठरे बालो पाटीलाचे नजीक बोरगाऊ कृष्णातीर

छ २३ रोजी सोमवारी माहाराज राजश्री संभाजी राजे आज्ञा घेऊन कोल्हापुरास आपल्या स्थलास गेले
(तारीख ३०--३--१७४१)

छ २३ रोजी सोमवारी रात्रीं राजश्री आनंदराऊ सुमंत याची रवानगी नवाब किल्चिखान याकडे केली सीरपाव दिल्हा

तारीख ८--४--१७४१

शाहू दप्तर.

रुमाल नं. ६

यादी छ ३ सफर. (इहिदे आर्बैन)

+ + चतुर्दसी सौम्यवासर रुद्रापा गौडा देसाई सरकार हुबोली यास आज्ञा कीं मऱ्यापा नाईक याचे पुत्र विरापा हुजूर आहेत त्याणी आपले स्वार आणविले होते ते ती गडी (गढी) संपगाऊ येथील तलावरी राजश्री दादाजीराव याच्या लस्करात येऊन राहिले होते तेथून तीन घोडया चोरून नेल्या त्याचा थाक तुम्हाकडे लागला आहे म्हणऊन हुजूर विदित जाहले येसीयास हुजूरच्या लोकाची घोडी चोरून न्यावी ही रीत कांही कार्याची नाही याउपरी देखत आज्ञापत्र तिन्ही घोडया सोडून देणे उजूर न करणें म्हणऊन पत्र १

तारीख ४--६--१७४१

शाहू दप्तर

रु. नं. ६

राजमंडल रोजकीर्द माहे रबिलाखर सु॥ इसने (आर्बैन)

तेरीख १ रोज आषाढ शुध्र द्वितीयासह त्रितीया गुरुवासरे शके ६८ दुर्मतीनाम संवत्सरे सु॥ शाहूनगर

किता ताकीद पत्र चिटनिसी तीथवार छ मजकूर बनाम तिमाजी सुरार देशमुख पा मिश्रीकोट यास ताकीद पत्रकी हल्यालचे किलेदारास द्रव्य देऊन दुसरियाचे वतन करून घेतले पातशाही परगणियातील गाव किलेदाराचे सनदेने + (दि) मत घेतले आणि परगणा खराब केला यावरून तुजला काय म्हणावे ? किल्ला चिरंजीव राजश्री याकडे हस्तगत जाहला आहे किलेदाराची पत्रे करून घेतली आहेत ती राजश्री रामचंद्र बावाजी याजकडे देणे गाव सोडून देणे हे न करिता परगणियात दखलगिरी केलिया पारपत्य करणे लागेल म्हणऊन पत्र १

लेखांक ४४ तारीख २-२--१७४३

शाहू दप्तर

रुमाल नं. १

राजमंडल

रोजकीर्द माहे जिल्हेज सु॥ सलास तेरीख १७ रोज माघ बहुल पंचमी सौम्यवासर शके ६९ दुंदुभीनाम संवत्सरे मु॥ शाहूनगर नजीक किले सातारा

किता हातरोखा राजश्री मुरारजी हिंदुराऊ घोरपडे वजारतमाब याजकडील रा॥ भिवराऊ अनंत यासी पत्र

तारीख २७-५--१७४३

छ १३ रोज माहे रबिलाखर

राजमान्य राजश्री जगजीवन पंडित यासी जे तुम्ही विनंती पत्रे पाठविली पावली तुम्ही विशालगडच्या शहास जाणे राजश्री कानोजी मोहिते यास पत्र दिले आहे तुम्ही त्याची वस्तभाव सोडून देणे तेही तुमची घोडी व माणसे सोडून देतील म्हणून १

तारीख ३-७-१७४३

शाहू दप्तर

रुमाल नं. ६

राजमंडल रोजकीर्द माहे जालोवल सु॥ आर्बा

तेरीख २१ रोज आषाढ बहुल अष्टमी रविवासरे शके ७० रुधिरोग्दारी नाम संवत्सरे मु॥ शाहूनगर नजीक किले सातारा

किता येक जाब राजश्री राणोजी घोरपडे सेनापति यास आज्ञा केली यैसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले लिहिला अभिप्राय विदित जाला राजश्री केशवराव रधुनाथ यास कितेक अर्थ लिहिला तो त्याणी विदित केला ऐशास स्वामीनी आज्ञा कर्तव्य ते म॥रनिलेस स्वमुखे केली आहे ते तुम्हास लिहितील त्यावरून कलेल म्हणऊन उतर चिटनिसी पत्रे तिथवार छ मजकूर

१ सेनापतीचे उतर

१ गोविंदराम याचे उतर

केशवरायास लिहिले त्याणी निवेदन केले या स्वामीनी आज्ञा कर्तव्य ते राव मजकुरास केली आहे ते लिहितील व राजश्री राऊ सेनापति याचे विनंती पत्राचे उतर

सादर केले आहे त्यावरून कलेल म्हणऊन
पत्राचे उत्तर दिल्हे

—
२

लेखांक ४५ तारीख ६-३-१७४४

राजमंडल रोजकीर्द माहे सफर सुहूर सन आर्बा
तेरीख २ रोज चैत्र शुध त्रितीया भोमवासरे शके ७० रक्ताक्षीनाम संवत्सरे मुकाम शाहूनगर नजीक किले सातारा

किता साहित्य पत्रे चिटनिसी राजश्री रामचंद्र बावाजी प्रभु दिमत राजश्री संभाजी राजे चैत्र शुध द्वितीया इंदुवासरे यास फोंडे व कडवाल (कारवार) सिवेश्वर वगैरे हा जिल्हा माारनिलेस सांगोन त्याप्रांते रवाना केले आहेत तरी तुम्ही सर्वप्रकारे यास अनकूल होऊन राज्यातील स्थले हस्तगत होत ते करणे तेणेकरून तुमचे मनोभिष्ट सिद्धीस पावेल म्हणून पत्रे

देशमुख व देशपांडिये माहाला-
निहाये बि त॥
१ पा कडिवाल (कारवार)
१ पा अकोले
१ पा जाजेहाली पंचमाहाल
१ पा सिवेश्वर
१ पा फोंडे
—
५

राजश्री जयेराम सांवत व राम-
चंद्र सांवत भोसले सरदेसाई पा
कुडाल यासी आज्ञा कीं फिरंगी
व सोंधेकर एकत्र होऊन राज्या-
तील स्थले अक्रमून मनस्वी वर्तणूक
करू लागले आहेत याचे पारपत्य
करून स्थले सोडवावी हे स्वामी-
स परम अवशक होऊन रामचंद्र
बावाजी यास फोंडे व सुपे व
कडवाल सिवेश्वर हा जिल्हा
सांगोन त्या प्रांती

तिमाजी मुरार देशमुख पा मिश्री-
कोट यास आज्ञा कीं तुम्ही हाल-
याल प्रांतीचे वतन तकलुफी करून
घेऊन पा मजकूर खराब करिता
म्हणून हुजूर विदित जाहले तरी हे
गोष्ट कार्याची नाही स्वामीस
मानत नाही हाली हे आज्ञापत्र
सादर केले आहे तर हल्यालच्या
वतनास कागदपत्र असतील ते फिरोन
देऊन खेडीपाडी तुम्हाकडे असतील
ती सोडून देणे या गोस्टीस नव-
दिगर केलिया स्वामी हे वतन
करितील मिश्रिकोट परगणा नेस्तना-
बूद करितील ऐसे पष्ट समजोन
वर्तणूक करणे ताकीद असे म्हणोन
पत्र १
राजश्री रुद्रपा गौडासा देसाई
मामले हुबली यास आज्ञा कीं रा॥

सरंजामानिसी उभारणी करून
रवाना केले आहेत मारनिलेचे
सर्वप्रकारे साहित्य करून स्वा-
मीस अवशक आहे मागाहून जे
साहित्य कराल ते स्वामी पुर-
वितील तरी तुम्ही या मनस·
बियास हरोल होऊन मनसबा
सिधिस जाये ते करणे तुम्हासा-
रखे प्रमुख वतनदार स्वामीचे
पदरी असता राज्यातील स्थले
कानड्यानी अनभवावी हे योग्य
नव्हे मारनिले व तुम्ही मिलोन
मसलत सिधीस नेणे म्हणून पत्र.
तेरीज पत्र

५ देशमुख व देशपांडिये
माहालानिहाय
१ तिमाजी मुरार
१ रा जयेराम सांवत
१ रा रुद्रपगौडा.

—

८

रामचंद्र बावाजी याचे सर्वप्रकारे
साहित्य केले व हल्यालचे स्थल
रक्षिले म्हणून कितेक तुमचे एकनिष्ट-
तेचा अर्थ मारनिलेनी विदित केला
त्याजवरून स्वामी तुम्हावरी परम
संतोषी जाहाले तुम्ही स्वामीच्या
राज्यातील वतनदार तुमचे हाते
महत्कार्य घेऊन तुमचे मनोदय
सिधीस पावावे हेच स्वामीस
अवशक आहे प्रस्तुत फोंडे व
कडवाड सिवेश्वर व सुपे हा
जिल्हा मारनिलेस सांगोन त्या
प्रांते रवाना केले आहेत तरी
तुम्ही सर्व प्रकारे यास अनकूल
होऊन राज्यातील स्थले हस्तगत
होत ते करणे तेणे करून तुमचे मनो-
भिष्ट सिधीस पावेल तिमाजी
मुरार याणी मिश्रीकोटची देशमुखी
सरकारची आटोपून हल्यालासी
शशत लाविली आहे त्यास पारि-
पत्य करून जरूर जाणोन मारनिलेस
आज्ञा केली आहे तर तुम्ही त्याचे
पारपत्य करून सरकारचे वतन सुटे
आणि हल्यालचा वेध तुटोन
परगणा हल्याल खाले सुरलीत
चालोन स्वामी कृपा आपणावरी
होय ते करणे म्हणून पत्र.

लेखांक ९६ तारीख ५-३-१७४५

शाहू रोजकीर्द रुमाल नं. ७

राजमंडल रोजकीर्द

माहे सफर खमस (आर्बेन)

तेरीख १२ रोज फालगुण शुध चतुर्दसी भोमवासर शके ७१ रक्ताक्षीनाम संवत्सरे मु॥
शाहूनगर नजीक किले सातारा

किता पत्रे चिटनिसी फाल्गुण शुध पंचमी इंदुवासर राजश्री

(तारीख २५-२-१७४५)

संभाजी राजे माहाराज याच्या प्रांतातील जमीदार व संस्थानिक वगैरे घाटगे आदिकरून रूजूत होऊन मर्यादेने वर्तत नाही म्हणून हुजूर विदित जाले तरी हे गोष्टी कार्याची नाही याउपरी त्यासी निस्टापूर्वक मर्यादेने वर्तणूक करून त्याची पत्र निस्टापूर्वक मर्यादेन वर्तता यैसी स्वामीस येत ते गोस्टी करणे फिरोन बोभाट आलिया फौज पाठऊन पारपत्य करणे लागेल यैसे पस्ट समजोन वर्तणूक करणे म्हणोन पत्रे

दकाराची पत्रे वरते नांव लेहून
पत्रे दिल्ही
१ रा॥ खानगौडा बाहादर देसाई
पा लक्षुमेस्वर
१ रा॥ आबाजी घाटगे सर्ज्याराऊ
यास पत्र
१ राजश्री............................
....
यास पत्र कीं किलियाचा तनखा
आहे तो सुरलीत चालो देत नाही
वेरियास उपसर्ग करिता व वर
घाटे येऊन मुलकास उपसर्ग करिता
म्हणून हुजूर विदित जाहाले.

अशास ये गोस्टीचे पारपत्य करावे
परंतु तुम्ही स्वामीचे आज्ञे प्रा
वर्तणूक कराल निस्टेस अंतर न करा
हा स्वामीचा निश्चा याकरिता हे
आज्ञापत्र सादर केले आहे तरी
चिरंजिवासी मर्यादेने वर्तणूक करून
किलियाच्या तनखियास खलेल न व्हो
मुलकास उपद्रव न लागे याचा अमल
याजकडे सुरलीत चाले तुमचे निस्ठेचे

किता पत्रे कोनाडी याची देशमुख
व देशपांडिये
माहालनिहाये
१ पा तोरगल
१ पा गलगले
१ पा रायेबाग
१ पा यादवाड
१ पा हुकेरी
१ पा जमखिंडी
मातुश्री साहेबाकडे आहे त्याज-
कडे सुरलीत वर्तणे
१ पा गुतल
१ पा नवलगुंद
१ पा कितूर बनाम रुद्रापा
गौडा यास
१ पा होनगुंद
१ पा जैनाबाद
१ येमाजी रुद्र यास पत्र
१२

राजश्री तुळाजी आंगरे सरखेल
यास आज्ञा जे तुम्ही आपला
कौल सावकारास समुद्रात देता
आणि चालवीत नाही येस जाणोन
जंजिरे सिंदुदुर्गकरी व तेथील

वर्तमान राजश्री लिहित ते करणे
म्हणऊन पत्र

३ वर त्या नांवाची पत्रे
१ राजश्री श्रीनिवास वेंकटाद्रि
 देसाई पा गदक

४

राजश्री बाबूराव सदाशिव यास
पत्रे दोन २
१ चिकोडी पासून तुंगभद्रेपावेतो
मुलुक मारून ताराज केला सोंधे
बिदनूर बंकापूर या तिन्ही संस्था-
नापासून टका घेतला यामुले
राजश्री येऊन रुषवा करून
बैसले आहेत तेव्हा तुम्ही टका
जो चिकोडीपासून तुंगभद्रे पर्यंत
तिन्ही संस्थाने आदीकरून घेतला
याची चौथाई व हती घोडे निमे
येणे प्रो द्यावयाचा करार करून
स्वामीनी त्यासी शफत केली
आणि हे आज्ञापत्र तुम्हास सादर
केले आहे तर चिकोडीपासून तुंग-
भद्रे पर्यंत संस्थाने देखील जो टका
घेतला असेल त्याची चौथाई व
हती घोडे निमे या प्रा
....
....
आले आहेत त्याचे पदरी घालणे
पावलियाचे कबज हुजूर पाठविणे
म्हणऊन पत्र

आरमारासी कजिया लाविता
म्हणऊन हुजूर विदित जाले अशास
त्याचे सरदेत त्याचा कौल व
तुमचे सरदेत तुमचा कौल व तुमचे
लोकाचे तरांडे त्याचे सरदेत आले
तरी त्याचा कौल घेऊन यासी
रुजवातीने वर्तावे केवल तुमच्या
कौलावरी सरदेतून तरांडी जाऊ
येऊ लागली म्हणजे जंजिरे याचा
अमल कैसा चालेल हा विचार
काहीच ध्यानांत न आणिता
कजिया करिता हे गोष्ट अपूर्व
आहे उचितार्थ वर्तत जाणे याच्या
कौलाखेरीज याच्या सरदेतून जे
तरांडे जाईल त्याचे पारिपत्य
हे करितील तुम्ही जंजिरकरासी
व आरमारासी घसघस कराल तर
न करणे फिरोन बोभाट आलिया
स्वामीस मानणार नाही यैस
जाणून जंजिरे मजकुरास व तेथील
आरमारास काडीमात्र उपसर्ग न
लावणे म्हणून पत्र १
 तेरीज पत्रे
 ४ किता
 २ बालाजीराऊ
 १२ माहालानिहाय
 १ तुलाजी आंगरे

१९

१ किता पत्र की सोंध्यास सिवाजी त्रिमल पाठविले होते त्याकडे संस्थानचा यैवज पावो दिल्हा नाही व सिवाजी त्रिमलास नागवून त्याची अप्रतिष्टा केली म्हणऊन कलो आले यावरून हे उतम केले नाही तुम्ही व ते सेवकपणात दोन नाहीत तर सोंध्याचा पैका जो घेतला असेल तो त्याचा त्याकडे देणे व सिवाजी त्रिमलाचा बहुमान करून त्याजकडे रवाना करणे

२

लेखांक ४७ तारीख ५-३-१७४७

श्री

शाहू दप्तर

रु. नं. २३

सरंजाम राजश्री उदाजी चव्हाण हिमतबहादर ममल्कतमदार सरंजाम राज्याभिषेक शके ७३ प्रभवनाम संवत्सर अधिक चैत्र शुध पंचमी गुरुवासर छ ४ माहे रबिलोवल सन सबा आर्बैन मया अलफ सरंजाम बेरीज रुपये

७०९०००

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आई

साहेब साहेबाचे सेवेसी

कृपांकीत राणोजी सर्ज्याराव घाटगे देशमुख प्रा कागल कृतानेक दंडवत विनंती उपरी येथील वर्तमान तो धर्म माहाराजाचा जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष माहाराजाकडून पत्रे येऊन सांभाल होत नाही त्यावरून मानस चिंतातूर आसे तर निरंतर पत्रधार सेवक लोकांचा सांभाल करीत गेले पाहिजे तदनंतर आमचे मानस आहेत की माहाराजासंनिध राहून सेवा करून दाखवावी साहेबाचे हात उर्जा करून घ्यावे ऐसा हेत चितात आहे साहेबी स्वरूपायोग्य बलाऊणे चालविले या पायापासी येऊन प्रविष्ट होऊ पूर्वीपासून वडिलाचे चालऊन सेवा चाकरी घेतली तैसेच आमचेही चालऊन सेवा चाकरी घ्यावी साहेबाचे पत्र आलेनंतर सेवेसी कारकून पाठऊन देऊ. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

लेखांक ४८ तारीख ८-११-१७४९

छ ८ जिल्हेज सुा खमसैन

मुकाम शाहूनगर नजीक किले सातारा

छ मजकुरी राजश्री भगवंतराव रामचंद्र याच्या भेटी जाल्या नजरा जाल्या नाहीत सबब राजश्री स्वामीस सावकाश नव्हते.

लेखांक ४९ तारीख २७-७-१७५२

शाहू दप्तर

रु. नं. ४०

श्री

पौ छ २७ माहे रमजान

को. घ. इ.२...८

श्रीमंत माहाराज मातुश्री

आईसाहेब साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक सिदोजी थोरात कृतानेक विज्ञापना तागायेत छ २६ माहे रमजान पावेतो साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विज्ञापना ऐसीजे साहेबाचे आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा जे आष्टेचे ठाणे खासगीचे त्यास तुम्ही उपसर्ग न देता हुजूर दर्शनास येणे जे आज्ञा करणे ती केली जाईल ऐसी आज्ञा त्यास श्रीमन्माहाराज राजश्री कैलासवासी जाहले तेसमई माहराज करवीरवासी वारणा आलाकडे येत होते तेसमई राजश्री पंतप्रधान याणी आम्हास सांगितले जे तुम्ही वारणेवरी जाऊन त्यास आलाकडे येऊ न देणे आष्टेविसी श्रीमंत माहराज मातुश्री साहेबास अर्ज केला तुम्हास आष्टे दिल्हे सेवेचा मजुरा करून घेणे त्याजवरून वारणे निकट गेऊन सेवा केली पुढे राजश्री पंत प्रतिनिधि या प्रांतास आले ते दंगेमुले दोन्ही स्थले टाकोन पलाकडे गेलो त्याउपरी साहेबाचे आज्ञापत्र आले जे राजश्री प्रतिनिधि वचन देतील ते साहेबाचे समजोन त्याची भेटी घेणे त्याजवरून त्याची भेटी घेतलेवरी वालवे हवाला केले अष्टे द्यावे त्यास राजश्री साबाजी बाजी घाटगे धणी दिल्हे च्यार महिने वाट पाहिली आष्टे हस्तगत जाहले नाही सूर्यवंसी याणी वालवेची तमाम बिसात उठोन नेहली ते द्यावी येसा करार व्होता तेही दिल्ही नाही यास्तव आष्टेनजीक येऊन राहिलो असो कराराप्रां आज्ञा करून आष्टे व बिसात देववावया साहेब धणी समर्थ आहेत सेवकास साहेबाचे चेरणा वितरिक्त दुसरा विचार नाही. सेवेसी विदित व्हावे हे विज्ञापना :

तारीख १४–९–१७५२

शाहू दप्तर
रु. नं. ४०

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आ
ईसाहेब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक पार्वतीबाई कृतानेक विज्ञापना ता छ ५ जिल्काद मुकाम ठाणे अष्टे साहेबाचे कृपादस्टीकडून वर्तमान येथास्थित असे विशेष राजश्री सिदोजी थोरात याचे आमचे युध्य जाले याचे वर्तमान साद्यंत धण्यास विदित व्हावे येदर्थी विनंती पत्रे पाठविलीच आहेत प्रस्तुत थोराताकडून साहेबाकडे हुजूर माहादाजी जाखदेव व बहीरजी थोरात आले येसे वर्तमान आले त्यावरून खानंदास विनंती पत्र लिहिले असे तरी त्याकडून कोणी रदबदल करील आण आमच्या कार्यास अपाय चिंतील त्याची गोष्टी खातरेस न आणावी आमचा अभिमान धण्यास मात्र आहे हे ठाणे अगर लौकीक

जाहाला तो साहेबाचा आहे आम्ही स्थापित ज्या गोष्टीने ऊर्जित होय तो अर्थ करावया साहेब धणी आहेत सिबंदीची गवगवा फार आहे लोकाची घोडी पिडी पडली त्याची वाट व्हावी लागते त्यास समजाविसी करून राजश्री सुभानजी नाईक सूर्यवंसी यासी सेवेसी रवाना करून देतो सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

तारीख १२-१०-१७५२

शाहू दप्तर

रु. नं. ८

राजमंडल रोजकीर्द

दिमत मजमु सु॥ सलास खमसैन

माहे जिल्हेज छ ४ रोज

राजश्री भगवंतराव पंडित अमात्य याच्या व करवीरवासी याचा कलह आजी दोन वरसे लागला आहे येदनिमित्य पंडित म॥रनिले याणी राजश्री नारो सिवदेव यासी जमावानिसी त्या प्रांं रवाना केले आहेत त्यास धामधूम करून स्वारीसिकारी करितील तरी तुम्ही याचे सर्व प्रकारे साहित्य करून राहावयासी आश्रा जागा देऊन अमल सुरलीत चालवणे

	पत्रे
सिवाजी सालोंखी	१
र॥ हरि राम विसाजी नारायेण नि॥ घोरपडे	१
सुभानजी सूर्यवंसी	१
गोपालजी भोसले	१
तुलाजी देसाई सिरालेकर	१
सिदराम देसाई करंजवाडकर	१
पालगौडा पाटील साडोली	१
वाटेचे दस्तक	१
	८

तारीख १२-११-१७५२

राजमंडल रोजकीर्द सु॥ सलास खमसैन दि॥ मजमू माहे मोहरम

तेरीख ५ रोज कार्तिक सुध शष्टी रविवार अंगिरानाम संवत्सरे मु॥ शाहूनगर नजीक किले सातारा

पार्वती भोसली यासी आज्ञा जे तुम्ही विनंती पत्र पा ते पावोन लेखनार्थ अवगत जाहला येसियास वारणेपलीकडे तुम्ही उपद्रव केलात म्हणून तेही मोबदला करावयाच्या

विचारात आहेत तर आपली ठाणी व खेडी खबरदारीन राखणे छ ४ रोज —पत्र
पत्र १

तारीख १४–११–१७५२

तेरीख ७ माहे मोहरम कार्तिक शुध अष्टमी मंगलवार

पार्वती भोसली यासी आज्ञा जे प्रा कुडाल व प्रा राजापूर वगैरे प्रांतीचे लोक श्री माहायात्रेस जात असता तुम्ही सिराले प्रांती जराबाजरा लुटोन घेतले यैसे नादान तर ज्याची वस्तभाव जराबाजरा घेतली असेल ती यात्रूकरास देऊन पावलियाची कब्जे घेऊन हुजूर पाठवणे या कामास बहिरजी लेंढे व गोपालजी जाधव व बापूजी गायेकवाड व निंबाजी कदम हुजरे याचे विद्यमाने वस्तभाव यात्राकराचे पदरी घालणे. हुजरे यास मसाला रुपये वीस देणें.

२०

यांविसी पत्र १

तारीख १६–११–१७५२

राजमंडल रोजकीर्द सु॥ सलास खमसेन

दि॥ मजमु छ ९ मोहरम.

पार्वती भोसली यासी आज्ञा जे रा॥ सूर्याजी इंदूलकर हे चिरंजीव राजश्री संभाजी राजे याजकडेस सेवा करत आहेत व धोंडजी इंदुलकर हुजूर आहेत यैसे असता त्यास चिरंजीवानी सरंजाम दिल्हा आहे त्या गावची गुरेढोरे वस्तभाव + + आणिली तर त्याची वस्तभाव गुरेडोरे देऊन पावलियाचे कबज हुजूर पाठविणे.

तारीख १७–११–१७५२

तेरीख १० मोहरम

पार्वती भोसली यास आज्ञा जे धोंडजी इंदूलकर याचे गाव तुम्ही लुटून आणाला तर त्याचे गावचा जो नागावा आणला असेल तो माारनिलेचे स्वाधीन करणे इंदूलकर याचा गाव भोगाव वारणे पलीकडे होता तो तुम्ही (पार्वती भोसली) लुटिला घर नागाऊन नेले व गुरे ढोरे नेली चिंदाचोली केली म्हणऊन विदित जाले तर हे वर्तणूक कार्याची नाही.

तारीख २५–११–१७५२

राजमंडल रोजकीर्द सु॥ सलास खमसैन दि॥ सुरनिसी माहे मोहरम छ १८

रा। येसवंतराव गायकवाड यास पत्र जे चिरंजीवाची स्वारी करवीराहून वडगावास जाली आहे त्यास तुम्ही समागमे असता स्वारीचे लोक व राऊत सिराले प्रांती वगैरे

मुलकांत उपसर्ग देऊन गाव जाळून पाटील नेऊन दंगा करितात म्हणून हुजूर विदित जाले तर तुम्ही तेथे असता स्वराज्य प्रांतांत धामधूम करावी हा अर्थ योग्य नव्हे या उपरी मुलकात दंगा न होय तो अर्थ केलिया उतम आहे येविसी चिरंजीवासही पत्र पाठविले आहे.

१

राजमान्य राजश्री आबाजी घाटगे सर्ज्याराव यासी व राजश्री राणोजी घोरपडे सेनापति यासी पत्र जे चिरंजीवाची स्वारी करवीराहून वडगावास जाली आहे त्या समागमे फौजेसुधा तुम्ही आला आहा यैसे असता स्वारीचे राऊत व लोक सिराले प्रांती वगैरे प्रांतांत उपसर्ग देऊन गाव जाळून पाटील नेऊन दंगा करिता म्हणून हुजूर विदित जाले तर तुम्ही लोकी स्वराज्य प्रांतांत धामधूम करावी हा अर्थ किमपि नाही हे तुम्हा लोकास कलतच आहे कदाचित या प्रांतीहून बालगोपाल भोसले याणी वारणेपलीकडे थोडीबहुत स्वारी केली असेल त्याच्याहि पारपत्यास साहेबास अगाध आहे यैसे नाही त्यासही जे आज्ञा कर्तव्य ते केलीच आहे ते अमर्यादा वर्तणूक करणार नाहीत हे चितात आणून जे स्वारी या प्रांतात आली असेल ती माघारे जाऊन मुल्क आबादान होये ते करणे. येविसी चिरंजीवास पत्र पाठविले आहे त्यावरून कलेल.

२

तारीख २९--११--१७४२

राजमंडल रोजकीर्द दिमत मजमु सु॥ सलास खमसन छ २२ माहे मोहरम रा घनशाःम नारायेण मंत्री यासी पत्र जे तुम्ही विनंती पत्र पा त्यात लिहिले कीं वडगावाहून स्वारी येऊन मुल्कात दंगा आरंभिला आहे म्हणून लिहिले तर पार्वती भोसली इणे चिरंजीव याच्या मुल्कात दंगा केला त्यामुले त्याणी उपद्रव केला तर पार्वती भोसली इस ताकीद करून दंगा न होये ते करणे तुम्ही व सिवाजी सालोखी व बावाजी थोरात यैसे जमावासुधा त्याचे तोंडावर राहाणे पत्र १

पार्वती भोसली यास आज्ञा जे आपली ठाणी व खेडी खबरदारीने राखणे दंगा न करणे म्हणऊन ताकींद

१ पत्र रा सिवाजी सालोखी यास आज्ञा

१ जे तुम्ही जमावसुधा मंत्री यास सामील
होऊन शह राखणे म्हणऊन बावाजी

१ थोरात यास सदरहू प्रा

५

तारीख ३०--११--१७५२

माहे मोहरम तेरीख २३

राजश्री घनशाःम नारायेण मंत्री यासी आज्ञा जे..
वडगावास फौज किती आहे व कोणकोणते सरदार आहेत काये मनसुभा करतात तो लिहिणे. पत्र १

माहे नोव्हेंबर इ. स. १७५२

शाहू दप्तर
रु. नं. ४०

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब याणी राजश्री बावाजी थोरात यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान विदित जाहाले करवीरवासीयाचा मजकूर लिहिला अशास आजी तागायेत तुमचे उर्जित करून तुम्हा लोकाचा संग्रह साहेबी काय निमित्य केला जे हे शह तुम्ही लोकी राहून साहेबाची कृपा संपादून पुढे आपले ऊर्जित करून घ्याल हा भरवसा साहेबास पूर्ण आहे तरी तुम्ही आपला जमावसुधा शहावर जावे आपले सामिलातीस बाल गोपाल भोसले व मिरजकर व चिकोडीकर व राजश्री नारायेणराव घोरपडे व इसलामपूरकर यास मदतीस घेऊन शह सांभाळून शह निवारण जाल्यानंतर साहेबाच्या दर्शनास येऊन आपले ऊर्जित करून घेणे साहेब तुम्हावर संतोषी होऊन चालवितील हा भरोसा असो देणे.

तारीख ६-१२-१७५२

राजमंडळ रोजकीर्द दिा मजमु
छ २९ सुा सलास खमसैन माहे मोहरम ऊर्फ कार्तिकमास
करवीरवासी याणी पार्वती भोसली यासी युधप्रसंग केला त्यास तंबी पोहचवणे म्हणऊन ताकीद पत्रे सादर केली

१ राजश्री घनशाम नारायेण मंत्री यासी
१ राजश्री उदाजी चव्हाण यासी
१ राजश्री सिवाजी सालोंखी यासी
१ पार्वती भोसली यास आज्ञा जे साहित्य पत्रे पाठविली आहेत त्याप्रो पारिपत्य करणे

४

तारीख २४-१२-१७५२

राजमंडल रोजकीर्द दि॥ मजमु सु॥ सलास खमसैन माहे सफर तेरीख १७ रोज अंगिरानाम संवत्सरे मार्गेश्वर वद्य चतुर्थी मु॥ शाहूनगर नजीक किले सातारा
रा सिवाजी सालोंखी यासी आज्ञा जे तुम्ही विनंती पत्रात लिा कीं करवीरवासी

जमाव भारी करून आले म्हणून लि॥ व रा नरसिपंत यांणी निवेदन केले त्यावरून रा पंतप्रतिनिधि व रा मंत्री व बालगोपालजी भोसले व तमाम सरदार यास आज्ञापत्र सादर केली आहेत ते जमावसुधा अविलंबे मजत होतील तुम्ही ठाणेची बंदोबस्ती करून व मुल्कास उपद्रव न होये ते करून करवीरवासियास तंबी पोहचवणे म्हणून पत्र.

लेखांक ५० तारीख २-१-१७५३

छ २६ माहे सफर सुा सलास खमसैन
रा सिवाजी सालोखी यासी आज्ञा जे तुम्ही रा उदाजी चव्हाण याच्या मुलुकात उपद्रव देता त्यावरून त्याणी तुमच्या मुल्कात उपद्रव देतात व तुम्ही सानईमधे मालजी चव्हाण याच्या माणसास अटकाविले त्यावरून सिवाजी खांडकर पा आहेत तर अथपर उपसर्ग तुम्ही न देणे तेही न देतील व चिरंजीव करवीरवासी याच्या मुलुकात उपसर्ग न करणे. पत्र ?

पार्वती भोसलीस आज्ञा जे कोलापुराकडे उपसर्ग तुम्ही न करणें. पत्र १

तारीख ४-१-१७५३ पैवस्ती

शाहू दप्तर

रु. नं. ४३

श्री

पा छ २८ सफर

राजश्री भगवंतराव हुकू

मतपन्हा गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥
रामचंद्र सांवत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला ऐसेच सदैव पत्र पाठवून आपणाकडील कुशलार्थ लेहून स्नेहाभिवृद्धि करीत असिले पाहिजे श्रीमंत मातुश्री आईसाहेबांची पत्रे पेसर्जी पाठविली त्याची प्रत्योतरे रवाना केली असेत व जे लिहिणे ते राजश्री तानाजीराव खानवलकर यास लिहिले असे सविस्तर निवेदन करितील त्यावरोन कलो येईल सर्वदा पत्र पाठवून आपणाकडील साकल्यार्थ लिहावया निरोपीत असिले पाहिजे बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे ही विनंती.

तारीख ७–१–१७५३

छ १ रबिलावल सु।। सलास खमसैन

पत्रे रवाना सरदार व राजश्री पंत प्रतिनिधि व राजश्री येमाजी पंत यासी करवीरवासी याचा जमाव उदाजी चव्हाण फौंजेसुधा येक होऊन मौजे भिलवडीवर मुकाम आहे सबब पत्र

१ राजश्री थोरात यास

१ पार्वती भोसली यासी

१ राजश्री घनशाम नारायेण मंत्री

१ राजश्री जगजीवन पंडित प्रतिनिधि

१ राजश्री येमाजी सिवदेव यास

१ राजश्री सिवाजी सालोखे

—

६

१ रा उदाजी चव्हाण यास

येकून पत्रे ६ साहा यसीजे राजश्री पंडित मा।।रनिलेस सामील होऊन त्यास तंबी पोहाचावणे आपले मर्यादेवरी राहात ते करणे म्हणऊन पत्रे ६

तारीख ७–१–१७५३

शाहू दप्तर

रुमाल नं. ८

राजमंडल रोजकीर्द दि्मत मजमु

सुा सलास खमसैन छ १ माहे रबिलावल

राजश्री सिवाजी सालोंखी यास पत्र जे तुम्हाकडून रा गोविंद नरसिंह आले त्याणी सविस्तर विनंती केली त्यावरून अवगत जाले हाली करवीरवासी याची फौज व उदाजी चव्हाण फौजेनिसी भिलवडीवर आले तर तुम्ही येकनिष्ट सेवक आहा हाली पंडित प्रतिनिधीसही रवाना केले आहे रा खंडो जगथाप व वरकड पतके यास पत्रे रवाना केली आहेत तर तुम्ही आपले फौजेचा गाहा करून त्यास तंबी पोहचवणे साहित्य पत्रे

१ मारनिलेस

१ राजश्री अग्नोजी सालोंखी यास

१ रा माहादाजी शिंदे यास पत्र

१ रा येशवंतराव वोलेकर यास

१ रा खंडोजी जगथाप यास

१ रा आबाजी भोसले यास

१ रा खत्रोजी शिंदे यास

१ रा संभाजी घोरपडे
१ रा संताजी शिंदे यास
१ सिवाजी भोसले
१ रा पोसजी गायेकवाड
—
११

तुम्ही हुजूरची पतके असता उदाजी चव्हाण यास सामील होऊन मिरज प्रांती धामधूम करिता तर सरंजाम दूर केला जाईल तर देखत आज्ञापत्र रा सिवाजी सालोंखी यास सामील होऊन करवीरवासियास तंबी पोहचवणे.

याविसी पत्रे

१ राजश्री सिवाजी भोसले
१ रा येशवंतराव वोलेकर यास
१ रा आबाजी भोसले यास
१ माहादजी शिंदे यास
—
४

तारीख १९–४–१७५३

राजमंडल छ १४ माहे जा। लाखर

सुा सलास खमसैन

राजश्री आबाजी घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली यैसीजे करवीरवासी चिरंजीव याणी राजश्री कृष्णराव पंडित आमात्य याजवरी इतराजी करून किले गगनगड नजीक सालवण येथे जाऊन ठाणियासी वेढा घातला आहे ठाणे घेणार त्याचे सामीलातीस तुम्हास बरोबर घेऊन गेले म्हणून विदित जाले तरी पंडित मा।रनिले पुरातन राज्यातील सरकारकून साहेबी त्याचे स्वाधीन कोटकिले करून सरंजाम दिल्हा तरी तुम्ही उभयेपक्षी सौरस्य राहोन प्रजा नांदे देते गोष्टी केलिया साहेबास संतोश आहे म्हणून पत्र १

तारीख २६–४–१७५३

छ २१ जमादिलाखर

राजश्री जगजीवन पंडित प्रतिनिधि यासी पत्र जे तुम्ही विनंती पत्र पाठविले तेथे अंगारकाच्या दर्शनाचा योग घडोन विशालगडचा तहरह होऊन आल्याचे वर्तमान लि॥ त्यास हुजूरचे यैवजाची बोली केलीच असेल म्हणऊन पत्र.

तारीख १--५--१७५३

छ २६ जमादिलाखर सु॥ सलास खमसैन

राजश्री जगजीवन पंडित प्रतिनिधि यासी आज्ञा जे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाहला राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याची तुमची भेटी जाहली उतमप्रकारे सौरश्य जाहला कितेक मनसबियाच्या गोष्टी राजोपयोगी कर्तव्यार्थ म्हणून विनंती पत्र लेख केला ....

तारीख १२--५--१७५३

छ ८ माहे रजब सु॥ सलास खमसैन

राजमान्य राजेश्री जगजीवन पंडित प्रतिनिधि यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री अमृतराऊ याणी किले विशालगडाहून स्वारी करून सरकारचे खिलार नेले येविसी मार-निलेस आज्ञापत्र पाठविले व तुम्हासही पत्र सादर केले ....

....

तरी सरकारची गुरे सोडून देवणे ....

.... म्हणोन पत्र १

येविसी सौ भागिर्थीबाई यासी पत्र १/२

विभाग (ब)

चिटणीस दप्तर

जमाव दप्तर

पेशवे रोजनिशी

को. छ. घ. इ. साधनें भाग २

लेखांक ५१

इ. स. १७०८

श्री

कोंकण जमाव
रु. नं. ६०२

जमाव दप्तर
रु. नं. ५५

राजश्री कान्होजी आंगरे
सरखेल यासी

प्रति श्रीमंत मातुश्री तारा आईसाहेब उपरी तुम्ही आपणाकडील कुशल वर्तमान लेहून संतोष पाववीत जाणे यानंतर राजश्री नानाजी दत्तात्री याचे बतनी इनामतीचे शेत + + ता खारापाटण या गावी आहे अशास मारनिले पहिलेपासून स्वामीचे येकनिष्ठ सेवक आलीकडे या दुईच्या प्रसंगे करून त्याची स्वारीच जाली तथापि त्याणी स्वामी कार्याविसी आपल्या निष्ठेने श्रम करून सेवा केली आहे याकरिता त्याचे चालवणे हे गोष्ट आवश्यक आहे .... देशक व ग्रामस्त यास ताकीद करून याचे सेत चालवणें.

लेखांक ५२

इ. स. १७१०

श्री

+ चि. द. रु. नं. १

राजश्री पंत अमात्य
स्वामीचे सेवेसी

श्री सकलगुण अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य स्ने॥ उदाजी काटकर दंडवत विनंती उपरी राजश्री बाबूराव घोरपडा व करवीरचा मजकूर साद्यंत राजश्री स्वामीचे सेवेसी लिहिला आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल तरी त्याचा अभिप्राये मनास आणून कितेक करवीरकरास समाधानपत्रे त्याच्या मुद्यामाफक आलियाने स्थल स्वामीच्या पदरी पडते असल त्या प्रांतीचे लस्करचे सरदार आहेत त्यांचीही अनुसंधाने आली आहेत ऐशास राजश्री स्वामीची पत्रे करवीरकरास आली असावी आम्ही त्या जागियास गेलो म्हणजे कुली सरदार पदरी पडतात ऐसा अर्थ आहे जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे पारपत्य करणार स्वामी आहेत बहुत काय लिहावे कृपा असो दीजे ही विनंती

मोर्तब
सूद

पौ छ १८ जमादिलाखर
(ता. ३-८--१७१०)

+ ‘ चि. द. ’ हें संक्षिप्त रूप ‘ चिटणीस दप्तर ’ याबद्दल योजिलें आहे.

लेखांक ५३ तारीख २६--१--१७११

श्री

(जमा दप्तर)

रु. नं. ५५

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके३७ विकृतीनाम संवत्सरे माघ बहुल त्रितीया भृगुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा सिव छत्रपति याणी तमाजी परवगोंडा देसाई सरनाईक पा। हुकेरी यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही स्वामीचे पायासी निष्ठा धरून आपले वतनावरी राहून सेवा करीत आहा सांप्रत आम्हास येक गाव इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणोन हुजूर विनंती सांगून पाठविली यावरून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुमचे चालवणे अगत्य याजकरिता तुम्हास इनाम कुलबाब कुलकानू देखील हलीपटी व पेस्तर पटी झाडझडोरा-सहित खेरीज हकदार ब इनामदार करून मौजे मलिगवाड क॥ सदलगे प्रा। कोल्हापूर देह १ येक इनाम आजरामरामत करून दिल्हे आहे तर मौजे मा।र पूर्व मर्यादे प्रा। चतुःसिमा आपले मुकाम करून घेऊन पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने आनभऊन सुखरूप राहणे स्वामी इनाम सुरक्षित चालवतील जाणिजे लेखन अलंकार मोर्तब

तेरीख छ १७ जिल्हेज रुजू सुरनवीस

सु॥ इहिदे आशर मया बार सु॥ सुद बार

आलफ.

लेखांक ५४ तारीख २२--१२--१७१३

श्री

कर्नाटक जमाव (जमाव दप्तर)

रु. नं. ५४४ रु. नं. ५५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४० विजयनाम संवत्सरे पौष बहुल द्वितीया भोमवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित हुकमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसीजे र॥ विठ्ठल त्र्यंबक व शामजी त्र्यंबक व केशव त्र्यंबक व नीलकंठ त्र्यंबक व मुरार दादाजी उपनाम नाडकर हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक वडीलवडिलापासून सेवा एकरूप निष्ठेने करीत आले आहेत थोरले कैलासवासी राजश्री स्वामीचे वेलेस याचे बाप त्र्यंबक बाजी व चुलते मुरार बाजी हुजूर सेवा करीत असता स्वामीकार्यावरी खर्च जाहाले त्या उपरी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामी कर्नाटक प्रांते चंजीस असता रा॥ विठल त्र्यंबक बंधुसमेत चंजीस जाऊन कैलासवासी स्वामीचे निकटसहवासे बहुतच सेवा केली त्यासमागमे या प्रांते येऊन सेवाधर्मेकडून त्याची कृपा विशेषात्कारे संपादून घेतली त्या आलाकडे स्वामीच्या पायासी येकरूपनिष्ठेने सेवा केली व हालीही संनिधच सेवा करीत

आहेत याचे बंधू आत्माजी त्र्यंबक व दादाजी त्र्यंबक स्वामी सेवा करीत असता स्वामी कार्यावरो खर्च जाहले याकरिता माारनिल्हे वंशपरंपरेने चालवणे हे अत्यावस्यक म्हणोन स्वामी यावरी कृपाळू होऊन यास नूतन इनाम मौजे वाले ता॥ सौंदल प्रां राजापूर हा गाव कुलबाब कुल्कानु खरीज हकदार व इनामदार करून इनाभ दिल्हा असे तरी तुम्ही मौजे माार रा॥ विठल त्र्यंबक व शामजी त्र्यंबक व केशव त्र्यंबक व नीलकंठ त्र्यंबक व मुरार दादाजी यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे जाणिजे. बहूत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ आसा.

बार

लेखांक ५५ तारीख २२-१२-१७१३

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. ५४४

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४० विजयेनाम संवत्सरे पौष्य बहुल द्वितीया भोमवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यासी आज्ञा केली यैसीजे

(बाकीचा मजकूर वरील लेखांक ५४ प्रमाणे)

लेखांक ५६ तारीख १९-५-१७१८

श्री

मोंगलाई जमाव

रु. नं. २०१

श्रीमंत मातुश्री राजसबाई साहेब याणी वेदशास्त्रसंपन्ने राजश्री देवदत परमानंद कवींद्र गोत्र काश्यप शाखा तैत्रीये सूत्र आपस्तंब यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही साहेबाच्या राज्यातील पारंपर आश्रित विद्वान भलेसिष्ठ जाणोन तुम्हास भूदान दिल्याने परम श्रेयेस्कर हे साहेबी चितात आणून विलंबी नाम संवत्सरी वैशाख सोमवती अमावाशा पर्वण तद्दिनी धारादत करून मौजे पेदूर ताा सिराले प्रांत मल्कापूर हा गाव तुम्हास कुलबाब कुल्कानु हालीपटी व पेस्तर पटी जलतरुपाषाणनिधि निक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौजे मजकूर गाव दिल्हा असे याप्रमाणे मौजे मजकूर चतुःसीमापूर्वक मर्यादे प्रमाणे तुम्ही आपल्या स्वाधीन करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्र वौंशादिवौंशपरंपरेने अनभऊन स्नानसंध्यादिक सत्कर्म आचरोन साहेबाच्या राज्यास कल्याण चिंतून सुखरूप राहाणे छ २९ जमादिलाखर सु॥ समान आसेर मया व अलफ बहुत काये लिहिणे.

लेखांक ५७ तारीख १८-१०-१७१९

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. ३५४

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४६ विलंबीनाम संवत्सरे आस्विन बहुल प्रतिपदा इंदुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रांत कोल्हापूर यासी आज्ञा केली ऐसीजे श्रीमंत रामदास स्वामीचे संप्रदाई राा शंकराजी गोसावी वास्तव्य किले तोरगल याणी किले नरगुंदेच मुकामी स्वामीस विदित केले कीं आपण तोरगलेस मठ बांधोन तेथे श्री
मूर्ति प्रतिष्टा ब्राम्हणाकडून करविली आहे त्या मूर्तीचे पूजा व वार्षिक रामनवमीचा उत्सह यथानकुल करीत असतो

लेखांक ५७ अ तारीख १६-९-१७२०

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४७ शार्वरीनाम संवत्सरे भाद्रपद बहुल दसमी भृगुवार क्षेत्रिये कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी
(नंतर मजकूर वरील लेखांक ५६ प्रमाणे)

लेखांक ५८ तारीख ८-११-१७२३

श्री

रुमाल नं. ५२

(जमाव दप्तर)

श्री महालक्ष्मी

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल सप्तमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी वेदशास्त्रसंपन्न राजश्री शिवरामभट याचे पुत्र राजश्री नरहरभट गोत्र काश्यप सूत्र आश्वलायेन ऋकशाखाध्याई उपनाम सावगावकर वास्तव्य श्री करवीर यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही स्वामी संनिध किले पनालाचे मुकामी विदित केले कीं श्री वास्तव्य करवीर हे आनादी क्षेत्र त्यासी आवांतराचे योगास्तव बहुत दिवसा पूर्वील देवालये सोडून पुजारी याचे घरी होती त्यास पूर्वी राज्य विज्यापूर आदिकरून स्वस्त होते परंतु पूर्वस्थली श्रीची स्थापना कोणी केली नाही सांप्रतकाली देश उद्वस राज्य स्वस्थ नसता श्री ने आपणास साक्षात्कारे प्रेरणा करून आपले स्थली बैसावे हे इच्छा जाली हे वृत स्वामीस पूर्वी आपण विदित केले त्याजवरून स्वामीनी राजश्री सिदोजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यास

आज्ञा केली त्याजवरून राव ममलकतमदार मारनिले करवीरास येऊन मन्मथनाम संवत्सरी आश्विन शुध विजयादशमी इंदुवासरी श्रीची स्थापना पूर्वस्थली देवालयात सुमुहूर्ते केली ऐसीयास श्री म्हणजे अनादिस्थल येथे विशेषात्कारे यथाविध पूजा जालिया राज्याभिवृध्दी होऊन स्वामीच्या कीर्तींचा विस्तार वाढतो तरी पूजा उछाहास पोखता यैवज करून देऊन श्रीच्या पारपत्यवरी अधिकारी करून ठेवलिया उतम पक्ष आहे म्हणून तुम्ही विदित केले त्यावरून मनास आणिता यथोर्थ श्री म्हणजे अनादिस्थल पुराणप्रसिध जाग्रत येक कासीक्षेत्र कीं करवीर यापेक्षा दुसरे स्थल विशेष आहे यैसे नाही यास्थली विधी पुरस्कर पूजा उत्साह जालियाने स्वामीस व स्वामीच्या राज्यास बहुत कल्याणावाह ऐसे जाणून तुम्ही बहुत थोर वेदशास्त्रसंपन्न कर्मनिष्ठ श्रीच्या पूजेचे विधानशास्त्र मर्यादा जाणत आहा. यास्तव स्वामींनी कसबा सांवगाव इनाम व कसबे कोल्हापूर पेठ व केसापूर येथील चौथाई ऐवज सर्वमान्य करून दिल्हे आहे याप्रमाणे हे जाणोन श्रीचे इनाम सर्वमान्य स्वामी उतरोतर सुरक्षित चालवितील. जाणिजे निदेश समक्ष मोर्तब. रुजू.

बार सुरू सुद बार

लेखांक ५९ तारीख १४-११-१७२६

श्री

रुमाल नंबर ५४ (जमाव दप्तर)
कर्नाटक जमाव नं. १२१६

१

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५३ पराभवनाम संवत्सरे मार्गसीर्ष शुध द्वितीया इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

राजश्री सुबेदारानी व कारकून कमाविसदारानी दिमत मुकासी व सुबेलस्कर व बाजे वर्तमान व भावी सरकार मुदगल यासी आज्ञा केली ऐसीजे बकशी.......... पीरजादे यासी ....इनाम चालविले ते हा कालवरी चालत आले आहे ऐसियासी पीरजादे बहुत थोर ईस्वर परायेण आहेत जाणोन स्वामींनी आपले तर्फे सदरहू कसबा येक व देह च्यार कुलबाब कुलकानु दखील हाली पटी व पेस्तर पटी जलतरूपाषाणसहीत खेरीज हकदार व इनामदार करून वंशपरंपरेने इनाम दिल्हे असे तरी तुम्ही हे जाणून सदरहू लि॥ प्रमाणे इनाम मशारनिलेस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुरक्षित चालविणे खंडणी अगर हरयेक उपसर्ग येकंदर न देणे लिहिले प्रमाणे इनाम चालवावयासी हिंदू होऊन इस्कील करील त्यासी श्रीवाराणसी मध्ये गोहत्यादिपातक व मुसलमान होऊन इस्कील करील त्यासी सोराची[2] सौगंद[1] असे यासी कोण्हीही हरकत न करणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटियासी मशारनिले यासी परतोन देणे. जाणिजे. निदेश[3] समक्ष.

१ सौगंद-शपथ, २ सुवर-डुकर, ३ समक्ष केलेली आज्ञा ३ रुबरू हुकूम

लेखांक ६०

तारीख २४–१०–१७२७

श्री

कर्नाटक जमाव

सन ११३७

रु. नं. १०७४

फसली

आज्ञापत्र राजमान्य राजश्री पिराजी घोरपडे ता। मोकदमानी मौजे बेटद पांगरे का। कटी सु।। समान अशरीन मया व अलफ मौज मजकूर राजश्री खंडोजी निकम शमशर बहादूर याणी मठ श्री याकडे धर्मसंरक्षणास इनाम करून दिल्हा आहे त्यास सांप्रत नारासांवत कुडाल्कर यावरी मोहीम करावयाकारणे राजश्री छत्रपति स्वामीनी आज्ञा केली त्यावरून आम्ही फौजेसह वर्तमान पाटगावच्या मुकामास येऊन श्रीचे दरशणास येऊन दरशण घेतले श्रीचे शिष्य राजश्री चतुर्तगिरी महंत याचेही दरशण घेतले आशास स्थळ माहजाग्रत तसे चतुर्तगिरीबाबा योग्य आहेत अन्नखर्च फार परंतु उत्पन्न नाही याकरिता संकोचित मानीवते आहे अशाच्या स्थळची सेवा अनन्य जागीकडून जागीकडून घडलियाने महापातके नाश होतील श्रेयस्कर विशेष आहे हे जाणून खेरीज हकदार करून मौजे मजकूर कुलबाब कुलकानु इनाम करून दिल्हा आहे तरी तुम्ही मटचे स्वाधीन होऊन मटीच्या निसबतीने जो येईल त्याच्या आज्ञेत वर्तणूक करून आकार प्रमाणे हकदार इनामदार खेरीज करून उसूल मटाकडे सुरलीत देत जाणे म्हणजे मटधर्मा सेवच होऊन राजश्री स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याणाभिवृद्धी चिंतून सुखरूप राहतील दुसऱ्याकडे काही उसूल न देणे प्रतीवरसी नूतन पत्राची आपेक्षा न करिता या पत्राची नकल लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवटियास बावाकडे देणे जाणिजे रवाना छ १९ माहे रोवल

मोर्तब

सूद

लेखांक ६१

तारीख २४--१२--१७२७

(जमाव दप्तर)

रु. नं. ५२

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरे पौष बहुल अष्टमी भानुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी समस्त प्रांत संगमनेर यासी आज्ञा केली यैसीजे वेदमूर्ति राजश्री उमाभट बिन गंगाधरभट उपनाम ऋषी गोत्र भारद्वाज सूत्र आश्वलायन वास्तव्य मौजे कोपरगाव पा। कुंभारी प्रांत संगमनेर थोर ब्राम्हण यानी स्वामीसंनिध विदित केले + +

(दोन ओळीं मजकूर फाटला आहे) + शाहूराजे[1] + + माहाराज +
यण स्वामीनी दयावंत होऊन इनाम करून दिले पाहिजे म्हणोन विदित केले त्यावरोन मनास आणोन विद्यावंत पुरातन राज्यांतील आश्रित + + (योग) क्षेमास गाव इनाम दिधलियाणें राज्यास कल्याण जाणून मौजे कोपरगाव पो मजकूर येथील मोकासा हक कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पटी चतुःसीमा पूर्वमर्यादे पो स्वामीनी वेद-मूर्तीस इनाम मान्य करून दिधला असे तरी तुम्ही मट गोसावी याचे स्वाधीन करणे आणि इनामे-यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालविणे वर्षप्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करणे या सनदेची प्रती घेऊन आसल भोगवटियास परतोन देणे. निर्देश समक्ष.

रुजु बार सुद रुजू सुद बार.

लेखांक ६२ इ. स. १७२७--२८

श्री

कर्नाटक जमाव
रु. नं. १०७०

हरि गुरुभक्त परायण राजश्री
दुर्गगिरी महंत गोसावी यासी

स्नेहपूर्वक पिराजी घोरपडे नमोनारायण विनंती सु।। समान असरीन मया व अलफ तुम्ही पाटगांवचे मुकामी आम्ही श्री स्वामी समाधी दर्शनास आलो ते समई मटीचे सबिस्तर वर्तमान विदित केले कीं पूर्वी पासून राजश्री थोरले कैलासवासी स्वामीनी मटी खर्चावेचास राजग्रहसंमधे उदंडच बेगमी केली होती.

....

लेखांक ६३ इ. स. १७२८

चि. द. रु. नं. ४

श्री

आर्ज विनंती देवजी आटोले दंडवत विनंती उपरी आपली नियेत हेच आहे कीं साहे-बाचे पाये आपल्या जिवात जीव आहे तोंवर सोडीत नाही साहेबसरींरंगपटणास गेले

---

१ टीप :— १ (राज्याभिषेक शके ४२ मन्मथनाम संवत्सरे फाल्गुन बहुल पंचमी गुरुवासर या दिवशी श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी गाव मजकूरचा स्वराज्या पैकी मोकासा ऋषी यास इनाम दिल्हा होता. खंडेराव दाभाडे सेनापति यांच्या मार्फतीनें छत्रपति स्वामीची व हे ऋषी याची भेट सातारा मुक्कामी त्यापूर्वी झाली होती.) नगर जमाव रु. नं. ८५३

ते साली आपल्या पायास आजार जाहला तेसाली तवाई पडली साहेबाच्या नांवावरून घरी राहिलो दुसरे साली बंदोबस्ती मोडिली ते साली साहेबी पांच महाल दिल्हे त्या माहालंत राजश्री संभाजी राजे व व रो पिलाजी जाधव याही वसूल नेला ते तवाई आपणावर पडली साहेबी पाचा माहालातून दोन माहाल काहाडले यास्तव आपण रुसवा करून गेलो कीं गेलो साहेबासी नेम करूण गेलो की जमाव करूण साहेबाच्या पायापासी येतो साहेबी मेहेरबानगी करूण पत्र पाठविले त्या पत्रावरूण साहेबाच्या पायापासी आलो ....
साहेबी आपल्यास माहाल दिल्हे होते ते माहाल साहेबी मेहेरबानगी करुण दिल्हे पाहिजेत बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ६४ तारीख १३–१–१७२९

श्री

कर्नाटक जमाव

रुमाल नं. १२००

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलकनाम संवत्सरे पौश बहुल दशमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे ता। हवेली कोल्हापूर यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री खंडोजी बिन नरसोजी करजकर करंजकर हे पुरातन स्वामीच्या राज्यातील येकनिष्ठ सेवक तीर्थस्वरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामी पासोन हाकालपरयत मनोभावे निष्ठेने सेवा करीत आहात तीर्थस्वरूप राजश्री संभाजी राजे काका याचीही सेवा येकरूपनिष्ठेने करून त्याची कृपा बहुतच संपादून आपली नान्मा करून घेतली त्या नंतर तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी स्वामी चंजी प्रांते जाता या प्रांते राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा आणि राजश्री परशुराम पंडित यांजवरी कुल मुख्तीयार देऊन ठेविले होते तेव्हा म॥रनिलेसही याजवल ठेविले ते प्रसंगी याणी स्वामीच्या राज्याभिवृध्दी विषयी बहुतच श्रमसाहस केले त्याउपर अवरंगजेब पादशाहा याणी किले सातारा व सजनगड व वसंतगड व विशालगड आदिकरून परीघ घालून बैसले तेसमई म॥रनिलेनी गडकिल्यास समा[1] जवादा पाववून गडकिले शर्तीमर्दीनें भांडविलें. राजश्री शिवाजीराजे दाजी याची सेवा निष्ठेने केली स्वामी राज्यासनारूढ जाहालियापासून स्वामीच्या पायासी निष्ठा धरून त्रिकर्ण शुधीने सेवा केली स्वामीच्या पायाविना दुसरे जाणत नाही याचे सर्व प्रकारे उर्जित करून चालवणे हे स्वामीस परम आवश्यक याचा वृधापकाल याकरिता स्वामी याजवरी कृपालु होऊन मौजे मुरशिंगी ताळुके हवेली कोल्हापूर हा गाव खासगीचा यास मुकासा दिल्हा होता तो हाली

१ सामान सुमान

स्वामीनी यास नूतन इनाम कुलत्राब व कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाण-निधिनिक्षेपसहीत खेरीज करून हकदार व इनामदार करून यास इनाम अजरामऱ्हामत करून दिल्हा असे तरी तुम्हीं मौजे मजकूर पूर्व मर्यादे प्रमाणें याचे स्वाधीन करणे आणि इनाम यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें या पत्राची प्रती लेहून घेऊन असल याजवल भो परतोन देणे. निंदेश समक्ष.

मर्यादेय
विराजते
रुजू
सुरू सुद बार

(पत्राचे पाठीमांग)

लेखांक ६५ इ. स. १७३०

श्री

चि. द. रु. नं. ४

सेवेसी विज्ञापना आपली फौज वाल्व्यास आली यास यैसे भासले कीं गतवरसी वारणे पलीकडे फौज बसली होती त्याप्रमाणे हाही मजकूर दाभाडीकडील राजकारण पहिले येथे आले होते सांप्रत नाही येथील ग्रहस्तही आम्हास वारंवार दाभाड्याकडील मजकूर विचारतात याची आस्ता त्याचे ठाई कांहींसी आहे परंतु स्वामीच्या दहशतीमुले कोणाच्या गला पडो शकत नाहीत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

लेखांक ६६ तारीख १६-४-१७३१

रुमाल नं. ५५ जमाव दप्तर

राजमंडल

प्रांत दक्षण सु॥

चिरंजीव राजश्री संभाजी राजे यान्चा तह करून मुलुक नेमून दिल्हा छ १९ माहे सौवाल सन इहिदे सलासीन चैत्र बहुल शष्ठी भृगुवासर विरोधक्रुतनाम संवत्सर चिटनिसी पत्रे

(डावी बाजू)

अहद वारणा तहद संगम कृष्णा तदपासून निवृत्ती संगम तुंगभद्रा पावेतो दरोबस्त मुलुक दिल्हा येविषई पत्रे

१ पा कागल १ पा हुकेरी १ पा गोकाक १ पा जमखिंडी १ पा तेरदल १ पा तोरगल १ पा कितूर १ पा गदक १ पा लक्षमेश्वर १ पा जालेहाल १ पा बादामी १ पा हावनूर १ कर्यात अडगल १ पा नवलगुंद १ पा मुधोल पंचमहाल १ पा नरगुंद । १६

१६

१ देशमुख देशपांडे अहद वारणा तहद तुंगभद्रा

—

१७

ठाणेदारास पत्रे

१ आलते व नांदणी व घुणकी व हेरले व हातकणगले स्वाधीन करणे म्हणून सदरहू ठाणेदारास पत्रे

१ बावाजी थोरातास पत्र जे वडगावचे ठाणे पाडून स्वाधीन करणे

—

२

० किता पत्र रा।। हिंदुराव घोरपडे यास कीं तुम्हाकडे गडकोट ठाणी आहेत ती चिरंजीवाच्या स्वाधीन करणे म्हणून पत्र १

(उजवी बाजू)

किता कोकण प्रात अहद सालसी तहद पंचमाहाल आकोले दरोबस्त दिल्हे येविषई पत्रे

१ फोंड सांवत भोसले सरदेसाई पाा कुडाल

४ देशमुख देशपांडे याचे नावे

१ सुभा कुडाल — १ सुभा भींवगड.

१ सुभा फोंडे — १ सुभा आंकोले.

—

५

किता पत्रे किले कोपल चिरंजीवाच्या स्वाधीन करणे म्हणून पत्रे

१ मुद्राधारी किले मजकूर यास १ गोविंद मोरे १ सुभानराव मोरे

१ बलवंतराव सिवदेव

—

४

रा।। कुसाजी येसाजी भोसले यास पत्र जे अहद वारणा तहद तुंगभद्रा पावेतो मुलुक व गडकोट व ठाणी चिरंजीवाच्या स्वाधीन केले आहेत तुम्ही त्या प्रांते उपसर्ग न देणे हेरले व आलते व नांदणी हातकणंगले व घुनकी सदरहू ठाणी याचे स्वाधीन करणे व वडगांवचे ठाणे पाडोन त्याच्या हवाला करणे म्हणून पत्र १

किता गगनगड उर्फ किले बावडा चिरंजीवाच्या स्वाधीन करणे म्हणून पत्रे

१ रा।। भगवंतराव पंडित यास

१ मुद्राधारी व लेखक किले मा।र

—

२

लेखांक ६७ तारीख २५-६-१७३१

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. २८३

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५८ विरोधीकृत नाम संवत्सरे आषाढ शुध द्वितीया गुरुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी

राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी मामले मिरज यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे नवकस देशमुख प्रांत मजकूर याणी मनोलीचे मुकामी स्वामीसंनिध विनंती केली कीं आपले आजे राजश्री संताजी घोरपडे याणी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामीची सेवा मनोभावे केली याजकरिता कैलासवासी स्वामी आपले आज्यावर मेहेरवान होऊन मामले मिरज येथील देशमुखीचे वतन पूर्वी जैन व ब्रांम्हणाचे होते त्यास थोरले माहाराज राजश्री कैलासवासी याच्या पायासी अनराहाटी केली यास्तव त्याचे वतन दूर केले होते ते मारनिलेस चंदीचे मुकामी मन्हामत करून दिल्हे त्याप्रमाणे आपल्या आज्यानी अनभविले त्याप्रमाणें आपले चुलते राणोजी घोरपडे याणी अनभविले ते स्वामी कार्यावर पडिले त्याउपर आपले बाप राजश्री पिराजी घोरपडे याणी अनभविले हाली वतन सेवकास चालत आहे परंतु भोगवटियास पूर्वील पत्रे होती ती आवांतर प्रसंगामुले गेली पुढे भोगवटियास पत्रे पाहिजेत ऐसियास सातारियास राजश्री शाहू राजे यासी विनंती केली त्याणी आपली पत्रे करून दिल्ही आहेत तर स्वामीनी आपली पत्रे भोगवटियास करून दिल्ही पाहिजेत म्हणोन विनंती केली आणि तीर्थरूप राजश्री शाहू राजे आबासाहेब याची पत्रे दाखविली राजश्री संताजी घोरपडे याणी राज्याभिवृद्धी विषयी श्रम असाधारण केले त्यामागे राणोजी घोरपडे याणी निष्ठेने सेवा केली राजश्री पिराजी घोरपडे याणी स्वामीची सेवा येकरूपनिष्टेनें केली हाली राजश्री राणोजी घोरपडे स्वामीची सेवा येकरूपनिष्ठेने करीत आहेत याचे सर्वप्रकारे चालवणे हे स्वामीस परम आवश्यक यास्तव पूर्वी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामीनी याच्या वडिलास मामले मिरज कर्याती अठरा येथील देशमुखीचे वतन मन्हामत करून दिल्हे त्याप्रमाणे स्वामी याजवर कृपाळू होऊन राणोजी बिन पिराजी घोरपडे यासी देशमुखीचे वतन पूर्ववत प्रो अजरामन्हामत करून दिल्हे कर्याती बि तपसील

किता

१ कर्यात हवेली मिरज

११

१ कर्यात म्हेसाल

७

१ कर्यात सांगली

१०

१ कर्यात इसापूर

८

१ कर्यात इचलकरंजी

९

१ कर्यात रुकडी

९

१ कर्यात उदगाव

९

१ कर्यात देसिंग

९

१ कर्यात सिराटी

१२

१ कर्यात भिलवडी

८

किता

१ कर्यात तासगांव

१०

१ कर्यात अजणी

१२

१ कर्यात कवठे

९

१ कर्यात भालवणी

८

१ कर्यात इठे

१२

१ मौजे कवठे महांकाल

१५

१ कर्यात बेडग

१०

१ कर्यात मनीराजोरी

८

येणे प्रमाणे कर्याती अठरा येकूण देहे येकशे शाहातर मामले मजकूर येथील देशमुखीचे वतन आजरामरामत करून दिल्हे असे या वतनास हकलाजिमा पानमान तसरिफा वाजे कानु इनामती व इसाफत महत कदीम चाल्त असेत त्याप्राो करार केले असे तर तुम्ही मामल मजकूरची सेवा याचे हाते घेत जाणे आणि देशमखीचे वतन राजश्री राणाजी बिन पिराजी घोरपडे याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रत लिहून घेऊन असल पत्र भोगवटियास परतून देणे. निदेश समक्ष.

मोर्तब

रुजू संमत मंत्री

तेरिख १ मोहरम सु॥ इसने

स॥ सुद बार बार बार

लेखांक ६८ तारीख १८-८-१७३१

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. २८३

छत्रपति

राजश्री नारो खंडेराऊ गोसावी या-

सी

अखंडित लक्षुमी आलंक्रुत राजमान्य श्रो राणोजी घोरपडे सेनापति सुा इसने सलासीन मया अलफ तुम्ही राजश्री स्वामीच्या राज्यातील कदीम सेवक आमचे सोब्रतीने बहुत श्रमसायास असाधारणे करून कितेक स्वामी कार्यें केली पुढेही स्वामी सेवेसी सादर याकरिता तुमचे उर्जित करून सर्वप्रकारे चालवावे हें अगत्य जाणोन सुभा प्रांत पनाळा व मामले मिरज या दोनी सुभेची सरदेशमुखीची वतन तुम्हास देऊन भोगवटियास आमचे वतनाची पत्रे दिली आहेत तरी तुम्ही वडिलाचे पुत्र पौत्रादि वौंत्रपरंपरेने वतन अनभत्रून सुखरूप राहणे यासी जो इस्कील करील त्यास आपले महनजब्याची[1] आण असे व गोत्र हत्याचे पातक असे जाणिजे छ २५ माहे सफर बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ६९ तारीख २९-८-१७४०

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. ७६७

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६७ रौद्रनाम संवत्सरे भाद्रपद बहुल त्रितीया गुरुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्त सेना धुरंधर राजमान्य राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे सेनापति यासी दिल्हे इनामपत्र यसीजे तुम्हाविसी राजश्री आपाजी सितोले याणी हुजूर येऊन विनंती केली जे पूर्वी कैलासवासी थोरले माहाराज याणी संताजी घोरपडे सेनापति यास मौजे लाट का इचलकरंजी पा मिरज व मौजे रांगोली का नेज प्रा हुकेरी हे दोनी गांव इनाम देऊन पत्रे करून दिल्ही होती

....

माहाराजानी कृपा करून नूतन इनामपत्रे करून देविली पाहिंजेत म्हणून त्याजवरून मनास आणिता पूर्वी कैलासवासी माहाराज यापासी संताजी घोरपडे सेनापति याणी येकनिष्ठ-

---

१ महनजब्याची = धर्माची.

पणे सेवा करून चंदीचे मसलतीस फौजसुधा जाऊन आसाधारण श्रमसाहास करूना स्वामीस संतोष पावऊन राज्य रक्षिले त्याअन्वये प्रस्तुत तुम्ही उमेदवार आहा येकनिष्ठ-पणे परंपरागत सेवा करीत आला याकरिता स्वामी तुम्हावर कृपालू होऊन पूर्ववत प्रमाणे तुम्हास·········खेरीज हकदार व इनामदार वजा करून हरदू गाव इनाम करून दिल्हे ···················जाणिजे निर्देश समक्ष.

रुजू सा

मंत्री

लेखांक ७० तारीख ११–६–१७४१

चि. द. रु. नं. ६

इसन्ने आर्बैन छ ८ रबिलाखर

राणोजी घोरपडे यास पुत्र जाला म्हणोन व्यंकटराऊ नारायण याणी साखर वाटली.

साखर वाटावयास कारकून आला

त्यास तिवट येक.

लेखांक ७१ तारीख २४–१२–१७४६

श्री

रु. नं. ५६ जमाव दप्तर

समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री सदासिव चिमणाजी यासी आज्ञा केली यैसीजे तुमचे विनंती पत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाही तर यैसी गोष्ट न करिता विनंती पत्री सविस्तर अर्थ लिहीत जाणे वरकड कितेक राणीवास वाडा चौथा याजपासी जे सांगण ते सांगितले आहे सविस्तर पत्री लिहितील त्याजवरून कलेल व राजश्री हरि राम यास स्वमुखे आज्ञा केली आहे आज्ञेप्रमाणे सांगतील ती स्वामीची वचन यैसी जाणून समर्पक उतर विनंती पत्री येऊन स्वामीस संतोषाते पावत यैसी गोष्ट करण सर्वावसी भारवाही तुम्ही आहा राजश्री जिवराज सिंदे हिमतबहादर यास जाऊन फार दिवस जाहले स्वामीचे दरशन बहुत दिवस नाही याकरिता दरशनास यात्रयाविसी मारनिलेस आज्ञा पत्र सादर केले आहे तर मारनिलेस तुम्ही च्यार गोष्टी बहुताप्रकारे सांगोन हुजूर दर्शनास पाठवून देणे मागती माघारे येतील येविसी हरि राम यास आज्ञा केली आहे आज्ञेप्रमाण सांगतील त्याजवरून कलेल. जाणिजे रा। छ २२ माहे जिल्हेज सूज्ञ असा.

लेखांक ७२ तारीख १९-१२-१७४७ नंतर

श्री

चि. द. रु. नं. ७

विनंती सेवक रामचंद्र बावाजी कृतानेक सेवेशी विज्ञापना सेवकास इकडे रवाना केले तेसमई आज्ञा केली आहे तदनुरूप आपला चिताभिप्राय निगुढ राखून प्रत्यक प्रत्यक सर्वांचे अंतरभाव शोधून साधनीय कार्यांचा विचार मनास आणिता राजश्री स्वामीकडील व बाईसाहेबाकडील अर्थ जो आढलला तो तिसरे जोडीबराबर सेवेशी लिहिलाच आहे अलीकडे छ १९ जिल्हेजची आज्ञापत्रे छ २७ जिल्हेजी प्रविष्ट जाली लेखनाभिप्राय अक्षरशा मनन करून तदनुरूप वर्तणुकेस सेवकापासून अंतर होणार नाही मुरारराव स्वामीकडील श्नेहाचा अर्थ बोलतात गत वर्षी भाऊसाहेबी लोभ केला तो ब्हूत आठवितात पुढील कर्तव्याचा करारमदार जाला तोही बोलतात तिन्ही संस्थानें गुदस्ता स्वामीकडे जाली आहेत त्याप्रमाणे करार जाल्याविना आपला त्याचा श्नेह कसा घडेल ? इत्यादि बोलणे व वर्ततेस्थितीत अंतर तो कांहीं दाखवीत नाहीत अंतर्भाव व परिणाम श्री आधीन सांगवडयाचे मुकामी बाईसाहेब व मुरारराव एके ठाई असता सेवकही मुजऱ्यास गेलो बहुत आदरेकरून बाईसाहेबी सन्निध बसवून घेऊन स्वामीकडील कुशल आदि करून कितेक वर्तमान विचारिले उतर प्रत्योतर जालियावरी बोलिली कीं तुम्हास बहुत दिवस जाले याकरिता तुमचे यजमान व तुम्ही आम्हावरी श्रमी असाल परंतु काय करावे हा घोर आजी सात आठ महिने पर्यंत प्राप्त होऊन आपणास कांही उगवले न कले ना मावलंलेन कले असे जाले होते सरकारचे किलेकोट ठाणी आपण अर्जोजीचे स्वाधीन केले होते ते त्याणी काटकाचे पदरी घातले थोरली धणीन व यमाजी भोसले याणी समय साधून आम्ही चांदरातीचे चांदरातीस पोटास मात्र मागून घ्यावे असे केले होते इतके अपेश्यास आपण पात्र जालो होतो परंतु एकवेल श्रीने तोंड उजल केले याउपरी तुम्हासी बोलो त्यापरते आम्हासही कांही नाही व आम्हापरते त्यासही इतर जोड अधिक काय आहे ? यैसे कितेक मायेममतेने बोलीस प्रारंभ केला सेवकेही त्याची स्तुतीस्तोत्र खुशामद जे करणे ते करून त्वरेने जाबसाल करावा कूच दरकूच स्वामी गंगेच्या रोखे चालिले याउपरी साहेबी दिवसगतीवरी न घालावे त्यावरी उतर दिल्हे कीं बोलणे बहुत आहे स्वच्छ चिते तुम्हासी उदईक बोलो इतके बोलोन आणिखी कारभारास लागली मुरारराव उठोन चालिले सेवकही जाऊ लागलो तेसमई बोलली कीं तुम्ही कांहीं नूतन नव्हा यथील राबित्याचे उसण्यासारिखे जाता पलता कां ? बसा. त्यावरी राव आपले डेऱ्यास गेले सेवक प्रहररात्र पर्यंत होतो तेसमईची बोलीची पुरवणी आलाहिदा आहे त्यावरून विदित होईल फलारास देवविले खासे विडे देऊन बिराडास जावयाची आज्ञा केली प्रातःकाली राजश्री स्वामीनी बोलाऊन नेऊन राजश्री उपाध्यबावास बसऊन प्रारंभापासून बोलीचा संदर्भ सांगितला अर्जाजीचे विद्यमाने याददास्त ठहरली असता

पुन्हा गोष्ट राहिली त्यावरी राजश्री गोविंदराव चिटनीस याचे विद्यमाने भुदरगडची गोष्ट सोडऊन आपण करार केला होता तो पुन्हा अर्जोजीने मोडून सर्वांस उडऊन आपमते भुदरगडची गोष्ट ठराऊन करार केला आहे म्हणून बोलले श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ७३ पैा तारीख ३०-१-१७४८

श्री

चि. द. रु. नं. ६

छ १० सफर

सेवेसी विज्ञापना वाडीकर सांवत व रा। भगवंतराव मिलोन तुलाजी आंगरे याचा मुलुख मारीत विशालगडाखाले गेले तेथे रा। गंगाधरपंतही सामील जाले रत्नागिरीची खेडी मारून संगमेश्वर प्रांते गेले आंगरयाकडील पांडुरंग दादाजी येथे संनिध होते त्याणी राजश्री स्वामीकडे व बाईसाहेब व मुरारराव याकडे संदर्भ राजकारण करून त्याणी दीड लक्ष रुपये द्यावे रा। गुती याणी रांगण्याचे घाटाने फौज वाडीवरी नेऊन वाडीकराचे पारपत्य करावे असा सिधांत होऊन यशवंतराव गायकवाड व वजारतमाबाकडील जीवभट पांडुरंग दादाजी देखील विजेदुर्गास जाऊन आजी छ २७ मोहरमी साहा दिवस जाले हे वर्तमान कळून भगवंतराव व गंगाधरपंत याकडून निषेधाची पत्रे आली आहेत साताराहूनही पत्रे येतच आहेत पुढे कसे होते पाहावे मुराररायाची फौज चार हजार गणती तीन हजार फौज चांगली आहे येका दो दिवसी हे करवीरास जातात राजश्री व बाईसाहेब वडगांवाहून तेथे येऊन पुढे जो सिधांत होणे तो होईल तोफा व जेजाला काली माघारे करवीरास गेल्या तलंदग्याबाबत लहान थोर दोन सवा दोनसे घोडे सांपडले आहे तेही करवीरास पाठविले घोडीपीढी गुरेंढोरें वस्तभाव व रयतीचा वगैरे सारा येकंदर खंड पैकी पावणा लक्षाची भरती जाली आणिखी निर्माण होता दिसत नाही हाणामारी मात्र होत असते करवीरी मुराररायास कर्ज पनास साठ हजार रुपये देणे आहेत त्या खेरीज राजश्री विष्णूपंत साताराहून देवास आले होते त्याचे मारफात वीस हजार रुपये घेतले होते त्यास प्रस्तुत जवाहिराच्या वस्ता आणून देऊन ते कर्ज फारीक केले बाईसाहेबाचे विचारे सेनापतीची दोन च्यार ठाणी घ्यावी हे बहुत होते परंतु याणी उतर दिल्हे कीं वडगांवचा प्रसंग तुमचा सुरलीत करून दिल्हा याउपरी आपली उस्तवारी उभारणी काय करिता ते करा पुढे जे आज्ञा कराल त्यास हाजीर आसो असे म्हणोन आपले खासागत बोलीचा प्रसंग घातला आहे सुभानजी सिंदे याचे स्वाधीन पथके आहेत त्याकडे लक्षा दीडा लक्षाचा सरंजाम आहे तो आपणाकडे द्यावा सेनापतीचा सरंजामदेखील सर्व आपले स्वाधीन करावा यैसी बोली घातली आहे याउपरी त्याचा याचा सौरख्य कसा राहतो मनसबा काय ठरतो ते मागाहून लिहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ७४

माहे फेब्रुवारी इ. स. १७४८

चि. द. रु. नं. ६

श्री

विनंती सेवक रामचंद्र बावाजी कृतानेक सेवेशी विज्ञापना बाईसाहेबाचे विचारे होते कीं वजारतमाब याचे विद्यमाने स्वामीकडील प्रसंग ठराऊन त्यास स्वामीचे पदरी बांधावे हे बहुतसे होते वजारतमाब याणी सर्व सोडून या संदर्भावरी आपण स्वामीचे कृपेस पात्र व्हावे स्वकार्य साधावे हे फारच चिती धरिले होतें श्रीनिवासरायास वडगावास पाठवून बाईसाहेब येविषयी विनंती करून लस्करात आणिली वजारतमाब याचे कौशल्यरीतीचा भरोसा न पुरवे याकरिता सेवके निराले वाटेने बाईसाहेबास अर्ज केला त्यावरून बाईसाहेबी त्यास साफ उतर सांगितले कीं तिकडील राजकारण आपणास परिछिन्न करणे नाही आणयास तुम्ही साफ निरोप द्या असे सांगोन वडगावास गेली सेवके मुराररायाजवली दुसरे दिवशी निकडीने निरोप मागितला त्याणी येक तिवट ताडपत्री पासोडी सेवकास दिल्ही सासुदास तिवटे दिल्ली घोडा येक सेवकास देता होते परतु कार्य नसता घोडा कश्यास पाहिजे म्हणून घेतला नाही स्वामी कारणे वस्त्रे पत्रे देतो म्हणोन एक जोडी ठेऊन घेतली आहे सेवक येथे वडगावी येऊन बारावे सफरीदाखल जालो वेदमूर्ती दादंभटजीनी बाईसाहेबाचे पत्र घेऊन सेवेशी पाठविले होते ते प्रविष्ट जालेच असेल पत्रे आणविली होती त्याचा मार्ग बाईसाहेब पाहत आहेत दादंभटजीनी बहुत श्रम केले आहेत पुढे प्रयोजनावरी सादर यैसे असता त्यास पत्र यत नाही तरी त्यास पत्र व त्याणी आणविल्याप्रमाणे पत्रे सत्वर येत ते आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत वजारतमाब येथे आल्यावरी भेटी जाली जोडीकरिता तटलो आहो म्हणून यास सांगितले लस्करास जाऊन पत्रे वस्त्रे देऊन जोडी पाठवितो आम्हाकरिता दोन दिवस राहाणे म्हणून बहुतप्रकारे सांगोन ते आपले घोरास लागले आहेत येथील दिनचर्येचे वर्तमान वरीचेवरी सेवेशी विदित व्हावे याकरिता तपासले सेवेशी लिहितो येथून गेली जोडी अद्यापि आली नाही व सेवकास वर्तणुकीची आज्ञा वरचेवरी पत्रारूढ होऊन येई ते आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ७५

माहे फेब्रुवारी इ. स. १७४८

चि. द. रुमाल नं. ७

कृतानेक विज्ञापना सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेबी आपले पत्र देऊन जोडी रवाना केली आहे त्या पत्राचे उतर यताच स्वामीनी आज्ञा केल्याप्रमाणे पर्यायेकडून निरोप

घेऊन सेवेसी येतो स्वामीकडील आस्था बहुतसी धरून वरीचेवरी ममतापूर्वक बोलणे ते बोलत असतात शामराव दिवाण केले त्याचे स्वाधीन पागा केली त्यास सांगितले की श्रीमंताकडील मतबराचे स्वाधीन स्थले करून या प्रांते आखर घालवितो घटपे अली-कडीलही बंदोबस्त त्याचे हाते करवितो तुमचे साहित्य उपराला सर्वस्वे त्याकडून होईल इत्यादि त्यास दिलासा देऊन त्यास उभे केले तेही सेवकाचे भेटीस आले होते स्वामीचे पदरीचेच यैसी निष्ठा धरितात वरकडही कितेक संदर्भ आहेत सेवेशी आलियावरी सविस्तर विदित करीन वेदमूर्ती राजश्री दादंभटजीनी श्रम बहुत केले आजी दोन वरषे पर्यंत घरदार कांहीं म्हटले नाही प्रस्तुत इकडून रूपास आले असता स्वामीकडून विलंबावरी पडिले यामुले श्रमी आहेत समाधानपूर्वक स्वामीचे पत्र आले त्यावरून कांही स्वच्छता पावले पुरातन स्वामीचे पदरीचे बुधीमंत ममतेचे आहेत बाईसाहेबाचे पत्राचे उतर इतके दिवसांत तेथून रवाना जालेच असेल नसिले तरी सत्वर उतर येई ते आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत उतर येतेक्षणी सेवक पर्याये करून निरोप घेऊन स्वार होऊन सेवेशी येतो मासे पक्ष लागेल इतक्या अवकाशे म्हणून आलो त्यास पाच महिने होऊन गेले साहावा महिना चालतो या उपरी त्वरेने चारणदृष्टीस पडतील तो सुदिन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ७६ माहे फेब्रुवारी इ. स. १७४८

चि. द. रु. नं. ७

श्री

सेवेसी विज्ञापना स्वामीचे आज्ञेप्रमाणे वजारतमाब यासी मार्गस्त करून संस्थानचे ताकीद-रोखे घेऊन सत्वरीच सेवेशी येतो सौभाग्यादि संपन्न मातुश्री बाईसाहेबाचे बोलीचा भावगर्भ सविस्तर वेदमूर्ती राजश्री दादंभटजीनी सेवेशी लिहिलाच असेल सेवकाच्या भेटी जाल्या त्यात पूर्वी आढळला अर्थ सेवेशी लिहिलाच आहे हाली वडगावी आलियावरी पूर्वील निकटवर्तीपण आठऊन बहुतच ममता दाखविली दोन च्यार दिवस भोजन समईही जवलून उठो दिल्हे नाही भाव बोलण्यात, बोलली कीं गुदस्ता जाले कारभारात येका दो गोष्टीची आमची रदबदली आहे संच्छानच्या ताकिदी देऊन मग बोलो ऐसे बोल-तात घोरपडयाबाबत व मोतादेबाबत येवज वजा होऊन करार ठरल्याविना नाही म्हट-ल्यावरी बोलली कीं आम्ही कांहीं संच्छानापुरतीच त्यासी ममता धरली आहे यैसे नाही व त्यासही आणिखी कारभार नाही म्हणून दीड तोला पावरती असे म्हणावयासाठी केले आहे असे नाही ते देऊ जाणेत आम्ही घेऊ जाणो इकडील सर्व विचारास बेजार होऊन आम्ही त्याचे मांडीचे उसे केले आहे कोणीही हुजूर ठेऊन खर्चवेच सर्व त्याचा त्याणी मनास आणावा या अर्थे बोलतात वजारतमाब गेल्यावरी जाबसाल करून सेवेसी येतो. सेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ७७ तारीख ९-३-१७४८ नंतर

चि. द. रु. नं. ८

श्री

विनंती सेवक रामचंद्र बावाजी कृतानेक सेवेसी विज्ञापना छ २२ सफरची आज्ञापत्रे छ १४ रबिलवली प्रविष्ट जाली छ ११ रबिलवची छ २० रबिलवली प्रविष्ट जाली स्वामीचे आज्ञेप्रमाणे सेवकापासोन वर्तणुकेस अंतर होणार नाही अलीकडील वर्तमान वजारतमाब अद्यापवरी तलंदग्यावरी आहेत फौज दीड हजार पर्यंत आहे नित्य दंगा धरणी पारणी होणे ती होतच आहेत कागदपत्रा करिता कारकून हुजूर ठेविले आहेत ते येथेच आहेत सोभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेबात त्यात नित्य नूतन + + सच वाढत चालिला एका दो रोजात + + जाणार आहेत ते स्वार होऊन गेलियावरी सेवक स्वार होऊन सेवेशी येतो सातारा थोरली धनीन यात व राजश्री प्रतिनिधि पंतात विपर्यास बहुत आला आहे प्रतिनिधिपंताकडून बहुत गौप्यरीतीने पत्रे वस्त्रे येऊन हाट राबिता लागला आहे राजश्री यसाजी भोसले याणी त्याचा गाव येक लुटिला कऱ्हाडा अलीकडे धुंद आरंभिली वजारतमाब याचाहि पैगाम यसाजी भोसल्याकडे आहे दुसरे वजारतमाब याची मातुश्री लक्ष्मुमीबाई समीप आली सातारा जाणार थोरले धननीचे अनुमते सिरक्याकडील मूल मुराररायाचे बंधूस नेमस्त करणार या वर्तमानावरून बाईसाहेबी राजश्री रामचंद्र नाईकास लस्करातून बोलावून आणून वजारतमाबास बहुत नसीहत करून सांगोन पाठविले जरी हे गोष्टी केली तरी तुम्ही परिछिन्न आमचे नव्हा म्हणून साफच निरोप गेला आहे पुढे जे होईल ते मागाहून लेहून पाठवितो सावनूरकराकडील कारकून आला आहे तो येथेच आहे सोंध्यास हुजूरचे हेजीब होते तेही आले सोंधेकरानी लिहिले आहे कीं संस्थानास बहुत उपसर्ग लागला याउपरी संस्थान हुजूरच ठेवावे म्हणून बहुत ग्लांतीनें लिहून व सांगोन पाठविले आहे तेही हेजीब ठेऊन घेतले आहेत राजश्री दौलतराव घोरपडे यास राजश्री सुभानजी शिंदे याची कन्या दिल्ही आहे त्याना त्याने बाईसाहेबास बहुत मायेममतेने सांगोन पाठविले कीं आपला अभिमान धरावा स्वामीचेही कृपेचा हेतु बहुत धरतात मुराररायासी जुमानून राहावे तुंगभद्रे अलीकडे याचा पाया असो नये या धावंतीत पितापुत्रही आहेत राणोजी घोरपडे सेनापती व यमणा[१] मिलोन यास सुरलीत जाऊन द्यावे या धावंतीत आहेत राजश्री भगवंतराव व गंगाधरपंत व वाडीकर याणी मुडागड घेतला लोक सोडिले गड पाडणार वाडीकर वाडीस गेले साताराहून माहराज राजश्री स्वामीची वस्त्रे व बहुत गौरवे करून पत्रे त्रिवर्गासही गेली येथूनही जाणार फिरंगी याणीं येथील बातमी राखिली आहे स्वामीकडील पैगाम येथे सद्दढ जाला तरी वाडीकरासी

१ यमणा चिकोडीकर.

स्नेह करावा या विचारात आहेत हे गोष्ट न बने श्नेह त्यासी करीत नाहीत सिंधेदुर्ग बहुत नातवानीस आला प्रस्तुत कोकण प्रांती गला मुतलक मिलत नाही पाच चार हजाराची पैदास्त सिंधुदुर्गी जाली होती तुलाजी आंग्रे याजकडून विसाजी पंत पुनरुक्त सातारा गेले गोवलकोट नजर करून कृपा संपादावी हा हेतू धरिला आहे म्हणून येथे वर्तमान आहे अर्जोजी वादव याची स्त्री व यैवज मालवज + + + थांग्याथांग्य.नी लांबला अ + + माहाराजानी हुजूरे ताकिदी देऊन सारे इकडील इकडे यावे सारिखे केले आहे अर्जोजीस चौकी आहे वडगावच्या मामल्यास मामलेदार योजीत आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ७८ तारीख १५–८–१७४९

श्री

चि. द. रु. नं. ४

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्ये मातुश्री जिजाबाईसाहेब याणी राजेश्री रामाजी मल्हार यासी आज्ञा केली यैसीजे सुा खमसैन मया व अलफ इकडील बंदोबस्तीविसी कितेक अर्थ लिहिला आहे तरी तुम्ही समर्पक खालजाब करून इकडील बंदोबस्त होये आणि तुमचे सेवेचा मजरा होये यैसे करणे येविसीचे सविस्तरे मुक्ता केदारी सांगता कलल त्याप्रमाणे समर्पक करून बंदोबस्त होये जाणिजे रवाना छ १२ माहे रमजान लेखनसीमा.

चवथा
वाडा मोर्त
ब सूद
बार

लेखांक ७९ तारीख १९–१२–१७४९

चि. द. रुमाल नं. ४

श्री गजानन

सेवक भास्कर हरि कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ता छ १९ मोहरम भोमवार मुकाम तांदुलवाडी स्वामीचा निरोप घेऊन शनिवारी निघालो ते अदितवारी तिसरे प्रहरी वारणेवर मुकामास आलो राजश्री सिवाजी थोरात याणी राऊत टाकोटाक रवाना वालवेस राजश्री सिदोजी थोरात यासी पाठविल होत त्यानी करवीरास बातमी नेहमी ठेविली होती तो राजश्री स्वामी करवीराहून निघोन वडगावास इकडे यावयास आले बातमी कलताच वालवेहून दोनसे तीनसे स्वारानिसी निघोन येथे प्रहररात्रीस आले आम्हाकडे राऊत पाठविले आम्ही व ते यसे काली सोमवारी प्रातःकाली येकत्र

जाहालो तो दोन तास दिवसास राजश्रीकडून हुजूर दोघे आले कीं तुम्ही येते काये निमित्य आला आहो ? कैसेकाये वर्तमान ? त्यास राजश्री सिदोजी थोरात याचे नांवचे पत्र लिहून पाठविले कीं राजश्री पंतप्रधान यानी आज्ञा केली कीं तुम्ही वारणेचे तीरी जाऊन जमावसुधा मुकाम करणे आम्हाकडूनही भास्करपंत व सिवाजी थोरात व सेट्याजी पुणेकर हजार राऊतानिसी रवाना केले आहेत कीं आपण इकडे येतील याकरिता तर आपणास इकडे येण आसिल तर सप्तरुसीस पत्रे लिहिणे तेथून आम्हास आज्ञा येईल राजश्रीसह सार आपण इकडे यावे नाहीतर येकंधर न यावे यैसे उतर लिहून दिले ते हुजुरे माघारी गेलेवर रा। रामाजी माणकेस्वर याणी आम्हाकडे जासुदासमागमे हे लाखोटे पाठविले ते सेवेसी पाठविले आहेत जाहले वर्तमान सेवेसी लिहिले आहे राजश्री सिदोजी थोरात तीनसे स्वार व तीन हती समागमे घेऊन आले आहेत खर्च भारी आहे राजश्री येसाजी भोसले त्याचे मेहुणे पनास स्वार व पनास प्यादेनिसी आले आहेत राजश्री नारो शंकरही वाटारावर आले म्हणून वर्तमान आले व त्यानीही राऊत पाठविले तेही उदईक येतील पुढे आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू सेवेसी श्रुत होये हे विनंती राजश्री उदाजी चवाण यैनापुरावर आले म्हणून वर्तमान आहे त्याचे बातमीस मिरजेस व कुर्देवाडास माणसे पाठविली आहेत आणि आम्ही येथे आलो म्हणून रा। आनंदराऊ डुबल यास मिरजेस पत्र पाठविले हे विनंती.

लेखांक ८० माहे एप्रील इ. स. १७५०

चि. द. रुमाल नं. ८

श्री

राजश्री पंत प्रधान

गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो राणोजी घोरपडे सेनापति दंडवत विनंती उपरी येथील क्षेम जाणून निजानंदलेखन सेदयता करीत जावी सांप्रत बहुत दिवस अतिक्रमले परंतु पत्रद्वारे परामर्ष न केला यैसे न करिता सदोदित प्रेसित पत्रार्थ श्रवणे आनंदवाप्ती करवावया आवितारता असो द्यावी पूर्वीपासोन या दौलतींची उभारणी करावी हे आवष्यक राव कैलासवासी यासी बहुत होते परंतु आमच्या विषम योगास्तव त्यासी आयुष्य स्वल्प जाहले बरे त्यास पदरी पुर्वार्जित महतपुण्ये होंती यास्तव आपणासारिखे कुलदीपक उदरी जन्मले तत्कर्तुत्वापेक्षा आपणही महत्कीर्ति संपादिल्या जितके त्याच्या परिश्रमाचे त्याची उर्जित केली आणि या दौलतीचे अगत्य किंनिमित्ये न धरिले हे न कले याउपरी या राज्यातील मजकूर आपणास कललाच आहे आमचे साद्यंत वृत आपणास निवेदन व्हावे येदर्थी राजश्री जिवाजी सिधेश्वर पाठविले आहेत त्याचे मुखोद्गतें मनन करावे आणि आपले आगमन सप्तरुसीहून स्वस्थळासी

जाहले नंतर आम्ही भेटीस येऊ याउपरीं या दौलतींचे न्यूल्यपूर्ण सर्वही आपणास पावेल कळले पाहिजे बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.[१]

लेखन

सीमा

तारीख १०-६-१७५०

लेखांक ८१

चि. द. रु. नं. ८

श्री भवानी प्रसन्न

सेवेसी विनंती सेवक येमाजी सिवदेऊ कृतानेक विज्ञापना तागायत छ १६ रजब रविवासर प्रातःकाल मु॥ लस्कर आंकलखोप संनिध राजश्री पंतप्रतिनिधि साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष छ १३ रजबी कसबे मसूर येथून निघोन छ १४ रोजी लस्करास श्रीमंता संनिध आलो प्रस्तुत वर्तमान ऐकिले जे सौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाई साहेबा बराबरी राजश्री येकाजीपंत चिकोडीकर यासी घेऊन श्रीमंत राजश्री प्रधानपंत याच्या लस्करास गेली म्हणून कलले बहुधा सत्यच आहे ऐकिले वर्तमान सेवेसी कलावे म्हणून लिहिले असे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

माहे सप्टेंबर इ. स. १७५०

लेखांक ८२

चि. द. रु. नं. ४

श्री रामचंद्र श्री माहाराज रघुवीर

चिरंजीव राजश्री सिवरामपंत व राजश्री भास्करपंत यासी आसीर्वाद विनंती उपरी राजश्री प्रतिनिधि यांचा अर्थ लिहिला तो कलला यैशास कारभारी दुर्योधन व राजश्री भाऊ माहाराजास सांगितले ते प्रमाण आहे आमचा कांही येत्न चालत नाही कैलासवासी गंगाधरपंत याचा पुत्र आणविला आहे म्हणून तुम्ही लिहिले तरी परिणाम होईल तो कलेल तूर्त सर्व समते राजश्री फतेसिंग बावा याचे भेटीस जात आहेत त्याचा विचार कलेल मग फौजा यमाजीपंत याजवर रवाना करून माघारे सातारियासी येणार यैसा विचार आहे आम्ही माहाराजाजवल अर्जास व विनंती करावयास अंतर केले नाही हे विनंती.

यादी प्रा॥ सनगे घेऊन पा

पैका पाठवून देतो.

---

१ पत्रापाठीमागें राणोजी घोरपडे सेनापतीचा वाटोळा शिक्का आहे.

लेखांक ८३ माहे डिसेंबर इ. स. १७५०

चि. दं. रुमाल नं. १४

श्री रामोजयती*

राजश्री सवाई इंब्रडी सदासिव नाईक
सोंधे गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री
उपरी पूर्वी पासून ते संस्छान स्वराज्यांग ऐसे मानून स्वल्पमात्र नियत जाला होता तितकीयाचवरी संस्छानचे आजपर्यंत चालवावयास अंतर जाले नाही ऐसे असता तुम्हापासून कालोचित होऊ लागली बाक्या ठेऊ लागला मनस्वी सोडी घेतल्या सध्या मबलगा बाकी तुम्हाकडे तगली आहे याकरिता संस्छान राजश्री बालाजी पंडित प्रधान त्याकडे दिल्हे त्यास हाली तुम्ही विनंती सांगोन पाठविली कीं संस्छान हुजूरचे हुजूर ठेवावे म्हणजे संस्छानच्या आयुर्दायाप्रमाणे पोख्ता नूतन तह करून देऊन सुरलीत वर्तणुकेस अंतर पडणार नाही म्हणून व तुमचे विनंती प्रमाणे चिरंजीव राजश्री मुरारराब घोरपडे वजारतमाब याणी ही विनंती केली याकरिता पंडित प्रधान याकडील अमल दूर करून हुजूर ठेविला आहे तरी तुम्हाकडील मातबर हुजूर पाठविणे संस्छानचे जमाबंदी माफिक उतर प्रांतीच्या वलवटीयाप्रमाणे वाजबी तह करून हुजूरचे हेजीबाचे पदरी यैवज घालीत जाणे.

" सोंधे बिद्रूर व सावनूरास
येणेप्रो राजपत्रे तयार जाली आहेत."

लेखांक ८४ तारीख ८-१-१७५१

चि. द. रु. नं. ८

श्री रामोजयती

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कासीराव नीलकंठ कृतानेक विज्ञापना ताा छ २० सफर पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे आमचे वर्तमान तरी करवीरवासी राजश्री स्वामी याचा आमचा पेच पडोन आज्ञा घेऊन निघोन आलो तीर्थरूप कैलासवासी रावयाही राज्यात सेवा चाकऱ्या बहुतच केल्या त्या सर्व स्वामीस विदितच आहेत त्या प्रमाणे आमचा थाक लागून आमचा सांभाल करावा हे भूषण स्वामीचे आहे राजश्री स्वामी व आपण सांगोल्यास गेला तेसमई सर्व राज्याचा बंदोबस्त आपण केला

*(पत्राचे आरंभीं माथ्यावर डाव्या बाजूस खालील शेरा आहे.)

आम्ही त्यासमयी हाजीर नव्हतो त्यास आमची नेमणूक व उभयता चिरंजीव आमचे धाकटे भाऊ याच्या नेमणुका केल्या त्या स्वामीस विदितच आहेत तरी साहेबी आम्हावरी कृपा करून आमचा सांभाल होये वडिलाच्या नावलौकिका प्रमाणे लाऊन आमचा सांभाल होये ते करावया स्वामी समर्थ आहेत आमच्या उभयेता चिरंजिवाच्या थाकाविशी आज्ञा करून थाक उत्तमप्रकारे लाऊन दिल्हा पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

माहे मार्च इ. स. १७५१

लेखांक ८५

चि. द. रु. नं. ४

श्री निवास

श्रीमंत राजश्री बाबा स्वामीचे

सेवेसी

पोष्य केशवराव रघुनाथ कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष आलीकडे बहुत दिवस जाले स्वामीकडील पत्र येऊन परामृश न जाला यास्तव चित सापेक्षित आहे तर सदैव पत्री सांभाल करावयास आपण वडील आहेत येथील अभिप्राय सर्व विदित होतच आहे आपणाकडील उतर प्रति उतर कर्जाचे प्रसंगाचे समर्पक न आले म्हणून श्रेष्ठ श्लेषेंकरून बोलतात आणि रघोजीबावा मधी येतील म्हणून पुसतात तेही येणार आहेत आलियावर सर्व ब्रम्ह बाहेर पडेल विदित होये राजश्री मुरारराव याकडील पत्रे आली आहेत तो भाव मनसबियाचे अभिप्रायाचा अर्थ श्रीमंताचे पत्री तपसिले लिहिला आहे तो आपण ध्यानास आणून त्याप्रमाणे रा॥ वजारतमाब याचे साहित्य अगत्यरूप करावे यैसे आहे स्वामीचे वचनही आहे यास्तव लिहिले असे विदित होये राजश्री स्वामी करवीरवासी याणी आम्हास सावणूरच्या यैवजी वरात दिली होती त्यास तेथे माणूस बहुत दिवस त्याणी ठेऊन घेऊन निदानी आपला येत्न नाही ताकीदपत्र श्रीमंताचे आलियाविना रुपये पावणार नाहीत म्हणून त्याणी उतर लिहिले आहे यैसीयास परभारेच प्रयोजन परंतु देणे हेच स्वामीचे आणि नरगुंदास जाता स्वामीचे वचन ही त्या स्वारीचे कर्ज वारावयाचे घेतले होते अस्तु. स्वामी जेव्हा कृपा कराल तेव्हा करा तूर्त हे परभारे व्हावयाचे प्रयोजन आहे त्याची वरातच आहे यैवज खर्ची घालून आमचे माणसाचे पदरी साडेबारासे रुपये घाली तसी नवी ताकीद नारोपंतास व शिवरायास श्रीमंताची अगत्य देववावी यांत जे स्वामीचे प्रत्ययास येईल ते निरोपावे वरकड अर्थ चिरंजीव जिवराव विनंती करिता विदित होईल. कृपालोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक ८६ माहे मार्च इ. स. १७५१

चि. द. रु. नं. ४

श्री निवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी आम्ही नरगुंद स्वारीहून आलियावर येथे राजश्री

स्वामी करवीरवासी होते याणी कृपाकरून घोडियास म्हणून वरात आपले यैवजी साडेबारासे रुपयाची देऊन आपला वकील तेथे भगवंतराव म्हणून आहे त्याचे नांवे सनद करून देऊन गेले यास्तव माणसे मुजरद पाच सात महिने तेथे होती येविशई स्वामीस विनंती करून स्वामींचे पत्र श्रीमंत राजश्री भाऊसाहेबास घेऊन पाठविले ते पत्र त्यास न पावले त्यापूर्वीच त्याचे आगमन इकडे जाले वरातेचे वर्तमान तेथे राजश्री भाऊ स्वामीस विदित जाहाले परंतु ते समई कृपा करून ताकीद न केली यैवज्ञ पर-भारे त्याणी देविला वरात तेथे लाविली आहे सारांश आम्ही स्वामींचे पदरचे असे असता इतके निमित्य वरात त्याणी दिली हेच होऊन यैवज आम्हास पावलिया त्या स्वारीत कर्ज जाहाले आहे त्या पैकी कांहीं फिटेल उरल्यास स्वामीस मागेच जातेसमई विनंति केली होती जेव्हा स्वामी कृपा कराल तेव्हा भार स्वामींचे चरणास आहे परंतु सध्या नारोपंतास पत्र येक व भगवंतरायास कीं वराते प्रमाणे बारासे रुपयाचा निकाल करून यैवज केशवरायाच्या माणसांचे पदरी घालणे इतके पत्र जालियाने तो यैवज येतो वराते प्रमाणे त्याचे यैवजी वजा येतात सेवकाचे प्रयोजन सहजात होते यात स्वामींचे खातर मुदारकेस येईल ते निरोपावे. येविशई चिरंजीव राजश्री जीवराव विनंती करिता विदित होईल. हे विंनंती.

लेखांक ८७ तारीख २–५–१७५१

चि. द. रु. नं. ८

श्री

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याणी राजभान्य राजश्री बालाजी बाजीराऊ पंडित प्रधान यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत ज्ञाहला आपणास स्वस्थळास जाणे म्हणून अवकृपा करून आज्ञापत्र सादर केले त्यास आज्ञे प्रमाणे स्वस्थळास जाऊ सेवकाचे चितात राज्यनादे ऐसे करावे संशयामुळे अंतरे पडली असतील ती दूर करवावी असे होते परंतु अवकृपा धरिली याजउपर सेवकावरी शेब्द नाही म्हणून लिहिले ऐसीयासी तुम्हास स्वस्थळास जाणे म्हणून लिहिले ते अवकृपेने लिहिले नाही पूर्वीप्रमाणे तुमचे तालुकियाच्या कार-

भारास कारभारी तुमचा ठेवावा त्याने पूर्ववत प्रमाणे धंदा करावा मातबर कार्य लागेल तेव्हा हुजूर तुम्हास बोलवावे ऐसे चालत आले त्याप्रमाणे चितात अर्थ आणून लिहिले होते तुम्ही संशय चितात आणिला त्यास जो जो कार्यभाग तुम्ही योजिला असेल तो कराल्च आजी शन्मास परीघ पडिलाच आहे मुख्य साहेबाच्या चितात तुम्हाविसी दुसरा अर्थ नाही तुम्हास उचित असेल ते सुखरूप करणे जाणिजे १६ जमादिलाखर बहुत काये लिहिणे. सूज्ञ असा.

लेखांक ८८ तारीख ६-९-१७५१

जमाव दप्तर

रु. नं. ५६

श्री

राजश्री बालाजी पंडि-
त प्रधान यासी

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाई साहेब उपरी साहेब पुणेहून निघाले-पासून आपले पत्र येऊन कुषलोत्तर न कलता चित सापेक्षित असे ऐसे न करता निरंतर पत्री साहेबास संतोषबीत असावे आम्ही आजी चतुर्दसीस कृष्णापार होऊन करवीरासी गेलो राजश्री शेषो नारायेण छ मारी आपणाकडून आले आपले संतोषाचा अर्थ कितेक सांगितला तेणेकरून परम हरखात्कर्षे चितासी जाहला आपण साहेबाचे आप्तच आहा साहेबाचे बरे लवकिका साजिरे आपल्यास श्रेयस्कर असेल तेच आपण आचेरतील राजश्री बाजी वासूदेव आपल्या निरोपाप्रमाणे शेवा उतमत केली सांप्रत मारनिलेसी आज्ञा देऊन पाठऊन दिल्हे आहे सविस्तर वर्तमान याच्या मुखे करून आवगत होईल.. जाणिजे र।। छ २६ माहे शौवाल बहुत लिहिणे तरी सूज्ञ आसां

चवथा

बार वाडा मोर्त

ब सुद

लेखांक ८९ इ. स. १७५१

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. ३३७

पु।। राजश्री नाना स्वामी गों-
सावी यास

विनंती उपरी राजेश्री फतेसिंग बावानी राजश्री त्रिंबक हरि याची उभारणी करुन चव्हाणाच्या उपमर्दास पाठविले ते येऊन मौजे कुर्दवाड प्रा रायबाग राजश्री राणोजी घोरपडे सेनापति याचा गाव तेथे राहिले आहेत त्यास आमचे पदरी होते तेव्हा या प्रांतामधे मामला होता प्रस्तुत काही बहाना करून मुलुकात उपसर्ग द्यावा त्यास कोठे फतेसिंगबावाचे नांवे घासदाणा कोठे मिरजकर राऊत आणिले आहेत त्याच्या नांवे करून रोखे करणार सरंजाम सेनापतीचा त्यामधे आमचे गाव वतन देशमुखी सरदेशमुखी रोखे फिरोन गावकरी टाकितील ते स्वारीस धावतील तेव्हा सेनापति व आम्ही येकच आहो आडवे व्हावे लागेल हे गोष्टीचा विचार जे कर्तव्य ते केला पाहिजे चव्हाणाचा उपमर्द दूर आहे परंतु सध्या आपणास दरबारी जाबसालाचे संकट पडेल यास्तव आगोधर सूचना लिहिली आहे हे विनंती.

लेखांक ९० तारीख २५–१२–१७५२

चि. द. रु. नं. १

श्री रामचंद्र

पा छ ५ माहे
रबिलावल

तीर्थरूप राजश्री दादा वडि-
लाचे सेवेसी

अपत्ये कृष्णराये चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १८ सफर पर्यंत वडिलांचे आसीर्वाद करून बालकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष या प्रांतीचे वर्तमान तरी धणियाचा व सिरालेकर याचा कजिया लागला होता त्यास प्रस्तुत विवेक जाहला मिरजकर याचा हर्शामर्श अद्यापवर लागला आहे अंगारक याणे दाहा हजार जमाव पावेतो भगवंतगडी जाहला आहे मतलब कांहीं कलत नाही मातुश्रीकडे कांही संदर्भ आहे येसे दिसते आम्ही आपली स्थले रक्षून आहो अलीकडे मिरजकर व आबाजी घाटगे याचे युद्ध जाहले इकडील मोड होऊन दहावीस घोडी नेली व दाहावीस माणूस मारिले ऐसे वर्तमान आले आहे तिकडील शह निवारण करून आम्हाकडे फौजसुधा यावे येसा मनसबा आहे होईल वृत्त ते वरचेवर सेवेसी लि॥ पाठवू इकडील साद्यंत मजकूर राजश्री भास्करपंत वडिलाकडे गेले त्याणी सविस्तर विदित केलेच असेल. कृपा पूर्ण असावी हे विज्ञापना.

लेखांक ९१ तारीख २६–१२–१७५२

चि. द. रु. नं. २३

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री
आईसाहेब साहेबाचे सेवेसी

अपत्ये समान पार्वतीने दोनी कर जोडून सां विज्ञापना ता छ १९ मोहरमपर्यंत साहेबाचे कृपाअवलोकने वर्तमान येथास्थित असे विशेष करवीरवासी राजश्री स्वामी वडगावास आले जमा भारी केला याचा विस्तार सेवेसी विनंती पत्र पाठविले आहे त्यावरून विदित जाहलेच असेल प्रस्तुत इसलामपूर पर्यंत येऊन दोन गावचे पाटील घेऊन गेले मिरज प्रांती येक स्वारी करून त्यासी युध्य करून फौजेचा गाहा करून नदीपार होऊन अलीकडे येणार कराडपर्यंत धुंद करणार यैसा विचार केला आहे र॥ उदाजी चव्हाण याचा पुत्र चाकर ठेविला चिकोडीकर र॥ राणोजी घोरपडे व दौलतराऊ घोरपडे यास पत्रे पाठविली आहेत यैसा उत्पात आरंभिला आहे लौकिकांत निमित्यास आमचे नांव परंतु अंतरभाव निरालाच आहे थोरात सेनापतीस त्याजकडे गेले यैस वर्तमान आहे येविसी विदित व्हावयानिमित्य विनंती पत्र लि॥ आहे याचा विचार मिरजकर यासी साहेबी आज्ञापत्र सादर केलिया ते व आम्ही मिलोन बहादरवाडीवर उतरोन शाह देऊ त्यामुले झुंज जाहाले तरी झुंजावे नाहीतर शाह दिल्हेने तहावर पडेल यासी साहेबी काये आज्ञा ती केली पाहिजे त्याप्रमाणे वर्तणूक करू सरदार खासा फौजेचे व कांहीं खर्चाचे साहित्य कृपालू होऊन केले पाहिजे ठाणीठुणी साहेबाची जतन होऊन मुलाचे उर्जित करणार धणी समर्थ आसा केवल आम्ही कांहीं बेवर्तणूक केली नाही सर्वानी आम्हावरी करबंदी केली स्वामीनी मुलावरी नजर देऊन थोरातास कुमक न द्यावी तहास अंतर न करावा म्हणून विनंती पत्रे पाठविली परंतु द्रव्यावर नजर देऊन अमान्य केले पुढेहि करितील म्हणून येक स्वारी करून चार हजार रु॥ घेतले साहेबी आज्ञापत्र पाठविलेवरी स्वारी मना केली त्याणी निमित्य ठेवून चितातील येकप्रकार विचार करून हा मजकूर केला आहे कोणकोणाचे खेल काये आहे न कले याचा विचार साहेबी मनास आणून काये ती आज्ञा केली पाहिजे फौजेच साहित्य करावे साहेबाचे पुण्ये करून विल्हे लागेल र॥ सुभानजी सूर्यवंशी आहे यास आज्ञा करून निरोप दिल्हा पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

लेखांक ९२ तारीख २६-१-१७५३

श्री

चि. द. रु. नं. १४

श्रीमंत राजश्री पंत प्र-

धान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक हरि राम साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत छ २० रबिलावल जाणून स्वामीचे कृपे करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे यानंतर छ २८ सफरचे पत्र गंगातीरचे मुकामीहून पाठविले ते पावोन लेखनार्थ कलो आला अंगारका-कडील व करवीरवासियाच्या संदर्भाचा प्रसंग कितेक विस्तारे लिहिला त्यास येदर्थीचे

प्रत्युतर श्रीमंत राजश्री   तात्या याचे पत्री विषदे लिहिले आहे त्यावरून श्रवण होईल करवीरवासियाच्या बोलीचा अर्थ स्वामीस श्रवणच आहे परंतु खासा स्वारी त्या मनसबियास्तव त्याप्रांते जाहली तेंव्हा याचे चित डावाडूल आहे त्यामध्ये राजश्री बिसाजी नारायण यास त्याणी अतीत्वरेने स्वामीकडे रवाना केले आहेत त्याचा स्वालजाब येई आणि आम्हीही या रानीं आहो तो चलबिचल होऊन राजकारणाची दरज पडो देत नाही याचे तरतुदेत स्वामी तो असतीलच परंतु सूचना लिहिली असे याउपरी बेलगांव प्रांती च्यार दिवस पोट भरायाचे विचारात आहो परंतु फौज थोडकी रान हुशार येक दुसरे जाग्यास गांठ घालून बसल्यांवरहित दबाव बसत नाही यद्यपि बसो म्हटलियाने खर्चाची तरतूद नाही यामध्ये स्वामीचे पुण्येकडून घडेल ते प्रमाण सविस्तर मागाहून सेवेसी लेहून पाठऊन. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

लेखांक ९३   तारीख १५-४-१७५३

चि. द. रुमाल नं. ६

२ पुरवणी

जी रायासी मागती आम्हाकडे पाठविले कायनिमित्य जे आपले स्वहित ते आपणास करणे दुसरा विचार तिलतुल्य नाही येसमई आपणास येश देऊन महद संकटातून काडावे यैसे केवल निखालसपणे सांगितले त्यावरून दूरंदेसीवर नजर देऊन मानमार्ग पाहोन सर्व बोलीचालीचा थेख्तयार त्याजवरी दिल्हा उपरांत त्याणी मातुश्री कडील शोध करणे तो करून घेतला आणि त्रिवर्ग व राजश्री अहिलोजी यादव पांचसे फौजेनिसी माहानवमीचे दिवसी दर्शनास आले आम्ही पुढे संभापूरपर्यंत सामोरे गेलो रंग उतमप्रकारे आला पेठेत आणून जागे ठिकाणे दिली बोली-चाली होणे ते जाली त्रिवर्गांनी श्री संनिध आपले अंतःकरणयुक्त निशा करणे ती केली लडा ठेविला नाही राजश्री येमाजीपंती येसमई या घरचा बहुतक्षा अगत्यवाद धरिला आहे सांगरूल दोन महिने याने आमचे आम्हाकडे करून द्यावे येविसीचा त्याणी खातर-जमा करून द्यावयाचा त्या रीतीने दिल्हा वरकड खेडी सरंजाम वतने सुरलीत करून द्यावयाचा करार करून त्रयोदसी रविवारी आम्हास घेऊन राजदर्शनास गेले सावर्डेचे मुकामी दर्शन जाले नदीपर्यंत माहाराज पुढे आले होते आदर बहुमान उतमप्रकारे करून रसरंगे दर्शन दिल्हे समागमेच वाडियात जाऊन दुस्त[१] ठेवून अर्ज करणे तो करून सवेच आज्ञा घेऊन परखदलेस मुकामास आलो इंदुवारी माहाराज कूच करून करवीरास जावयासी गेले आम्ही सालवणास आलो सनदा पत्रा दिवाणांतून येणे होत्या त्याकरिता राजश्री राम ठाकूर व राजश्र बच्याबा समागमे दिल्हे होते त्यास सांगरूल खेरीज करून वरकड टाणी सरंजाम खेडी आलीकडील प्रसंगांत गेली होती तितके करार होऊन आले

१ (वस्त्रे)

ताकिदी आल्या सेवेसी कळावे म्हणोन लिहिले आहे सांगरुलाविसी त्रिवर्गाची बल्कटी करून घेतली आहे फिकीर नाही विदित असावे या घरचा अगत्यवाद राजश्री येमाणा व येसाजी राम व राजश्री आबाजी बावा याणी बहुतसा धरिला त्यामुले जिदीस गोष्टी पडली होती ती याकडून सुधामत जाली आपणास कलावी म्हणोन सेवटी लिहिली आहे लोकाच्या समजाविसी व कर्जदारी याच्या दंगा पडला आहे तरी वडिली मातुश्रीकडे विनंती करून इकडील दंगा वारे आणि वडिलाचे दर्शन घडे तो विचार करावा.. कृपा करावी हे विज्ञापना.

लेखांक ९४ तारीख १-५-१७५३

चि. द. रु. नं. ८

श्री

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याणी

राजश्री नारायेणराव वेंकटेश घोरपडे यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री अग्नोजी सालोखे हुजूर चाकर यासी तुम्ही आश्रा दिल्हात आणि मौजे मरकटवाडी प्रा मिरज हा गाव हुजूरचा येथील गुरे वळून नेली हे कांहीं तुम्हास उतम नाही तुम्ही व सालोखे राज्यातील सेवक असोन हुजूरची खेडी खराब करावी ये गोष्टीने तुमचे येकनिष्ठेच्या विपर्यास जाहलियाने पुढे श्रेयस्कर पडेल न पड हे चितात आणोन अग्नोजी सालोखे यासी आश्रा न देणे तथापि आश्रा देणे जरूर तर हुजूरचे खासगीचे वाटेस न जात आणि नेली गुरे सोडून देववणे यासी अंतर न करणे जाणिजे छ २६ जा॥खर सु॥ सलास खमसैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे.

मोर्तब
सुद

लेखांक ९५ माहे मे इ.. ज.. १७५३

चि. द.
रुमाल. नं. ७

श्री नाथ परसन

श्रीमंत राजेश्री पंत अमात्य हुकम-
तपनाह गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

श्ने॥ येशवंतराव यादव मोकाम लस्कर तल शाहापूर बेलगांव नजीक आपले कृपेकरून सुखरूप असो

....

आम्हाकडील वृत तो धारवाड पेशवानी घेतले ठाणे बैसविले आहे नारायेणराव घोरपडे ठेविले आहेत बेलगांव घ्यावे तेथेही ठाणे बैसवावे ऐसा बेत आहे

....

वडिलास कलावे म्हणोन लिहिले असे. कृपा असो देणे हे विज्ञापना.

लेखांक ९६ तारीख ११-८-१७५४

रुमाल नं. ५६ (जमाव द्प्तर)

श्री

राजश्री बालाजी पंडित

प्रधान यासी

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाई सो उपरी साहेबाचे आगमन जाहल्यादारम्य आपणाकडील पत्र येऊन वर्तमान न कल्ता चित्र सापेक्षित भासे निरंतर पत्रार्थी संतोषाते पावविले पाहिजे विशेष श्री माहादेवासी स्वारी होऊन देवदर्शन जाहले येथे गुमट बांधावा व ब्राम्हणासी विहिर येक बांधोन द्यावी याप्रो संकल्प केला आहे येथील आमलदारासी आपले पत्र पाहिजे सरकारचा कारखाना चालेल त्यास कांहीं उपद्रव न करिता किरकोली फरमास कांहीं लागले तरी देवून सुरलीत कारखाना चालो देणे म्हणोन पत्र पाठवावे जाणिजे छ २१ माहे शौवाल बहुत लिहिणे तरी सूज्ञ आसा.

लेखन

सीमा

बार

लेखांक ९७ तारीख २०-११-१७५४

चि. द. रु. नं. १४

श्री

सेवेसी हरी राम व विसाजी नारायण कृतानेक सं।। नमस्कार विनंती त।। छ ५ सफर मु।। करवीर जाणवून येथास्थित असे विशेष स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहलो ते दर मजल इचलकर्जीस पौष शुध प्रतिपदेस दाखल जाहलो हे वर्तमान मुख्यास विदित जाहलेवरी येथून राजश्री शेषो नारायण यास आम्हाकडे पाठविले व आज्ञापत्रहि सादर जाहले तेथे आज्ञा जे सडे येऊन दर्शन घेऊन जाणे म्हणऊन लिहिले त्यावरून येथे यावयाचा करार राजश्री मानाजी पायगुडे याचे विचारे जाहला त्यावरून फौज घेऊन राजश्री तात्या व पायगुडे घेऊन द्वितीयेस कागलावरी गेले आम्ही उभयेता येथे आलो दर्शन जाहले स्वामीचे आज्ञे प्रमाणे उभयेता धण्यास विनंती केली त्याउपरी धणी बोलिले कीं राजकारण बहुत दिवस बोलत आहेत परंतु एकही गोष्टी प्रत्ययास येत

नाही त्यास प्रस्तुत येकनिष्ठता दिसोन आली याकरिता आपले तर्फेने ज्या गोष्टी बोलिलो आहो तेणेप्रमाणे निभावणी जाहल्याने तिकडून निभावणीस कोणता विचार हे पुसिल्याउपरी आज्ञे प्रमाणे आम्ही व राजश्री केशवराव लक्ष्मण याणी अर्ज करावयाचा तो करून धण्याच्या चिताची निशा सातारियाचे मुकामी करार जाहला आहे त्याप्रमाणेच निभावणी होईल धण्याकडूनही त्याचप्रमाणे निभावणी व्हावी यैसे बोलिल्या उपरी उतर जाहले कीं भुदरगड व सामानगड हे दोनी किले आपले भाऊ याजकडे आहेत त्याचा आड न घालावा त्याखेरीज बोलिल्या प्रमाणे करार आहे त्या उपरी आम्ही अर्ज केला जे भुदरगड धण्याणी द्यावा तथापि सध्या घडोन न आले तरी पुढे मातबर येऊन अर्ज करितील तेव्हा द्यावा लागेल तेही गोष्ट मान्य न केली त्या उपरी आम्ही उठोन बिराडास आलो मध्यस्ताजवल बहुताप्रकारे सांगितले त्याणी विनंती केली त्याजऊपरी कोपलचा किल्ला याची सनद द्यावी हा करार जाहला हे गोष्टी मान्य न करिता राजकारण तुटते यैसे दिसो लागले तेव्हा मान्य करणे लागले स्वामीची आज्ञा होतीच त्याप्रमाणे भीवगड पारगड व कलानिधी तिनी जाग्याचा सनदा दिल्या समागमे हुजरे देऊन जागे स्वाधीन करितो कोपलची सनद देतो म्हणऊन बोलिली तेणे प्रमाणे सनदा करून घेतल्या या उपरी प्यादे व कारकून आणविले आहेत ते आले म्हणजे किल्यास रवानगी करून राजश्री विसाजी नारायेण देतील जागे हस्तगत जाहल्या उपरी सविस्तर विसाजीपंत व केशवराऊ सेवेसी लिहितील आम्ही निघोन लस्करास गेलो लस्कर घाटाखाली उतरल्या उपरी तिकडील सविस्तर सेवेसी लिहोन पाठवितो जागे क्षेपनिक्षेप देतात. बोली प्रमाणे निभावणी करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञापना.

लेखांक ९८ इ. स. १७५४

चि. द. रु. नं. ६

श्री

राजश्री बालाजीपंत प्रधान
गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ जयराम सांवत भोंसले व रामचंद्र सांवत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राय कलो आला माहामूरखान व॥ हसनखान वस्ती नांदगाव मुरुड याची गलबते दोन व रा॥ बाजी गंगाधर याचे गलबत सलामती मीठ भरून जात होती तेव्हा हिरोजी न॥ तोडवलकर याणी धरली त्यास ताकीद करून गलबते सोडवावी येतद्विसीचे तपसिले लिहिले अशास हिरोजी नाईक पेसजी आम्हाकडेस चाकरीस होता हाली करवीरवासी श्रीमंत माहाराजाकडेस चाकरीस आहे हे वृत आपले

निसबतीचे रायाजी बोरकर आरमारकरी साल गु॥ मालवणी होते त्यास दाखल आहे नाईक मारनिले आम्हाकडील चाकर असते तर गलबते सोडली जाती आम्हास गोसावी याच्या लिहिल्या पेक्षा दुसरे अधिकोतर नव्हते घडीघडी पत्र पाठऊन श्नेहाभिवृधी करीत असिले पाहिजे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक ९९ पौ तारीख १९–१–१७५५.

चि. द. रु. नं. ८

श्री

पा छ ६ रबिलाखर

श्रीमत राजश्री राव अमात्य
हुकुमतपन्हा स्वामीचे सेवेसी

पौ आबाजी नागनाथ स॥ नमस्कार विनंती तदुपरी दया करून पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय श्रवणें हर्षनिर्भर जाहला चवाणाचे साहित्यास य.वे हे गोष्ट उतमात नवती म्हणून तर मिरजकरानी करवीरवासीयाच्या तालुकातीस अतिशईत उपसर्ग केला त्या करिता धण्याची फौज आली त्याबरोबर राजश्री सेनापतीनी आपली फौज पाठविली त्या समागमे आमचेही येणे जाहले मिरजकराने चौकडे धामधूम केले त्याचा विचार स्वामीस परस्परे श्रुत असे सर्वांसी येंदा खेकडे केले ते अवघे येऊन मिलाले धण्याचे मुल्कात अगर कोणासी न छेडिता मिरजकर विचारे राहिल्यानंतर त्याचेही वाटे कोणी जाणार नाहीत बावडेकडील साहित्याविषी निरोपिले त्यास धण्याचे चित्तीं सालवणचा मनसबा करावासा आहे आम्हास सांगोन पाठविले होते हे गोष्ट होणे नाही असे उतर प्रत्युतर केले चवाणास व कागलकरास व आम्हास बावडेहून श्रीमंताचीहि पत्रे आली होती आम्ही चवाणास सर्वांस सांगितले तेही याप्रसंगी स्वामयाकडील आवस्यक धरितात आम्ही या प्रसंगी आहो तो स्वामीचे सेवेसी अंतर होणे नाही आम्ही पदरचे आहो. विशेष काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

लेखांक १०० तारीख १–२–१७५५.

चि. द. रु. नं. ६

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ताा छ १९ रबिलाखर राजश्री अंताजीराव व रामाजीराव विचारे वस्ती वरवडे मालगुंड तालुके खेतवडे माहाल प्रांत राजापुर हे राजश्री तुळाजी आंगरे याजकडे होते

त्याचा याचा नाबनाव याजमुले निघोंन येऊन स्वामीचे पदरात पडावे ऐसे मानस मागे येकवेल त्याणी आपला आप्तविशई आम्हाकडे पाठविला होता येंदा कबिलेसहीत निघोन पनास माणूस भाऊबंद कबिलासुदा मौजे तलवडे घेरा किले बहिरवगड येथे येऊन कावणे घालून राहून आम्हास पत्र पाठविले तेवबजिनस सेवेसी पाठविले आहे त्याजवरून अवगत होईल सारांष वरवडे मालगुंडचे विचारे मर्द माणूस नामांकित सरदार याची जड चांगली जिव्हाल्याचे लोक याचा पहिल्यापासून लौकीक सांप्रत स्वामीच्या पदरी पडावयाची उमेद धरून तिकडील आस्था सोंडोन पनास माणूस भाऊबंद कबिलेसुदा येऊन स्वामीचें आज्ञेची प्रतीक्षा करीत असेत.........पदरी घेणार धनी आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १०१ माहे फेब्रुवारी इ. स. १७५५

चि. द. रुमाल नं. १०

श्री रामचंद्र

पुरवणी राजश्री बालाजी पंडित स्वा-
मी गोसावी यासी

विनंती उपरी आम्हाकडील वर्तमान तरी सौ।। मातुश्री

बाईसाहेब याणी आम्हावरी इतराजी करून विश्वासघाते मौजे सांगरूल व मौजे रासीवडे हे दोनी गावची ठाणी घेतली गाव जालून लुटून पस्त केले याखेरोज आणिखी पाच सात खेडी होती तीहि घेतली त्याविसी आम्ही माहाराजाचे सेवेसी व सौ मातुश्री

बाईसाहेबास विनंती पत्रे दोन तीन मर्तबे लिहोन पाठविली कीं आम्ही आज्ञे प्रो सेवेसी तयार आणि जे साहेब आज्ञा करीत आले त्याप्रो सेवाही करीत आलो अमर्याद वर्तणूक न केली नाहक खेडी घेऊन आमचा उछेद धणियानी न करावा पूर्ववत प्रमाणे चालवावे यैसे लिहीत आलो तथापि पत्राच्या उतराचा अभाव तेथे वरकड विचार कलतच आहे ठाणी व खेडी घेतली या उपरी येक मास मार्ग पाहिला परंतु मातुश्री स आमची करुणा न येता विशेशात्कारे पुढे पारपत्याची योजणा आरंभिली आमचा नातवानीचा प्रसंग या राज्यांत आम्हास कोणाचा आधार नाही वडील त्याच्या राज्यांत गेले त्याच्याही ऊर्जिताचा प्रसंग जो होऊन आला तो आपणास श्रुतच आहे पुढे होणे ते आपणच चितावरी घेऊन अभिमानपूर्वक करितील हा भरोसा वडिलास व आम्हास आहे वडिलास ते प्रांतीं जाऊन दोन वर्षे जाली आम्ही तिलतुल्य धणी याची अवज्ञा न करिता जेसमई जे जे आज्ञा केली ते वंदन करून सेवा करीत असता अकस्मात आमचा सर्वस्वे अपाये केला रासिवडे व सांगरूल या दोनी खेडियावरी आमचे जिनगानी वरकड सरंजाम होता त्यामध्ये मातुश्री

नी कांही बाकी ठेविली नाही दोनी खेडीयाची हे गत जाली बाकी येक दोन ठाणी राहिली त्याच्याही येत्नाची योजणा आरंभिली संकटाचा प्रसंग प्राप्त जाहला तेव्हा राजश्री त्रिंबकपंत यासी पत्रे पाठविली त्याही कागदपत्री कांहीं साहित्य केले त्यावरून हा कालवरी जागे रक्षून आहे आपण दूर प्रांतें स्वारीस गेले आपल्या आगमनाची प्रतीक्षो करीत असता प्रस्तुत आपले आगमन ये प्रांतें जाले पंढरपुरावरी मुकाम आहे यैसे वर्तमान यैकीले त्यावरून बहुत समाधान जाहले पेशजी वडिलावरी यैसे १
येक दोनवेला कजिये पडिले तेप्रसंगी कैलासवासी राजश्री राऊ व राजश्री आपा होते त्याही सर्व प्रकारे या घरचा आगत्यवाद धरून मदत उपराला व खर्चाची बेगमी करून हे घर व जागे जतन केले ते परस्पर आपणास श्रुत आहे तेथे विस्तारे काये लिहिणे? हाली त्याचे जागा आपण आहेत आम्ही केवल निराश्रत पडिलो आहो आपण खेरीज आम्हास कोणाचा आधार आहे यैसे नाही यामागे आपल्या वडिली या घरचे संरक्षण केले आहे त्याप्रमाणे आपण आम्हास सर्वा गोष्टीने पदरी घेऊन आमची स्थले व आम्हास जतन करावे हें उचित आहे येणे करून आपली कृती आहे सौ मातुश्री बाईसाहेब्री आमची सर्वप्रकारे पाटी घेऊन उथापना मांडिली आहे तो अर्थ पत्री लिहिता पुरवत नाही आम्ही येकमास वाट पाहिली खेडी गेली सरंजामास जागा नाही पदरी जमाव व ठाणी आहेत खर्चवेच चालिला पाहिजे याकरिता कसबा कलंबे येथे स्वारी करून दोनतीनसे गुरे आणिली ते गोष्टीची विशमता मातुश्रीनी चितात आणून हाली आपणाकडे आम्हाकडील भरीउभरी लिहोन राजश्री विसाजी नारायेण व शेशो नारायेण पाठविले आहेत म्हणऊन वर्तमान कलो आले त्यावरून आम्हाकडील तपसिले वृतात आपणास कलावा याकरिता विस्तारे जाला मजकूर लिहिला आहे आपण विवेकी आहेत करवीराहून पत्री लेख केला असेल व मुक्ताही कितेक सांगोन पाठविले असेल त्या गोष्टीवरी जावे यैसे नाही जाले वर्तमान येथातथ्य आम्ही तपसिले लिहिले आहे राजश्री विसाजीपंत व राजश्री हरीपंत यासी करवीरवासीयाचा व आमचा विचार सविस्तर मजकूर दखल आहे उभयेतास शफतपूर्वक निराले वाटेने पुसावे सविस्तर श्रुत करितील आम्हास सर्व प्रकारे भरवंसा आपला आहे भिन्नत्व न मानिता वडिली या घरचा अभिमान धरून ज्याप्रकारे साहित्य केले त्याचप्रकारे आपणही जमावानसी व खर्चाविसी साहित्य करून हे वडिलार्जीत संस्थान जतन करावे आम्ही आपणाविरहीत नाही धणी यानी पूर्ववत माया ममता धरून उर्जित करून चालविल्याने त्याच्या पायाविन्न आम्हास दुसरे दैवत काये आहे? याभवे उतम विचार दिसेल तो आपल्या चिती येईल तो करून येशकीर्ती संपादावी. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती हू. हू.

लेखांक १०२ तारीख २३-३-१७५५

चि. द. रु. नं. ६

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ ९ जमादिलाखर पावेतो येथील वर्तमान मुकाम साहागाव स्वामीचे कृपावलोकने करून यथास्थित असे विज्ञापना राजश्री रामाजी माहादेव याजकडून निघाल्याचे अद्यापि पत्र आले नाही दिवसास येक पत्र त्याजकडे पाठवीत असतो इकडील राजकारणी विश्वासराव आदिकरून आपल्या लाखणावर बसोन आमची वाट पाहतात केल्याकरारा प्रमाणे सर्व सिधता जाहाली म्हणतात आम्हाकडून विलंब जाहला पुढेही रामाजीपंत काय करीतील याचा विश्वास येत नाही कन्हाड व सागाव मिलोन पंधरा रोज आमचा मुकाम निरार्थक जाहला हे पंधरा रोज मोठे घातेचे गेले पुढे आखेरी समीप आली कवल घाटमाथा जाऊन मुकाम करून बसतो बावडेकर विशाल-गडकर व कानोजी सिरके आदिकरून आपल्या स्थलास तयार करून ठेविले तिघे मिलोन दोंन हजार व आम्ही महिमतगड हुजरात मिलोन तीन हजार येकूण पाच हजार माणूस तीन हजार फौज तयार करून बसलो आहे सांवतास स्वामीनी पत्र पाठविले ते जासुदा-बराबर रवाना केले ते तीन हजार माणसानसी तयार जाले आमच्या खाली जाण्याची वाट पाहातात म्हणोन त्याची एक दोंन पत्रे मानकरास आली याखेरीज आंगऱ्याची मोकासबाबेचे निरोप येतात तुम्ही खाली येताच आम्ही दोंन हजार माणूस येऊन भेटतो या प्रमाणे या प्रांतीचे वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १०३ पौं तारीख १६-८-१७५५

चि. द. रु. नं. ६

छ ७ जिल्काद

श्री रामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडित ल-
क्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बा·
लाजी पंडित स्वामी गोसावी यासी

पोष्य कृष्णराऊ भगवंत कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथीन कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष राजश्री कृष्णाजी महादेव येथे आल्यानंतर खालील मनसब्याची पहिरवी करणे ते केली आहे राजश्री रामचंद्र सांवत भोसले वाडी-कर याकडे पत्रे पाठविली आहेत त्याची उतरे निश्चयात्मक येतील त्या प्रमाणे विचार करणे तो करू येविसीचे साकल्य वृत्त राजश्री महिपतराव व राजश्री कृष्णाजीपंत याणी आपणास लिहिले आहे त्यावरोन कलो येईल आपल्या लिहिल्यावरून आम्ही कार्यभागाचे ठायी सादरता धरिली आसे होईल कामकाज त्यास अंतर होणार नाही. बहुत काय लिहिणे लोभ असोदीजे हे विनंती. हू हू

लेखांक १०४ पौ तारीख १५-९-१७५५

चि. द. रु. नं. ६

श्री रामचंद्र

छ ८ जिल्हेज

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी
अलंकृत राजमान्य राजश्री सदाशिव
पंडित स्वामी गोसावी यासी

पोष्य कृष्णराव भगवंत कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष राजश्री कृष्णाजी महादेव व राजश्री महिपतराव गांडदी समवेत रवाना केले परंतु पर्जन्य विशेष कार्यभाग तूर्त होणे नाही वरघाटे राहिल्याने उपयोगी नव्हे याजस्तव आपले आज्ञे प्रमाणे आम्हाकडील जमाव समागमे घेऊन खारेपाटणा नजीक दोन कोशावरी मेढा घालून जबरदस्तीने राहिले आहेत येक रोखी शह जाहला यामुले आंगरे याने अवघा जमाव खारेपाटणी जमा करून बल धरिले आहे त्यास भारी फौज आलियाविना स्थले हस्तगत होत नाही येविसीचे साहित्य विशाई उभयता मारनिले याणी पत्रे देऊन रामजी वणजरे व रायाजी संकपाल पाठविले आहेत इकडील साद्यंत वृत निवेदन करितील तो अर्थ ध्यानात आणून भारी फौज व आरमाराचे साहित्य येऊन दो चौ स्थलास शह दिल्यावरी स्वल्प दिवसांत शत्रूचा उपमर्द यथास्थित होईल फौज रवाना करणे ते आंबाघाटाने करावी म्हणजे मानमार्ग पाहोन जिकडे पाहिजे तिकडे आणावया येईल. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. हू हू

लेखांक १०५ तारीख १-१०-१७५५

चि. द. रु. नं. ८

श्री

सेवेसी विज्ञापना ता छ २४ जिल्हेज आणाजी साटम व धोंडो नारायेण व रामजी बेरडे वगैरे लोक रवाना केले होते तेथून मल्कापुरास गेले तेथून काजीरडा घाटमाथा गेले तेथून वासीस गेले तेथे संभाजी राजे याजकडील लोकानी घाट व वाटा बंद केल्या होत्या तेथे शंभर लोकानसी गोरखोजी यादव होता त्याणे द्वाही दिल्ही आणि मागे फिरोन करजवणास आले तेथोन धोंडो नारायेण यास सालवणास पाठवून दिल्हे याउपरी भानसांवत व साबाजी सेणवी स्वामीकडील सालवणाहून करजवणेयास आले आणि आणाजी साटम व लोक यास घेऊन सालवणास गेले तेथे कोंडाजी भोसले व आणाजी परभु व येसवंतराव गाइकवाड जमावसुधा हजार माणसानसी कोलापुराहून सालवनास आले तेथे बोलीचाली करून वरकड जमाव आम्हाकडील सालवणास ठेऊन आणाजी

साटम व धोंडो नारायेण रामजी बेरडा व दादो गणेश यास पनास माणसानसी कोलापुरास घेऊन गेले राजश्रीची भेटी केली बोलीचाली जाहलीया उपरी सिवगड बाजीराव याचा होता तो स्वामीनी घेतला होता तेथे वरकड लोक आम्हाकडील राहिले ते सिवगडास रवाना केले आणि दसजी झेंडा व सटवोजी गाइकवाड हुजरे स्वामीकडील व तुकोजी च्वाण प्यादा आपले जमावातील येसे पत्रे देऊन इकडे रवाना केले आहेत ते व आपला जमाव देऊन बावडेयाची पेठेवरी जाऊन पेठ घ्यावी हा विचार आहे आपला जमाव कोलापूरचा द्यावा व आमचे लोक येसे पाठवावे येसा विचार आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०६ तारीख १०-११-१७५५

चि. द. रु. नं. ६

पौ छ ९ सफर

श्री रामचंद्र

राजश्री जावजी गौली गोसा-
वी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने॥ कृष्णराव भगवंत आमात्य आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे विशेष तुम्हास राजश्री प्रधानपंती फौजसुधा कोकणचे मसलतीस रवाना केले मांगलेवरी येऊन मे॥ केला म्हणोन वर्तमान कलो आले येसीयास फौज आंबेच्याघाटाने उतरावी येसा करार राजश्री खंडोजी माणकर याणी करून आम्हास पत्र लिहिले व परभारे तुम्हासही आंब्याघाटे उतरावे हाच करार लिहिला आहे म्हणून देवरुखाहून पत्रे आली त्यावरून हे पत्र तुम्हास लिहिले असे तरी फौजसुधा तुम्ही मल्कापुरावरून आंब्याघाटे उतरावयाचे करणे राजश्री खंडोजी माणकर मेढयाहून जमावासुधा निघोन लांज्यावरी येणार इकडून राजश्री कृष्णाजी माहादेव व आम्हाकडील जमाव लांज्यावरी जाणार येसा सिधांत जाहाला आहे मागाहून कृष्णाजीपंत याची पत्रे तुम्हास येत आहेत आंब्याघाटे फौज उतरल्याने उपयोगी आहे बावडयाघाटे उतरल्यास येकरोकी शह होतो याकरिता लिहिले असे कदाचित आंब्याघाटे उतराबे याचा आनमानच आसला तरी आणुसकुऱ्याच्या घाटास येणे टाकोटाक पत्रे लिहून इकडेस पाठवणे म्हणजे राजश्री कृष्णाजी माहादेव यास लिहून पाच च्यारसे माणूस आणुसकुऱ्याघाटाखाले रवाना करऊं कोण्या घाटाने उतरता हा सिधांत लिहून सत्वर पाठवणे तदनुसार विचार केला जाईल. र॥ छ ५ सफर बहुत काये लिहिणे.

लेखांक १०७ तारीख ९-१२-१७५५

चि. द. रु. नं. ६

श्री रामचंद्र

राजश्री जावजीराव गौली गो-
सावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ कृष्णराऊ भगवंत अमात्य आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान आवगत होत नाही तरी निरंतर पत्र पाठवून साकल्यार्थ लेखन करून संतोषवीत जाणे यानंतर राजश्री पंतप्रधान याणी तुम्हास राजश्री खंडोजी माणकर याजसमागमे फौजसुधा रवाना केले त्यास तुम्ही मारनिले समागमे येऊन गडी खारेपाटणास मोर्चेबंदी केली गड हस्तगत करावी येविसीची बंदोबस्ती करणे ती केलीच होती त्यास रा॥ रुद्राजी धुलप जमाव व आरमारसुधा येऊन छापा घालावा हा मनोदय होता परंतु ईस्वर इच्छेने व राजश्री प्रधानाचे पुण्ये गनीमास नामोहरम करून रुद्राजी धुलप यासी हस्तगत केले हे व्रत यैकोन समाधान वाटले तुम्ही स्वामी सेवेवर येकनिष्ठ आहा त्याप्रमाणे महद येश आले हे साद्यंत कलले पाहिजे तरी सविस्तर लेहून पा वरकड तुम्ही या घरासी कितेक ममता धरिता येविसीचे कितेक वृत राजश्री विसाजीपंत याही लिहिले त्यावरून संतोष जाहला यैशास या घराणीयासी ममता धरावी हे तुम्हा लोकास उचितच आहे रा॥ छ ५ रबिलावल बहुत काये लिहिणे. +

लेखन
सीमा

लेखांक १०८ तारीख २९-१०-१७५७

चि. द. रु. नं. ६

श्री

सेवेसी विज्ञापना येसीजे राजश्री हैबतराऊ बंडगर अमीरलउमराव यास पत्र कीं खासा स्वारी बाहेर निघाली आहे तरी फौजसुधा सत्वर येऊन पोहचणे म्हणून पत्र द्यावयाची आज्ञा केली पाहिजे

पत्र देणे लिहिणे

छ १५ सफर सु॥ समान खमसैन मया व अलफ.

+ टीप—पत्राचे पाठीमागें डाव्या कोपऱ्यांत डोक्यावर शिक्का अमात्यांचा आहे.

लेखांक १०९ तारीख १५-३-१७५९

चि. द. रु. नं. ६

श्री

पौ छ १५ शाबान
चैत्र सन तिसा

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारो त्र्यंबक मुकाम जंजिरे विजयदुर्ग चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ १५ रजब पर्यंत स्वामीच्या कृपावलोकने करून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष जंजिरे मजकुरी तोफा चांगल्या अनीखी असाव्या याकरिता स्वामीनी करवीरास पत्र लिहून मालवणापैकी तोफा देविल्या त्यास जंजिरे सिंधुदुर्गाहून त्याणी पाच जंबुरे येथे पाठऊन दिले त्याचा फर्मा गोले वजन करून पाहिले

वजन पक्के ये।। जंबुरे

२ प्रा। जंबुरे २ दर गोला वजन ८०।। अदसेर प्रो लांब हात दर १।। प्रो

३ प्रा। दर गोला वजन पक्के ८०।।३ अदसेर तीन टाक प्रो जंबुरे लांबी हात दर १।।। प्रो.

५

सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ११० तारीख १०-६-१७५९

चि. द. रु. नं. ४

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री कृष्णाजी त्र्यंबक स्वा
मी गोसावी यासी

पे।। बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष तुम्ही पत्र छ ८ सवालचे पाठविले ते छ १४ भिनहूस पावले करवीरवासीयाणी सिरोल प्रांती धामधूम करून गुरे ढोरे नेली त्यावरून दोनशे स्वार व हशम सेंभर पाठविले त्या दिवसापासून त्याची स्वारी राहिली लूट नागावा नेला तो मागत असता देत नाही दोन महिने जाले आपले लोकानी दबाव टाकिला कीं आमचा

लूट नागावा देत नाही तर वारणे पलीकडे स्वारी करून त्याजवरून त्याणी जमा केला याजवर येणारसे कलोन आपले स्वारानी आगलिक करून काले व मोहरी येथील दोनसे पावेतो गुरे वलून आणिली याणी हे करावयाचे नव्हते अतःपर ते जमा जाले ते धावतील येविसी आज्ञा करणे ते करावी म्हणोन लिहिले ते कलले ऐशास त्यानी इकड धामधूम केली लूट नागावा केला गाव जालुला यैविसी आम्ही त्याजसी बोलतो त्याजकडील राजश्री सेषो नारायेण यास फजित करितो तुम्हास वारंवार लिहिले कीं तुम्ही आगलीक न करणे ऐसे असता दो गावची तुम्ही गुरे वलून आणिली याजवरून तुमच्या शाहाणपणास काये म्हणावे आमचा शब्द त्याजकडे असता उलटा त्याचा शब्द तुम्ही कसा लाऊन घेतला हे कांहीं शाहाणपणाची रीत नव्हे अतःपर पत्र पावताक्षणी त्याची गुरे त्याच्या गावास पाठवून देणे एक गुरु तफरका होऊ न देणे येक गुरु तफरका जालियास त्याचा जाब तुम्हास करावा लागेल तुम्ही गुरे त्याची दिल्ही असता ते उपद्वाप करितील धामधूम करितील तर मग तसीच तजवीज करणे ते केली जाईल तुम्ही गुरे त्याची गावास पाठवून देणे घडीच्या विलंब न लावणे जाणिजे छ १४ सवाल सु॥ सितैन मया व अलफ बहुत काये लिहिणे

+ पाटिलास जागा राहावयास देणे इतके असता त्या पाटलाने दावा करावा तुम्ही पाठ राखावी हे आज्ञा नव्हती व्यर्थ मागे कजिया लाहान थोर लोकासी वाढविलात आता आज्ञा नसता गुरे आणिली इतुर्थत्व गैरहुकमी कामाची नाही पत्रदर्शनी गुरे माघारे देणे पुढे आपले तर्फेने अंतर न करणे (नउवतर न करणे ?)–आज्ञा होईल ते करावे. छ १४ सवाल हे विनंती

पो छ १६ सवाल जेस्ट वद्य
त्रितीया रविवासर संध्याकाल

लेखांक १११

तारीख ११–१–१७६०

चि. द. रु. नं. ८

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद शेषाद्री कारकून जथे जावजी नाईक जासूद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता छ २१ माहे जमादिलोवल पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष रा उदाजी चव्हाण हिमतबहादर मो तारेख नजीक विजापुर या समागमे याचे पुत्र व रा रताजी चव्हाण हे तिघ मिलोन फौऊज अठरासे आहे मौजे तोरव निमे गाव फकीराकडे होता निमे गाव सरकारात होता त्यासी फकीरा सूत्र करून गाव घेतला हावेली परगणाच तमाम सेते पेडोल व हरभरा कापून व कही भरून सिवार सर्व चारिला

व गावगना रोखे करून राऊत पाठविले आहे जबरदस्तीने कही भरता ती जबरदस्तीने पैका रयते जवळून घेता ती शाहारचे पेठा भारावे त्याप्रमाणे मजकूर आहेत विजापुरचे कमाविसदारानी तमाम देसची रइतची वस्तभाव सर्व किलात आणिले चेव्हाणाचे अंतरयामी हुजूर यावेयाचे नाही करवीरकर श्रीमंत मातोश्री जिजाबाई याजकडिल राजकारण आहे हमेशा कारकून जासूद येताती तिकडे जावयाचे अथःकरण पासून जावे सबब कोलापुराहून रा दामोदर शेलार वडगावचा हिमतबहादर यासी बोलावेयासी आला आहे छ १८ जमादिलावल लस्करात तारेवावरी आला बसालतजेगाकडील सोफीबेगखान विजापुरास सनदा घेऊन येतो गुडगुटे किरणतीरी नजीक तालीकोट येथे जमा जाहला आहे सुरापुरकर बेरड याची व सोफीबेगची भेटी जाहाले तेही फोउज जमा करून विजापुरास येणार आहे सोफीबेगाचे चेव्हाणाचे सूत्र येक आहे सारअवशे मोगलाचे उतकरशे पाहताती बसालतजेंगाकडील पत्र व निजामअलीकडील पत्र येत असता ती चौकडील अर्थतरावरी नजर देऊन हुजूर यावेयाचा दुरबुधी आहे मौजे तारेवात अडीचसे प्यादा घातला जेबरदस्ती केली हुसेनी फकीर मिलाला तोही फकीर कुचेलचा चालक आहे विजापुरकर कमाविसदाराकडील कारकून लस्करात चेव्हाणानी बोलावून आणविले होते त्याजजवल चेव्हाणानी बोलिले कीं मोगलाचा अमलातील बाकी सरकारात अमल जाहला पासून बाकीचा निशा करून देणे म्हणून बोलिला त्यासी कारकूनानी उतर दिले कीं परगणास कऊल देऊन जुजवी लावणी केली आहे किलाचे सिबंदीसी ऐवज पुरत नाही तुम्हास पैका कोठून द्यावा ? श्रीमंतास लिहून पाठवितो त्याचा आज्ञा येईल त्याप्रो निरकत करून देऊ म्हणून विजापुरकरानी बोलिले त्यावरी चेव्हाणानी मुखभक्तीचा भाशेण केले कारकून निघोन शाहरास गेले हावेली परगणात धामधूम फार मांडली आहे रा तुको विनायेक कारकून सरकारचे सेवेसी येथून गेले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ११२

तारीख १६–१–१७६०

चि. द. रु. नं. १४

श्री

पौ छ २५ जा॥खर

सितैन

राजमान्य राजश्री बलवंतराव गणपत यासी श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब याणी आज्ञा केली यैसीजे सु॥ सितैन मया आलफ साहेबी तुम्हा कारणे मकरसंक्रमण प्रयुक्ततिलशर्करा खलिती पाठविली आसे घेऊन स्वीकार करून पावलियाचे प्रत्योतर विनंती पत्री लिहिणे. जाणिजे. र॥ छ २६ जमादिलोवल बहुत काये लिहिणे.

चवथा
वाडा मोर्त
ब सुद

बार

लेखांक ११३ तारीख ५-३-१७६०

चि. द. रु. नं. ८

श्री

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री कृष्णाजी त्रिंबक स्वामी गोसावी यासी
पोष्य बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले
सिराले प्रांत उद्वस जाहला करवीरकासी याचे दीडसे दोनसे प्यादे व दहा वीस राऊत आले ते रा। सिवाजी बलाल याणी वारणेहून कनक व कड्या (कांक ?) आणिल्या आहेत त्या नेऊ लागले याजकरिता गोपालजी भोसले याजकडील सेट्याजी खराडे याणी आम्हाकडील राऊत प्यादे घेऊन गेले त्याची याची कटकट जाली त्याजकडील व इकडील माणसे जाया जाहली आम्हाजवल सरंजाम नाही यास्तव रा। माधवराव यास लिहिले आहे गड्याखेरीज करून मुल्क ओस जाला म्हणून लिहिले ते कलले

राजश्री सिवाजी बल्लाळ याचे वेळू व लाकडे मांगलेकरानी नेली दोनसे जोडी लाऊन नेली त्यास नेऊन द्यावी सिवाजी बलाल याचा शब्द लागेल म्हणोन सरहदेस गेलो समज्यस बोलत असता गोल्या अहिलोजी यादव यानी टाकोन माणसे जखमी केली म्हणोन लि।

सिराले प्रांतीची गुरे नागावा त्याणी नेला असेल तो दबानी माघारा घेणे व त्याचे मुलकातील तुम्ही आणिला असेल तो देणे म्हणून आज्ञा आज्ञेप्रमाणे सिरालियात राऊत गाडदी ठेविले आहेत त्यास ताकीद उपद्रव न करावा ऐसी केली आहे त्यास याचे मुलुकातील नागावा आम्ही आणिला नाही सिराले प्रांतीचे पाच सात गाव लुटून नेले आहेत त्याचा नागावा त्याजवल मागत असता देत नाहीत पाच हजार रुपये मागतात म्हणून लिहिले ते कलले ऐशास तुम्ही तिनी मजकूर लिहिले ते कलले
तुम्ही समंज्यसरीतीने बोलत असता कजिया करितात आगलीक करितात चिंता काये ? तुम्ही मर्यादा करणे ते केलीच स्वार गाडदी तुम्हाकडे पाठविलेच असेत तुम्ही अतःपर मोखबला करणे जाणिजे छ १६ रजब सु।। सितैन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे विनंती.

लेखांक ११४

चि. द. रु. नं. ८

श्री

आशीर्वाद उपरी वाटेगावास मुकाम जाला होता सौ मातुश्री बाईसाहेब करवीराहून पुढे आली त्याच्या भेटी वडगावाहून पुढे ती कोसावर जाल्या तेथून वडगावास आलो छ १०

जमादिलाखरी करवीरास येऊन राजश्री स्वामीचे दर्शन घेतले येथे दोन तीन मुकाम होतील प्रतिपदा द्वितीयेस कूच होईल आपल्यास कलावे यास्तव लिहिले असे छ ११ जमादिलाखर हे आशीर्वाद.

लेखांक ११५

चि. द. रु. नं. ४

श्री

सेवेसी विज्ञाप्ति

राजश्री रघुनाथ देसाई निंबालकर निपाणीकर याजविसी राजश्री राणोजी घोरपडे सेनापति व राजश्री येमाजीपंत चिकुडीकर यासी पेशजी हुजूर आज्ञा होती निपाणीकर व नणदीकर याचे वाटे ना जावे याची वतनदारी सुरलीत चालो द्यावी त्याजकडे गावखेडी चार असतील त्याचे वाटे न जावे त्याजवरून आजीपर्यंत आज्ञे प्रो वर्तले आता मागती स्वारी त्याजवरी करणार राजश्री नारायेणराव घोरपडे यानी तह करून दिला आहे तो मोडणार याकरिता त्यास ताकीदपत्रे जे राजश्री नारायणराव तात्यानी तह करून दिल्हा त्या प्रो वर्तणूक करणे मा।।रनिलेसी कजिया खटखट न करणे मा।।रनिलेच चालवण आवश्यक असे येणे प्रो ताकीद पत्राची आज्ञा पाहिजे.

सूची भाग २

व्यक्तींपुढील आंकडे लेखांकाचे आहेत.



